# अनुक्रमणिका


**4**
अध्यक्षीय– जयंत पाटील
पाणीवाटप व वापराचे फेरनियोजन आवश्यक

**5**
प्रबंध संपादकीय– दिलीप वळसे पाटील
विचारांचा स्वीकार केव्हा होणार!

**6**
संपादकीय– डॉ. सुधीर भोंगळे
नकलाकार वांदरलाल पोपट!

**10**
यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार, भाषणे
१) शरद पवार–१०
२) डॉ. रेणू स्वरूप–१४
३) डॉ. अनिल काकोडकर–१७
४) सुप्रिया सुळे–१९

**24**
सुविचार गौरव पुरस्कार वितरण सोहळा,भाषणे
१) जयंत पाटील–२५
२) छगन भुजबळ–२८

**32**
महाराष्ट्र साहित्य कला प्रसारिणी सभेचा
रौप्यमहोत्सवी वर्ष समारंभ, भाषणे
१) शरद पवार–३२
२) श्रीनिवास पाटील–४०
३) सुशीलकुमार शिंदे–४३
४) मधुकर भावे–४६

**50**
पाच राज्यांचे निकाल व
भारतीय राजकारणाची भावी दिशा
– वसीम अहमद

**58**
कोणता काश्मीर हवा?
– मनाली भिलारे

**60**
कर्मचाऱ्यांना मिळणार विशेष अधिकार
– सुप्रिया सुळे

**62**
हरित हिंदवी स्वराज्य
– प्रा.डॉ. प्रकाश पवार

**70**
राज्यकारभाराचा नवा नमूना :
व्यक्तिस्वातंत्र्यावर वाढते आक्रमण
– अनंत बागाईतकर

**76**
महिलांच्या शिक्षणासाठी जीवन परमात्म्याला
अर्पिणारे महर्षी धोंडो केशव कर्वे
– प्रा.डॉ. गणेश राऊत

**80**
ललित कलेचे आश्रयदाते– राजर्षी शाहू महाराज
– डॉ. जयसिंगराव पवार

**90**
घंटाकर्ण– कानोकानी (राजकीय किस्से)

**100**
भक्ती देवळात नाही आणि मशिदीतही
–सचिन परब

**102**
शेवटचे पान– 'अभिजात'कशाला?
मी हाय तशी बरी हाय
–हेमन्त टकले






**संचालक**
हेमन्त टकले
**प्रबंध संपादक**
दिलीप वळसे पाटील
**संपादक**
डॉ. सुधीर भोंगळे
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.

**संपादकीय पत्रव्यवहार**
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट,
मुंबई-४०० ०३८
०२२-३५३४७४००/०१
**कला निर्देशन**
धनंजय सस्तकर
**मांडणी**
दिलीप रोडे

**वर्गणीचे दर–**
**वार्षिक रु. ५००/–**
**वर्गणीचा धनादेश**
**'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'**
या नावाने काढावा.
**www.ncp.org.in**
यावर मासिक उपलब्ध
**फोटो**
प्रशांत चव्हाण

**मुद्रक, प्रकाशक**
**हेमन्त प्रभाकर टकले यांनी**
**'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.'**
च्या वतीने मीडिया आर अ‍ॅण्ड डी., १३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३, सेक्टर-३,आरएससी-२८, चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७ येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई-४०००२० येथून अंक प्रकाशित केले.

अध्यक्षीय



# पाणीवाटप व वापराचे फेरनियोजन आवश्यक

नदीखोरेनिहाय महाराष्ट्राची विभागणी पाच भागात करता येते. १) कृष्णेचे खोरे, २) गोदावरीचे खोरे, ३) नर्मदा-तापी खोरे, ४) वैनगंगेचे खोरे आणि ५) कोकणातून वाहणाऱ्या २२ पश्चिम वाहिनी नद्या. आपल्या महाराष्ट्राच्या दृष्टीने पाण्याची मुबलक उपलब्धता असलेली दोनच खोरी आहेत ती म्हणजे वैनगंगेचे खोरे आणि कोकणातून वाहणाऱ्या २२ पश्चिम वाहिनी नद्या. कृष्णा आणि गोदावरी या दोन्ही खोऱ्यात मागणी व वापराच्या तुलनेत पाण्याची उपलब्धता कमी आहे. त्यामुळे काही वेळा चणचण व टंचाई जाणवत राहते. त्यामुळे ओढाताण होते आणि पाण्यासाठी संघर्षही निर्माण होताना दिसतो. नर्मदा नदीतले १० टीएमसी पाणी महाराष्ट्राच्या वाट्याला आलेले असले तरी आपण अजून त्याचा पूर्णपणे वापर करू शकलेलो नाही. त्याच्या वापराचे नियोजन आता आपण करतो आहोत आणि धुळे व खानदेशातील जनतेला ते पाणी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने प्रयत्न व विचार चालू आहे. केंद्र सरकारने नेमलेल्या लवादांनी कृष्णा, गोदावरी, तापी या नद्यांमधील पाण्याचे वाटप करून दिलेले आहे. त्यामुळे लवादांच्या निर्णयाप्रमाणेच आपल्याला पाणी अडविण्याचे, साठविण्याचे, वापराचे व इतरत्र वळवून नेण्याचे नियोजन करावे लागते आहे. लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांच्या पाण्यासंबंधीच्या सूचना अगणित व मौल्यवान आणि काही अभ्यासपूर्णही आहेत. पण त्या सर्व सूचना लवादांच्या निर्णयांमुळे जशाच्या तशा स्वीकारता येत नाहीत ही सरकारची अडचण आहे. ती आपण समजून घेतली पाहिजे. यावर मात करण्याच्या दृष्टीनेही काही उपाययोजना आम्ही नव्याने करण्याचे हाती घेतले आहे.

कृष्णा मराठवाडा प्रकल्पासाठी आवश्यक २३.६६ टीएमसी पाण्यापैकी ७ टीएमसी पाणी उपलब्ध आहे. उर्वरित १६.६६ टीएमसी पाणी उपलब्ध कशा प्रकारे करता येईल याबाबत अभ्यास सुरू आहे


टाटा जलविद्युत प्रकल्प समुहातून वीजनिर्मितीनंतर कोकणात सोडण्यात येणारे भिमा खोऱ्याचे ४२. ५० टीएमसी पाणी टप्प्या टप्प्याने कमी करून काही पाणी भिमा खोऱ्यात उपलब्ध करून देता येईल का ? याबाबत सुर्वे समिती गठीत केली असून समितीद्वारे अभ्यास प्रगतीपथावर आहे. सुर्वे समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर याबाबत पुढील निर्णय घेता येईल

वळण बंधाऱ्यांचा वापर करून आपण नाशिक जिल्ह्यात पूर्वेचे पाणी पश्चिमेला आणण्याचा प्रयत्न करत आहोत. त्याला मोठी गती आली आहे. एकुण ३० प्रवाही वळण योजनांद्वारे ७.४ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळवण्याचे नियोजन आहे. या पैकी १४ वळण योजनांची कामे पूर्ण झाली असून त्याद्वारे १.०७ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळण्यात येत आहे. ५ योजनांची कामे विविध टप्प्यावर प्रगतीपथावर असून या योजना जून २३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. उर्वरित ११ प्रवाही योजना भविष्य कालीन आहेत.

तसेच गोदावरी खोऱ्यासाठी इतर नदीजोड योजनाही प्रस्तावित आहे. दमणगंगा-एकदरे-गोदावरी, दमणगंगा-वैतरणा-गोदावरी, पार-गोदावरी अशा व इतर नदीजोड योजनांद्वारे साधारणतः ८९ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळवण्यासाठी आखणी केली आहे. तसेच साधारणतः ११ टीएमसी पाणी तापी(गिरणा) खोऱ्यात वळवणे प्रस्तावित आहे.

वीजनिर्मितीनंतर कोळकेवाडी धरणातून ६७.५ टीएमसी पाणी वशिष्ठी नदीत सोडण्यात येते. यापैकी १७.५ टीएमसी पाणी दक्षिण कोकणात सिंचनासाठी, पिण्याच्या पाण्यासाठी, औद्योगिक क्षेत्रास वापरण्याचे नियोजित आहे. उर्वरित ५० टीएमसी पाणी उत्तर कोकणात वापरणे नियोजित आहे. याबाबतचा अभ्यास वॅपकॉस या संस्थेमार्फत सुरू आहे.

अमरावती विभागातील अनुशेष भरून काढण्यासाठी शासन प्रयत्न करत आहे, शासनाला यात बऱ्यापैकी यश आले आहे. विदर्भ क्षेत्रासाठी मा. राज्यपालांच्या सन २०-२१ च्या निर्देशाप्रमाणे २५.६५५ % निधी वितरित केला जातो. विदर्भातील ८१ % अनुशेष दूर झालेला असून उर्वरित अनुशेष जून २०२४ पर्यंत दूर करण्याचे नियोजन आहे



प्रबंध संपादकीय



# विचारांचा स्वीकार केव्हा होणार!

बौद्ध धर्माचा जाणीवपूर्वक स्वीकार करून ज्यांनी बौद्ध तत्त्वज्ञानाचा स्वतःच्या आचरणातून विशेषतः भारतात मोठ्या प्रमाणावर प्रसार केला व दलित आणि अस्पृश्य मानल्या गेलेल्या समाजामध्ये स्वाभिमान व आत्मभानाची ज्योत प्रज्वलित केली त्या थोर घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १४ एप्रिल रोजी जयंती आहे. विशेष योगायोग असा आहे की याच दिवशी भगवान महावीरांचीही जयंती आहे. बौद्ध धर्म आणि जैन धर्म हे फार प्राचीन पुरातन असे धर्म आहेत. बौद्ध धर्म हा जगातील एकच असा उच्च धर्म आहे, की जो माणसाच्या आत्मनिरीक्षणातून, मानसिक चिंतनातून म्हणजे मानवी प्रज्ञेतून निर्माण झालेला धर्म आहे. गौतम बुद्धाने हा धर्म प्रथम प्रवृत्त केला. गौतम बुद्धाने स्वतःला देवाचा प्रेषित वा देव मानले नाही त्याचप्रमाणे त्याचा धर्म वेदोक्त आहे, असेही स्वतः बुद्ध किंवा त्याचे अनुयायी मानत नाहीत. त्याचप्रमाणे मी सर्वज्ञ, साक्षात्कारी, अंतिम सत्याचा द्रष्टा आहे म्हणून माझा उपदेश श्रद्धापूर्वक स्वीकारा असेही बुद्ध सांगत नाही. तो म्हणतो, की मी अंतिम सर्वश्रेष्ठ सत्य सांगत आहे, परंतु ते सत्य स्वतःच्या विवेकबुद्धीने तपासून घ्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देखील हीच विचारसरणी स्वीकारून आपल्या बांधवांना मी सांगत असलेल्या गोष्टी चांगली भट्टी लावून तपासून घ्या, आंधळेपणाने काहीही स्वीकार करू नका असे स्पष्टपणे बजावलं होतं. समाजातल्या अनिष्ठ चालिरीती, प्रथा, परंपरा, अस्पृश्यता, भेदाभेद, उच्च-निचपणा, मनुस्मृतीतली तत्त्वे या सर्वांविरुद्ध आंबेडकरांनी आयुष्यभर संघर्ष केला. त्यासाठी फार मोठी किंमत त्यांना मोजावीही लागली. परंतु त्यांनी त्याची कधी तमा बाळगली नाही. परदेशात जावून उच्च विद्याविभूषित झालेले डॉ. आंबेडकर हे आयुष्यभर देशाच्या विकासाची व गोरगरिब जनतेच्या उद्धाराचीच चिंता वाहात राहिले.

हिंदु धर्माप्रमाणेच जैन धर्म हा सनातन धर्म आहे कारण जैन धर्माचे उपदेशक तिर्थंकर यांची परंपरा अनादिकालापासून चालू आहे, अशी या धर्माची श्रद्धा आहे. ते मोक्षमार्ग दाखवितात. सम्यक् दर्शन, सम्यक् ज्ञान व सम्यक् चारित्र्य या तिनांचा समुच्चय हा मोक्ष मार्ग होय. सम्यक् दर्शन म्हणजे सत्यावर श्रद्धा. ही श्रद्धा जीवात स्वाभाविक असते. किंवा उपदेशाने निर्माण होते. अशी श्रद्धा असेल तरच सम्यक् म्हणजे पूर्ण सत्याचा साक्षात्कार होतो. परंतु नुसती श्रद्धा असून उपयोगी नाही. त्याला चारित्र्याची जोड पाहिजे. चारित्र्य म्हणजे अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रम्हचर्य आणि अपरिग्रह या महाव्रतांचे आणि शरीरक्लेशकारक कठोर तपाचे आचरण. त्याच्या योगाने जे कैवल्य म्हणजे मोक्ष प्राप्त करून घेतात आणि सर्वज्ञ बनतात असे तिर्थंकर धर्मोपदेश करतात. मागचा तिर्थंकर पुढच्या पिढ्यांना उपदेश करतो; पुढच्या पिढीत तिर्थंकर त्यानंतरच्या पिढ्यांना उपदेश करतो; अशा रितीने अनादि कालापासून तिर्थंकरांची परंपरा चालू असून असे तिर्थंकर एकंदरीत वर्धमान महावीरांपर्यंत २४ झाले आहेत. तिर्थंकर म्हणजे संसार सागरातून तारून नेणारे साधन निर्माण करणारा. वृषभ देवापासून महावीरापर्यंत जे २४ तिर्थंकर झाले आहेत त्यापैकी पार्श्वनाथ आणि वर्धमान महावीर यांचे ऐतिहासिक अस्तित्व मान्य झाले आहे. पार्श्वनाथ हा २३ वा तिर्थंकर २२ व्या नैमिनाथ अरिष्टनेमि या तिर्थंकाराचा शिष्य होय. वर्धमान महावीराचे पिता सिद्धार्थ व माता त्रिशला हे पार्श्वनाथाचे उपासक जैनच होते. बिहारमधील वैशाली जवळच्या कुंडग्राम या गावात महावीराचा जन्म झाला. महावीराने वयाच्या ३० व्या वर्षी श्रमणदीक्षा घेतली. दीक्षेनंतर १३ महिन्यांनी तो नग्न स्थितीत राहू लागला. १२ वर्षे तप आचरले व केवली बनला. केवली म्हणजे सर्वज्ञ. ७२ व्या वर्षी त्याचे पावा या गावी निर्वाण झाले. दिगंबर मताप्रमाणे इ.स.पू. ५०९ हे निर्वाणाचे वर्ष. श्वेतांबरमध्ये इ.स.पू. ५२७ हे वर्ष आणि पश्चिमी विद्वानांच्या मते इ.स.पू. ४८० हे वर्ष महावीराच्या निर्वाणाचे वर्ष मानले आहे. महावीर जैन धर्माचा प्रथम संस्थापक नव्हे पण त्याने जैन धर्माला नवीन उजळा दिला. पार्श्वनाथाने अहिंसा, सत्य, अस्तेय आणि अपरिग्रह अशी चार महाव्रते मानली, महावीराने त्यात ब्रम्हचर्य व्रताची भर घातली, असे जैन धर्मग्रथांवरून लक्षात येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भगवान महावीर यांच्या कार्यकर्तृत्वाचा व विचाराचा थोडक्यात धावता आढावा मुद्दाम अशासाठी येथे नमूद केला की, त्यांची या महिन्यात मोठ्या उत्साहाने दोन्ही धर्माचे लोक जयंती साजरी करतील. त्यानिमित्ताने अनेक समारंभांचे आयोजनही होईल. पण त्यांच्या विचारांचे काय? हे सगळे महापुरूष आता आपण सणसमारंभासाठी म्हणून पूजणार आहोत का? आणि त्यांच्या विचारांना तिलांजली देणार आहोत का? याचा गंभीरपणे विचार करण्याची वेळ आलेली आहे. या दोन्ही महापुरुषांचं तत्त्वज्ञान, विचार, यांची कास धरली तरच आपण देश पुढे नेऊ शकतो याची जाणीव सर्वांनी बाळगणं गरजेचं आहे.

संपादकीय



# नकलाकार वांदरलाल पोपट!

वांदरलाल पोपट? कदाचित नव्या पिढीला माहिती नसेल! चिं.वि.जोशी नावाचे एक प्रख्यात विनोदी साहित्यिक महाराष्ट्रात होऊन गेले. त्यांच्या 'स्पष्टवक्तेपणाचे प्रयोग' या विनोदी कथेत त्यांनी एका नकलाकाराला हे नाव वापरलेले आहे. त्यांनी चिमणराव व गुंड्याभाऊ ही दोन पात्रे अजरामर केली. तर त्या चिं.वि.जोशी यांच्या एका कथेतील या वांदरलाल पोपट या नकलाकाराची आठवण अचानक का यावी असा प्रश्न नक्कीच पडेल. पण करणार काय महाराष्ट्रात सध्या असेच एक वांदरलाल पोपट निरनिराळ्या लोकांच्या, नेत्यांच्या नकला करुन टाळ्या मिळवीत आहेत. नकलाकार, जादूगार, काही गायक किंवा तत्सम कलाकारांना गणेशोत्सव, नवरात्रि उत्सव अशा निमित्ताने त्यांचे प्रयोग करण्यासाठी आमंत्रित केले जात असते. तर हे जे वर्तमान युगातील वांदरलाल पोपट आहेत त्यांचे हे नकलांचे प्रयोग कोणत्या तरी निवडणुका आल्या की तत्काळ सुरु होतात. या प्रयोगांना गर्दीही मोठी होते. परंतु एवढी मेहनत केल्यानंतरही पदरात काही पडेल तर नवलच! निवडणुकीत लोकं मतं मात्र दुसऱ्यांनाच देतात. यांच्या पदरी मतांचा मेहनताना पडतच नाही, मग हात हलवीत हे अदृष्य होतात आणि पुढच्या कोणत्या तरी निवडणुकीच्या वेळी पुन्हा नकलांचे प्रयोग करायला लोकांसमोर हजर होतात. यांचे इंजिन नुसते धूर सोडणारे आहे. हे इंजिन नुसतेच कर्कश्श शिट्ट्या वाजवते. पण जागचे हलतच नाही! एक इंच सुध्दा ते पुढे सरकेल तर शपथ! जसे हे नकलाकार तसेच त्यांचे इंजिन म्हणजे देखील प्रत्यक्ष इंजिनाची प्रतिकृति असावी. प्रत्यक्ष इंजिनाप्रमाणे धूर सोडणे व शिट्टी वाजवण्याचे काम ते करते पण रुळावरुन धावण्याचे काम मात्र या इंजिनाला येत नाही. ते जागीच बसून राहते!

महाराष्ट्रात मुंबई, पुणे अशा महानगरपालिकांच्या निवडणुकांच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. त्यामुळे वांदरलाल पोपट यांचे कार्यक्रम सुरु होणे अपेक्षितच होते. तसे ते सुरु झाले देखील! सध्या हे 'इंजिनदादा' .........! अरे, पुन्हा हसायला काय झालं? अहो, एक लहान मुलांचं गाणं....... बालगीत तुम्हाला आठवत नाही का? ' इंजिनदादा इंजिनदादा, तुम्ही काय करता? डबे मी जोडतो, तुम्हाला नेतो, गावाला जातो नव्या नव्या! पाणी मी पितो, वाफ मी सोडतो.........! कोळसा मी खातो, धूर मी सोडतो..................! वगैरे वगैरे! तर असे हे इंजिनदादा सध्या सांप्रदायिकतेचा कोळसा खाऊन काळा काळा विषारी धूर पुन्हा सोडू लागले आहेत. त्यांच्या ताज्या प्रयोगात त्यांनी मशिदींवरचे भोंगे काढले नाहीत तर आम्ही (ते स्वतः नव्हे, त्यांचे कार्यकर्ते) मशिदींसमोर जाऊन भोंगे लावून हनुमान चालिसाचे पठण करु असा इशारा दिला. मग काय वांदरलाल यांच्या सेनेच्या हातात कोलीतच (इथे आपण भोंगे म्हणू) मिळाले. गुढी पाडवा उर्फ वर्ष प्रतिपदेच्या दिवशीचा मुहुर्त साधून त्यांच्या सेनेने हनुमान चालिसा पठणाचा कार्यक्रम केला. परंतु या प्रकाराची काहीतरी तीव्र प्रतिक्रिया उमटेल अशी त्यांची जी अपेक्षा होती ती धुळीस मिळाली. उलट मुस्लिम समाजाने शांतपणे हा प्रकार सहन करुन परिपक्वतेचे दर्शन घडवले. इंजिनदादांची पण मजा आहे बरं का! त्यांना हनुमान चालिसा आठवला. पण भीमरुपी महारुद्रा स्तोत्र नाही आठवले! म्हणे मराठीचा अभिमान!

या वांदरलाल पोपट यांना ही प्रेरणा कोठून मिळाली असावी? सध्या त्यांचे प्रेरणास्थान इंद्रदेव आहेत. दिल्ली-महाराष्ट्रातल्या इंद्रांकडून ते सध्या ऊर्जा प्राप्त करीत आहेत. देशात विकास व प्रगतीच्या आधारे राजकारण करण्याऐवजी धार्मिक ध्रुवीकरण, सांप्रदायिकता, नकली-नाटकी व प्रदर्शनी राष्ट्रभक्ति आणि त्याद्वारे उन्मादी वातावरण निर्माण करुन त्यावर आपल्या राजकीय स्वार्थाच्या पोळ्या भाजण्याचे राजकारण यशस्वीरीत्या राबवले जात आहे. तोंडी लावायला विकास व प्रगती पण मुख्य आहार सांप्रदायिकता आणि कट्टर धार्मिकता व धार्मिक ध्रुवीकरणाचा असा हा राजकारणाचा नवा नमूना सध्या देशाच्या नेतृत्वाकडून प्रचलित केला गेला आहे. अनेक गोष्टींचे अनुकरण आणि नकला करणाऱ्यांना हा एक सोपा मार्ग सापडला. सध्या तर राजकीय बेकारी चालू आहेच आणि बुडत्याला काडीचा आधार घ्यावा लागतो. आताच्या दिवसात 'राष्ट्रीय आयाराम-गयाराम सुपरफास्ट एक्सप्रेस' नावाची एक लांबलचक गाडी फार लोकप्रिय आहे. आता त्या गाडीत हे

महाशय चढले आहेत आणि जागा मिळते का म्हणून शोधाशोध सुरु आहे. काही दलालांनी जागा मिळवून देतो म्हणून मधाचे बोट लावलेले आहे. त्यामुळे आता त्यासाठी जी भलावण करावी लागते ते काम सुरु करण्यात आले आहे.

महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार आहे. हे सरकार अजुन पडत कसे नाही हा घोर भाजपला पडलेला आहे. त्यांच्या पाळीव माध्यमांद्वारे रोजच्यारोज बातम्या पेरण्याचे काम सुरु आहे. आज काय तर म्हणे राज्याच्या गृहमंत्र्यांवर शिवसेना नाराज! ते अतिमवाळ असल्याची शिवसेनेची तक्रार! फारशी राजकीय बुध्दी नसलेल्या आणि केवळ सुतावरुन स्वर्ग गाठणाऱ्या उथळ माध्यमांना हे सूत सापडले की स्वर्ग गाठायचाच असतो आणि मग गृहमंत्रीपद शिवसेना स्वतःकडे घेणार येथपर्यंत यांच्या राजकीय अकलेची घोडदौड चालू होते. अर्थात ही जी (अप)प्रचारमोहिम असते ती 'प्रायोजित', 'पुरस्कृत' आणि 'उपकृत' असते. संबंधित माध्यमांना विविध प्रकारे 'उपकृत' केल्यानंतर आपल्या 'धन्या'ला जागणे हे




त्यांचे इतिकर्तव्यच होऊन जाते. परंतु महाविकास आघाडीचे सरकार आपल्या एकट्याच्या प्रयत्नाने पडत नाही असे समजून चुकल्यानंतर कुणाची तरी मदत घ्यावीच लागणार ना! तसा सध्या आऊटसोर्सिंगचा जमाना असल्याने मग भाजपने तूर्तास इंजिनदादांकडे महाविकास आघाडीवर ताशेरे झाडण्याचे काम 'आऊटसोर्स' केलेले दिसते. त्यानुसार इंजिनदादांनी धूर ओकायला आणि शिट्ट्या वाजवायला सुरुवात केलेली आहे. त्याचा भाग म्हणून त्यांनी हिंदू-मुस्लिम कार्ड खेळण्यास सुरुवात केली. हाही भाजपच्या अनुकरणाचाच भाग आहे. पण येथे इंजिनदादांचे दुर्दैव आड आले. त्यांच्याच पक्षातल्या अनेक स्थानिक नेत्यांनी त्यांच्या मुस्लिमविरोधी सुरात सूर मिळवण्यास साफ नकार दिला. असले प्रकार आम्ही करणार नाही असे त्यांनी स्पष्ट केले. आपल्या मतदारसंघात मुस्लिम मतदारांची लक्षणीय संख्या व प्रमाण आहे आणि त्यांची मतेही आपल्याला मिळत असल्याने आपण त्यांच्या भावना दुखावणाऱ्या गोष्टी करणार नाही असे या मंडळींनी इंजिनदादांना बजावले. यांच्या पक्षात असलेल्या मुस्लिम कार्यकर्त्यांनी तर पक्षातून बाहेर पडण्याचीही तयारी केल्याचे समजले. त्यामुळे एकप्रकारे त्यांचे हे राणा भीमदेवी थाटातले भाषण त्यांच्या अंगाशी आल्याचेच दिसून येत आहे. शेवटी अनुकरण हे अनुकरण असते आणि त्याची मूळ गोष्टीशी तुलना होऊ शकत नसते.

नकला या नकलाच असतात, अनुकरण हे अनुकरणच असते व मूळ गोष्ट ही मूळचीच असते. 'ओरिजिनल ते ओरिजिनल' नाही का? परंतु हा फरक ज्यांच्या बुध्दीला कळत नाही किंवा त्यांच्या बुध्दीलाच झेपत नसेल त्यांना काय समजावणार?

इंजिनदादांनी आतापर्यंत हिंदू-मुस्लिम, मराठी विरुध्द अमराठी आणि महाराष्ट्रातील भूमिपुत्र विरुध्द परप्रांतीय अशा मुद्यांवर महाराष्ट्रात आपल्या राजकारणाची गुढी उभारण्याचे प्रयत्न केले. परंतु त्यावर त्यांना अपेक्षित यश मिळाले नाही. मुळातच असले तोड-फोडीचे मुद्दे घेऊन राजकारण करणे हे अखूड बुध्दीचे लक्षण आहे. भूमिपुत्रांना न्याय मिळाला पाहिजे ही शास्त्रशुध्द भूमिका आहे. परंतु त्यासाठी परप्रांतीयांना लाथा घालणे हा विशुध्द वेडेपणा आणि अशास्त्रीय विचार झाला. या मर्यादित व संकुचित विचाराला मतदारांचा प्रतिसाद मिळू शकला नाही. स्वतः मुंबईत सुरक्षित ढोलीत रहायचे आणि परप्रांतीयांच्या नावाने बोटे मोडणे हा भेकडपणा आहे. असंख्य मराठी मंडळी परदेशात राहतात आणि भारतातल्या अनेक परप्रांतात रहातात. तेथे त्यांच्या विरोधात कुणी असल्या भेकड घोषणा करीत नाहीत. आपण महाराष्ट्रात परप्रांतीयांना धमक्या दिल्यानंतर परप्रांतात राहणाऱ्या मराठी मंडळींना संभाव्य उपद्रवाचा धोका उत्पन्न करतो हे मुंबईच्या ढोलीत राहून कुईकुई करणाऱ्यांना कळणार कसे? एकदा परप्रांतात जाण्याची हिंमत दाखवा आणि मग वल्गना करा ना!

आपल्या गल्लीत सगळेचजण वाघ असतात हो पण एकदा गल्लीबाहेर येऊन तर दाखवा ना? त्यामुळे अशा नकलाकारांचे स्थान किती क्षुल्लक आहे हे कुणाच्याही लक्षात यावे.

गंभीर राजकारण करायचे असेल तर राजकारणाचे गांभीर्य पाळावे व टिकवावे लागते. त्याचप्रमाणे राजकारणात टिकून राहण्यासाठी सातत्याची आवश्यकता असते. निवडणुकांपुरते जागे व्हायचे आणि निवडणुका झाल्यावर पुन्हा अति किंवा दीर्घनिद्रेत जायचे ते पुढच्या निवडणुकीच्या वेळी जागे व्हायचे याला सातत्य म्हणत नाहीत. किंवा एखाद्या मुद्यावर अचानक आवाज उठवायचा आणि मध्येच काही साटेलोटे झाले की गप्प बसायचे याला राजकारण किंवा राजकारणातले सातत्य म्हणत नाहीत. मागे नाही का, टोलच्या मुद्यावरुन फार मोठा गहजब करण्याचा प्रयत्न इंजिनदादांनी केला होता?

पण मध्येच काय झाले कुणास ठाऊक त्यांनी आंदोलन मागेच घेतले. हा अचानक माघारीचा निर्णय का केला याच्याबद्दल अनेक मंडळी कायकाय गोष्टी कानात हळूच बोलत होती आणि कायकाय माहिती देत होती. पण जाऊ द्यात ना, तो इतिहास झाला. सांगायचा मुद्दा हा की असे अधुनमधून जागे होऊन राजकारण करण्याने अपेक्षित यश कधीच मिळणार नाही. त्याचप्रमाणे आपले राजकारण केवळ प्रदेशापुरते मर्यादित ठेवायचे की त्याला व्यापक स्वरुप द्यायचे याचे हिशोब मनाशी पक्के ठेवावे लागतात. मागे इंजिनदादा जेव्हा विश्वप्रिय ब्रह्मांडनायकांच्या विरोधात गेले होते आणि 'लावा रे तो व्हिडिओ' म्हणून भरपूर प्रचार करीत होते तेव्हाची गोष्ट! विरोधी पक्षांच्या राजकारणात त्यांनी भाग घेण्यास सुरुवात केली होती. ते दिल्लीला गेले, सोनिया गांधी आणि इतरही अनेक राष्ट्रीय नेत्यांना भेटले. तेव्हा अशी आशा निर्माण झाली होती की ते व्यापक राजकारणाची तयारी करीत असावेत. परंतु काही दिवसांनी सगळाच फुसका बार ठरला! थोडक्यात स्वतःचीच राजकीय दिशा निश्चित न ठरल्याने भरकटलेल्या पतंगासारखे राजकारण या इंजिनदादांकडून केले जात आहे. त्यामुळे त्यांच्या या प्रयोगांना लोकांची गर्दी होते, लोकं टाळ्यांचा कडकडाट करतात, हंशा-टाळ्या जोरदार होतात परंतु मनोरंजन आणि करमणूक यापलीकडे या प्रयोगांना मतदार किंमत देत नाहीत कारण त्यांना तुमच्यात सातत्याचा पूर्ण अभाव दिसतो. अशा बेभरवश्याच्या राजकीय पक्षावर कशासाठी विश्वास टाकायचा असे त्यांना वाटते. मग तुमच्या प्रयोगाला टाळ्या वाजवून त्यांचे हात इतर पक्षांना मते देण्यासाठी सरसावतात. हाच तुमचा खरा पराभव आहे. याचे गंभीर आकलन जेव्हा होईल तेव्हाच राजकारणातल्या सातत्याचे महात्म्य तुम्हाला पटेल!

महाराष्ट्राशी निगडित प्रदेश पातळीचे राजकारण सुध्दा प्रभावीपणे करणे शक्य आहे. परंतु तशी इच्छाशक्ति असली पाहिजे. तसेच त्यासाठी तर्कसंगत अशा प्रादेशिक मुद्यांवर लक्ष केंद्रित करावे लागेल. इंजिनदादा ज्या कमळाबाईशी लगट करु पहात आहेत त्या कमळाबाईंनी महाराष्ट्राचे आणि मुंबईचे महत्व कमी करण्याचा विडा उचलला आहे. मुंबई व महाराष्ट्रातील अनेक प्रकल्प गुजरातला पळवून नव्हे तर चोरुन नेण्याचे प्रकार दिल्लीतल्या राज्यकर्त्यांनी केले आहेत. त्यांच्याशी इंजिनदादा हातमिळवणी करीत असतील तर महाराष्ट्रद्रोह ठरेल. 'गिफ्ट सिटि' हे त्याचे ढळढळीत उदाहरण आहे. मनमोहनसिंग सरकारच्या काळात आंतरराष्ट्रीय वित्तीय-व्यापार सेवा केंद्राची उभारणी मुंबईत करण्याचे ठरलेले असताना २०१४ मध्ये सत्तेत आल्याआल्या सर्वप्रथम हा प्रकल्प गुजरातला गांधीनगर येथे पळवून नेण्यात आला. त्यावेळी महाराष्ट्रात दिल्लीकरांच्या बगलबच्च्यांचेच सरकार होते. तेव्हा इंजिनदादा कुठे झोपले होते? नॅशनल सिक्युरिटि गार्ड आणि नॅशनल मरीन पोलिस ॲकॅडेमी पालघर येथे उभारण्याची योजना असताना ती पळवून गुजरातमधील द्वारका येथे नेण्यात आली. तेव्हाही इंजिनदादा गप्पच राहिले. एअर इंडिया आणि ट्रेड मार्क पेटंट ऑफिस यांची मुख्य कार्यालये जी गेल्या चाळीस वर्षांपासून मुंबईत असताना आता ती दिल्लीला हलविण्यात आली आहेत. शिप ब्रेकिंग हा मोठा व्यवसाय असतो. त्यासाठी बंदरांजवळ स्वतंत्र जागा दिलेली असते. परंतु मुंबईहून हलवून ही केंद्रे गुजरातला नेण्यात आली. नॅशनल सिक्युरिटि गार्ड आणि नॅशनल मरीन पोलिस अकादमी मुंबईत स्थापन करण्यामागे मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याची(२६-११) पार्श्वभूमि होती. त्यासाठी पालघरमध्ये ३०५ एकर जागाही ताब्यात घेण्यात आली होती. अचानकपणे केंद्रीय गृहमंत्रालयाने एक फतवा जारी करुन हे दोन्ही प्रकल्प गुजरातमध्ये हलविण्याची



घोषणा करुन टाकली. अशी अनेक उदाहरणे देता येतील. परंतु महाराष्ट्राच्या हिताला नख लावणाऱ्या दिल्लीतल्या नतद्रष्ट राज्यकर्त्यांच्या विरोधात इंजिनाची शिट्टी एकदा देखील वाजली नाही. महाराष्ट्राचा समावेश पक्षाच्या नावात केला म्हणजे कुणी महाराष्ट्रप्रेमी होत नाही. दिल्लीतल्या सत्ताधाऱ्यांनी कोंकणात नाणार येथे तेलशुध्दीकरणाचा एक महाकाय प्रकल्प उभारण्याची घोषणा केली आहे. सौदी अरबस्तानमधील आरामको ही कंपनी यामध्ये असेल. अद्याप यावर शिक्कामोर्तब झालेले नाही. आता तेलशुध्दीकरण व तेही महाकाय स्वरुपात होणार म्हणजे या विभागातील प्रदूषणाचे प्रमाण अतोनात वाढणे अपरिहार्य होणार आहे. कोंकण किंवा पश्चिम घाट परिसर हा युनेस्कोने जैवविविधतेसाठीचा म्हणऊन त्यास जागतिक मान्यता दिलेली असताना ती विविधता नष्ट करणारे प्रकल्प कोंकणात स्थापन करण्याचा घाट दिल्लीपति घालत आहे. आता अशा प्रदूषण फैलावणाऱ्या प्रकल्पाला गुजरातमध्ये नेण्याऐवजी महाराष्ट्रात स्थान देण्याचा निर्णय निश्चितच अनुचित म्हणावा लागेल. परंतु याठिकाणीही इंजिनदादांची आठवण झाल्याखेरीज रहात नाही. महाराष्ट्राचे हित ज्यांच्या नसानसात भरलेले आहे त्यांना दिल्लीकरांचे असे सगळे महाराष्ट्रद्वेष्टे आणि महाराष्ट्रविरोधी व महाराष्ट्रद्रोही निर्णय सहन कसे होतात याचे आश्चर्य वाटते. म्हणजेच भाजपप्रमाणेच यांचे महाराष्ट्रप्रेम बेगडी खोटे आहे असे म्हणावे लागेल. अन्यथा यांनी आंदोलनच उभारले असते. उलट आता तर त्या दिल्लीश्वरांबरोबर हातमिळवणी करण्यासाठी इंजिनदादा उतावीळ झाल्याचे चित्र समोर आहे. बिहारमध्ये नीतीशकुमार यांना दिल्लीश्वर कशी वागणूक देतात याचे काही नमूने इंजिनदादांनी प्रत्यक्ष पहावेत म्हणजे त्यांना भाजपबरोबरच्या हातमिळवणीची किंमत काय असते ते कळेल.




अशा इंजिनदादांना आता अचानक असाही साक्षात्कार झालेला आहे की शरद पवार हे फारच जातीयवादी आहेत. ते जातीपातीचे राजकारण करतात. यासंबंधी बोलताना पवार यांनी त्याची फारशी दखल न घेण्याची भूमिका घेतली आणि ती योग्यच आहे. शरद पवार हे राजकारणात गेली पासष्ट वर्षे आहेत. त्यांनी राजकारणाचे सातत्य कधीही सोडलेले नाही. जनतेच्या व सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर भूमिका घेतलेली आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे शरद पवार केवळ निवडणुकीच्या काळातच जागे होत नाहीत आणि निवडणूक झाल्यावर दीर्घनिद्रेत जात नाहीत. ते २४ तास म्हणजेच अखंड जनतेच्या संपर्कात असतात. तोच त्यांच्या दीर्घकालीन राजकारणाचा आधार आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणे राजकारणात अखंडता आणि सातत्य हे दोन घटक महत्वाचे असतात. त्याचबरोबर जनतेच्या प्रश्नांवर जनतेबरोबर संवादही साधायचा असतो. उगाचच नाटकी व अभिनिवेशपूर्ण टाळीबजाव भाषणे करणे म्हणजे राजकारण नव्हे. अनेक प्रसंगात जनतेची टीका, टोमणे सहन करण्याची तयारी ठेवावी लागते. परंतु आपल्या अंगाला काही लागणार नाही अशी काळजी घेत राजकारण होत नाही. राजकारणात पासष्ट वर्षे टिकून राहणे ही चेष्टा नसते. त्यामुळे उगाचच कुणावर टीका करताना भान बाळगण्याचा बहुधा विसर पडला असावा. अर्थात शरद पवार यांनी घेतलेली भूमिकाच योग्य आहे. अशा फुटकळ टीकेची दखल घेण्याची गरज नाही.

इंजिनदादांना एकच सांगणे आहे. प्रथम राजकीय भूमिका निश्चित करा. 'एक ना धड भाराभर चिंध्या' अशी अवस्था होऊ देऊ नका. प्रादेशिक राजकारण करायचे असेल तर प्रादेशिक मुद्दे व समस्यांवर लक्ष केंद्रित करा. राजकारणाला केवळ टाळीबजाव जाहीर सभा हा एकमेव पैलू नसतो. राजकारणाला विविध पैलू असतात. प्रथम त्याचे आकलन करा. आंदोलनावर आधारित राजकारणही असते. आम आदमी पार्टी हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. एका बेगडी व भंपक का होईना परंतु आंदोलनातून त्यांनी पक्षासाठी ताकद मिळवली आणि आज दिल्लीत व त्यानंतर पंजाबसारख्या राज्यात ते राज्यकर्ते झाले आहेत. तुम्ही कितीही स्वयंभू असलात तरी चांगल्या गोष्टी दुसऱ्यांकडून शिकण्याची तयारी ठेवावी लागेल. नुसत्या नकला करुन आणि हंशा-टाळ्या मिळवणे याला गंभीर राजकारण म्हणत नाहीत. त्यामुळे आम आदमी पार्टीकडून तरी काही धडे घ्या! तुमच्याकडे वय आहे, व्यक्तिमत्व आहे, वारसा आहे, वक्तृत्व आहे त्याचा लाभ घेऊन वजनदार व गंभीर राजकारण केलेत तर टिकून रहाल. अन्यथा तुम्हालाही इतिहासजमा व्हावे लागेल!



महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या १०९व्या जयंतीनिमित्त १२ मार्च २०२२ रोजी मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात जैवतंत्रज्ञान विभागाच्या माजी सचिव, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रेणू स्वरूप यांना २०२१चा यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि माजी कृषी मंत्री शरद पवार यांच्यासह मान्यवरांनी केलेल्या भाषणांचा सविस्तर वृत्तांत...



# देशाचा अन्नधान्याचा प्रश्न सोडविण्यात शेतकऱ्यांबरोबर शास्त्रज्ञांचेही योगदान महत्त्वाचे

**शरद पवार**

आज चव्हाण साहेबांची १०९वी जयंती. महाराष्ट्राच्या आणि देशाच्या उभारणीमध्ये ज्यांनी प्रचंड योगदान दिलं, ज्यांनी सामान्य माणसाचा विचार अखंड केला, अशा प्रकारचे दृष्टे आणि कर्तृत्ववान नेतृत्व चव्हाण साहेबांच्या माध्यमातून आपल्याला प्राप्त झालं. ते महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री होते. देशावर संकट आल्याच्यानंतर देशाच्या सीमेचे रक्षण करण्याच्यासाठी हा महाराष्ट्राचा सह्याद्री हिमालयाच्या मदतीला गेला. देशाच्या पातळीवर अनेक जबाबदाऱ्या सांभाळल्या. कधी संरक्षण मंत्र्याची, कधी गृहमंत्री, कधी परराष्ट्र मंत्री, कधी अर्थमंत्री, साधारणत: मंत्रालयातील जे सगळेच महत्त्वाचे विभाग असतात, त्या विभागांचं सारथ्य हे चव्हाण साहेबांनी अनेक वर्षे केलं. आणि हे सगळं करत असताना संसदेमध्ये एकसंघ संसद सदस्य, संसदीय लोकशाहीवर अखंड निष्ठा असणारा सदस्य असं पथ्य पाळून एक प्रकारचा आदर्श त्यांनी देशाच्या संसदेमध्ये निर्माण केला. त्यामुळं साहजिकच आहे, अशा कर्तृत्ववान आणि दृष्ट्या नेतृत्वाचं स्मरण आपण करतो आहोत याचा सार्थ अभिमान आपल्या सगळ्यांना आहे.

चव्हाण साहेबांनी नेहमी काही नवीन विचार देण्याचे प्रयत्न केले. आता यंदाचं चव्हाण प्रतिष्ठानचं जे मॅगझिन आहे, त्याच्यामध्ये नव्या पिढीला काय संदेश द्यायचा याचा चव्हाण साहेबांचा विचार दिलेला आहे. आणि त्यांनी काय म्हणलंय, आपण ज्ञानी व्हावं आणि शहाणेही व्हावं. ज्ञानी आणि शहाणे, या दोन्ही गोष्टी व्हावं. आणि हे सांगत असताना ते म्हणतात, की ज्ञानात आणि शहाणपणात फरक आहे. शास्त्रांचे ज्ञान तत्त्वांच्या दृष्टीने करून घेणे अत्यंत आवश्यक असते. परंतु, त्या ज्ञानाचा समाजजीवनात उपयोग करून घेण्याचं जे शास्त्र आहे. त्याच्यामुळं शहाणपण येतं. आणि म्हणून शहाणपणाचा विचार त्यांनी नेहमी मांडलेला आहे.

मला आनंद आहे, की आज याठिकाणी या देशाच्या बायो टेक्नॉलॉजी डिपार्टमेंटमध्ये फार मोलाची कामगिरी गेली वीस-पंचवीस वर्षे ज्यांनी केली, अशा डॉ. रेणू स्वरूप यांचा आपण याठिकाणी सन्मान करतो आहोत. बायो टेक्नॉलॉजीचं क्षेत्र हे अनेक प्रश्नांची सोडवणूक करण्याच्यासाठी अत्यंत उपयुक्त अशा प्रकारचं क्षेत्र आहे. त्याच्यासंबंधीची विविध मतं आहेत. या देशाच्या अनेक प्रश्नांची गरज भागवण्याच्यासाठी बायो टेक्नॉलॉजीचं सुद्धा मोठं धैर्य आहे. मला आठवतंय, की मी देशाच्या शेती खात्याची जबाबदारी सांभाळली. ज्या दिवशी मी शपथ घेतली, माझ्याकडं दोन विभाग होते, शेती आणि अन्न नागरी पुरवठा. शपथ घेतल्याच्यानंतर मी घरी आलो आणि त्यावेळचे माझे सचिव हे माझ्याकडे फाईल घेऊन आले. त्या फाईलमध्ये प्रस्ताव होता, की या देशात अन्नधान्याची टंचाई आहे आणि म्हणून ब्राझीलवरनं किंवा अमेरिकेवरनं आणि ऑस्ट्रेलियावरनं गहू आयात करायचा आहे. मी अतिशय अस्वस्थ झालो. पहिली फाईल काय, तर परदेशातून धान्य आणायचं. म्हणायचं आपण शेतीप्रधान देश आणि परकीयांच्या अन्नधान्यावर जगायचं ही काय चांगली गोष्ट नाही.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी मला मनमोहनसिंगांचा फोन आला आणि ते मला म्हणाले, की पवारजी, कुछ गेंहू इम्पोर्ट करने का प्रपोजल आप के पास भेजा हैं. अब तुम देखो. मी





सांगितलं, हा मैने देखा हैं. ते म्हणाले, की टॉप की पोझिशन देश की देखी आपने. मी म्हणालो, हाँ देखी. ते म्हणाले, की जल्दी करीये, देर मत किजीये. अन्यथा अनाज की समस्या देश में पैदा हो जायेगी. नाइलाजानं मी सही केली आणि धान्य इम्पोर्ट करायचा हा निर्णय मान्य केला. पण त्याच्यानंतर मी ठरवलं, की काय वाट्टेल ते झालं, तरी या देशाच्या भुकेचा प्रश्न सोडवण्याच्यासाठी भारताच्या बाहेरच्या शेतकऱ्यांवर अवलंबून राहायचं नाही. इथेच प्रश्न सोडवायचा. त्यासाठी कष्टकरी शेतकरी होता. पण, त्या शेतीला विज्ञानाची जोड, त्या शेतीला बायो टेक्नॉलॉजीची सुद्धा जोड याची आवश्यकता होती आणि त्या दृष्टीनं अनेक गोष्टी आम्ही त्या क्षेत्रामध्ये केल्या. त्या दहा वर्षांच्या कालावधीत देशातल्या या सगळ्या वैज्ञानिकांशी अतिशय घनिष्ठ संबंध आले. त्यांच्या माध्यमातून या सगळ्या शेतीच्या संबंधातलं परिवर्तन करायला आम्ही लोकांनी जी पावलं टाकली त्यामुळं आज अन्नधान्याचा प्रश्न हा या देशाचा राहिलेला नाही.





आज भारत जगातला दोन नंबरचा गहू एक्स्पोर्ट करणारा देश झालांय. भारत जगातला एक नंबरचा राईस एक्स्पोर्ट करणारा देश झालांय. अशी अनेक क्षेत्रांत आपण कर्तृत्वं दाखवली आहेत आणि हे सगळं दाखवलं, त्याच्यामागं काळ्या आईशी इमान राखणाऱ्या शेतकऱ्याचं योगदान जसं आहे, तसं विज्ञानावर निष्ठा ठेवणाऱ्या शास्त्रज्ञांचंसुद्धा योगदान फार मोठं आहे. आणि म्हणून आज याठिकाणी शास्त्रज्ञाचा सन्मान होतोय, याचा मला अतिशय मनापासूनचा आनंद होतोय.

कितीतरी गोष्टी सांगता येतील. त्याच्यामध्ये अडथळे आले. अन्नधान्याचं उत्पादन वाढवण्याच्यासाठी जीएमच्या सुद्धा मार्गाचा स्वीकार करण्याची आवश्यकता आहे. पण त्याच्याबाबतीत आपल्याकडं या न्यायालयाच्या माध्यमातून काही तरी अडचणी आल्या. पण ठीक आहे. त्या सगळ्या अडचणींवर आपण मात केली. शास्त्रज्ञांची मदत झाली. नवीन जाती जन्माला आल्या. आणि या सगळ्या प्रश्नांची सोडवणूक झाली. हे काम करण्याच्यासाठी डिपार्टमेंटच्या बायो टेक्नॉलॉजी या संस्थेची मदत शेती उत्पादन वाढवण्याच्यासाठी सुद्धा प्रचंड झालेली आहे. आणि मला आनंद आहे, की त्याचं नेतृत्व डॉ. रेणु स्वरूप या अनेक वर्षे करत होत्या. त्यांच्या आणि त्यांच्या सगळ्या सहकाऱ्यांच्या प्रयत्नांतून आपण आज देशाचं चित्र बदलू शकलो. त्यामुळं विज्ञानाचा पुरस्कार करणारे यशवंतराव चव्हाण, त्यांना विज्ञानाच्यासंबंधी आस्था होती. आणि अशा विज्ञानाच्यासंबंधी आस्था असणाऱ्या व्यक्तिमत्त्वाच्या नावानं पुरस्कार आज त्या विज्ञानाच्या क्षेत्रामध्ये ज्यांनी देशासाठी योगदान दिलं अशा व्यक्तिमत्त्वाला दिला जातोय, याचा आनंद आम्हा सगळ्यांना मनापासूनचा आहे.



मी काय अधिक बोलून आपल्या सगळ्यांचा वेळ घेत नाही. आमचे स्नेही आत्ता याठिकाणी काहीतरी बोलताना मला ५५ वर्षे झाली विधिमंडळात जाऊन याचा उल्लेख केला. त्यांच्या मनात नक्की काय मला माहिती नाही. पण बहुतेक निवृत्तीचा सल्ला मला देतायंत की काय अशी शंका माझ्यासारख्याच्या मनात आली. ठीक आहे. या राज्यातल्या जनतेचं ऋण मी कधी विसरू शकत नाही. ५५ वर्षे झाली ही गोष्ट खरी आहे. या ५५ वर्षामध्ये एक दिवससुद्धा मला सुट्टी दिली नाही. विधानसभा, राज्यसभा, लोकसभा याच्या बाहेर ठेवलं नाही. त्याबद्दल राज्याच्या जनतेच्याबद्दल कृतज्ञ राहणं हे योग्यचं राहील. एवढंच याठिकाणी सांगतो आणि मी माझे दोन शब्द संपवतो. ■■

# तंत्रज्ञान समाजापर्यंत पोहोचविण्यात प्रतिष्ठानसारख्या संस्थांचे मोठे योगदान

**डॉ.रेणू स्वरूप**

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांचा अत्यंत मानाचा समजला जाणारा यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्यानंतर सत्काराला उत्तर देताना भारत सरकारच्या जैवतंत्रज्ञान विभागाच्या सेवानिवृत्त सचिव डॉ. रेणू स्वरूप यांनी केलेले हे भाषण.**

सर्वप्रथम या अतिशय प्रतिष्ठेच्या अशा पुरस्काराने मला सन्मानित करण्यात येत असल्याबद्दल सर्वांचे आभार मानते. हा पुरस्कार स्वीकारणे माझ्यासाठी अतिशय मोठा सन्मान आहे असं मी मानते. यशवंतराव चव्हाण यांच्यासारख्या प्रतिष्ठित आणि सामाजिक-आर्थिक विकासासाठी राष्ट्रीय योगदान दिलेल्या व्यक्तिमत्त्वाच्या नावाने हा पुरस्कार दिला जात आहे. आज हा पुरस्कार स्वीकारताना मला खूप अभिमान वाटत आहे. मला हा पुरस्कार देऊन सन्मानित केल्याबद्दल मन:पूर्वक आभार.

एका महान दिग्गज व्यक्तिमत्त्वाच्या जयंतीनिमित्त तुम्ही हा कार्यक्रम आयोजित करत आहात, हा खरोखरच अभिमानाचा विषय आहे. त्याहीपेक्षा तुमच्या प्रतिष्ठानमार्फत राबविण्यात येणाऱ्या अद्‌भूत उपक्रमांबद्दल ऐकून मी खरोखरच प्रभावित झाले, जे केवळ तुम्ही सुरू केलेत असं नाही, तर तुम्ही हे उपक्रम राज्यभर घेतले आहेत. मॅडमनी सांगितल्याप्रमाणे तुम्ही ज्या व्यक्तींवर लक्ष केंद्रीत केलेले आहे, ती प्रत्येक व्यक्ती सक्षम झाली पाहिजे. मला वाटतं, की तुम्ही ज्याविषयी बोललात त्या वेगवेगळ्या क्षेत्रात प्रतिष्ठान कार्य करत असल्याचे दिसत आहे. मला हेही सांगायला हवं, की ३० वर्षापेक्षाच्या अधिक वर्षांच्या सरकारी सेवेत मला जी संधी मिळाली आहे, त्यात मोठ्या संख्येने कार्यक्रम आणि उपक्रमांशी निगडित राहता आलं हा माझ्यासाठी मोठ्या बहुमान आहे. ज्यामध्ये आपण वैज्ञानिक संशोधन आणि टेक्नॉलॉजीच्या विकासात सक्षम ठरलो. ज्याचा थेट परिणाम समाजावर होतो. आणि तुमच्यासारख्या संस्थांनी हे तंत्रज्ञान समाजापर्यंत पोहोचविण्यात मोलाची भूमिका बजावली आहे.



कारण, तुम्हाला माहिती आहे, की सरकार नवनवीन उपक्रमांसाठी धोरणे विकसित करण्यावर काम करत आहे. सातत्यानं काम करत आहे. सामाजिक-आर्थिक विकास आणि सक्षमीकरणासाठी धोरणे. महिला सक्षमीकरणासाठी धोरणे आणि युवा वर्गाच्या सक्षमीकरणासाठी धोरणे. ज्यामध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञानाशी

संबंधित साधनांच्या सर्व पैलूंचा समावेश आहे. पण, जर आपल्याकडं चांगले कार्यक्रम असतील, तरच या धोरणांची अंमलबजावणी केली जाऊ शकते. आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, असे कार्यक्रम पुढे नेऊ शकतील अशा अद्‌भूत लोकांचा गट तयार करणे. तुमच्यासारख्या संस्था केवळ कार्यक्रम आणि लोकांना पुढे आणत नाहीत तर या तरूणांना, महिलांना पुढे आणण्यासाठी तुम्ही करत असलेले कौशल्यपूर्ण उपक्रम खूप महत्त्वाचे आहेत, असं मला वाटतं.

डॉ. काकोडकर बायरॅकविषयी बोलले आणि मला वाटतं, की ३०-३२ वर्षांच्या माझ्या अचूक शासकीय सेवेत याचा उल्लेख करणे माझ्यासाठी महत्त्वाचे आहे. मला अनेक उपक्रम हाती घेण्याचा आणि त्याचे नेतृत्व करून राबविण्याचा बहुमान मिळाला त्याबद्दल माझ्या मनात समाधानाची भावना आहे. पण, हो बायरॅक हा एक विशेष उपक्रम होता. सर्वात महत्त्वाचे म्हणजे हा उपक्रम पुढे घेऊन जाता राहिलो पाहिजे. आपण फक्त ज्याचे आज घरोघरी नाव झाले आहे ते स्वदेशी आरटीपीसीआर किटच वितरित करू शकलो नाही, तर पण तुमच्यापैकी किती जणांना हे माहित आहे याची मला माहिती नाही, की ज्यावेळी जानेवारी २०२०मध्ये कोविडने शाश्वतपणे आपल्याला तडाखा दिला, आर आणि डी मार्ग विकसित करणाऱ्या पहिल्या काही देशांपैकी प्रत्यक्षात भारतही एक देश होता आणि मला आनंद वाटतो, की फेब्रुवारी २०२०मधील डब्ल्यूएचओच्या बैठकीला माझा विभाग उपस्थित राहू शकला. त्यानंतर आम्हाला जाणीव झाली, की आपण पूर्णपणे परदेशातील आरटीपीसीआर किटस्‌वर अवलंबून आहोत. आम्हाला याचीही जाणीव झाली, की भारतात मोठ्या प्रमाणात या किटस्‌ची आवश्यकता आहे आणि पुरवठा साखळीत व्यत्यय आल्यास आपण ही गरज पूर्ण करू शकणार नाही. २६ मार्च २०२०मध्ये पुणेस्थित मायलॅब या पहिल्या बायोटेक्नॉलॉजी स्टार्टअपला आयसीआर,



**शाल, श्रीफळ आणि धनादेश देऊन डॉ. रेणू स्वरूप यांचा शरद पवार सत्कार करताना. शेजारी डॉ. अनिल काकोडकर, अरुण गुजराथी, हेमंत टकले आणि सुप्रिया सुळे.**

डीसीजीआयकडून पहिल्यांना मंजुरी मिळाली आणि आयसीएमआरने आरटीपीसीआर किटसाठी मान्यता दिली.

आम्हाला याचा अभिमान वाटतो, कारण बायरॅकचा या लॅबला सपोर्ट होता. आम्हाला अतिशय अभिमान वाटतो, कारण त्यांनी अन्य काही आजारांसाठीही आरटीपीसीआर तंत्रज्ञान विकसित केले. तेही कोविडसाठी तातडीने नाविन्यपूर्ण केले. आणि त्यानंतर आमच्या स्टार्टअप्सना हे आव्हान दिले गेले. तुम्हाला आता हे करावे लागेल. स्वदेशी उत्पादन, जेणेकरून आपण जागतिक पातळीवर स्वावलंबी होऊ. हे एक उदाहरण आहे जे आपण ठेवले आहे. ६० दिवसांत आपण प्रतिदिन दहा लाखांपेक्षा अधिक किटस्‌चे उत्पादन घेतो. मला नाही वाटत, की अन्य कोणताही देश हे साध्य करू शकला आला, इकोसिस्टिम तयार करणे आणि त्याचे पालनपोषण करण्यासाठी. एक अशी इकोसिस्टिम, जी स्टार्टअप्स आणि उद्योजकांना पुढे येण्यासाठी मान्यता देते. मात्र, एक अशी इकोसिस्टिमही आहे, जी शिक्षण संस्थांना उद्योगाशी जोडते. आणि ते नंतर आपल्याला तंत्रज्ञानाचे उत्पादनात रुपांतर करण्यास मदत करते किंवा प्रयोगशाळेचे उत्पादनात.

कोविड हा आपल्यासाठी एक आव्हान म्हणून आला आहे. विज्ञानासाठी, अनंतकाळासाठी. एक संधी म्हणूनही तो आला असल्याचे मी मान्य करते. समाजावर, मानवी जीवनावर थेट परिणाम करू शकणारे आपले विज्ञान आणि तंत्रज्ञानाची साधने सक्षम बनविण्यासाठी पुढे घेऊन जाण्याची संधी आपल्याला असेल. भारतात आपण त्याच्यासोबत उभे

आहे आणि बरोबर आहे, की नुकतेच डॉ. काकोडकर यांनी सांगितले, की आपल्याकडे बळकट इकोसिस्टिम आहे. ही इकोसिस्टिम प्रतिसाद देत आहे. आपल्याकडे असे युवा आहेत, की त्यांच्यामध्ये आधीच नाविन्यपूर्णतेची ऊर्जा आहे. वाहून घेण्याचे चैतन्य आहे.

स्वदेशी किटस्, लस, ज्याचे आपल्याकडे सर्वोत्तम उद्योग आहेत आणि मला माहित आहे, की नोव्हेंबरमध्ये तुम्ही सर्वांना डॉ. सायरस पूनावाला यांचा गौरव केला होता. सीरमसह भारत बायोटेकची लस आली आहे आणि आता आपण एकमेव असा देश आहोत, ज्याने तंत्रज्ञानाचे व्यासपीठ समोर आणले आहे. डीएनए ते एमआरएनएपासून नाकातील लसीपर्यंत. अब्जावधीहून अधिक लोकसंख्येला लसीकरण करणे हे तुमच्यासाठी जागतिक स्तरावर सर्वात मोठा लसीकरण कार्यक्रम आहे. हे सांगण्याचं कारण आणि ही कथा तुमच्यासाठी शेअर करण्याचं कारण म्हणजे तुम्ही इकोसिस्टिममध्ये, लोकांमध्ये आणि कार्यक्रमांमध्ये करत सिस्टिममध्ये आणायचे आहेत.

आपण आपल्यासमोर जे लक्ष्य ठेवत आहोत, ते जर पूर्ण करायचे असेल, मॅडम मघाशी तुम्ही १ ट्रिलियन इकॉनॉमीविषयी बोललात, आपण पुढील दोन वर्षांत १५० बिलियन योगदानासह बनलेल्या बायाटेक्नॉलॉजीविषयी बोलत आहोत आणि जागतिक पातळीवर तिसऱ्या सर्वात मोठ्या संस्थेबद्दलही. तुमच्यासह अन्य संस्थांनी आमचे संशोधन सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यात आम्हाला मदत केल्याशिवाय हे साध्य होऊ शकत नाही. जरी आपण स्टार्टअप्सविषयी बोलतो तेव्हा केवळ काठावरच्या तंत्रज्ञानाविषयी नाही, तर लसीविषयी आणि डायग्नोस्टिक्सविषयी बोलतो. आणि हो एका बाजूला पेशी आणि पुनरूज्जीवित औषधे, अॅण्टीबॉडीज् आणि अँटीबायोटिक्सविषयीही. आपण ग्रास रूटवरील तंत्रज्ञानाविषयी बोलत आहोत. ज्याची सर्वसामान्यांसाठी गरज आहे. तुम्ही कृषीमधील नाविन्यपूर्ण उपक्रमांविषयी बोलत असाल, मग ते यंत्रसामग्रीतील नवकल्पना असो किंवा ड्रोन,


अन्न प्रक्रिया उद्योगात जैव तंत्रज्ञानाचा वापर

असलेल्या गुंतवणुकीची ही ताकद आहे. तुमच्या तरूणांना सशक्त बनविण्यासाठी तुम्ही आज काय गुंतवणूक करत आहात आणि जेव्हा मी चर्चा करत होते, तुम्ही कृषी सक्षमीकरणासाठी तुम्ही काय केले याविषयी बोलत होता. तुम्ही कृषी विज्ञान केंद्राबरोबर हे कार्यक्रम बनविले आहेत. अन्न प्रक्रियेसाठी त्यांना सक्षम बनवले आहे. आपल्या देशासाठी ही स्पष्टपणे पुढील क्रांती आहे. ही इकोसिस्टिम काय प्रतिसाद देते आणि पुढील काही वर्षांत या उपक्रमांचे प्रमाण कसे वाढवले जाईल हे तुम्हाला दिसेल. आणि मला वाटते, की ही गुंतवणूक मोठ्या प्रमाणातील लाभांशासह परतावा देईल. कारण आता आपण केवळ दीर्घकाळाचाच विचार करत नाही, तर यापुढे आपल्याला हव्या असलेल्या वाढीव बदलांवर आपले लक्ष असेल. हे असे वेगवान बदल आहेत, जे आपल्याला जे आता बाहेर येत आहेत किंवा तुम्ही तुमच्या बीजारोपणाद्वारे तयार केलेल्या सुधारित बियाण्यांच्या उत्पादनाबद्दल बोलत आहात. विविध कार्यक्रम किंवा उपक्रम, किंवा आम्ही करत असलेल्या जीनोम सिक्वेन्सिंग कृतीद्वारे तुम्ही सुधारित प्राण्यांच्या उत्पादकतेबद्दल बोलत आहात. मात्र, हे तंत्रज्ञान आता युवा स्टार्टअप्सच्या माध्यमातून पुढे नेले जात आहे. आणि माझ्या मते हे फक्त तुम्ही घेतलेल्या विविध कार्यक्रमांच्या माध्यमातूनच जिल्हा स्तरापर्यंत पोहोचले जाऊ शकते. पुन्हा एकदा या सन्मानासाठी मी तुम्हा सर्वांना धन्यवाद देते. आणि तुमच्या प्रतिष्ठानच्या कार्यालाा यश मिळो अशा शुभेच्छा देते.

■■

आज चव्हाण साहेबांची १०९वी जयंती आणि आजच्या दिवशी आपण स्मरण करतो. त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेतो आणि चव्हाण सेंटरनी विविध उपक्रम, खूप चांगले उपक्रम चालवले आहेत आणि त्याची माहिती आपल्याला सुप्रियाताईंनी दिलेलीच आहे. आजच्या दिवसाचं औचित्य साधून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी आजच्या दिवशी राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करत असतो आणि तोच आजच्या कार्यक्रमाचा मुख्य भाग आहे. आता या राष्ट्रीय पुरस्कार कोणाला द्यायचा, याची निवड करण्यासाठी एक समिती आहे आणि त्या समितीवर डॉ. माशेलकर आहेत, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर आहेत. एसएनडीटीच्या माजी कुलगुरू डॉ. रूपा शहा आहेत. नरेंद्र जाधव आहेत. आर्किटेक्ट कादरी आहेत आणि अर्थातच काळे साहेब यांचाही या कार्यक्रमात सहभाग असतो.

आपण देशभरातून वेगळ्या वेगळ्या स्तरावर प्रस्ताव मागवत असतो आणि ही जी निवड समिती आहे, तीसुद्धा आपल्यापरीनं चांगली चांगली नावं सतत शोधत असते. आपण दरवर्षी बघतोय, की अत्यंत नामांकित व्यक्तिमत्त्वांना यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित केलेलं आहे. या मंडळींची यादी जरी बघितली तरी ती एकदम सर्वांना स्फुरण देणारी अशी ती आहे. याच्यामध्ये मार्शल ऑफ इंडियन एअरफोर्स अर्जनसिंग हे प्रत्यक्ष इथे आले होते. रतन टाटा आहेत. अभिजीत बॅनर्जी, रघुराम राजन, जुबीन मेहता आहेत, श्रीधरन आहेत. विजय केळकर आहेत. मागच्या वर्षी आपण डॉ. विवेक सावंत यांना हा पुरस्कार प्रदान केला होता. यावर्षी आपण अर्थातच डॉ. रेणू स्वरूप यांना हा पुरस्कार प्रदान करत आहोत.

डॉ. रेणू स्वरूपांबद्दल अर्थातच त्याचं वाचन होईलच, पण मला असं मुद्दाम सांगावसं वाटतं, की आपल्याकडं सायन्स डिपार्टमेंटस्, केंद्रीय सरकारमध्ये डिपार्टमेंट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी आहे, डिपार्टमेंट ऑफ बायोटेक्नॉलॉजी आहे, सीएसआयआर आहे. आणि अन्य पण सायन्स डिपार्टमेंट आहेत. मिनिस्ट्री ऑफ अर्थ सायन्स आहे, अॅटॉमिक एनर्जी आहे. स्पेस आहे. तर आपल्याकडे हे वैज्ञानिक संस्थांचे खूप मोठं जाळं आणि या प्रत्येक डिपार्टमेंटच्या कितीतरी प्रयोगशाळा, कितीतरी विज्ञान संस्था काम करत असतात. बायोटेक्नॉलॉजीचं महत्त्व आजकालच्या युगात आपण सर्वजण जाणतो. डॉ. रेणू स्वरूप यांनी संबंध ३० वर्षापेक्षा अधिक काळ डिपार्टमेंट ऑफ बायोटेक्नॉलॉजीमध्ये आपलं योगदान दिलं आहे. वेगळ्या वेगळ्या क्षेत्रात त्यांचं योगदान आहे.



# कोविडचा सामना करण्यात बायोटेक्नॉलॉजीची मोठी मदत

डॉ.अनिल काकोडकर

संशोधन आहे. पॉलिसीचं काम आहे. प्रोग्रॅम डेव्हलपमेंटचं काम आहे. पण, मला सर्वात प्रामुख्यानं उल्लेख करावासा वाटतो, तो म्हणजे डिपार्टमेंट ऑफ बायोटेक्नॉलॉजीचं काम एखाद्या कंपनीसारखे चालते. पण त्याचा उद्देश स्टार्टस्अपना, इनोव्हेशनला प्रोत्साहन देणं हा आहे.

याच्यामध्ये एक बायरॅक म्हणून विभाग आहे. बायोटेक्नॉलॉजी इंडस्ट्री रिसर्च असिस्टन्स कौन्सिल. या कौन्सिलची रचना कशी असावी, त्याचं काम कसं असावं याच्यावर बरीच वर्षे विचारविनिमय झाला आणि याचे रचनाकार कोण आहेत, तर त्या डॉ. रेणू स्वरूप आहेत. अर्थातच त्या या बायरॅकच्या पहिल्या मॅनेजिंग डायरेक्टर होत्या. नंतर मग त्या डिपार्टमेंटच्या सेक्रेटरी पदावर त्यांची



पदोन्नती झाली. माझी खात्री आहे, की याबाबत त्या त्यांच्या भाषणात माहिती देतील. पण आजकाल आपण बघतो, की स्टार्टअपसाठी केवढं प्रोत्साहन देतोय आणि तरूण मंडळी खूप पुढे येतायंत. बायरॅकच्या माध्यमातून, म्हणजे तिथं टेक्नॉलॉजी डेव्हलपमेंट बोर्ड आहे, प्रत्येक सायन्स डिपार्टमेंटची त्यादृष्टीनं काही ना काही काम आहे. पण माझ्या मतानुसार, हे माझं वैयक्तिक मत आहे, की बायरॅक ही सर्वात सक्सेसफुल अशी संस्था आहे, की ज्यांनी आजपर्यंत जवळपास पाच हजार स्टार्टअप आणि एक हजार स्मॉल अँड मीडियम एंटरप्रायजेस यांना नवीन टेक्नॉलॉजी, नवीन काम, नवीन प्रोडक्टस् पुढे आणण्यासाठी म्हणून मदत केलेली आहे.

मला असंही वाटतं, की आता आपण गेली दोन वर्षे कोविडचं संकट अनुभवलं आणि आपल्या देशानी कोविडवर मात करण्यासाठी खूप लक्षणीय काम केलेलं आहे. म्हणजे मग ते व्हॅक्सिन शोधाचं असो, व्हॅक्सिनच्या निर्मितीचं असो, कोविडसाठीची औषधं असो, आता आपण आरटीपीसीआर वगैरे म्हणतो, पण या टेक्नॉलॉजीस् राबविण्यासाठी म्हणून ज्या काय पायाभूत सुविधा लागतात, त्याचं एक इकोसिस्टिम, त्याचं बेसिक इन्फ्रास्ट्रक्चर गेली कित्येक वर्षे बायाटेक्नॉलॉजी डिपार्टमेंटच्या माध्यमातनं आपल्या देशात उभं राहात होतं. सरकारी संस्थातनं, प्रायव्हेट कंपन्यांमधनं वगैरे. माझं असं ठाम मत आहे, की आपण कोविडला इतक्या सक्षमपणं मात देऊ शकलो आणि त्याच्यामध्ये प्रत्येक वैज्ञानिकाचं, प्रत्येक संस्थांचं, आपण मागे सीरम इन्स्टिट्यूटचा पण विचार केला होता. पण हे सगळं जे झालं याच्या मुळाशी काय आहे. याच्या पाठीमागं एक मोठी यंत्रणा आहे. एक मोठी साधनं जी देशभर निर्माण करावी लागतात, ती माझ्या मताप्रमाणं बायोटेक्नॉलॉजी डिपार्टमेंट आणि बायरॅकच्या माध्यमातनं प्रामुख्याने, इतरही हातभार आहेत. नाही असं नाही. आणि त्या बायरॅकच्या आर्किटेक्ट डॉ. श्रीमती रेणू स्वरूप. म्हणूनच निवड समितीला असं वाटलं, की यावर्षीचा पुरस्कार हा त्यांना प्रदान करण्यात यावा. अर्थातच निवड समितीची ही सूचना प्रतिष्ठानचे अध्यक्ष माननीय श्री. शरद पवार साहेबांनी मान्य केली आणि आज आपण हा पुरस्कार सोहळा समक्ष बघणार आहोत. मी माझ्यावतीनं डॉ. रेणू स्वरूप यांचं अभिनंदन करू इच्छितो आणि पुरस्कार घेण्याचं तसेच इथं येण्याचं मान्य केलं याबद्दल मी त्यांचं आभारही व्यक्त करतो. धन्यवाद!

■■

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचा विविध उपक्रमांनी कार्यविस्तार

**सुप्रिया सुळे**



वर्षातून दोन वेळा आपण याठिकाणी भेटतो. एक म्हणजे १२ मार्चला चव्हाण साहेबांच्या जयंतीला पुरस्कार प्रदान करण्यासाठी. वर्षातून दोनवेळा आपण पुरस्कार सोहळा आयोजित करतो, त्यामध्ये एक राष्ट्रीय पुरस्कार असतो आणि दुसरं राज्य पुरस्कार देतो २५ नोव्हेंबरला पुण्यतिथीच्या दिवशी. या दोन्ही दिवशी आपण त्यांची आठवण काढतो. हा सोहळा असतो असं मी म्हणू शकत नाही. पण आपण या दोन्ही दिवशी एकत्र जमतो. काकोडकर साहेब यांच्या पुढाकाराने हे दोन्ही कार्यक्रम होतात आणि त्यांच्या नेतृत्वाखाली आपण गेली अनेक वर्षे हे पुरस्कार देत असतो. त्यांचे आपल्याला नेहमीच मार्गदर्शन लाभत असते.

मी थोडंस इंग्रजीमध्ये आणि थोडंसं मराठीमध्ये तुमच्याशी बोलणार आहे. अंबरिश मिश्राजी म्हणाले, की मी वडिलांची मुलगी आहे. कारण आमच्यामध्ये काहीतरी समान आहे. स्वरूप भगिनींच्याबाबतीतही हीच गोष्ट असेल. त्यामुळं मला वाटतं, की तुमच्या वडिलांचीही हीच स्थिती असेल जी माझ्या वडिलांची आहे. कारण तेही घराप्रमाणेच आहेत. कारण तेही महिलांनीच वेढलेले असतात. त्यामुळे त्यांचे निर्णयही सर्वार्थाने त्याच पद्धतीचे असतात. मला खात्री आहे, की तुम्ही तिघी बहिणी आणि पत्नी. ते एकटेच पुरूष आहेत. त्यामुळं काहीवेळा मला प्रश्न पडतो, की तुम्हाला त्यांच्याबद्दल वाईट वाटलं पाहिजे, की आनंद वाटला पाहिजे. कारण, घराबाहेरच्या जगाचे सगळे निर्णय ते घेत असतील. पण जेव्हा ते घरात येतात, मला नाही वाटत, की ते कोणताही निर्णय घेऊ शकत असतील किंवा काहीही जे ते योग्य करतील. मात्र, मला अतिशय आनंद होतोय, की तुम्ही एका अशा कुटुंबातून आला आहात, जे महिलांचा भाग आहे. तिन्ही बहिणी अतिशय सशक्त आहेत. एक महान गृहिणी होती. दुर्दैवाने त्या आज आपल्यामध्ये नाहीयेत. एक बहिण अतिशय निपुण होत्या. याठिकाणी आमच्यासोबत उपस्थित राहिल्याबद्दल तुमची अतिशय आभारी आहे. त्या अनेक वर्षे दीर्घकाळापासून मुंबईत ओएनजीसाठी काम करत आहेत. त्यामुळे त्यांना या सगळ्या परिसराची चांगली माहिती आहे आणि त्यांचे या

शहरावर प्रेम आहे. याच शहरात त्या वाढल्या आणि शहराच्या वाढीतही त्यांनी मदत केली.

आणि हो रेणूजी, त्या उच्चस्थानी आहेत. त्यामुळे या तिन्ही बहिणी कर्तबगार आहेत आणि हो, संरक्षणाचा भाग असलेल्या एका शिस्तीच्या कुटुंबातून त्या आल्या आहेत. त्यामुळे हे एक अतिशय सुशिक्षित कुटुंब आहे. तर आम्ही सर्व ज्या सुरक्षिततेबद्दल बोलतो त्यात तुमच्या वडिलांचे योगदान नक्कीच मोठे असेल. आपण सर्वजण वाढत असताना आणि नंतरही, आणि अशा तीन अद्भूत मुली असतानाही, मला वाटते, की हीच ती वेळ आहे, जिथे आपल्यासारख्या मुलींना पाहून लैंगिक समानता पलिकडे जाते आणि तिथं आपण सर्व सशक्त होतो. तर मला असं वाटतं, की पुढच्या वेळेला जर कोणाला मुलगा किंवा मुलगी असेल, त्याला मुलाचे लिंग काय आहे याचा विचार करण्याची गरज भासणार नाही. म्हणून मला वाटते, की विशेषत: आपल्यासारख्या देशात हे खरोखरच महत्त्वाचं आहे. जिथे लिंगभेद अजूनही अस्तित्वात आहे. त्यामुळे तुमच्यासारख्या आदर्शांना भेटणे खूप महत्त्वाचे आहे.

या कोविडनंतरही आपण जीवंत राहण्याचा आणि बचावाचा प्रयत्न करत आहोत याबद्दल मी खरोखरच आभारी आहे. मला माहिती आहे, की तुम्ही सर्व प्रथमच दिल्लीतून बाहेर पडला आहात. त्यामुळे तुम्हा दोघींचीही मी खूप आभारी आहे, की तुम्ही दोघींनीही हा प्रयत्न केला आणि आमच्या मुंबई शहरात आलात.

आपल्या संस्थेची माहिती थोडी इंग्रजीमध्ये देते. तुम्ही तर दरवर्षी ऐकताच. पण यावेळी दोन वेगळ्या पुस्तिका आपण काढलेल्या आहेत. एकतर आपण एक नवीन वेबसाईट करतोय. कारण तंत्रज्ञान इतकं लवकर बदलतंय, की त्याच्याबरोबर चव्हाण सेंटरनीही त्या वेगानं चाललं पाहिजे याची जाणीव आम्हाला झाली. कारण वेबसाईट अनेक वर्षे आपण चांगल्या पद्धतीनं चालवत होतो. पण इतकं नवीन तंत्रज्ञान दर महिन्यांनी, सहा महिन्यांनी बदलत राहतं. त्यामुळं खूप बदल आम्ही केलेले आहेत. त्याचं उद्घाटन आदरणीय पवार साहेब आज करणार आहेत. पण एक वेगळेपणा या वेबसाईटमध्ये आम्ही तुमच्यासमोर मांडलेला आहे. त्याच्यात शेअर यूवर आयडियाज्. म्हणजे जे जे इथे मेंबर्स आहेत किंवा जो बाहेरचा एखादा देशातला, महाराष्ट्रातला माणूस असेल, त्याला काही चव्हाण सेंटरच्या कुठल्याही कार्यक्रमात सहभागी व्हायचं असेल किंवा सूचना करायच्या असतील, तर त्याच्यात आपल्या सगळ्या वेबसाईटवर आपण एक वेगळा कॉलम केलेला आहे, की एखाद्याला जर आपल्याला,



नाहीतर काय होतं, की वेबसाईटवर बघितलं जातं वन-वे. त्यामुळे प्रत्येकाशी संवाद साधला जाण्याच्या दृष्टीनं प्रत्येकाने आम्हाला त्यांच्या कल्पना कळवाव्यात. आम्ही ही वेबसाईट सुरू करत आहोत आणि प्रत्येकाने यामध्ये सहभागी व्हावं आणि आम्ही काही माहिती द्यावी.

त्याचप्रमाणं आपण यशवंत संवाद म्हणून कार्यक्रम सुरू करतोय. सर्वसाधारणपणे आपण लोकांनी संवाद साधतो.









त्याला आम्ही आणखी परस्पर संवादात्मक बनवत आहोत आणि आमच्याकडे लोकांचा दर दोन महिन्यांचा अहवाल असेल. आम्हाला अधिक परस्परसंवादी, अधिक पारदर्शी व्हायचंय आणि आम्हाला अनेक लोकांपर्यंत पोहोचण्याची इच्छा आहे आणि त्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करायचा आहे. आम्हाला पर्यावरणाचीही जाणीव ठेवायची आहे. त्यामुळे आम्ही त्याचा वापर कमी करण्याचा प्रयत्न करत आहोत. सर्व कामकाज तंत्रज्ञानावर आधारित असेल, मुद्रितवर नसेल. पण आमच्याकडे असे काही सदस्य आहेत, जे तंत्रज्ञानावर आधारित काम करू शकत नाहीत. त्यामुळे अजूनही आम्हाला छपाईवर भर द्यावा लागत आहे. मात्र, मी या मार्गावर जात आहे. त्यांना तंत्रज्ञानाची तितकीशी माहिती नाही. एवढे, की तुम्ही त्यांना व्हॉटस्ॲप पाठवलात, तरी ते म्हणतील, की आम्ही त्यांना आमच्या व्हॉटस्ॲपवर कॉल करावा. व्हॉटस्ॲप पाठवला आहे हे सांगण्यासाठी. त्यामुळं आम्हाला अजूनही अशांना मार्गदर्शनाची गरज आहे. पण हे केवळ २० टक्के छपाईचे काम होत आहे. पण आमची खरोखरच इच्छा अशी आहे, की ही एक पेपरलेस संस्था बनावी आणि तिला एक पर्यावरणपूरक इमारत बनवावी आणि त्यासाठी शक्य ते आम्ही सर्वकाही करत आहोत. आम्हाला पर्यावरणपूरक बनण्याची इच्छा आहे. म्हणून आमचा जवळपास १६ हजार लोकांचा एक गट, जो प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष आमच्याबरोबर राज्यात काही पातळ्यांवर तसेच अन्य ठिकाणांहून काम करत आहे.

आम्ही आमचं काम चार महत्त्वाच्या कार्यक्षेत्रात विस्तारत आहोत. त्यातील एक म्हणजे महिला सशक्तीकरण, एक म्हणजे शैक्षणिक प्रोफाईल, यामध्ये प्रामुख्याने शिक्षणासंबंधी विद्यार्थ्यांशी संवाद, तिसरे म्हणजे मदतीची आवश्यकता असलेले दिव्यांग लोक आणि चौथे क्षेत्र युवांविषयी आहे. नव्या भारतातील युवा वर्ग नवीन तंत्रज्ञानासह

बदलत आहे. संपूर्ण राज्यात आम्ही या चार कार्यक्षेत्रांत काम करत आहोत. त्यासाठी आम्ही २० जिल्हे निवडले आहेत. या वर्षाच्या अखेरपर्यंत आम्ही महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांत हे काम विस्तारणार आहोत. या अंतर्गतच आम्ही पुण्यामध्ये दिव्यांग विवाह सोहळा घेतला. महिला सशक्तीकरणामध्ये आम्ही प्रामुख्याने आर्थिक साक्षरतेवर लक्ष दिले आहे. कारण, मी पाहिले आहे, अनेक महिलांपर्यंत मी पोहोचले आहे, त्यावेळी असं लक्षात आलं, की त्यांना पैसे कसे कमवायचे माहित आहे. पण, त्याची बचत कशी करायची हे माहित नाही. त्यामुळे आर्थिक साक्षरता कार्यक्रमावर मोठ्या प्रमाणात लक्ष केंद्रीत केले जात आहे. निश्चितच नाबार्ड, आमच्या

आहोत. यामध्ये शिक्षकांना फेलोशिप सुरू करणार आहोत. विविध पुरस्कार दिले जातील. मी जास्त वेळ घेऊ इच्छित नाही. पण, आणखी एक मोठा कार्यक्रम आम्ही राबवत आहोत, ज्याविषयी मला बोलायला आवडेल. तो म्हणजे आमचा आरोग्य दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिक कार्यक्रम. हे अतिशय महत्त्वाचे कार्यक्रम आहेत. आमच्यासाठी हे मोठे यश आहे. या देशात हजारो दिव्यांग नागरिकांना मदतीची गरज आहे. त्यांचे त्यांचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी जिल्हा प्रशासनात जाताना मदतीची गरज लागते. केंद्र सरकार आणि महाराष्ट्र सरकारच्या त्यांच्यासंदर्भातील १८ योजना एकत्रित आणल्या आहेत. तुम्हाला त्याचा फायदा मिळतो. पण,




सर्व जिल्हा सहकारी बँका, आम्ही अशा सर्व महिलांबरोबर धनादेश कसा लिहायचा, बँकेत खाते कसे उघडायचे, तुमच्या पैशाचे व्यवस्थापन कसे करायचे, म्युच्युअल फंडस् काय आहे यावर काम करत आहोत. कारण, अनेक लोकांना याविषयी माहिती नाही आणि याविषयी जागरूक नाहीत. बॉण्ड कसे खरेदी करायचे. कोणता बॉण्ड चांगला आहे. त्यामुळे आम्ही याविषयी संघटित करण्याचा प्रयत्न करत आहोत. आम्ही करत असलेला हा एक मोठा कार्यक्रम आहे.

शिक्षणामध्ये आम्ही शिक्षक कार्यप्रणाली कार्यक्रम करत

त्यासाठी तुम्हाला प्रमाणपत्राची गरज असते. हे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी शेकडो मैल प्रवास करावा लागतो. तिथे जायचे, टोकनसाठी प्रतिक्षा करायची, तासन् तास प्रतिक्षा करायची. काही दिवस असे असतात, की तुम्ही हे करू शकत नाही आणि तुम्हाला त्या व्यक्तीला घेऊन जावे लागेल, जो विशेषत: तुमच्याबरोबर आहे. त्यामुळे त्या कुटुंबाला खूप त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे आम्ही यासाठी काम करत आहोत आणि त्यासाठी महाराष्ट्र सरकारला प्रस्ताव सादर केला आहे. प्रत्येक दिव्यांग व्यक्तीला प्रमाणपत्रासाठी

त्याचे घर सोडावे लागणार नाही. त्यांना ते त्यांच्या गावात किंवा सार्वजनिक आरोग्य केंद्रात उपलब्ध करून दिले जाईल. शेवटच्या माणसापर्यंत आम्ही हे काम घेऊन जाणार आहोत. त्यामुळे यासंदर्भातील अधिकार शेवटच्या डॉक्टरपर्यंत दिले जावेत अशी आमची इच्छा आहे, ज्याठिकाणी तो किंवा ती तपासणी करू शकेल, फॉर्ममधील सर्व बॉक्सवर टिक करू शकेल आणि प्रमाणपत्राची प्रिंट काढून २४ तासात त्यांना ते उपलब्ध होईल अशा प्रकारची योजना भारतात असेल. राज्यात आम्ही जवळपास एक लाख लोकांपर्यंत पोहोचलो आहोत आणि येत्या सहा ते आठ महिन्यांत यामध्ये आणखी वाढ करण्याचा प्रयत्न असेल. यासाठी मी राज्याचे आरोग्य



मंत्री राजेश टोपे आणि सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांना धन्यवाद देऊ इच्छिते. हे सर्व एकत्र आणण्यासाठी त्यांनी खरोखरच आम्हाला मोठी मदत केली आहे.

आम्ही सातत्याने नवनवीन उपक्रम राबवत आहोत. त्यासाठी निस्वार्थीपणे काम करणारी चांगली टीम आमच्याकडे आहे. मला वाटते, की यशवंतराव चव्हाण यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी हे काम म्हणजे त्यांना चांगली आदरांजली ठरेल. मला हे सांगताना अतिशय आनंद होतोय, की भारत सरकारच्या आर्थिक सर्व्हेक्षण अहवालानुसार, सर्व इनक्युबेशन आणि स्टार्टअप कार्यक्रमांत महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. तुमच्याबरोबर ही माहिती शेअर करताना मला अतिशय अभिमान वाटत आहे. महाराष्ट्राने अतिशय चांगली कामगिरी केली आहे. आपण आपले अर्थमंत्री श्री. अजित पवार यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात ऐकले असेल की आपला विकासदर १२.१ असा आहे. आपला राष्ट्रीय विकासदर ९.२ असा आहे. सध्या युद्धानंतर काय घडेल हे आपल्याला माहिती नाही. मात्र, महाराष्ट्राने १२.२ टक्के विकासदर गाठला आहे आणि खरोखरच हे एक मोठे यश आहे. यामध्ये योगदान देणाऱ्या तुम्हा सगळ्यांना मी धन्यवाद देते. कारण, हा केवळ सरकारचा विकास नाही. लोक सरकार बनवतात आणि सरकार त्याची अंमलबजावणी करते. त्यामुळे महाराष्ट्राच्या लोकांनी हे उद्दीष्ट साध्य केलेले आहे. एक ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीचे उद्दीष्ठ गाठणारे महाराष्ट्र देशातले पहिले राज्य ठरले आहे. तर हे एक मजबूत राज्य आहे. खरोखरच आम्ही चांगल्या प्रशासनासाठी प्रयत्न करत आहोत. लोकांची जीवनशैली सुधारावी यासाठी चांगले निर्णय घेतले जात आहेत. चव्हाण सेंटर अशा सर्व कार्यक्रमांत सहाय्य करण्यासाठी आमच्या सहकाऱ्यांसोबत काम करत आहे. यामध्ये डॉ. काकोडकर यांचे चांगले मार्गदर्शन लाभत आहे. त्यांनी आम्हाला ती मदत केली त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देते. त्याशिवाय या कोविडच्या संपूर्ण काळात

**बारामती येथे झालेल्या कार्यक्रमात दिव्यांग व अपंग व्यक्तींना तीन चाकी सायकलचे सुप्रिया सुळे यांच्या हस्ते मोफत वाटप करण्यात आले. शेजारी संभाजी होळकर व इतर कार्यकर्ते**

तंत्रज्ञानाचा वापर कसा करायचा आणि शेवटच्या माणसापर्यंत कसे पोहोचायचे याविषयी मार्गदर्शन करणारे डॉ. विवेक सावंत यांचेही मी आभार मानते.

आज तुम्ही सगळे आवर्जुन इथे उपस्थित राहिलात. माझी एवढीच विनंती आहे, की आपण सर्वांनी या वेबसाईटवर जरूर जावं आणि आपल्या फेलोशिप, यशवंत संवाद या दोन्ही पुस्तिका आम्ही तुम्हाला व्हॉटस्‌ॲपवरही पाठवू. पण, वेबसाईटवरही त्या आहेत. त्याच्यात काही सुधारणा असतील तर त्या सुचवाव्यात आणि एक चांगल काम करण्याचं, त्याच्यात सातत्य ठेवण्याचा प्रांजळ प्रयत्न चव्हाण सेंटरची सगळी टीम करतेय. तुमच्या आशीर्वादाने हे काम आम्ही पुढं नेतोय. हा कार्यक्रम म्हणजे नात्यांना उजाळा देण्याचा कार्यक्रम असतो. आपले ऋणानुबंध असेच कायम राहो अशी देवाचरणी प्रार्थना करते. आपण सगळे आलात. तुमचे सर्वांचे मनापासून आभार मानते. जय हिंद! जय महाराष्ट्र!!

■■

# मराठी माणूस आपल्याच माणसाला मोठे करण्यात कमी पडतो

**जयंत पाटील**

नाशिक येथे ५ मार्च २०२२ रोजी आयोजित करण्यात आलेल्या सुविचार गौरव पुरस्कार वितरण सोहळ्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तसेच जलसंपदा मंत्री मा. जयंत पाटील यांनी केलेले हे भाषण.



आपल्या सर्वांना मघाचपासून ज्यांना आपण नेहमी ऐकतो, पडद्यावर पाहतो अशा सर्वांना पाहायची संधी मिळाली. बरंच काही आपण सगळ्यांची मनोगतं ऐकली आणि या सर्वांच्या कलेचा, त्यांच्या प्रतिभेचा सन्मान हा आकाशनी केला. मी चार एक वर्षापूर्वी याच कार्यक्रमाला आलो होतो. असे कार्यक्रम होत असतात आणि कालांतराने ते थांबत असतात. पण, मला आनंद झाला, की चार वर्षापूर्वी पहिल्या कार्यक्रमाला मी आलो होतो, ऑफिसचं लाँचिंग आणि आज आकाशनी आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी ही परंपरा कायम ठेवली आहे आणि सुविचार गौरवचा पुरस्कार मला मिळाला पाहिजे, अशी अपेक्षा किंवा अशी स्पर्धा, अशी इच्छा महाराष्ट्रातल्या तमाम वेगवेगळ्या क्षेत्रातल्या लोकांना झाल्याशिवाय राहणार नाही, एवढा उत्तम कार्यक्रम केलांय. तरीही नानांनी आश्वासन दिलेलं आहे, की हा हॉल लहान पडलेला आहे. आपला शब्द आपण राजकारणी असल्यामुळं पुरा कराल का हा प्रश्न माझ्या मनात आहे. त्यामुळं पुढच्या कार्यक्रमाचे फोटो मला पाठवा.

आपल्या सर्वांना आकाशचं कौतुक केलं पाहिजे. आकाशनं अतिशय कल्पकतेनं हा सुविचार गौरव पुरस्कार चालवलेला आहे. आज अतिशय भव्य असं स्वरूप या कार्यक्रमाचं झालंय आणि व्यासपीठावरच्या दिग्गज कलाकारांना याठिकाणी आणणं हे सुविचारचं यश आहे असं मला वाटतं. दोन वेळा कार्यक्रम पुढं ढकलला आणि दोन्ही वेळा कार्यक्रम पुढं ढकलताना रवींद्र नाना मला म्हणायचे, की साहेब हे काही बरोबर नाही. पण, कोरोनाने आमचे हात बांधले होते. मला आनंद आहे, की कोणतेही आत्ता निर्बंध नसल्यामुळं तुम्हीही याठिकाणी बिनधास्त आलेला आहात. फक्त विचारी लोकांच्या तोंडावर मास्क आहे. बाकी कुणाच्याही चेहऱ्यावर मास्क नाही. आणि आपला तर मास्कचा ब्रॅण्डच आपण केलेला आहे. पण, सिद्धार्थ जाधव यांना फार वर्षे आपण पाहतो. सामान्य घरातला माणूस प्रतिभेनं कुठपर्यंत पोहोचू शकतो याचा आदर्श सिद्धार्थनी घालून दिलेला आहे. आणि दिसण्यावर काही नसतं. कारण, प्रत्येकाचं दिसणं वेगळं असतं. एक माणूस दुसऱ्यासारखा दिसायला लागला तर त्याला जुळं म्हणतात. जुळं फार लोकांना होत नाही. त्यामुळं तुम्हाला जुळं नाहीये ही जगाच्या, पृथ्वीवरच्या पाठीवर एकमेव सिद्धार्थ जाधव आहात.

मराठी माणसं आपल्या माणसाला मोठी करायला कमी पडतो. तुम्ही तामिळनाडूमध्ये जावा, आंध्रमध्ये जावा, तिथल्या स्थानिक भाषेतल्या कलाकारांचं एवढं डोक्यावर घेतात, तिकडच्या भागातल्या लोकांना मुख्यमंत्री करतात. कलेच्या क्षेत्रातल्या लोकांना इथपर्यंत डोक्यावर घेतात, की एखाद्याचं काहीही झालं तर आत्महत्या करणाऱ्यांची संख्या प्रचंड आहे दक्षिणेत. एवढं प्रेम ते त्या कलाकारांच्यावर करतात. आणि त्यामुळं आम्ही मराठी माणसंच सगळं हात राखून, प्रेमही हात राखून, द्वेषही हात राखून, करायचं असेल तर जे काय करू ते मर्यादेत करू. कारण, आपल्याला मर्यादा कायम लक्षात असतात. पण, सिद्धार्थनी मिळवलेलं यश हे प्रचंड मोठं आहे. सिद्धार्थची प्रतिभा एवढी मोठी आहे. आणि आत्ता तुम्हाला काल परवा कोण भेटलं का, तुम्हाला चांगलं नाही म्हणणारं. त्याचं नाव मला सांगा. तुम्ही व्यासपीठावरचे सगळ्यात हॅण्डसम आहात. आणि तुमचे जे केस आहेत आणि त्या केसाचा जो फुगा आहे, या फुग्याला मघाचपासून मला हात लावायचा होता. मला कुतुहल होतं. पण नाशिककर काय





म्हणतील. दोन–चार दिवस त्याच्यावरच लिखाण होईल.

एवढं मोठं ग्लॅमर असूनही तुमचं मन किती निर्मळ आहे. निर्मळतेला आयुष्यात फार महत्त्व आहे. मन ज्याचं निर्मळ असतं त्याला कायम यश मिळतं. स्वच्छ मनानी, खरेपणानी आयुष्यभर चाललात, तर तुम्ही आज जे आहातच तुम्ही, त्याच्यापेक्षा कितीतरी मोठे व्हाल. अशा शुभेच्छा मी मन:पूर्वक तुम्हाला देतो. आपल्यातला कलाकार मराठी रसिकांना नेहमीच आनंद देत राहील.

पूजा सावंत यांचा सिनेमा मी कधी पाहिलेला नाही. सिद्धार्थचा पाहिलेला आहे आणि यापूर्वी मी सिद्धार्थला भेटलेलो आहे फार वर्षापूर्वी आणि त्यांचं एक नाटक मी पाहिलेलं आहे थिएटरमध्ये पूर्ण वेळ बसून. पण, आपली जी काही क्लिप पाहिली, निश्चितच आपण कलेच्या क्षेत्रात विशेष कामगिरी केलेली आहे. तुमचा सन्मान झाला आणि मला खात्री आहे, हिंदीतही तुम्ही काम केलं आहे. त्यामुळे हिंदीतल्या सगळ्या स्पर्धकांना भीती वाटावी एवढी प्रतिभा निश्चितच तुमच्यात आहे आणि त्याला आमच्या शुभेच्छा आहेत. चिन्मय उदगीरकर तर नाशिककरच आहेत. ते उदगीरचेच असावेत. हेमंत राठींचे रामबंधू मसाले हे सगळ्यांनाच माहिती आहेत. आपल्या डॉ. अतुल वडगावकरांनी केलेली कोरोनातील सेवा त्याचं कौतुक केलेलं आहे. सांगली जिल्ह्यानंही सगळ्या महाराष्ट्राची सेवा केली आहे. नितीन महाजन यांनी टेलिफोन क्षेत्रात नाशिकचं नाव एक नंबरला आणलेलं आहे. आम्हाला वाटत होतं, की बीएसएनएल बंद करायचं चाललेलं आहे आणि नंतर ते विकायचंय, असं आम्ही ऐकत होतो. पण नाशिक एक नंबरला बीएसएनएलला आलेलं आहे. याचं कौतुक आणि अभिमान सगळ्या नाशिककरांना आहे. त्यामुळं नितीन यांचं आभार मानावेत तेवढे कमी आहेत. प्राध्यापक मधुकर कडलग यांचे चिरंजीव माझे जीवन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आहेत. तोसुद्धा उत्तम काम करणारा आमचा सहकारी आहे. पण, शिक्षकी पेशातून आज वयाच्या ८२व्या वर्षीही रोज दहा किलोमीटर चालणं, चालण्यामुळेच ८२चे ९२ होतील आणि ९२चे १०२ होतील याची मला खात्री आहे. कापडणीसांसारख्या प्राध्यापकांच्या साहित्याचं देखील या व्यासपीठावर कौतुक झालं.

ईश्वरी सावकार हिला आम्ही स्कोर विचारला. अंडर १९खाली खेळलीय ती. एकदा ८५ आणि एका इनिंगमध्ये ६४ स्कोर केलाय आणि ती ऑफस्पिनर बॉलरही आहे. मला खात्री आहे, की ज्या पद्धतीने आपण तिची क्लिप बघितली, ती नक्कीच मोठ्या क्रिकेटमध्ये खेळून नाशिककरांचा नावलौकिक वाढवेल, याच्याबद्दल माझ्या मनात शंका नाही. किशोर खैरनार यांना मी मागच्या काळात भेटलेलो आहे. माणसाच्या जिद्दीला मर्यादा नसतात आणि आपल्याला शारिरीकदृष्ट्या अपंगत्व जरी आलं, तरी यांनी आपली पूर्ण जिद्द दाखवून आज पुन्हा एकदा स्वत:च्या पायावर उभं राहण्याचं काम केलं आहे. त्यांचं कौतुक करावं तेवढं कमी आहे. अशी जिद्द, म्हणजे





निराश होण्याची गरज नाही आयुष्यात. प्रत्येकाला मार्ग असतो. प्रत्येकाला पुढं जाण्याची संधी असते. आपल्याकडं काय नाही याचा विचार केला जातो. पण, त्यांच्याकडं एक पाय आहे त्याचा विचार करून ते काम करतायंत. इथे त्यांचं कौतुक आहे आणि म्हणून अनेक मान्यवरांना एका व्यासपीठावर आणण्याचं काम आमच्या आकाशनी केलं. त्याचं मन:पूर्वक कौतुक करतो.

खरं म्हणजे तरूणांना पुढं येण्याची संधी दिली पाहिजे. जरा वय झाल्यानंतर थोडं मागं राहायचं असतं. पण तरूणांच्याबरोबर स्पर्धा करण्याचं काम मी मघाचपासून इथं बघतोय. एका बाजूनी आकाश बोलतोय आणि दुसऱ्या बाजूनी आमचे रवींद्र नानाही बोलतायंत. त्यामुळं रवींद्र नाना तरूणच आहेत. त्याबद्दल काय वाद नाही. अनेक वर्षे त्यांनी आमच्या पक्षात काम केलेलं आहे. पक्षासाठी भरपूर कष्ट केलेले आहेत.

आमचा पक्ष विरोधी पक्षात असतानाही ते आमच्याबरोबर होते हेही महत्त्वाचे. आम्ही वणवण फिरत होतो महाराष्ट्रात, त्यावेळी ते आमच्याबरोबर या जिल्ह्यात फिरत होते. भुजबळ साहेब याठिकाणी अडचणीत होते. त्यावेळीदेखील किल्ला लढवण्याचं काम या जिल्ह्यातले अनेक मान्यवर नेते करत होते, पक्षाचे अध्यक्ष म्हणून ते करत होते. त्यांचा मुलगा अतिशय प्रभावीपणानं पुढं येतोय. आपल्या सर्वांच्यावतीनं मी त्याला मन:पूर्वक शुभेच्छा देतो. मला इथं येण्याची संधी दिली, त्या नानांचं आणि आपल्या सर्व मान्यवरांचं आभार मानून माझे दोन शब्द संपवतो.

■■

खरं म्हणजे नाव फार चांगलं आहे या संस्थेचं, सुविचार. जो आजकाल फार दुर्मिळ होत चालला आहे. म्हणून खास यांनी कदाचित नाव ठेवलेलं आहे, की बाबांनो नेहमी सुविचार करा. त्यामुळं नाव चांगलं ठेवलेलं आहे आणि असा सुविचार ज्यांच्याकडे आहेत अशा सगळ्या लोकांचा जो आहे त्यांचा मानसन्मानसुद्धा केलेला आहे. ही संस्था जी आहे निरपेक्षपणे काम करते आहे. अनेक गोष्टींत काम करतेय. लोकांची मोठी फळी आहे आज त्यांच्यामागे. आपल्यामध्ये खूप चांगली माणसं असतात. खूप हुशार माणसं असतात. पण असं म्हणतात ना, की जिथं पिकतं तिथं विकत नाही. अशी आपल्यातलीच जी चांगली माणसं आहेत त्यांचं गुणगान बाहेर होते. पण आपण करत नाही. आपणच आपल्या लोकांचं गुणगान केलं पाहिजे. त्यांना लोकांच्यासमोर आणलं पाहिजे, याविषयीचं चांगलं काम दरवर्षी ते करतायंत. त्यामुळं त्यांना खरोखरच मी मनापासून धन्यवाद देतो.

अनेकांनी इथं चांगलं काम केलेलं आहे. नितीन महाजन हे प्रशासक म्हणून बीएसएनएलमध्ये आहेत. मघाशी जयंत पाटलांनी सांगितलं. आमच्या तुम्हाला शुभेच्छा आहेत, की बीएसएनएल पुन्हा एकदा स्वत:च्या पायावर उभं राहावं. काय कल्पना नाही होणार की नाही, पण जोपर्यंत दिल्लीकर जे आहेत, त्यांची दृष्टी कशी असेल त्यावर सगळं अवलंबून असणार आहे. एक एक एक एक रेल्वे गेली, आमचे मनमाडला त्या खात्याचे मंत्री आहेत, पण एकही विमान नाही, एकही एअरपोर्ट नाही. असं जे काय आहे ते परत व्हायला नको म्हणून हे तरी विकू नये अशी सगळ्यांची सद्भावना असायला काय हरकत आहे. अर्थात ती सद्भावना तिकडं पोहोचणं फार कठीण आहे. पण, आमच्या तुम्हाला शुभेच्छा आहेत. तुमची कंपनी तुम्ही कुठेही राहा तुम्ही मात्र उंचावर राहा.

कापडणीस साहेबांचं जे आहे, आपण याठिकाणी



# आपणच आपल्या लोकांना शाबासकी दिली पाहिजे

**छगन भुजबळ**



पाहिलं, त्यांचंसुद्धा साहित्यात फार मोठं काम आहे. आषाढधारा हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह आणि तेव्हापासून त्यांची जी लेखणी आहे ती कधीही थांबली नाही. ते सतत लिहिते आहेत. मला आनंद आहे, की त्यांचासुद्धा सत्कार आज याठिकाणी झाला. ईश्वरी सावकारचा सत्कार झाला. बॅटस्मन आहे, बोलर आहे आणि आमच्या सदिच्छा आहेत, या नाशिकमध्ये फार चांगले कलाकार आणि क्रीडापटूही आहेत. बापू नाडकर्णी नाशिकचेच. त्याच्यानंतर नाशिकमध्ये धावण्याच्या बाबतीमध्ये ते विजयेंद्र सिंग जे कोच आहेत, एशियाडमध्ये, वेगवेगळ्या ठिकाणी ते जातायंत. नॅशनलमध्येही असतात. त्यांच्यामुळं नाशिकच्या आदिवासी मुली ज्या आहेत, त्यांना घडवलं जातंय. त्याचबरोबर कला क्षेत्रातही नाव कमावणारे खूप लोक आहेत. क्रीडा क्षेत्रात बापू नाडकर्णींना आम्ही लहानपणापासून बघत आलो आहोत. मेडन ओव्हर टाकायची म्हटली की बापूंच्या हाती बॉल जायचा. समोरचा माणूस प्लेड प्लेड खेळायचा. रन्स काढायचा नाही.

त्याच्यानंतर मधुकर कडलग साहेबांनीसुद्धा अतिशय चांगलं काम केलेलं आहे शिक्षणाच्या बाबतीत. शिक्षणाच्या बाबतीतमध्ये अनेक मोहरे दिलेले आहेत नाशिक जिल्ह्याने. संस्कृतीच्या बाबतीत, लिखाणाच्या बाबतीत. कुसुमाग्रज ज्ञानपीठकार, शिरवाडकर साहेब यांचं नाव विसरलं जाणार नाही. या सगळ्या भूमीमध्ये तुम्ही मनापासूनचा आनंद वाटतांय. वेगवेगळ्या क्षेत्रातील ही माणसं आमच्या नाशिकच्यादृष्टीनं नवरत्नं आहेत. कडलग साहेब वयाच्या ८१व्या वर्षीही दररोज दहा किलोमीटर चालण्याचा उपक्रम करतात. सगळ्यांनी चाललं पाहिजे, चालत राहिलं



पाहिजे. जो बसला तो फसला. त्याच्यामुळं चालतच राहा. आता किशोर खैरनार. खरोखरच स्टिफन हॉकिंग्ज म्हणून आहे, त्यांनीही त्यांचा एक अवयव चालत नाही, त्यांना चालता येत नाही, बोलता येत नाही. त्यांच्याकडं पाहिल्यानंतर आपल्याला वाटेल की आपल्याकडं तर खूप आहे. आणि खैरनारजी तुमच्याकडं बघितल्यावर आम्हालासुद्धा वाटतं, अरे आपल्याकडं खूप आहे. नेहमी आपल्या खालच्या माणसाकडं पाहायला शिकलं पाहिजे. मला फार आनंद आहे. तुम्ही ज्या हिमतीनं उभं राहिला आहेत त्याच हिमतीनं उभं राहा. नुसते




**सिद्धार्थ जाधव यांचा मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन जयंत पाटील सत्कार करताना शेजारी छगन भुजबळ, रवींद्र पगार व अभिनेत्री पूजा सावंत**

पाय असून चालत नाही हो, माणसानं पुढं चाललं पाहिजे. तेही नुसतंच चाललं पाहिजे असं नाही. जीवनामध्ये जे आहे पुढं पुढं चालत राहिलं पाहिजे. एकाच ठिकाणी जो बसला तो काही पुढं जाऊ शकणार नाही. तर कृषी क्षेत्रामध्ये पंधरा-पंधरा टन द्राक्षं जी आहेत ते घेतात. अडचणीमध्ये येतात द्राक्षं आमच्या नाशिकची. पण, दहा एकर शेती ते करतात आणि सगळी एक्स्पोर्ट होतात. त्यांनासुद्धा आमच्या शुभेच्छा!

डॉ. वडगावकरांना, ज्यावेळी कोरोनाचं प्रकरण अगदी डोक्यावर होतं, त्यावेळी आम्ही अनेकांना विचारत असू, की काय चाललंय, काय चाललंय. हॉस्पिटलमध्ये जागा नाही. त्यावेळी यांनी शोधून काढलं, की अनेक लोक उभे राहायचे आणि घरी जायचे आणि औषधं ज्यावेळी ते फोनवरून सांगायचे आणि ती औषधेसुद्धा द्यायचे, हॉस्पिटलमध्येसुद्धा जायची गरज भासली नाही. हजारो पेशंट त्यावेळी त्यांनी बरे केले. त्याबद्दल त्यांचा सत्कार झाला. हेमंत राठी, रामबंधू मसाले, तेही मसालेदार आहेत बुवा. मीठ, मिरची बरोबर असतं त्या मसाल्यामध्ये त्यांचं. चिन्मय उदगीरकर, अतिशय उत्कृष्ट कलाकार. खूप मोठं यश तुम्हाला मिळो. फार आनंद आहे, की तुम्ही आमच्या नाशिकचे आहात. कारण नाशिकचा माझा जन्म आहे. नाशिकचा मी पालकमंत्री आहे. बरंच आयुष्य गेलं मुंबईमध्ये. पण नाशिकबद्दलचं एक प्रेम, आस्था ज्याठिकाणी आहे ती माणसं आमच्या या नाशिकमध्ये आहेत. मी नेहमी सांगतो, की लोक शहरांना ओळखतात. देशाला ओळखतात. मुंबईला ओळखतात. कशामुळं ओळखतात. तिथे रस्ते खूप आहेत आणि बिल्डिंग खूप मोठ्या आहेत म्हणून नाही, तर त्या शहरामध्ये लोक कोण राहतात. त्या शहरामध्ये आतापर्यंत आपल्या लता मंगेशकर राहात होत्या. अमिताभ बच्चन राहतात. सचिन तेंडुलकर राहतो. रतन टाटा राहत आहेत. मोठ मोठे वकील राहत आहेत. मोठ मोठे राजकारणी, त्याच्यामुळं ते शहर ओळखलं जातं. नाशिकसुद्धा प्रभू रामचंद्र, एवढी चांगली हवा आणि एवढं चांगलं वातावरण, मी नेहमी सांगतो की पूर्ण फॅमिलीसहीत ते इथं येऊन राहिलेत. त्या नाशिकमधले तुम्ही आहात. तुम्ही फार मोठे व्हा अशा माझ्या मनापासून शुभेच्छा! त्यांना दादासाहेब फाळकेचा उत्तम मराठी कलाकाराचा पुरस्कार मिळालेला आहे. फार आनंदाची गोष्ट आहे. नाशिक आपलं असंच पुढं गेलं पाहिजे.



सिद्धार्थला तर सगळे ओळखतातच. ते महाराष्ट्र डान्समध्ये असतात. मधूनच आवाज येतो वा..वा.... मला आनंद आहे या गोष्टीचा. आता पांडे साहेब, ते रोज पहाटे चार वाजता, कदाचित त्याच्या अगोदर, ते अंघोळ करतात आपल्या गोदावरीमध्ये वरच्या बाजूला जाऊन आणि नंतर दिवसभर लोकांची सेवा करतात. आता उदगीरकरनं सांगितलं, की आपली गोदावरी स्वच्छ ठेवली पाहिजे. आता तुम्ही अंघोळ करता ते खालच्या बाजूला नाही तर वरच्या बाजूला जाऊन. तुम्ही तर पोलिस आयुक्त आहात. जरा तुम्ही ठीकठाक करा. नदीमध्ये घाण टाकू नका म्हणून सांगा. सगळ्यांनी मिळून काम करूया. अशी वेळ आली पाहिजे, की अंघोळीसाठी तुम्हाला वरच्या बाजूला जावं लागणार नाही. खालच्या बाजूला आला पाहिजे. पूजा सावंत असेल, सिद्धार्थ असेल ही सगळी मंडळी पूर्वीच्या काळात बहुजन समाजातले कलाकार जास्त नसायचे. शिक्षणात बहुजन समाजाची लोकं कमी आहेत. शिक्षणात कमी त्यामुळं जगाची ओळख नाही. देशाची ओळख नाही. संस्कृतीची नाही. आपण पाठीमागंच राहिलं पाहिजे. पण शिक्षणामुळं जे आहे आज शिक्षणतज्ज्ञ तयार झाले. आज वेगवेगळ्या क्षेत्रातले टॉप लोक तयार झाले. इथेसुद्धा आपण जर पाहिलं, यात उच्चवर्णीय होते, पण आता जे आहे बहुजन समाजातली मंडळीसुद्धा आहेत. यामध्ये कलाकार पुढे येतायंत ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे. कला, बुद्धी या सगळ्यांमध्ये असतात. पण त्यांना वाव मिळाला पाहिजे आणि तो वाव देण्याचं काम, तुम्हाला तर तो मिळाला. पण तुम्ही वेगवेगळ्या ठिकाणी जे काही महाराष्ट्र डान्स असेल, आयडॉल असेल, जे काय असतं तुमचं त्याच्यामधून अनेक कलाकारांना पुढे आणायचं काम तुम्ही करा. कितीतरी टॅलेंट पसरलेलं आहे आणि ते बहुजन समाजात आहे ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे.

आपण या सगळ्यांना बरोबर घेऊन चाललं पाहिजे. आपण आपल्या लोकांचा जो गौरव केला. रवींद्र असतील, आकाश असतील, त्यांचे सर्व सहकारी असतील. आपणच आपल्या लोकांना पुढं आणलं पाहिजे. त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली पाहिजे. जगांनी कितीही शाबासकी दिली, तरी मघाशी जसं सांगितलं सिद्धार्थनी, घरच्या आईची जी थाप आहे, वडिलांची थाप महत्त्वाची आहे. नाशिक शहर आज तुमच्या पाठीवर हीच शाबासकीची थाप देत आहे. धन्यवाद. जय हिंद! जय महाराष्ट्र!!

■■

पुण्यातील महाराष्ट्र साहित्य कला प्रसारिणी सभेच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त आदरणीय खासदार श्रीनिवास पाटील आणि ज्येष्ठ संपादक श्री. मधुकर भावे यांच्या गौरवशाली कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी राष्ट्रवादीचे अध्यक्ष आदरणीय खासदार शरद पवार यांच्या हस्ते आणि काँग्रेसचे नेते आदरणीय सुशिलकुमार शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली ५ मार्च २०२२ रोजी बालगंधर्व रंगमंदिरात पार पडलेल्या कृतज्ञता सन्मान सोहळ्यातील मान्यवरांची भाषणे....



# विचाराबरोबर सामाजिक बांधिलकी

सचिन इटकरांनी आज एक आगळावेगळा कार्यक्रम आयोजित केला. पुण्यामध्ये सार्वजनिक जीवनामध्ये काम करणाऱ्यांच्या बद्दलचा सोहळा आयोजित करण्यासंबंधीची वेळ आलीय, तर पुढाकार सचिन इटकरांचा असतो. विविध क्षेत्रातील मान्यवरांशी इतके संबंध ठेऊन त्यातलं एखादं व्यक्तिमत्व हे समाजाला कळावं यादृष्टीनं काही समारोह आयोजित करायचा असेल तर तो कसा केला पाहिजे याच्यामध्ये सचिन इटकरांचं वैशिष्ट्य आहे. आणि त्या वैशिष्ट्याला साजेसे महाराष्ट्र साहित्य कला प्रसारिणी सभा आणि संस्था गेली पाच वर्षे पुण्यामध्ये काम करतेय, आणि पुण्याच्या सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक, कला आणि संगीत या सगळ्या क्षेत्रामध्ये इटकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी एक स्थान निर्माण केलंय. मला आनंद आहे, की त्यांनी आज याठिकाणी सत्कार आयोजित केला.

सत्काराला निवड तर त्यांनी केली, मधुकर भावेंची, श्रीनिवास पाटलांची. पण याशिवाय वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये स्वत:च्या कर्तृत्वानं ज्यांनी यश मिळवलं अशांचा सहभाग या कार्यक्रमामध्ये घेतला. डॉ. पी. डी. पाटील हे एक अतिशय



सचिन ईटकर हे सन्मानचिन्ह देऊन शरद पवार यांचे स्वागत करताना शेजारी मधुकर भावे, सुशीलकुमार शिंदे, श्रीनिवास पाटील आणि रामशेठ ठाकूर

# ठेवणाऱ्यांचा सत्कार आनंददायी

**शरद पवार**

उत्तम वैद्यकीय महाविद्यालय चालविणारे आपल्या परिसरातील सहकारी आहेत. महाविद्यालय चालवतात. उत्तम हॉस्पिटल चालवतात. पण हे सगळं करत असताना सामाजिक जाण ठेवण्याबद्दलची भूमिका घेतात. कधी कधी मला गंमत वाटते, की हॉस्पिटल चालवतात, कॉलेज चालवतात आणि साहित्य संमेलनाची जबाबदारीही आपल्या खांद्यावर घेतात. आणि त्याही क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या लोकांच्या पाठीशी उभे राहतात. आज तेही याठिकाणी उपस्थित आहेत. रामशेठ ठाकूर, ज्यांचे विचार तुम्ही ऐकले. तुम्हाला माहित नसेल कदाचित, अत्यंत गरीब परिस्थितीतून वर आले. आज नवी मुंबईच्या पुढं जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट, न्हावा शेवा परिसरामध्ये पाहतो, या सगळ्या परिसरामध्ये जी अनेक कष्टकरी आणि गरीब कुटुंबं होती, त्या कुटुंबात रामशेठ जन्मले. अतिशय चिकाटीने शिकले आणि कष्टानी पुढे आले. सुदैवानं त्यांना यश आलं व्यवसायामध्ये. पण, त्या यशाचा वाटा हा समाजामध्ये आपण दिला पाहिजे ही गोष्ट त्यांनी अखंडपणानं मनामध्ये ठेवली. त्यांनी आत्ता बोलता बोलता रयत शिक्षण संस्थेचा उल्लेख केला, मी या संस्थेचा अध्यक्ष आहे. मला आठवणार नाही.

पण, रयत शिक्षण संस्थेमध्ये एखादा नवीन प्रकल्प हातामध्ये घ्यायचं ठरवलं आणि चर्चा झाली, की रामशेठ हळूच येऊन मला सांगतात, की माझे दोन कोटी रूपये जाहीर करा. हजार नाही, लाख नाही, कोटी. त्यांच्याकडं कधी जाण्याचाही प्रसंग येत नाही. काम सांगितल्याच्यानंतर त्यांचा पाठिंबा.

तलासरी आणि ठाण्याचा गुजरातच्या सीमेवरचा जो भाग आहे आदिवासींचा, तिथं आम्ही शाळा चालवत होतो आणि त्या शाळांचे काय प्रश्न होते. त्याबद्दल आमच्या कमिटीमध्ये चर्चा करत होतो. मला त्या भागात जायचं होतं. रामशेठनी निरोप दिला, की त्या शाळेच्यासाठी एवढी एवढी रक्कम माझ्याकडून आहे हे समजून तुम्ही पुढे जा. कुठलंही सार्वजनिक काम, लोकांच्या भल्याचं काम, शिक्षणाचं काम, याच्यामध्ये रामशेठची साथ ही नेहमीच असते. कर्मवीर भाऊराव पाटलांनी कमवा आणि शिका ही योजना काढली त्या काळामध्ये, यात कर्मवीरांच्या विचारानं तिथं शिक्षण घेऊन स्वकर्तृत्वानं ते आज इथपर्यंत आलेले आहेत. देशाच्या लोकसभेत होते. आज त्यांचे चिरंजीव विधानसभेत आहेत. अनेक वर्षे ते या सगळ्या क्षेत्रामध्ये काम करतात. तेही आज याठिकाणी आहेत याचा मला आनंद आहे.

शिंदे सरांच्याबद्दल काय बोलायचं. सुशिलकुमार शिंदे, त्यांनी सांगितलं, आम्ही शिकायला पुण्यामध्ये होतो. ते देशाचे गृहमंत्री झाले. महाराष्ट्रातले पहिले देशाचे गृहमंत्री यशवंतराव चव्हाण होते. मला गंमत वाटते, पण या दोघांच्यात साम्य काय. यशवंतराव कर्तृत्वानं, जनमाणसातल्या स्थानानं आम्हा सगळ्यांचे नेते होते. पण, यशवंतरावांची पार्श्वभूमी ही अत्यंत सामान्य कुटुंबातली होती. म्हणजे त्याचं एकच उदाहरण सांगायचं झालं, तर यशवंतरावजी आयुष्यात पहिल्यांदा मंत्री झाले. त्यानंतर त्यांच्या मातोश्री, त्यांचं नाव विठाबाई, कराडला यशवंतराव परत आले मंत्री म्हणून, त्यांचं स्वागत झालं. विठाबाईंना काय कळलं नाही. लोक त्यांच्याकडं पेढे घेऊन गेले आणि त्यांना सांगितलं, की यशवंतराव असे असे झालेत. मातोश्रींनी विचारलं, की मंत्री झाले म्हणजे काय. मामलेदाराच्यापेक्षाही मोठा झाला का. म्हणजे त्यांच्यादृष्टीनं तहसीलदार सगळ्यात मोठा. तर माझा लेक तहसीलदारपेक्षा मोठा झाला का ही शंका ज्या माऊलीनं विचारलं, ती पार्श्वभूमी चव्हाण साहेबांच्या घरची होती. आणि ते चव्हाण साहेब देशाचे गृहमंत्री झाले

आणि दुसरे गृहमंत्री सुशिलकुमार शिंदे यांनीही कष्टानं शिक्षण घेतलं. पुण्याला होते. माझी आणि त्यांची गाठ पडली पुण्याला. ते लॉ कॉलेजला नुकतेच आलेले होते. त्यांना भेटल्यानंतर मला आनंद झाला, गोरा-गोमटा म्हणून नाही. पण, एका उपेक्षित समाजातनं, कष्टकरी समाजातनं आज लॉ कॉलेजमध्ये हा गृहस्थ येऊन पोहोचला, त्यामुळे याच्यात काहीतरी स्पार्क असला पाहिजे ही गोष्ट माझ्या लक्षामध्ये आली आणि त्याच्यानंतर मी काय त्यांना सोडलं नाही त्या काळात. आत्ता तुम्ही म्हणालात की सोडलं. पण सोडलं नाही. तुम्ही गेलात गांधी-नेहरूंच्या विचारानं आणि गांधी-नेहरूंचा विचार आम्ही कधी सोडणार नाही. त्यामुळं आपण गेलो ही कल्पना डोक्यातून काढा. आपण आहोत तिथंच आहोत. विचारानं. आणि त्यावेळेला मी महाराष्ट्रात फिरत असे. संघटनेचं काम माझ्याकडं होतं आणि अनेकवेळेला त्यांना घेऊन जायचो. कुठं गेलो, कार्यकर्त्यांच्या घरी जेवण चांगलं असायचं. त्यांचं



जेवणावर लक्ष असायचं. जेवण वगैरे व्यवस्थित करायचे आणि पुढचा प्रवास, जेवण झाल्याच्यानंतर मी सांगायचो बसा गाडीत आणि गाडीत बसल्याच्यानंतर व्यवस्थित जेवण झाल्यामुळं साहजिकच डुलकी यायची आणि मी कायतरी नवीन सांगत असायचो. हळूच त्यांना धक्का मारून, की हे गाव आहे, या गावात हे हे कार्यकर्ते आहेत. हे स्वातंत्र्य चळवळीत होते आणि याच्याकडं आपल्याला लक्ष द्यावं लागेल. ही माणसं चांगली आहेत. अशी चर्चा त्यांची आणि माझी होत असे. आणि त्या पद्धतीनं आम्ही इथपर्यंत येऊन पोहोचलो.

मला आठवतंय, आम्ही ठरवलं, की त्यांना विधानसभेला उभं करायचं. मतदारसंघ वगैरे शोधले आणि सोलापूर जिल्ह्यातलं करमाळा निवडलं. तिथे जे निवडून आलेले गृहस्थ होते, ती जागा राखीव होती, तिथं आम्हाला तिकिट हवं होतं. प्रयत्न केलं. दिल्लीला गेलो. मी प्रदेश काँग्रेसचा सेक्रेटरी होतो. दिल्लीला नाव दिलं. मी आणि वसंतदादा पाटील, ते अध्यक्ष आणि मी सेक्रेटरी. पार्लमेंटरी बोर्डाच्यासमोर आमची यादी दिली. एक-एक नाव इंदिराजी, जगजीवनरामजी क्लिअर करत होते. यादी वाचत वाचत सोलापूर आलं आणि करमाळा आल्याच्यानंतर त्यांनी वाचलं सुशिलकुमार शिंदे. त्यावेळचे ज्येष्ठ नेते बाबू जगजीवनराम आणि बाबूजींनी सांगितलं, की नही चलेगा. त्यांनी सांगितलं, की तायप्पा हरी सोनवणे उसको देना है. पुराना कार्यकर्ता है, ये कौन नया छोकरा है. मी आपल अर्ग्यु करायला लागलो. त्यानंतर इंदिराजींनी मला डोळ्यानं खुणावलं. जास्त बोलायचं नाही, हे बाबू जगजीवनरामजी आहेत. त्यांच्यासमोर गप्प बसा. झालं. गेलं त्यांचं तिकिट. त्याच्याआधी ते सरकारी नोकरीत होते. मी त्यांना राजीनामा द्यायला लावला होता. राजीनामा दिला. पदही गेलं. नोकरीही गेली आणि उमेदवारीही गेली. मी परत आलो. विमानतळावर भेटले. खरं सांगतो, माझ्या डोळ्यातलं पाणी थांबेना. त्यांनी त्यांची नोकरी सोडली. बरं त्याच्यात आणखी एक गंमत होती, आंतरजातीय लग्न केलं. आणि मग सुशिक्षित वर्गातली पत्नी, नोकरी गेली. राहायला जागेपासून प्रश्न आणि हे सगळं संकट मी आणलं. त्यामुळं सारखं मला अस्वस्थ वाटायला लागलं. मला विमानतळावर सांगितलं, जाऊ द्या, आपण दुसरं काहीतरी बघू.

निवडणुका झाल्या. मी झालो गृहखात्याचा राज्यमंत्री. आणि त्यावेळेला गृहखात्यामध्ये अनेक कामं असायची. त्यात एक काम असायचं, कुणी छोटे-मोठे गुन्हे केले असले तर त्याची केस गृह राज्यमंत्र्याच्यासमोर यायची. दोनच शिक्षा द्यायचा अधिकार होता. दोन वर्षाच्यासाठी, सहा महिन्यासाठी तडीपार करायचं म्हणजे गाव सोडून जायचं ही शिक्षा द्यायचा अधिकार मला होता. किंवा पुन्हा असं करू नको, नीट वाग असं म्हणून दमदाटी देऊन सोडून द्यायचं हे अधिकार मला होते. या सगळ्या केसेस माझ्यासमोर चालायच्या. मी शिंदे साहेबांना सांगितलं, की तुम्ही वकील आहात. तुम्ही हे का करत नाही. ते म्हणाले, कुठं करू. म्हटलं माझ्यासमोर. या ज्या तडीपारच्या केसेस माझ्यापुढं चालतात. तुम्ही या घेऊन. कोणतरी भेटला त्यांना. केस घेऊन आले. त्याला रिलिव्ह केले. शिंदेंची केस म्हटल्याच्यानंतर त्याला सांगितलं, पुन्हा असं वागायचं नाही. व्यवस्थित राहा. यावेळी तुला सोडतो. त्यामुळं त्याला सोडलं. बाजारात बातमी गेली, की शिंदेंच्यामार्फत जर त्याठिकाणी केस गेली तर ताबडतोब सोडलं जातं. आणि काय सांगायचं. काय





श्रीनिवास पाटील यांचा मानपत्र देऊन शरद पवार सत्कार करताना, शेजारी सुशीलकुमार शिंदे, सचिन ईटकर, रामशेठ ठाकूर आणि दिलीप वळसे पाटील

वकिली चालली. एकदम जोरात होती.

थोडे दिवस गेले. ते तायप्पा हरी सोनवणे, जे निवडून आले होते, ते गेले. आता गेल्याच्यानंतर आता वसंतराव नाईक मुख्यमंत्री होते. नाईक साहेबांच्याकडं आम्ही दोघेपण गेलो. दादांच्याकडं गेलो. ते म्हणाले, ठीक आहे त्यांना तिकिट द्या. झालं तिकिट मिळालं. आयुष्यातील पहिली निवडणूक करमाळ्याची. तिथं एक मोठे नेते होते. काँग्रेसचा निष्ठावान माणूस. यशवंतराव चव्हाणांचे तर अत्यंत निष्ठावान. त्यांचं नाव नामदेवराव जगताप. त्यांच्याकडं आम्ही दोघंही गेलो. म्हटलं, पक्षानं तिकिट दिलंय. नामदेवराव म्हणाले, पक्षाचं तिकिट आहे ना, निवडून आला म्हणून समज. फॉर्म भरायला आम्ही गेलो. नामदेवरावांनी मोठीच्या मोठी मिरवणूक काढली. एका जीपमध्ये आम्ही तिघं आणि हजारो लोक दोन्ही बाजूंनी. यांच्या आयुष्यातली पहिली मिरवणूक. हे फक्त इकडे बघ, तिकडे बघ चाललेलं. नामदेवरावर मागनं सांगायचे, अरे दोस्ता हात जोड. त्या निवडणुकीमध्ये अक्षरश: हजारो मतांनी निवडून आले. त्यानंतर ज्या पद्धतीनं त्यांनी काम केलं, ते आज इथपर्यंत येऊन पोहोचले.

आमदार झाले. एक दिवशी मंत्रिपदाच्या काही जागा भरायचं ठरलं. मी मंत्री होतो. आम्ही दोघं मिळून नाईक साहेबांना भेटलो. त्यांना सांगितलं, की शिंदे साहेब असे आहेत, तसे आहेत. ते म्हणाले, चांगली गोष्ट आहे. लहान कुटुंबातनं गृहस्थ आलेत. बोलतात चांगले आणि ताबडतोब एक जागा होती, त्या जागेवर राज्यमंत्री म्हणून यांची निवड झाली. तिथून जे सुरू झालं, ते देशाच्या गृहमंत्रीपदावर गेल्यानंतरच थांबले. कुठं आधी मधी थांबले नाहीत. राज्यमंत्री, मंत्री, मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री, गृहमंत्री, राज्यपाल. आणखी काय राहिलंय का. हे सगळं होऊ शकलं याचं महत्त्वाचं कारण कुठं ना कुठंतरी कर्तृत्व आणि कुठं ना कुठं विचारांशी बांधिलकी, या दोन गोष्टींच्यामुळं आज ते इथपर्यंत येऊन पोहोचले. मला आनंद आहे, की आजच्या या दोघांच्या सत्काराला त्यांची उपस्थिती आहे.

आज याठिकाणी आपण मधुकर भावेंचा सन्मान केला. मला सांगण्यात आलं, की आम्ही त्यांचा सत्कार करणार आहे. ज्यांनी सांगितलं, त्यांना मी सांगितलं, की ते काय येणार नाहीत. त्यांच्या स्वभावात हे बसत नाही. पण, मी इटकरांना धन्यवाद देतो, की त्यांचा स्वभाव वेगळा असतानासुद्धा त्यांना उपस्थित ठेवले आणि या सत्कारामध्ये सहभागी ठेवलं. त्यांचं गाव रायगड जिल्ह्यातलं, जुन्या कुलाबा जिल्ह्यातलं रोहा हे गाव. रोहा गावाचं वैशिष्ट्य हे आहे, की रोहा गावानी एक फार मोठा माणूस आपल्याला दिला आणि तो मोठा माणूस म्हणजे सी. डी. देशमुख. सी. डी. देशमुख भारताचे अर्थमंत्री, भारताच्या नियोजन मंडळाचे अध्यक्ष, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर अशा आर्थिक क्षेत्रामध्ये अतिशय महत्त्वाच्या जबाबदाऱ्या ज्यांनी सांभाळल्या आणि ज्यांचं सार्वजनिक जीवन आणि व्यक्तीगत जीवन अत्यंत स्वच्छ प्रकारचं होतं, त्या सीडींचं गाव म्हणजे रोहा. त्या रोह्यानं अनेक लोक पुढं आणले. त्याच मालिकेतले मधुकर भावे. जे मुंबईमध्ये गेले गावावरनं आणि आचार्य अत्रेंच्याबरोबर काम करण्याचा निर्धार केला. आचार्य अत्र्यांनी शून्यातून सगळं उभं केलेलं होतं. मराठा पेपर असो, साहित्याच्या क्षेत्रामध्ये त्यांचं योगदान काय होतं हे सांगायची गरज नाही. शैक्षणिक

क्षेत्रामध्ये, या पुण्यामध्ये आधी शिक्षकाचीसुद्धा भूमिका त्यांनी सांभाळली, तोही कालखंड लोकांना ठाऊक आहे. अत्यंत सामान्य आणि गरीब कुटुंबातून अत्रे आले. पुणे जिल्ह्यामध्ये, पुरंदर तालुक्यामध्ये कऱ्हा नदीचा उगम होणाऱ्या कोडीत गावातले अत्रे. आणि म्हणून त्यांचं जे लिखाण होतं ते कऱ्हेचं पाणी म्हणून लिखाण होतं. कऱ्हेची सुरुवात तिथं होते आणि कऱ्हेचा शेवट बारामतीमध्ये होतो. आणि त्यामुळं आम्हा सगळ्यांना अत्रेंच्याबद्दल आस्था. मी काँग्रेसच्या विचाराचा आणि त्यांचा विचार वेगळा. पण अत्रेंच्याबद्दलचं आकर्षण आम्हाला होतं. त्यांच्या सभांना आम्ही जायचो.

मला आठवतंय, की मुंबईमध्ये दादरमध्ये एक व्याख्यानमाला होती. तिथं एक दिवशी त्यांचं भाषण होतं. आम्ही सगळे गेलो. आमचे एक मित्र होते, नाव मी सांगत नाही, त्यांच्यावर जबाबदारी ही होती, की अत्रेंची ओळख करून द्यायची. तर त्यांनी अत्रेंची ओळख करून दिली, की अत्रे म्हणजे अतिशोयक्ती. अत्रे म्हणजे दहा हजार वर्षात अशी सभा झाली नाही असं भाषण करणारे. अतिशोयक्ती आणि अत्रे यांचा घनिष्ठ संबंध. असं त्या वक्त्यानी सांगितलं. अत्रे बोलायला उभे राहिले. त्यांनी नाव घेतलं त्या ओळख करून देणाऱ्या वक्त्याचं. म्हणाले, आजच्या सभेचे अध्यक्ष अमुक अमुक असं नाव घेतलं आणि विचारलं, की याच्यात काय अतिशोयक्ती नाही नं. म्हणजे सहजपणानं अत्रे या पद्धतीनं बोलत असत.

या अत्रेंच्या मराठामध्ये मधुकर भावे गेले. कधी आम्ही जात असू मराठामध्ये अत्रेंना भेटायला. आनंद मिळायचा. अत्यंत मोठा माणूस महाराष्ट्रामध्ये जन्माला आला. साहित्य आणि अन्य क्षेत्राच्यामध्ये अनेक उत्कृष्ट कामं त्यांनी करून ठेवली. आणि त्या अत्रेंच्याबरोबर मराठामध्ये काम करणं ही काही साधी गोष्ट नव्हती. भावे तिथं गेले आणि अनेक वर्षे तिथं काम केलं, म्हणजे अत्रे गेल्याच्यानंतरसुद्धा मराठा या वृत्तपत्राचं एक स्थान होतं जनमाणसामध्ये, ते कसं राहील याची काळजी घेण्याची जबाबदारी ही मधुकर भावेंनी घेतली आणि ती उत्तमरितीनं पार पाडली. पुढं मराठा बंद झाला. लोकमत निघाल्याच्यानंतर अनेक वर्षे लोकमतची संपादकपदाची जबाबदारी त्यांनी घेतली आणि जे योग्य असेल, ते मुक्तपणानं लिहिण्याच्यासाठी त्यांनी अखंड लेखणी चालवली. त्यांचा मुलभूत विचार हा गांधी-नेहरूंचा विचार होता आणि त्या विचाराशी त्यांनी आजपर्यंत कधी तडजोड केली नाही. त्या विचारानेच ते पुढे गेले. कधीकाळी आम्हा लोकांची राजकीय भूमिका चुकली, तर त्यासंबंधी लिखाण करत असताना शब्दांची काटकसर त्यांनी कधी आमच्याबाबतीतही केली नाही. आणि त्याचं कारण, आम्ही ट्रॅक सोडून कुठं जातोय हे कळल्याच्यानंतर मधुकर भावेंची लेखणी ही आपल्याला शिकवणार अशी खात्री माझ्यासारख्याला असायची. हे काम त्यांनी अखंडपणानं केलं.

अनेक संकटं आलं. व्यक्तिगत जीवनात संकटं आली. कशाचाही विचार न करता आपल्या लेखणीनं समाजातल्या योग्य गोष्टींचा पुरस्कार करणं यासाठी आपली लेखणी आहे ही भूमिका त्यांनी शेवटपर्यंत ठेवली आणि आज मला आनंद आहे, की त्यांचा सन्मान याठिकाणी होतोय. त्यांचं कर्तृत्व यानिमित्तानं जनमाणसाच्या समोर आणण्याची संधी इटकर तुम्ही दिली, त्याबद्दल तुम्हाला खऱ्या अर्थानं धन्यवाद दिले पाहिजेत.

पाटलांचाही याठिकाणी सत्कार झाला, श्रीनिवास पाटील. आता काय काय सांगायचं, समोर बसलेल्या आहेत त्यामुळं बोलताही येत नाही. त्यांनी सांगितली स्वत:ची पार्श्वभूमी. आम्ही लोकांची मैत्री होती ती पुण्याच्या एस.पी. कॉलेजमधली. साधारणत: एसपी कॉलेजचा आणि आमचा काय संबंध नसायचा. असायचा पण दुसऱ्या कारणांसाठी. कारण, आम्ही त्यावेळेला कॉमर्स कॉलेजला शिकायला. देशातलं उत्तम कॉलेज. कॉलेजमध्ये मुली नाहीत आणि ज्या असायच्या त्या कॅम्पमध्ये असायच्या. विशेषत: पारशी, ख्रिश्चन अशा. आणि त्यांच्याशी बोलायचे म्हणजे त्या इंग्रजीमध्ये बोलायच्या आणि आम्ही गावाकडनं आलेलो. आम्हाला कुठलं इंग्रजी बोलता येतंय. त्यामुळं त्या भानगडीतच पडायला नको म्हणून नादच सोडला. आणि म्हणून त्या काळात एसपी कॉलेज अशा कामाला प्रसिद्ध होतं आणि आमचे पाटील तिथं. वसतिगृहामध्ये. वसतिगृह तिथलं असल्यामुळं त्या कॅम्पसमध्ये. आमची त्यांची गाठ झाली, ती कायमची झाली.

राजकारणात येण्याचा त्यांना इंटरेस्ट होता. आमच्याबरोबर बाकीची कामं करायचे. मला आठवतंय, की चीनचं युद्ध झालं आणि आम्ही एके ठिकाणी म्हणजे एस. एम. जोशी आणि काही लोकांनी सांगितलं, की या चीनच्या युद्धाच्या विरूद्ध जनमानस तयार करायचं आणि अनेक कार्यक्रम त्यावेळी झाले होते. त्यावेळी विद्यार्थ्यांची एक मोठी सभा करायचं आम्ही ठरवलं होतं. त्या सभेला जवळपास ४०हजारपेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी झाले होते. त्या सभेच्या तयारीची जबाबदारी आम्हा लोकांवरती होती. आम्हाला सांगितलं, की सगळ्या पुणे शहरामध्ये पोस्टर लावा. आता पोस्टर लावायचं म्हणजे कसं करायचं. एक सायकल, त्या सायकलवर पाठीमागं पोस्टर, एक खळीची बादली आणि आम्ही दोघं. गेल्याच्यानंतर पोस्टर लावायचं. हे म्हणायचे, मी तुझ्यापेक्षा उंच आहे. तु मला पोस्टरला खळ लाऊन दे, मी पोस्टर लावतो. मग मी त्या पोस्टरला खळ लाऊन द्यायचो.

अर्ध्या तासानंतर हाताला खाजवायचे. पण पोस्टर लावण्याचे काम यांचेच असायचो. आम्ही ती पोस्टर लावली आणि सार्वजनिक जीवनाची सुरूवात त्यांची या पद्धतीनं झाली.

सभा मोठी झाली आणि ते स्वत: एक चांगले वक्ते होते. त्यामुळं भाषणंही त्यांची शाळेमधली, कॉलेजमधली गाजायला लागली. असंच एके दिवशी दुसऱ्या क्षेत्रामध्ये जायचं त्यांच्या मनामध्ये आलं. तर कॉलेजमध्ये कुणीतरी अत्यंत सुंदर कथकली डान्स केला. आम्हाला काय त्यातलं फारसं कळत नव्हतं. पण ज्यांनी केला ते आणि आम्ही दोघंही चाललो होतो. पाठीमागनं पाटलांनी सांगितलं, कळलं का काल जी चांगली नाचली होती ती हीच ती. तर त्यांनी ऐकलं. रागावल्या, थांबल्या आणि विचारलं कोण बोललं. मी म्हटलं, मी नाही. त्यांनी आम्हाला सुनावलं, की नाचताना सुद्धा अक्कल लागते. हे ऐकल्याच्यानंतर आमचा पाटील तर वेडाच झाला. नाचायला अक्कल लागते म्हणताय काय. मग इथं डेक्कन जिमखान्यावर रोहिणी भाटे यांची नृत्य ॲकॅडमी होती. डायरेक्ट तिथं जॉईन झाले आणि अत्यंत कष्टानी दोन दोन तास त्याठिकाणी डान्सची प्रॅक्टिस केली. त्यानंतर होस्टेलला आले आणि आम्हाला सांगायचे, की अंग फार दुखतंय. मग ते झोपायचे आणि आम्ही त्यांचं अंग दाबायचो. असं करुन त्यांनी त्या नृत्याच्यामध्ये नाव कमवलं. अभिमान आहे आम्हाला. ज्यांनी या नृत्यावरून टोमणा मारला होता, त्यांच्याबरोबर कथकली नृत्य या दोघांनी करायचा कार्यक्रम केला. पुणे विद्यापीठात पहिले आले आणि देशातल्या सगळ्या विद्यापीठांत सुवर्णपदक मिळालं. म्हणजे एखादी गोष्ट करायची म्हटल्याच्यानंतर कुठपर्यंत करायची याचं एक उत्तम उदाहरण त्यांच्या रुपानं दिसतं. पुढे ते खासदार झाले. गव्हर्नर झाले. पण नृत्याच्या क्षेत्रात सुवर्णपदक त्यांनी मिळवलं हे फार लोकांना माहित नव्हतं.

आम्ही सगळे राजकारणात होतो. एक दिवशी म्हणाले, शरद, सुदैवाने तुला तिकिट मिळेल असं वाटतंय. आणखीन काय आमचे तरूण होते, त्यांनाही संधी मिळेल. पण मला काय मिळायची शक्यता दिसत नाही. म्हटलं, का. तर म्हणाले, की माझा मतदारसंघ म्हणजे यशवंतराव चव्हाण, दुसरे नेते बाळासाहेब भिलारे, तिसरे नेते कोण तर राजारामबापू पाटील. हे सगळे असेपर्यंत आम्हाला काय संधी मिळणार नाही. हे जीवंत आहेत तोपर्यंत काय तिकिट मिळणार नाही. मी म्हटलं, मग काय करणार. ते म्हणाले, मी जातो सरकारी नोकरीत. म्हटलं, ठीक आहे, जा. पण एका अटीवर जा. ठरलं आणि सोडायचं म्हटलं तर सोडायचं. गेले. संगमनेरला डेप्युटी कलेक्टर झाले. नंतर बीडला कलेक्टर, नंतर आणखीन कुठं कुठं. आत्ता माझ्या लक्षात नाही. अनेक ठिकाणी, मग आयएएस झाले. शेवटी नागपूरला कमिशनर झाले. काँग्रेस पक्षात दोन भाग झाले. आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस काढली. दुसऱ्या बाजूला इंदिरा काँग्रेस. निवडणूक जाहीर झाली. आमच्याकडं उमेदवार फार नव्हते. पण जागा लढवायच्या ठरवल्या आणि मी निकाल घेतला, की कराडची निवडणूक लढवायची. चव्हाण साहेबांचं गाव. तिथं आपण निवडणूक जिंकायची. त्यांना फोन केला. ते होते नागपूरला. म्हटलं, श्रीनिवास काय करतोयस. काही नाही म्हटले, ऑफिसला जायला निघालोय. म्हटलं, असं कर. उद्या सकाळी मुंबईला ये. दुसऱ्या दिवशी सकाळी दहा, साडेदहाला घरी आले. म्हटले, पुढं काय. मी म्हटलं, मंत्रालयात जा आणि तुझा आयएएसचा राजीनामा देऊन टाक. गेले. बारा-साडेबाराला परत आले. राजीनामा दिला. हे त्याचं पत्र. पुढं काय? मी म्हटलं, खादी भवनात जा. चार-पाच पायजमे, दोन-चार नेहरू शर्ट, दोन-चार टोप्या, एखाद दुसरं जाकिट एवढं खरेदी कर आणि कराडला जाऊन फॉर्म भर. गेले कराडला आणि काय सांगायचं, मी सभेला गेलो. लाखाची सभा. प्रचंड मोठी सभा. यांची भाषणं चालली होती. काही सभांमुळे मला थोडा उशिर झाला. हे भाषण करत होते आणि अंगात टोपी, नेहरू शर्ट, पायजमा, जाकिट. मी स्टेजवर आलो आणि बाकीच्या नेत्यांना विचारलं, की श्रीनिवास कुठं आहे. त्यांनी सांगितलं, की श्रीनिवास तिकडे बोलतोय. माझ्या लक्षातच आलं नाही. सरकारी नोकरीत पँट-शर्टमध्ये बघायची सवय. त्यामुळे मी ओळखलंच नाही आधी. निवडणूक कोणाच्या विरूद्ध होती माहित आहे, पृथ्वीराज चव्हाण. ते प्रधानमंत्र्यांच्या कार्यालयात राज्यमंत्री होते आणि त्यांच्याविरूद्ध हे उभे राहिले. तीन लाख मतांनी निवडून आले. या पद्धतीनं देशाच्या संसदेत पाऊल टाकलं आणि मला आनंद आणि अभिमान एका गोष्टीचा झाला, की सहा महिन्याच्या आत या देशाच्या संसदेमध्ये सभापतींची जी खुर्ची आहे, त्या खुर्चीवर बसून सभागृह चालवायची संधी या गृहस्थाला मिळाली. पुढे अनेकदा ती मिळाली.

कालावधी संपला आणि मतदारसंघ बदलला. हा मतदारसंघ संबंध सातारा जिल्ह्याचा एक मतदारसंघ झाला. तर माझ्यापुढं संकट आलं. त्यावेळी आमच्यापुढं आणखीन एक नाव आलं आणि ते नाव म्हणजे उदयनराजे. श्रीनिवासची जागा, मतदारसंघ बदललांय, उदयनराजे छत्रपती. आता कसं करायचं. नाही कसं म्हणायचं. शिवाजी महाराजांचं घर. यांना विचारलं, की काय करायचं. ते म्हणाले, ठीक आहे. मी थांबतो. राजांना आम्ही उभं केलं. राजे निवडून आले. एकदा, दोनदा, तीनदा राष्ट्रवादीकडून निवडून आले. तिसऱ्या वेळी काय आलं त्यांच्या मनात. निवडून आल्यानंतर चार महिन्यात त्यांनी पक्ष सोडला. खासदारकी सोडली आणि भाजपकडून उभे राहिले. आम्ही यांना सांगितलं, की चला आता, या परत. आले भरला फॉर्म आणि चांगल्या मताने निवडून आले.



**मधुकर भावे यांचा पगडी घालून शरद पवार सत्कार करताना, शेजारी डॉ.पी.डी. पाटील, सुशीलकुमार शिंदे, श्रीनिवास पाटील.**

अखख्या महाराष्ट्राचं, देशाचं लक्ष तिकडे लागले होते. पुन्हा निवडून आले. म्हणजे मधला काळ त्यांचा राज्यपालाचा झाला. काही वेळा त्यांना तिकिट देता येत नसल्याचं लक्षात आल्याच्यानंतर मी अस्वस्थ होतो. मनमोहनसिंग प्रधानमंत्री. मी त्यांचा मंत्री. मनमोहनसिंगांना सांगितलं, की तुम्हाला काय करायचे ते राज्यपाल तुम्ही नेमा. एक राज्यपाल मी निवडणार. ते म्हणाले, ठीक आहे. तुम्ही निवडा. मी नाव दिलं, श्रीनिवास पाटील आणि ते झाले गव्हर्नर. सिक्किममध्ये त्यांनी काम केले. या राज्याचं नेतृत्व त्यांनी केलं.

पुढं राजेंच्या अंगात आलं. त्यांनी राजीनामा दिला. त्यामुळं पुन्हा एकदा हे निवडून आले आणि आज देशाच्या पार्लमेंटमध्ये आहेत. आनंद एका गोष्टीचा आहे, की विचारांशी बांधिलकी आणि लोकांशी बांधिलकी ही पक्की. आज सातारा मतदारसंघामध्ये कुठल्याही गावी गेलो, कुठेही गेलो, कोणाशी बोललो आणि विषय यांचा निघाला, तर लोक सांगतात साताराचे, आमचा खासदार फार भारी. आज संबंध सातारा जिल्ह्यातील सर्वसामान्य लोकांचं प्रेम संपादन करणं ही काय साधी गोष्ट नाही आणि ती कमाई यांनी केली. आयुष्यातली हीच त्यांची मोठी कमाई आहे. मला आनंद आहे, की आज पुणेकरांनी त्यांचा याठिकाणी गौरव केलाय. पुण्याशी त्यांचा घनिष्ठ संबंध होता. कलेक्टर म्हणून त्यांनी काम केलं. ही जी बालेवाडी आहे, मला आठवतंय, की राष्ट्रीय सामने घ्यायचा निर्णय हा दिल्लीमध्ये चर्चेला घेतला आणि मुख्यमंत्र्यांशी चर्चा झाली. मी मुख्यमंत्री होतो. मी सांगितलं, की आम्हाला महाराष्ट्रात सामने पाहिजेत. दुसऱ्या एका राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी सांगितलं, की आमच्याकडे स्टेडियम वगैरे सगळं तयार आहे आणि आम्हाला पाहिजे. मी आग्रह केला, त्यावेळचे पंतप्रधान नरसिंहरावना, की हे मलाच हवे. ते म्हणाले, की तुमच्याकडे स्टेडियम नाही, सुविधा नाही. आठ महिने राहिलेत. काय करणार. मी म्हटलं, माझ्यावर सोपवा. शेवटी निकाल झाला, की हे सामने महाराष्ट्रात पुण्याला करायचे. तिथून आल्याच्यानंतर कलेक्टर आमचे, बाकीचे इतर सहकारी बोलवले. पाच महिन्याच्या आत ही बालेवाडी आम्हाला उभी करून पाहिजे, हे काम त्यांना सांगितलं. रात्र-दिवस कष्ट केले. त्यावेळेला बी. जी. शिर्के यांनी ही जबाबदारी घेतली आणि त्यांच्या पाठीमागं जिल्हाधिकारी म्हणून यांनी जबाबदारी घेतली. एवढा मोठा प्रचंड प्रकल्प सहा महिन्याच्या आत उभा केला आणि संबंध देशाला आनंद होईल अशा प्रकारच्या क्रीडा स्पर्धा बालेवाडीमध्ये केल्या. याची तयारी ही श्रीनिवास पाटलांनी केली.

आणि म्हणून आंतरराष्ट्रीय पातळीवर नृत्य करण्याचं काम असो, उत्तम वक्ता म्हणून भाषण करण्याचं काम असो, उत्तम प्रशासक म्हणून बालेवाडी उभं करण्याचं काम असो, अशी कुठलीही जबाबदारी घेतली, तर हा गडी आमचा पाटील मागं राहात नाही आणि त्यामुळं साहजिकच त्याचा आनंद आम्हाला आहे, की तुम्ही या सगळ्यांचा गौरव याठिकाणी पुणेकरांनी केला. इतकरांनीही सगळ्या प्रकारच्या लोकांना एकत्रित आणून हा समारंभ केला. त्याचाही मला आनंद वाटतो. एका चांगल्या प्रकारच्या कार्यक्रमाला मला आमंत्रित केलं. मी कधी मनमोकळं बोलत नाही. पण तुम्ही मला संधी दिली. त्याबद्दल मी तुम्हाला धन्यवाद देतो आणि माझे दोन शब्द संपवतो.

■■



# आतापर्यंत माणुसकी सांभाळून काम करत आलो

## श्रीनिवास पाटील यांचे उद्गार

पौर्णिमेचे हजार चंद्र ज्यांनी पाहिले आहेत, त्यांच्याच शुभहस्ते, पौर्णिमेचे हजार चंद्र ज्यांनी झेललेले आहेत, अशा दोघांचा सत्कार या बालगंधर्व सभागृहात होतोय, आणि त्याचवेळी कटगूणच्या महात्मा फुल्यांची पगडी आणि ज्या पदरात काय तरी घ्यावं ते उपरणं आणि नायगावची सावित्री त्याच जिल्ह्यातला मी श्रीनिवास आपल्यासमोर उभा आहे. पंचम जॉर्ज आला त्या गेट वे ऑफ इंडियामध्ये त्यावेळी खांद्यावर घोंगडं टाकून असलंच मुंडावळं घेऊन एक मानवी वीर काय करावं याचा कागद घेऊन उभा होता. त्याच एका सातारकरांचा सुपुत्र म्हणून याठिकाणी माझ्या या मित्रांच्या सहवासात मी उभा आहे.

उस्मानाबादला एक सभा झाली आणि त्यावेळी आमची काय मंडळी म्हणली, या वयात शरदराव. आता या वयात आम्ही काय करतो किंवा काय करू शकतो हे झालं, याचं उत्तम उदाहरण २०१९साली झालं. ते कसं घडलं. त्यामागं कोणता कृष्ण होता, त्याच्या हातात कुठलं सुदर्शन चक्र होतं, आणि त्यामुळं अर्जुनाच्या छातीचा बाण लागायचा म्हटल्यानंतर कृष्णानं त्याची घोडी बसवली आणि कर्णाचा बाण वरनं गेला, आणि तोच बाण, तो रामबाण हे नवं सरकार स्थापन करू शकला यातली ही मंडळी आहेत.

वडिलांचे संस्कार लहानपणी झाले. वडील भाबडे, एका शेतकऱ्याची मुलगी माझी आई. स्वर्गिय कर्मवीर अण्णांच्या धननीच्या बागेमध्ये लाकूड फोडून पोरांना ज्यांनी आंघोळी घातल्या, ते माझे वडील या दोघांच्या पोटी ११ फेब्रुवारी १९४१ला जन्म झाला. शरदराव १२/१२/१९४०, दोन महिन्यांनी वडील आहेत. भावे ९ ऑक्टोबर ४०चे वडील

आहेत. थोडेसे लहान सुशिलकुमार शिंदे, ४ सप्टेंबर १९४१चे आहेत. आणि त्यामुळं आम्हा चौघांना जो आनंद आहे, वर्षाव कशाचा आहे, ऊन सूरज लागतं, मन तापतं, पण चंद्र ज्यावेळी लिंबामागून उगवतो, त्यावेळेला चांदोबा, चांदोबा भागलास का आणि लिंबोणीच्या मागं लपलास का म्हणतात. तसंच माझे सगळे सहकारी, मित्र, चाहते आज या सभागृहात उभे आहेत. जुन्या आठवणी येतायंत. वर्क्तृत्व, नाट्य, नाट्यछटा, हस्तक्षेप, चित्रं हा सगळा नाद होता. परंतु, तो नाद जपायचा. पण अभ्यास सोडायचा नाही. नंबर सोडायचा नाही. कसलीच मुभा नव्हती. काय झालंच, तर सरळ मुंबई, पुण्याची वाट धरायची आणि माथाडी कामगारात सामील व्हायचं हा बापाचा दम.

सुदैवानं अभ्यास केला. प्रांत ऑफिसर झालो. २४ जून १९६५ला वडिलांच्या पाया पडलो अन् कोल्हापूरला निघालो. तेव्हा वडील म्हणाले, तारूण्य, सत्ता आणि संपत्ती हे तिन्ही गुण एकत्र आले आणि त्यात जरा जरी घसरला, तर राजासुद्धा वाहत जातो. माझ्या कानावर वाईट काय आलं, तर गोळी घालून ठार मारेन. आणि त्यामुळं आजवर बापाच्या बंदुकीची नळी दिसते आणि त्यामुळं कानाची पाळी धरून जो येईल त्याचा सन्मान करणं, त्याचं काम करणं आणि कायद्याच्या दोन छापील ओळीच्यामध्ये जी कोरी जागा आहे, त्यातनं माणुसकी सांभाळून माणसाचं मन राखून त्याला न्याय देणं हे काम करत आलो.

माझे गुरू यशवंतराव चव्हाण म्हणायचे, की पुढाऱ्यांनी कधीतरी न्हाय म्हणायला शिकलं पाहिजे आणि अधिकाऱ्यांनी कधी व्हय म्हणायला शिकलं पाहिजे. हे सगळे मंत्री बिंत्री त्यांना विचारा. कुठलाही सेक्रेटरी लगेच व्हय म्हणत नाही. नाही. अंडर रूल सेक्शन टू, धीस कॅन नॉट डू. आमचे एक मित्र होते, त्यांनी एक नोट छापून आणली. एकदा मंत्रालयात ती नोट फिरली होती. त्याच्यावर नॉट ॲप्रूव्हल लिहिलं होतं. एक हुशार सेक्रेटरी होता. तो म्हणाला, इकडे आणा. काय झालंय. तर म्हणाले, साहेब तुम्ही सहा महिन्यापूर्वी नॉट ॲप्रूव्हल लिहलंय. सेक्रेटरी काय करू शकतो एवढंच सांगतो. त्यानं नॉटच्या पुढं इ लिहिलं. नोट ॲप्रूव्हल. मी कधीही नोट घेतली नाही आणि अशा नोटा ॲप्रूव्ह केलेल्या नाहीत. आणि म्हणून टिकलो.

ज्यावेळेस हायस्कूलमध्ये माझे वडील शिकले. स्वर्गिय यशवंतराव चव्हाण साहेब दोन वर्षांनी लहान. २६ जानेवारी १९३२ साली हायस्कूलच्या लिंबावर त्यांनी झेंडा लावला, आणि वंदे मातरम् म्हणले. म्हणून अठरा महिन्यांची शिक्षा झाली. विठाबाईला बोलवलं. गुन्हा कबुल करायला सांगितलं. तेव्हा विठाबाई म्हणली, यशवंतानं काय खून केलेला नाही. त्याच यशवंतरावांच्या आशीर्वादानं आणि त्यांच्याच शिकवणुकीतनं थोडा फार शिकलो. १९६५ साली प्रांत झालो. वडील आईला म्हणाले, की आण्णा आता, ज्याला आम्ही युवर हॉनर म्हणतो, ज्याच्यापुढं आम्ही वकील म्हणून उभं राहतो आणि चार पैसे मिळवतो, तो पोरगा माझा आता प्रांत झालाय. माझ्या बापानं माझ्यासमोर माझी कधी स्तुती केली नाही. मॅट्रिकला पहिला आलो आणि बक्षिस मिळालं. दोन-तीन किलो पेढं कोर्टात वाटलं. माझ्या आईनं मला कौतुकानं सांगितलं. कठोर शिस्तीचे वडील. आणि ज्यांनी ज्ञान दिलं, आशीर्वाद दिले असे यशवंतराव चव्हाण आणि त्यामुळं ३४ वर्षे नोकरी केली. १९६५ साली नोकरीला गेलेलो आणि १९९९ साली एका मित्रानं बोलवलं. गेलो. काय करायचं म्हटलं. म्हणाले, जा आणि राजीनामा देऊन ये. राजीनामा दिल्यानंतर काय म्हणाले, तर जा आता गांधी महाराज बन. काय करशील, तर दोन-चार जाकिटं आणि टोप्या शिवून घे म्हणाले. ९९ आणि २००४, दोन्ही वेळा जिंकलो. २००९ला म्हणाले बसायचं. मी का सुद्धा म्हटलं नाही. हे ठरवतील ते धोरण, बांधतील ते तोरण आणि ८० टक्के समाजकारण, २० टक्के राजकारण, निवडणुकीपुरतं. मूल्यवर्धन नाही. अमूल्य नाही. चल म्हटलं, की जायचं, ओढायचं. शंका-कुशंका, मूल्यमापन काय नाही.

आपण रानात उतरतो आणि पौर्णिमेचा रात्र असती. कुत्रंसुद्धा भुकत नाही. आणि मग आपण जात असतो हळूहळू. आणि मग आईनं सांगितलेल्या कथा आठवतात. ओढ्यापाशी पिंपळ आहे. त्या पिंपळावर एक पाय अडकवून उभं असतंय. आणि आपण चंद्राकडं बघतो. राम..राम...तो चंद्र आपल्याबरोबर चालत असतो. तसा हा पुनवेचा, शारदेचा चंद्र, शरदचंद्र आमच्याबरोबर. ओढ्यापशी आलं, की उडी मारुन पल्याड. कुठं उडी मारावी, कशी मारावी याचं ज्ञान ज्यानं आयुष्यभर दिलं.

साधारणत: काय होतं, जसं हे म्हणाले, की हा शेवटचा सत्कार आहे का. तसं राज्यपाल केलं, म्हणजे आता संपलं. कसंतरी वर्ष, दीडवर्ष काढलं. २८ सप्टेंबरला फोन, काय करतुय. म्हणलं, देवपूजा करून बसलोय. जा म्हणाले, फॉर्म भर. २७ पानांचा फॉर्म. या बँकेत किती, त्या बँकेत किती. आमचं कुठंच काय नाही. भरायला सोपं गेलं. काय लपवायची भानगडच नाही. कुठं फ्लॅट नाही, प्लॉट नाही. मल्हारपेठेत सभा होती. मोर नाचत होते, थुई थुई थुई. सातारला आलो आणि धो धो धो. ओलेचिंब आणि भाषण. गंमत अशी, हे म्हणाले दोन शब्द बोल. तर आमच्या स्वभावाबरोबर, ढगाला लागली कळ, पाणी थेंब थेंब गळं, आणि तुमची सारी मतं मला मिळं. आणि देवाशपथ सांगू का, मतदानाच्या मोजणीला गेलो नाही.

मुलाला पाठवलं, सही आली, आणि मग चालू आहे जनसेवा. फार गंमत आहे. देण्यात गंमत आहे. डॉक्टर देतो दवा, आपण त्याला देतो दुवा. पण आमचा आणि जनतेचा दुवा फार मोठा आहे. जोडलेला आहे. शरदरावांनी यावं आणि लोकांना सांगावं. सगळीकडं व्हिडिओ चालतो आता. देशातला सगळ्यात मोठा. अनेक लोकांनी पाहिलेला व्हिडिओ. पहिल्यांदा निवडून आलो त्यावेळी पहिल्या दिवशी शरदराव म्हणाले, की श्रीनिवास तु माझ्याबरोबर चल. गेलो. इकडं गोविंद वल्लभ पंत, बाजूला आदरणीय चव्हाण साहेबांचा पुतळा, म्हणाले पाया पड. पडलो. मी मुख्यमंत्री असताना पुतळा बसवलाय. लहान पोरांना शाळेत जाताना कुणीतरी घेऊन जातात ना तसं शरदराव मला आत घेऊन गेले. समोरून चंद्रशेखर. म्हणाले, जिलाधीश यहाँ क्या कर रहें हो. तिकडं कलेक्टरला जिलाधीश म्हणतात. यांनी सांगितलं, निवडून आलेत. केवढा मोठा मान मिळालांय मित्रामुळं. आजही मान नाही, काही नाही. कानमंत्र एकच समाजसेवेचा. ते मोटेवरचं जे गाणं आहे, ते चाक कुईकुई वाजतंय आणि पाणी भरभर पडतंय. उसाला बी जातंय, हराळीला बी जातंय. मिरचीला पण जातंय. पण अशी मिरची खुडली की गोड लागते. कारण ती आपली आहे.


केवळ बदल झालांय. वय वर्षे २४. लग्नाचं वय झालं. कुणीतरी एक मिलिट्रीवाला आला. त्यानं एक मुलगी दिली, जी समोर बसलीय. सैपाक पाणी अजिबात नाय. गोळाफेक, भालाफेक, कबड्डी. एका दुकानात गेलो आणि एका टूथपेस्टवर बाळाचं चित्र असायचं. त्याचे डबे आणले. त्यात कणिक बिणीक भरली. पहिली चपाती हिंदुस्थान-पाकिस्तान. गोल नाही. पण आजवर तिनं सांभाळलं. कधीही, कसलीही तक्रार नाही. तुम्हाला लोकांच्याकरता वाहून दिलेलं आहे. तुमचा मित्र तुमच्या मागं उभा आहे. घरात या. हात पाय धुवा, जेवायला बसा, तापलेल्या तव्यावरची भाकरी आणि खर्डा. तो आतापर्यंत मिळाला. आकर्षणं खूप असतात. पण मनानं सांभाळलं. घरचा ताण नाही. मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न नाही. विचारावं लागतंय, की पुस्तकं काय कुठांय. पण जिनं आयुष्यभर साथ दिली, ती माझी पत्नी.

हा महाराष्ट्र साहित्य कला प्रसारिणीचा २५वा वाढदिवस. त्याला रौप्यमहोत्सव म्हणतात. त्याच्यापुढचा सुवर्णमहोत्सव असतो. त्याच्यापुढचा अमृतमहोत्सव असतो. त्याच्यापुढचा हिरक महोत्सव असतो आणि त्याच्यापुढचा शताब्दी महोत्सव असतो. पण रूपयाची गंमत आहे ना. रूपया वाजतो. सोनं वाजत नाही. बंदा रूपया तुम्ही वाजवा. तुम्ही सुवर्ण महोत्सवापर्यंत जावो. रौप्यमहोत्सवात तुम्ही माझ्यासारख्या एका चवली, पावलीला जे महत्त्व दिलं. बंदा रूपयाएवढी किंमत दिली आणि मधुकरजीच्या साथीत. या मधुकरची आठवण सांगतो. त्यानेही माझ्या दोन आठवणी सांगितल्या. माझे गुरू २२ नोव्हेंबर १९६२ला लोकसभेत शपथविधीनंतर गेले. चायनाचं युद्ध सुरू झालं होतं. शस्त्रसंधी त्यादिवशी झाली होती. आणि आदरणीय चव्हाण साहेब म्हणाले, चीन तो चीन है, लेकीन हम प्राचीन है आणि युद्ध थांबलं. त्या माझ्या मित्राचा सत्कार आज होतोय. जग बदललंय. आमचीच मुलं आमच्याबरोबर झाले आहेत. मंत्री झाले आहेत. गृहमंत्री झाले आहेत. आरोग्यमंत्री झालेले आहेत. त्यांचा आनंद फार मोठा आहे. जग आपल्या मुलांनी आपल्या खांद्यावर बसून बघावं आणि आपल्या मुलाला, पुतण्याला खांद्यावर घेऊन कुस्तीत जी दंगल चालते, आपल्याला कुस्ती कळते, त्याला कळत नाही. त्याचा गोंडा हलतो, टकुचं हलतं. पण त्याला आपण सांगत असतो. त्याला आनंद होतो. तो म्हणतो, काका लय चांगलं दावलंस. तसं काकांच्या रूपामध्ये ८१व्या वर्षामध्ये माझीच मुलं इथं बसलेले आहेत. आणि माझा एक मित्र पुन्हा बोटाला धरून, असंच तुमचं बोट आमच्या बोटात राहो आणि जग, दुनिया उरलेली आरोग्यदायी, तुम्हालाही आणि मलाही, कधीतरी एका तळ्याकाठी अशीच शाम रम्य ठरावी. सख्या रे किती रंगला खेळ!

■■

**हास्यविनोदात रमलेले श्रीनिवास पाटील, शरद पवार आणि सुशीलकुमार शिंदे**





# श्रीनिवास पाटील, भावेंच्या रुपाने तरुणांना समाजदर्शन

## देशाचे माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचे उद्गार

श्रीनिवास पाटील आमच्याबरोबर खासदार होते. राज्यपाल होते आणि परत खासदार झाले. मधुकरराव भावे हे आचार्य अत्रेंच्या तालमीत तयार झालेले थोर पत्रकार. आचार्य अत्रेंच्या लेखणीतून त्यांनी सर्व काही स्वीकारलं. पण, महाराष्ट्रामध्ये त्यांच्या लेखणीमधून आचार्य अत्रेंसारख्या शिव्या काही शिकवल्या आहेत. तिथं काम करत असताना थोडा तरी प्रभाव असतो. पण, मधुकर भावेंच्यावर तसा काही प्रभाव झाला नाही. उलट आचार्य अत्रेंच्यामधले जे काही चांगले गुण आहेत, आणि कळत नकळत अशी टीका कशी करावी हा गुणही त्यांच्याकडून शिकले. नाहीतर एखाद्याच्या तालमीत एखादा असतो, तो सर्वगुणसंपन्न असतो. पण, मधुकर भावेंनी अक्षरांची यात्रा करत असताना त्या पालखीचं वैभव वाढवलं.

माझे मित्र श्रीनिवास पाटीलजी, तीन-चार वर्षापूर्वी एक दिवाळी अंक वाचला होता आणि त्यामध्ये ते पुण्याला कॉलेजमध्ये यायला निघाले कराडहून आणि पुण्याच्या स्टेशनवर ते कसे वळकटी घेऊन निघालेले आणि कशी रात्र त्यांनी पुण्याच्या स्टेशनवर काढली, त्याचं सुरेख चित्र त्यांनी त्याठिकाणी केलं होतं. एका जिद्दी माणसाची, विद्यार्थ्याची ती कहाणी होती आणि मी भारावून गेलो. बराच वेळ विचार करत होतो. त्यांनी बरेचसं काय सांगितलं होतं, एसपी कॉलेजमध्ये ते कसे आले, कुठल्या हॉटेलमध्ये जात होतो, आता सगळं काय सांगणार नाही. पण, शरदरावांना एक फारच चांगली सवय आहे, अशी मुलं जिथं जिथं दिसतील त्यांना वेचून त्यांना पुढे घेऊन जाण्याची एक प्रथा आहे. शरदरावांनी महाराष्ट्रामध्ये असंख्य असे तरूण शोधले. त्यापैकी मीही एक आहे. पण,

शेवटपर्यंत मी काय त्यांच्याबरोबर राहिलो नाही, याचीही खंत मलाही आहे. त्यांनाही कदाचित असेल. असो, पण त्यांनीही मला काय विचारलं नाही. मी जातोय तर ते जाऊ द्या म्हणाले. यालाही मोठं मन लागतं.

पण, शरद पवारांना हा नाद आहे. महाराष्ट्र आपल्याला कसा घडवाचांय, तर हा महाराष्ट्र घडवत असताना विचारवंतांना बरोबर घेऊन जायचंय. लेखक, कवी, नाट्य आणि गावाकडचा समृद्ध असलेला शेतकरी आणि त्याचबरोबर शेतमजुरांनाही ते बरोबर घेऊन जाण्याचा प्रयत्न करतात. त्यांचा अनुभव खूप मोठा आहे. श्रीनिवास पाटील, त्यांनी त्या लेखात लिहिलं होतं, की शरदराव आणि ते कसे कसे फिरायचे आणि शरदरावांचा एक व्रात्यपणा मी राज ठाकरेंनी मुलाखत घेण्याच्यापूर्वी मी माझ्या प्रास्ताविकामध्येही सांगितलं होतं. शरदराव आज एक विचारवंत म्हणून यशवंतरावांच्यानंतर नेतृत्व करणारे देशातले एक थोर नेते आहेत. पण, त्यांच्या तारूण्यामध्ये ते व्रात्यपणा घेऊनच पुढे निघाले आणि आजही राजकारणामध्ये अधूनमधून तो व्रात्यपणा करण्याची सवय त्यांना आहेच. ते कधी काय करतील याचा नेम सांगता येत नाही. पण, असो तो भाग निराळा. पण, विचारांची साधना केवढी आहे.

अलिकडच्या काळात मी त्यांच्यावर काय जास्त बोललो नाही. पण, आज थोडीसी संधी मिळाली. आपण आहोत तिथं आहोत. पण दुसऱ्या पक्षामध्ये काय चाललंय, तिथं कसली विचारवंत माणसं आहेत, ते कसा देश घडवू इच्छितात, याचं आकलन, मनन करून ते समाजालाही सांगण्याचं काम करतात. श्रीनिवास पाटील, ग्रामीण भागातून आलेला एक तरूण मुलगा, ज्याच्यावर घरातून भजन, कीर्तनाचा प्रभाव असणारा, आत्ता बघितलं ना भाषण करताना, मला तर वाटत होतं, की एखादा बुवाच इथं व्यासपीठावर उभा आहे. तर तो प्रभाव आहे लहानपणापासूनचा. पण पुण्याच्या सांस्कृतिक जीवनामध्ये ते आले, आणि त्यांच्यावर पुण्याच्या संस्कृतीचा प्रभाव पडला गेला. पण, गावचं गावपण त्यांनी कधी सोडलं नाही. गव्हर्नर झाले, तरी मित्रांना बोलव, पत्रकारांना बोलव आणि शंभर–शंभर लोकांच्या जेवणाची व्यवस्था करायचे. माझी हिम्मत झाली नाही. मीही गव्हर्नर होतो. आणि तेही सिक्किमला. पण आपला भाग सगळा दाखवावा, देशाच्या कानाकोपऱ्यातली परिस्थिती कशी आहे हे सांगावं हेही त्यांनी महाराष्ट्रातल्या सगळ्या जर्नलिस्टना सांगितलं. मित्रांना सांगितलं.

आमचे भावे साहेब, त्यांनी माझ्या वाढदिवसाला काटे नसलेला गुलाब हे पुस्तक लिहून टाकलं. आता मी आयुष्यभर काटे घेऊनच निघालेला माणूस आहे. पण, आपल्याकडे असलेले काटे दुसऱ्याला टोचू नयेत याचं शिक्षण शरद पवारांनी मला दिलेलं आहे. राजकीय मतभेद असतात. माझा तसा काय मतभेद नाही. पण प्रवाह वेगळे आहेत. पण, वेगळे प्रवाह असले तरी, कोण पुढं जातं, व्यवस्थितशीर जातं त्याच्यावर बारीक लक्ष असतं त्यांचं. मधुकर भावेंच्या जीवनामध्ये सुख–दु:खाचे अनेक प्रसंग आले. शरदरावांना खडान्‌खडा माहिती असते त्याची. अनेक पत्रकारांना त्यांनी सहकार्य केलं. अनेकांना नवीन मार्ग दाखवले. पण, मधुकर भावे हे आमच्या



मानपत्र देऊन मधुकर भावे यांचा शरद पवार सत्कार करताना, शेजारी राजेश टोपे, डॉ.पी.डी. पाटील, सुशीलकुमार शिंदे, श्रीनिवास पाटील आणि सचिन ईटकर

महाराष्ट्राला असलेलं एक अलंकार आहे. पत्रकारितेतला अलंकार आहे. मराठी पत्रकारांची परंपरा जे म्हणतात, त्या परंपरेतला हा अलंकार आहे. ते कोकणातून आले. बाळशास्त्री जांभेकरांच्या, म्हणजे जिथून पत्रकारितेची सुरूवात झाली त्या गावाच्या जवळचे ते आहेत. विनोबा भावेंच्या गावाच्याही जवळचे ते आहेत. भावेंचं एवढं प्रचंड वाचन आणि त्यांची लेखणी आजही तरतरीत आहे. उल्हासदायक आहे.

आणि अशा दोन हिऱ्यांचा सत्कार तुमच्या कार्यकारिणीनं आज इथं केला, याचा आम्हा सगळ्यांना आनंद आहे, की हे दोन हिरे महाराष्ट्र ज्यांना माहिती आहे, महाराष्ट्राचं साहित्य ज्यांना माहिती आहे, महाराष्ट्राचा विचार ज्यांना माहिती आहे, महाराष्ट्रातलं नेतृत्व आणि कर्तृत्व ज्यांना माहिती आहे, त्या दोघांचा सत्कार आज तुम्ही याठिकाणी घडवून आणलात, आणि शरदरावांच्या हस्ते तो सत्कार केला याचा माझ्यासारख्याला आनंद आहे. कारण आता राहिले किती हात लोकांचं कर्तृत्व फुललेलं आहे, अनेक लोकांचं वर्क्तृत्वही फुललेलं आहे, पण, मी आलो पुण्यात ते लॉ कॉलेजला आलो. आणि त्या लॉ कॉलेजच्या प्रवासात मला शरदराव इथं भेटले. आणि मग मुंबईला माझे एक मित्र श्रीराम लेले म्हणून होते, त्यांच्याबरोबरीनं कसा राजकारणात आलो हे मलाही माहिती नाही. जसं श्रीनिवास पाटलांना ते सांगायचे, की काय वाचावं, काय वाचू नये आणि कुठल्या नेत्याला फॉलो करावं. ते फॉलो करुन मी तिकडे गेलो. ते आहे तिथेच राहिले. ते तिथून खूप मोठे झाले. मी आहे तिथं माझ्या योग्यतेनं जे काय व्हायचं ते झालो. तसं आमच्या शरदरावांनी श्रीनिवास पाटलांना, मला माहिती आहे, मी अनेक प्रसंग बघितलेले आहेत, की श्रीनिवास पाटील मोठा झाला पाहिजे. श्रीनिवास पाटील हे कर्तृत्वाने तर आहेतच, पण आपलाही हात लागला पाहिजे, अशी भावना घेऊन ते सातत्यानं काम करत राहिले आणि देशामध्येही काम करत राहिले. अशा या दोन कर्तृत्ववान



असे, की ज्या हातांकडून सत्कार करून घ्यावा असा एखादा दुसरा हात राहिलेला आहे आता. त्यात शरदरावजी आहेत. राजकीय भ्रमंती, सामाजिक भ्रमंती, महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये कायम ठेऊन तुम्ही दोघेही पुढे जात आहात. आता तसं तुमचं ८१वं, ८२वं वय चालू आहे. तुम्हा दोघांना उदंड अशा प्रकारचं आयुष्य लाभो, अशा प्रकारची प्रार्थना करतो.

मला फार थोडक्यात बोला असं सांगितलं होतं. थोडं जास्तच बोललो. पण बोलल्याशिवाय राहात नाही. कारण, अशी एखादी संधी मिळते चांगली, की ज्या पुण्यामध्ये अनेक माणसांना आज आपण प्रसारिणीने मानाचा मुजरा केला, त्याबद्दल तुम्हालाही धन्यवाद देतो, की हे असे चांगले नेते हुडकून काढले, की त्यांचं दर्शन, त्यांची भाषणं याचा परिणाम तरूणांच्यावर होतो, की हे कसे त्यावेळी कठीण प्रसंगातून पुढे आले. त्याच्यापरीने ते पुढे जाण्याचा प्रयत्न करत असतात. आपली २५व्या वर्षामधली ही प्रसारिणी पुढे अशीच वाढत जावो आणि हे सगळं समाजदर्शन तरूण पिढीला होत राहो. अशा प्रकारची प्रार्थना करतो आणि मी रजा घेतो. जय हिंद! जय महाराष्ट्र!!



# महाराष्ट्राच्या पुनर्बांधणीसाठी पवार साहेब पुढाकार घ्या

## ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांचे विचार

काय बोलू? काही वेळेला शब्द गोठून जातात. अनेक सभांतून भाषणं करताना जे दडपण येत नाही, ते आज पवार साहेबांच्यासारख्या देशाच्या दिग्गज नेत्याच्या हस्ते एवढा मोठा सन्मान कधी कल्पनाही केली नव्हती. ६२ वर्षापूर्वी रोह्याहून निघालो. अत्रे साहेब आले, म्हणाले, चल मराठात. म्हटलं, मला काही येत नाही. साहेब म्हणाले, पहिल्या दिवशी कोणालाच काही येत नाही. सुरू कर. वडील म्हणाले, जातोयस तर जा, माझ्याजवळ ५ रूपये आणि दहा आणे आहेत. दोन दिवसात परत येशील. म्हटलं, आलो तर आलो. घरीच येईन. जा म्हणाले, तुझ्याकडून काय मला मोठेपणाची अपेक्षा नाही. पण, मला कमीपणा येऊ देऊ नकोस. आणि आज पवार साहेब, तुमच्या हस्ते सत्कार स्वीकारताना मी ६०-६२ वर्षांत वडिलांना, आईला, कुटुंबाला, महाराष्ट्राला कमीपणा येईल एवढं केलेलं नाही. किमान एवढं तरी मी निश्चितपणानं सांगू शकतो. चांगलं केलं का नाही मला माहित नाही.

पण, आजचं हे सगळं व्यासपीठ बघितलं साहेब, व्यासपीठावर मांदियाळी जी आहे, त्यात सचिनराव तुम्ही ओढून ताणून मला बसवलंत. सत्कार कोणाकोणाचा आहे. श्रीनिवास पाटील साहेब आणि मी. अहो, कुठे ही तुलना आहे का. कुठे श्रीनिवास. कुठे मी. कलेक्टर माणूस. त्यात पुण्यात. पुण्यातल्या एका वाल्याला वाल्मिकी केलेला माणूस, तो आज दिगंत कीर्तिचा माणूस झालांय, असा केवळ प्रशासक नाही, माणुसकी अपार असलेला माणूस खासदार होतो. तुम्ही जे पावसाचं वर्णन केलं. ती सभा कव्हर करायला मी होतो. सह्याद्री पावसात नुसता भिजला नाही, कराडचा डोंगरसुद्धा पावसातच भिजला.

आपल्या वाढदिवसाला लोकं स्वागत-सत्कार करून घेतात. महाराष्ट्रातल्या दुष्काळातल्या छावण्यांना चारा पाठवण्याचं काम या माणसानी केलं आणि चारा पोहोचला की नाही, गुरांनी चारा खाल्ला की नाही, हे कळल्यानंतर जेवण घेतलं. कुठे एवढी मोठी माणसं आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून तुम्ही रामशेठना बोलवलंत. पी. डी. सरांना बोलवलंत. श्रीनिवासजी एवढे मोठे. आणि मी कुठे बसतो त्यात. रामशेठ ठाकूर एक शिक्षक. सात कोटी रूपयांची इमारत रयत शिक्षण संस्थेला बांधून दिली. कमवा आणि शिका कर्मवीरांच्या त्याच शाळेत त्यांनी केलं ते हे रामशेठ ठाकूर आहेत. आणि पी. डी. सर. एक पिंपरी-चिंचवडचं इंजिनिअरिंग कॉलेज त्यांना

मिळालं होतं. त्याच्या २७ संस्था करून दाखवल्या आणि ८९व्या मराठी साहित्य संमेलनाचा मराठी भाषा आणि संचित हा पाचशे पानांचा ग्रंथ केला. आज मराठीला राजभाषेचाच नव्हे तर अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी हा ग्रंथ उपयोगी पडेल इतकं मोठं काम सर तुम्ही केलेलं आहे.

असे हे तीन दिग्गज आणि अध्यक्ष कोण, महाराष्ट्राचा काटे नसलेला गुलाब सुशिलकुमार शिंदे. बेलिफ म्हणून सुरूवात केलेला माणूस कोर्टात. कोर्टात हाका मारणारा. तो गृहमंत्री, लोकसभेचा नेता. मी का सांगतोय. यांच्या शेजारी तुम्ही माझी खुर्ची ठेवलीय, साहेब, मी स्टुल दिलं असतंत तरी खाली बसलो असतो. मी एवढा खरंच मोठा नाही. मी तीन दिवस याच्यावर विचार करतोय, की खरंच आपण एवढा मोठा सत्कार घेण्याएवढे मोठे आहोत का. खूप छोटा आहे मी. माझा सत्कार का केलात तुम्ही. कशाकरता केला. तुमच्या या संस्थेमध्ये मी होतो, आहे? आपण अनेक जणांचे याच व्यासपीठावर सत्कार केलेत. पवार साहेबांचा केला. माशेलकरांचा केला. काकोडकरांचा केला. स्वामीनाथनचा केला. किती जणांचे केले आपण. त्यात मी स्वयंसेवक म्हणून काम करत होतो. तिथं तुम्ही माझा सत्कार करून टाकलात. कसं ते अवघड वाटतंय, तुम्हाला सांगतो. पेलवणारी गोष्ट नाहीये ही. पण मग का केला असेल सत्कार.

तर ६०पासून मी ज्या महाराष्ट्राचं प्रतिनिधीत्व केलं, ज्या वृत्तपत्राद्वारे, त्या वातावरणाचा, त्या नेत्यांचा, त्या प्रभावळीचा, त्या चारित्र्याचा, त्या सगळ्या कामाचा, त्यावेळच्या महाराष्ट्राच्या बांधणीचा साक्षीदार मी आहे, म्हणून तुम्ही माझा सत्कार केलात असं मी मानतो. किमान ही भावना आहे. यशवंतराव चव्हाणांसारख्या माणसानी पाठीवर हात टाकून, अरे मित्रा, असं म्हणणं, कोणतं आणखी सर्टिफिकेट पाहिजे, सांगा मला तुम्ही. मराठी राज्य झालं. यशवंतरावनी मधुकरराव चौधरींना बोलवलं, मधुकरराव नगरविकास खात्याचे राज्यमंत्री होते आणि म्हणाले, बाळासाहेब झालं महाराष्ट्र राज्य. तुम्ही आता नगरविकास खात्यामार्फत कोणतं बिल आणू इच्छिता. त्यांना काय सुचलं नाही. उद्या विचार करून सांगा. दुसऱ्या दिवशी आले, म्हणाले, साहेब काही सुचत नाही. नाही सुचत. मग असं करूया आपण, या महाराष्ट्रात माणसांची घाण, माणसं डोक्यावर वाहतात. या महाराष्ट्रामध्ये आपण माणसांची घाण माणसांनी डोक्यावरून वाहायची नाही याची बंदी करणारं विधेयक आणू आणि देशामध्ये महाराष्ट्र हे पहिलं राज्य आहे, की महाराष्ट्रानंतर माणसांची घाण माणसांनी वाहण्याची बंदी करणारं विधेयक या महाराष्ट्रात आणलं गेलं. तेव्हा नगरविकास खात्याच्या सेक्रेटरींना यशवंतरावांनी विचारलं, किती कोटी लागतील. त्या काळी २८ कोटी लागणार होते आणि साहेब त्या ट्रॉली आणल्या. आणि ती सगळी माणसांची घाण डोक्यावरून न वाहता या समाजाला. ही जी दृष्टी आहे, सचिनराव, या दृष्टीची, या विचाराची जी माणसं आहेत ना, त्याचे साक्षीदार पवार साहेब आहेत.

दुर्दैवानं आज काय झालंय साहेब, ज्या महाराष्ट्रामध्ये माणसांची घाण माणसांनी वाहायची नाही अशी विधेयकं आणून महाराष्ट्राची बांधणी करण्याचं काम करणाऱ्या माणसांच्या आजच्या या महाराष्ट्रात आम्हीच एकमेकांच्या अंगावर रोज सकाळी एवढी घाण ओततोय, एवढे आरोप-प्रत्यारोप करतोय, आजचं वृत्तपत्र यशवंतराव, वसंतदादा ही मोठी





माणसं स्वर्गात हातातसुद्धा घेत नसतील. सामान्य माणसाच्या प्रश्नाला जागाच राहिली नाही. पत्रकार म्हणून आम्ही काय करतो आहोत. काय आरोप करतो आहोत. काय लिहितो आहोत. राजकीय माणसं एकमेकांवर आरोप करतायंत, पण सामान्य माणसासाठी आज या महाराष्ट्रात जागाच राहिलेली नाही अशी जी परिस्थिती निर्माण झालेली आहे आणि साहेब हे सगळं बदलण्याचं काम, हे सगळं थांबवण्याचं काम फक्त, फक्त, फक्त शरद पवार साहेब, तुम्हीच करू शकता.

महाराष्ट्रातला कोणताही माणूस चुकला तर त्याचा कान धरण्याचा अधिकार फक्त तुम्हाला आहे. लता मंगेशकरही आदर करायच्या. स्वामीनाथनही आदर करतात. माशेलकरही आदर करतात. क्रिकेटमधली सगळी माणसं आदर करतात. राजकारणाच्या बाहेर असं कोणतंही क्षेत्र घ्या, एवढा मोठा माणूस, २२व्या वर्षी युवक काँग्रेसचा अध्यक्ष. २३व्या वर्षी जपानच्या पंतप्रधानांचं कामकाज पाहायला युवक काँग्रेसनी पाठविलेलं २३व्या वर्षी यांना. २७व्या वर्षी आमदार, ३२व्या वर्षी मंत्री, ३७व्या वर्षी मुख्यमंत्री, ९१ला संरक्षणमंत्री आणि आज जवळजवळ ३५ ते ४० संस्थांचे अध्यक्ष. साहेब, केवळ नी केवळ महाराष्ट्रापुरता विचार करू नका साहेब, पवार साहेब, आम्ही तुमच्याकडं जे पाहतो आहोत, राजकारणाच्या पलिकडं जाऊन महाराष्ट्रातल्या आणि देशातल्या लोकांनी विचार केलेला आहे या सगळ्या गोष्टींचा की राजकीय भूमिकेच्या पलिकडे उठून या देशामध्ये नेतृत्व असलेला आजचा आमचा एकमेव नेता म्हणजे शरद पवार साहेब आहेत हे मी तुम्हाला सांगतो.

हे त्यांच्या स्तुतीकरता मी सांगत नाही. पण माझा सत्कार होताना माझ्या मनात ज्या सगळ्या भावना आल्या, या चार लोकांमध्ये मी खरंच नाहीये कुठे. आणि म्हणून पवार साहेब, आत्ता महाराष्ट्राची बांधणी होताना, किंवा करताना फार मोठी जबाबदारी आपल्या सगळ्यांवर आहे. उद्याचा महाराष्ट्र या पद्धतीनं एकमेकांवर आरोप करू नये, ती माणसं सगळी आहेत साहेब. महाराष्ट्राची जडणघडण करताना कितीतरी लोकांनी मोठं योगदान दिलं आहे. आज हे कुठंतरी चुकतंय. कुठेतरी गडबड होतेय. रस्ता चुकल्यासारखा वाटतोय. आपण काही भलतीकडं निघालो नाही ना असं वाटतंय. आणि म्हणून हे सगळं एका वळणावर आणण्यासाठी महाराष्ट्रात पवार साहेब आमच्या सगळ्यांचं आयुष्य तुम्हाला मिळावं अशी मी प्रार्थना करतो. आणि हे तुम्हीच करू शकता.

प्रश्न विचारला, की राष्ट्रीय पातळीवरचं नेतृत्व म्हणजे नेमकं काय. देवीलाल आणि कर्पुरी ठाकूर यांनी २००८ साली देशपातळीवरचा दहा लाख शेतकऱ्यांचा मेळावा जो घेतला होता, त्याचं अध्यक्षपद शरद पवार साहेबांना दिलं होतं दिल्लीमध्ये. खूप बोलता येईल. पण मला आज जे दिसतंय पत्रकार म्हणून, की आजची वृत्तपत्रं ही आरोप-प्रत्यारोपांनी




**सन्मानचिन्ह देऊन मधुकर भावे यांचा शरद पवार सत्कार करताना शेजारी हर्षवर्धन पाटील, राजेश टोपे, डॉ.पी.डी. पाटील, सुशीलकुमार शिंदे, श्रीनिवास पाटील, सचिन ईटकर, रामशेठ ठाकूर आणि दिलीप वळसे पाटील.**

भरलेली वृत्तपत्रं आहेत. त्यात सामान्य माणसाचा आणि पत्रकारितेचा संबंध संपलेला आहे आज. ग्रामीण भागातल्या माणसांचे प्रश्न तिथेच्या तिथे आहेत. म्हणून परत एकदा महाराष्ट्राची पुनर्बांधणी करण्याकरता पवार साहेब तुम्ही आम्हाला शंभर वर्षे हवेत. हा पुरोगामी विचार यशवंतरावांनी दिलेला आहे आम्हाला. एवढा मोठा नेता होणार नाही साहेब. वसंतराव नाईक साहेब असतील, दादा असतील केवढं मोठं काम केलंय या माणसांनी. महाराष्ट्र एक दिवसात नाही घडलेला. रोजगार हमीचं विधेयक जे आलं, ते देशानं स्वीकारलं. गरीब माणसाला काम देण्याची ती योजना होती. महाराष्ट्रात असा विरोधी पक्ष होता, तो म्हणाला, की आम्ही टॅक्स लावायला मदत करतो म्हणून. जगाच्या पाठीवर असं उदाहरण कधी घडलंय. ५० वर्षे झाली राज्याच्या मुख्यमंत्र्याला म्हणून विधानसभेमध्ये मुख्यमंत्र्यांच्या अभिनंदनाचा ठराव विरोधी पक्ष मांडतो असं जगात कुठं घडलंय. ६१ वर्षे झाली म्हणून देशाच्या नेत्याचं अभिनंदन करायला टोकियोहून पंतप्रधान येतात आणि भाषणात सांगतात, मै इसलिये आया हूं की जब गुजरातमध्ये भूकंप हुआ, तो शरदजी मिले, कहने लगे, भूकंप से कैसे झुंजना मै जानता हूं, मै गुजरात जाना चाहता हूं. ७५० सांसद है, उसमे अकेले पवार निकले जो बोले जाना चाहता हूँ, इसलिये डिझास्टर मॅनेजमेंट का चीफ बनाया उनको. हे मी सांगतोय ते त्यावेळचे पंतप्रधान वाजपेयींचं आहे हे. आजच्या पंतप्रधानांचं नाहीये.

काय माणसं होती ती. आणि ७५वा वाढदिवस पवार साहेबांचा, देशाचे राष्ट्रपती, देशाचे पंतप्रधान, लोकसभेच्या अध्यक्षा, सात राज्याचे मुख्यमंत्री, केवढा प्रचंड वाढदिवस केला गेला. तो महाराष्ट्राचा नेता देशपातळीवरचा. आमच्या मनात एकच खंत आहे साहेब, मी हे राजकीय भाषण म्हणून करत नाही. पत्रकार म्हणूनही करत नाही. मनात काय येतं. अरे, जर गुजराल पंतप्रधान होऊ शकतात, देवेगौडा होऊ शकतात, चंद्रशेखर होऊ शकतात, व्ही. पी. सिंग होऊ शकतात, हजार पटीनं क्षमता आणि आवाका असलेले आमचे शरद पवार साहेब का होऊ शकत नाहीत. आजचं हे वृत्तपत्राचं सगळं पाहताना साहेब, तुम्हाला किती वेदना होत असतील याची मला कल्पना आहे. ज्या हिमतीनं तुम्ही त्या सगळ्या आजारांवर मात करून उभे राहिलेला आहात, अजून तुम्ही २०-२५ वर्षे त्याच पद्धतीनं उभे राहा. मी आपल्याला पुन्हा एकदा शुभेच्छा देतो. पवार साहेबांच्या हस्ते मी सत्कार घेतोय, माझं आयुष्य धन्य झालं.

■■



भाजप व संघ परिवाराने देशभक्ति-राष्ट्रवाद आणि बहुसंख्यक वर्चस्ववादाचे जे राजकीय मिश्रण तयार केले आहे त्याचा यशस्वी व पटेल असा प्रतिवाद करणे व तसा नवा तर्कसंगत युक्तिवाद तयार करणे हे विरोधी पक्षांसमोरचे मोठे आव्हान आहे. भारतात आजही उदारमतवादी लोकशाही मानणाऱ्या लोकांचा मोठा वर्ग आहे. त्या वर्गाला समर्थ पर्याय उपलब्ध होत नाही ही त्यांची अडचण आहे. त्यामुळे भाजपचे फावत आहे अशी त्यांची ठाम धारणा आहे. या वर्गाला आपण खात्रीशीर पर्याय असल्याची ग्वाही देण्याची जबाबदारी भाजपविरोधी पक्षांना पार पाडावी लागणार आहे आणि तरच त्यांना भाजपला समर्थ पर्याय उभारणे शक्य होणार आहे.

# पाच राज्यांचे निकाल व भारतीय राजकारणाची भावी दिशा

**वसीम अहमद**



गोवा, मणिपूर, पंजाब, उत्तराखंड आणि उत्तर प्रदेश या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल अपेक्षेप्रमाणेच लागले. पंजाबमध्ये 'आम आदमी पार्टी' – 'आप'ला मतदारांची पसंती असेल असे प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात स्पष्ट होऊ लागले होते आणि तशा बातम्याही दिल्या जाऊ लागल्या होत्या. अर्थात पंजाबमध्ये 'आप'चा झाडू काँग्रेस आणि अकाली दल या दोन प्रमुख प्रतिस्पर्ध्यांना पार झाडून टाकेल अशी अपेक्षा नव्हती. त्यांना बहुमत मिळेल एवढाच अंदाज आलेला होता. परंतु एकतर्फी निकालाची कल्पना कुणी केली नव्हती. पंजाबमध्ये भाजपचे अस्तित्व नगण्य होते आणि मतदारांनी त्यावर आणखी एकदा शिक्कामोर्तब केले. गोवा, मणिपूर व उत्तराखंड या तीन लहान

उत्तराखंडमध्ये सत्तेसाठी प्रसंगी घटनेला धाब्यावर बसविण्याचा उद्योग भाजपने केला होता, त्याप्रकरणी न्यायसंस्थेकडून चपराकही खाल्ली होती. परंतु 'सत्तातुराणाम् भयं न लज्जा'! त्यामुळेच या तीन लहान राज्यात बहुमत किंवा सर्वाधिक जागा विरोधी पक्षांना मिळाल्या तरी तेथे त्यांची सरकारे स्थापन होणार नाहीत हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट व स्वच्छ असल्याने या तीन राज्यांमध्ये भाजपची सरकारे स्थापन होणे हे काही फार आश्चर्यकारक नाही. उत्तर प्रदेशात भाजपला विजय मिळाला, बहुमत मिळाले आणि सरकारही स्थापन झाले. अर्थात गेल्या वेळेपेक्षा सत्तावन्न जागा कमी झाल्या हे कटु वास्तव भाजपला स्वीकारावे लागले आहे. समाजवादी पक्षाने दिलेली एकाकी लढत ही पराभवापेक्षा चमकदार ठरली.


भगवंत मान आणि
अरविंद केजरीवाल

राज्यांमध्ये विरोधी पक्ष विखुरलेले होते त्याचा लाभ भाजपला मिळणे नैसर्गिक होते. त्याचप्रमाणे या तीन राज्यांचा राजकीय व निवडणूकविषयक इतिहास लक्षात घेता येथील राजकारण लज्जाहीन अशा आयाराम-गयाराम स्वरुपाचे राहिले आहे. त्यामुळे या राज्यांमध्ये विरोधी पक्षांना यदाकदाचित यश मिळाले असते असे घटकाभर गृहीत धरले तरी सत्तेसाठी वाटेल त्या थराला जाण्याची भाजप नेतृत्वाची प्रचलित राजकीय पिपासा लक्षात घेता विरोधी पक्षांचे सरकार त्यांनी स्थापन होऊ दिले नसते. याला इतिहास साक्षीदार आहे. गोव्यामध्ये २०१७ मध्ये जे घडले ते सर्वांच्या स्मरणात आहे.

या पाच निकालांच्या पार्श्वभूमीवर भारतीय राजकारणाच्या भावी दिशेचा अंदाज बांधायचा झाल्यास त्यासाठी या निकालांचे आकलन आधारभूत ठरणार आहे. पंजाबमधील निकाल हा वेगळा असल्याने प्रथम त्याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करु. पंजाबमधील राजकारण आतापर्यंत दोन ध्रुवीय होते. शिरोमणि अकाली दल आणि काँग्रेस या दोन राजकीय पक्षांभोवती या राज्याचे राजकारण केंद्रित होते. या दोन राजकीय पक्षांनी आलटून पालटून पंजाबवर राज्य केले. यातून पंजाबचे राजकारण चाकोरीबध्द होत गेले. तसेच तिसरा पर्याय नसल्याने या दोन्ही पक्षांना अहंकाराची बाधा होणे नैसर्गिक

होते. यातूनच भ्रष्ट राज्यकारभाराची स्पर्धा या दोन पक्षांमध्ये सुरु झाली. त्याचप्रमाणे या दोन्ही पक्षांनी पंजाबमध्ये काळ सुसंगत राहून राजकारण आणि राज्यकारभार करण्याऐवजी परंपरागत व चाकोरीबध्द राज्यकारभारालाच प्राधान्य दिले. यामध्ये दीर्घकालीन हितसंबंधांचा प्रभाव निर्माण होणे देखील अपरिहार्य होते व परिणामी या दोन्ही पक्षांच्या राज्यकारभारात प्रचंड भ्रष्टाचाराचा शिरकाव झाला. यातूनच दिल्लीत उदयाला आलेल्या आम आदमी पार्टीने पंजाबवर लक्ष केंद्रित केले आणि प्रथम लोकसभेत आपले सदस्य निवडून आणण्यात यश मिळविल्यानंतर त्यांनी विधानसभेसाठी मोर्चेबांधणी सुरु केली. दिल्लीत त्यांनी ज्या प्रकारे पक्ष प्रचार व प्रसार केला त्याच धर्तीवर त्यांनी पंजाबच्या मतदारांना तिसऱ्या पर्यायाचे महत्व पटवून देण्यास सुरुवात केली. यामध्ये 'आप'च्या दिल्ली मधील सरकारची कामगिरी तसेच या कामगिरीमुळेच या पक्षाला दिल्लीकरांनी दुसऱ्यांदा पसंती देण्याची बाब हे प्रमुख मुद्दे होते. दिल्लीकरांना पाणी व वीज अंशतः मोफत देण्याचा त्यांचा प्रयोग यशस्वी झालेला आहे. याखेरीज सरकारी शाळा व आरोग्यसेवांमध्ये लक्षणीय सुधारणा, विस्तार याचे पुरावे 'आप'कडे होते. याखेरीज महिलांना सवलती वगैरे लोकप्रिय घोषणाही त्यांनी केल्या. वरवर लोकप्रिय घोषणा वाटल्या तरी आम आदमी पार्टीने दिल्लीमध्ये ही आश्वासने पूर्ण करुन दाखविलेली असल्याने मतदारांना त्यांची ही बाजू जमेची वाटली आणि आम आदमी पार्टीला त्यात मोठा फायदा झाला. काँग्रेस व अकाली दलास कंटाळलेल्या मतदारांना नवा ताजा पर्याय आम आदमी पार्टीच्या निमित्ताने मिळाला व त्या पर्यायाला त्यांनी भरघोस मतदान करुन पसंतीचे शिक्कामोर्तब केले.

ही झाली आम आदमी पार्टीच्या यशाची बाजू. परंतु याला दुसरीही तेवढीच महत्वाची बाजू आहे. त्यावर आम आदमी पार्टीच्या पंजाबमधील सरकारचे भवितव्य बहुतांशाने अवलंबुन राहील. पंजाब राज्य हे जवळपास दिवाळखोर राज्य आहे. अकाली दलाचे दहा वर्षांचे सरकार आणि त्यानंतरचे कॅप्टन अमरिंदरसिंग यांचे सरकार यांनी पंजाबसारख्या शेती व उद्योगप्रधान राज्याची प्रगती करण्याऐवजी ते लुटण्याचेच काम अधिक केले. भ्रष्टाचाराने या सरकारांच्या काळात कळस गाठलेला होता आणि परिणामी सरकारी तिजोरीत ठणठणपाळची अवस्था झाली. या पार्श्वभूमीवर आम आदमी पार्टी पंजाबमध्ये कोणती जादूची कांडी चालविणार आहे हे पाहणे उत्कंठेचे राहील. महिलांना दरमहा एक हजार रुपये पेन्शन देण्याची घोषणा आम आदमी पार्टीने केली आहे. यासाठी निधीची तरतूद कशी



होणार हे भलेमोठे प्रश्नचिन्ह आहे. वीज व पाणी याबाबतच्या आश्वासनांबाबतही अशीच अनिश्चितता आहे. पंजाब राज्य आम आदमी पार्टीची परीक्षा पाहणार आहे हे स्पष्ट आहे. याचे कारण दिल्ली हे राज्य असले तरी एक महानगरीय राज्य एवढेच त्याचे मर्यादित स्वरुप आहे. दिल्ली सरकारकडे महानगरी सुविधां वगळता कोणतेही प्रमुख विभाग किंवा खाती नाहीत. गृह, नगरविकास सारखे महत्वाचे विषय केंद्र सरकारच्या ताब्यात आहेत. त्यामुळे या मर्यादित चाकोरीत राज्यकारभार प्रभावीपणे त्यांनी करुन दाखविला आहे. पंजाब हे पूर्ण स्वरुपाचे राज्य आहे. तसेच ते पाकिस्तान सीमेला लागून असल्याने सुरक्षितता हा देखील अत्यंत महत्वाचा मुद्दा ठरतो. शेतीप्रधान राज्य असल्याने बागायतदार शेतकऱ्यांची अत्यंत बळकट व मजबूत लॉबी आहे. तर कापड व यंत्रसामग्री निर्मितीची मध्यम कारखानदारी तेथे आहे. पूर्ण स्वरुपाचे राज्य चालविण्याची जबाबदारी आता आम आदमी पार्टीला उचलावी लागणार आहे. सीमेला लागून हे राज्य असल्याने तसेच फुटीर चळवळीची पार्श्वभूमि असल्याने या राज्याकडे केंद्राचे बारकाईने लक्ष असते. पंजाबी माणसाचे लष्करप्रेम सर्वांनाच ठाऊक आहे. त्यामुळे या समाजावर त्याचाही पगडा आहे. या विविध बाबी लक्षात घेऊन राज्यकारभार करावा लागणार आहे. ही सोपी गोष्ट नाही. तेथे जातिवंत राज्यकर्तेच लागतात. म्हणूनच मतदारांना दिलेला भरघोष कौल हा एकीकडे आनंद व समाधानाचा भाग असला तरी ते एक अवघड आव्हानही आहे याची जाणीव आम आदमी पार्टीच्या नेतृत्वाला सतत ठेवावी लागणार आहे. अन्यथा लाटेसारखे मिळालेले यश ओसरायला वेळ लागणार नाही. विजय मिळविण्यापेक्षा विजय पचविणे अधिक अवघड असते.

पूर्ण राज्याचा कारभार आणि एका महानगरीय राज्याचा कारभार यात जमीनआस्मानाचे अंतर असते. आम आदमी पार्टी या आव्हानाला यशस्वीपणे तोंड देऊ शकेल काय हा प्रश्न आहे. केंद्रात सूडबुध्दीने वागणारे राज्यकर्ते असताना तर या आव्हानाचा मुकाबला अधिकच कठीण होऊ शकतो. केंद्राबरोबर संघर्ष करुन पंजाबचा राज्यकारभार करता येत नाही. शिरोमणि अकाली दलाने जेव्हाजेव्हा तत्कालीन केंद्रीय सत्तांशी संघर्ष केला त्याची परिणिती पंजाबमध्ये राष्ट्रपति राजवट लागण्यातच झाली व सरतेशेवटी खलिस्तानवादी फुटीर व हिंसक चळवळीच्या मार्गाने पंजाब गेला होता. हा इतिहास ध्यानात घेऊन आम आदमी पार्टीला पंजाबची सूत्रे सांभाळावी लागतील. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंतसिंग मान हे सामान्य जनातले अगदी खऱ्या अर्थाने 'आम आदमी' असले तरी ती प्रतिमा त्यांना राज्यकारभारासाठी उपयोगी पडणार नाही.

राज्यकर्त्याची प्रतिमा ही वेगळी असते. ती क्षमता त्यांना



दाखवावी लागेल. त्यांना राज्यकारभाराचा कवडीचाही अनुभव नाही ही वस्तुस्थिती आहे. आम आदमी पार्टीने त्यांच्यामधील काही कार्यक्षम मंडळींना पंजाबच्या राज्यकारभारासाठी मुख्यमंत्र्यांच्या दिमतीला देण्याचे धोरण स्वीकारलेले आहे. सध्या पंजाबची जबाबदारी सांभाळणारे आम आदमी पार्टीचे तरुण नेते राघव चड्ढा हेच पडद्यामागून पंजाबचा राज्यकारभार चालवतील अशी चर्चा कानावर येते. याखेरीज या पक्षाशी निगडित काही माजी प्रशासकीय तज्ज्ञांचीही मदत घेतली जाणार असल्याचे समजते. भगवंतसिंग मान हे केवळ सरकारचा चेहरा असतील असे तूर्तास तरी दिसून येते. राज्यकारभाराची सूत्रे या पडद्याआडच्या व्यक्तींकडेच राहणार आहेत. त्यामुळे पंजाब हे आम आदमी पार्टीसाठी एक आव्हानच असेल. उत्तर प्रदेशात भाजपने लागोपाठ दुसऱ्यांदा पूर्ण बहुमत मिळविले. सुमारे तीन दशकानंतर असे घडले आहे. योगी आदित्यनाथ पुन्हा मुख्यमंत्री झाले. भाजपला बहुमत मिळालेले असले तरी त्यांचे संख्याबळ सत्तावन्न जागांनी कमी झाले आहे ही बाब दुर्लक्षिता येणार नाही. दुसरी महत्वाची बाब म्हणजे समाजवादी पक्ष आणि या पक्षाचे तरुण नेते अखिलेश यादव हे भाजपचे मुख्य प्रतिस्पर्धी म्हणून गणले जाऊ लागले आहेत. अखिलेश यांच्या नेतृत्वाखाली समाजवादी पक्षाने सव्वाशे जागांपर्यंत मजल मारली आहे. भाजपचे प्रमुख मागास नेते आणि गेल्या व आताच्याही मंत्रिमंडळात ज्यांना उपमुख्यमंत्रीपदी कायम ठेवण्यात आले आहे ते केशवप्रसाद मौर्य हे विधानसभा निवडणूक हरलेले आहेत याकडे मुद्दाम दुर्लक्ष केले गेले आहे.. ही बाब साधीसुधी व दुर्लक्षिता येण्यासारखी नाही. परंतु पाळीव माध्यमांनी स्वामीनिष्ठा दाखवून याकडे दुर्लक्ष केले आणि ही बातमी दडपली. केशवप्रसाद मौर्य हे उत्तर प्रदेश विधान परिषदेचे सदस्य असल्याने त्यांना मंत्री होण्यात कोणतीच अडचण नाही. परंतु विधानसभा निवडणूक लढवून व त्यात पराभूत झाल्यानंतरही त्यांना पुन्हा उपमुख्यमंत्री करणे ही भाजपची आगतिकता किंवा राजकीय मजबुरी व अपरिहार्यता मानावी लागेल. याआधी असलेले उपमुख्यमंत्री दिनेश शर्मा हेही विधान परिषदेचेच सदस्य आहेत. त्यांनी विधानसभा निवडणूक लढवली नाही. परंतु त्यांना यावेळी मंत्रीपदही देण्यात आले नाही मग उपमुख्यमंत्रीपद तर दूरच! म्हणजेच मौर्य यांनी विधान परिषदेचे सदस्य असताना विधानसभा निवडणूक लढवली आणि त्यात ते हरले पण उपमुख्यमंत्रीपद त्यांनी टिकविले. आता दिनेश शर्मा यांना बहुधा प्रदेश भाजपचे अध्यक्ष करण्यात येईल असे समजते. शर्मा यांच्या जागी ब्रजेश पाठक या आणखी एका ब्राह्मण नेत्याला उपमुख्यमंत्रीपद देण्यात आले आहे. भाजपची जी तारांबळ उडली आहे तिचे प्रतिबिंब या त्यांच्या नव्या नेमणुकांमधून आढळून येते. केवळ उत्तर प्रदेशातच नव्हे तर उत्तराखंडमध्येही भाजपचे मुख्यमंत्री पुष्करसिंग धामी हे निवडणूक हरले. परंतु या लहानशा राज्यात भाजपमध्ये इतकी भयंकर सुंदोपसुंदी आहे की या हरलेल्या मुख्यमंत्र्यासच पुन्हा मुख्यमंत्रीपदी निवडण्याची आगतिक



स्थिती भाजपवर आली. अन्यथा मुख्यमंत्रीपदावर असताना विधानसभा निवडणूक हरणाऱ्याला पुन्हा मुख्यमंत्रीपदी नेमण्याचा प्रकार कोणत्या राजकारणात आढळतो याचा शोध घ्यावा लागेल.

मुख्यमंत्र्याचे हरणे ही सामान्य बाब नव्हे. ज्याप्रमाणे पंजाबच्या निवडणुकीत दोन माजी मुख्यमंत्र्यांना(अमरिंदरसिंग व प्रकाशसिंग बादल) आणि तत्कालीन मुख्यमंत्री चरणजितसिंग चन्नी यांना मतदारांनी आस्मान दाखवले ही बाब लक्षणीय आहे तोच प्रकार पुष्करसिंग व केशवप्रसाद मौर्य यांच्याबाबत आहे. त्यामुळे भाजपचा या राज्यांमधील विजय हा सहज व सोपा असल्याचा सरसकट निष्कर्ष काढता येणार नाही. त्याचप्रमाणे ज्या मतदारांनी भाजपच्या या नेत्यांना नाकारले त्यांना पुन्हा त्यांच्या आधीच्या पदांवरच पुन्हा नेमणे म्हणजे संबंधित मतदारांचा अपमान व अवहेलना आहे. लोकशाहीत मतदारांनी नाकारल्यानंतर सहसा कुणी व्यक्ती आपल्या आधीच्या सार्वजनिक पदावर राहणे पसंत करीत नाही. परंतु भाजपच्या तत्वशून्य आणि लज्जाहीन राजकारणाला या लोकशाही व शिष्टसंमत परंपरा व प्रथांचे वावडे आहे. त्याचप्रमाणे विजय मिळूनही भाजपला या पराभूत नेत्यांनाच पुन्हा त्यांच्या आधीच्या पदावर कायम ठेवावे लागते ही बाबही भाजपमधील अंतर्गत गडबड-गोंधळ स्पष्ट करणारी आहे. मात्र पाळीव माध्यमे त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करुन त्यांच्या भाजपधन्याची ईमानइतबारे चाकरी करीत आहेत.

उत्तर प्रदेशात भाजपच्या सत्तावन्न जागा कमी झाल्या. समाजवादी पक्षाने भाजपला ठिकठिकाणी चांगली लढत दिली. या पक्षाने तीस जागा पाचशेपेक्षा कमी मतांनी गमावल्या तर ४९ जागा एक हजार मतांनी गमावल्या. ८६ जागा दोन हजार किंवा त्यापेक्षा कमी मतांनी गमावल्या. पाचशेपेक्षा कमी मतांनी गमावलेल्या बहुसंख्या मतदारसंघात एमआयएम (असदुद्दिन ओवैसी) हा पक्ष प्रामुख्याने कारणीभूत ठरल्याचे आढळून आले आहे. ओवैसी यांचा हा पक्ष भाजपचा हस्तक पक्ष आहे आणि दोन कट्टरपंथी एकमेकाला कसे मदतगार असतात याचा हा जिताजागता पुरावा आहे. वरील आकडेवारीवरुन लक्षात यावे की भाजपचा उत्तर प्रदेशातील विजय हा निसटताच म्हणावा लागेल. काही राजकीय तज्ज्ञांच्या मते समाजवादी पक्षाने व विशेषतः या पक्षाचे तरुण अध्यक्ष अखिलेश यादव यांनी निवडणुकीसाठी आणखी आधी सुरुवात केली असती तर कदाचित भाजपला मात देणे त्यांना शक्य झाले असते. अखिलेश यांच्या सभांना होणारी गर्दी उत्स्फुर्त होती आणि भाजपपेक्षा अधिक होती हे अनेकांनी नमूद केले आहे. सामाजिक न्यायाच्या शक्तींनी धर्मवादी कट्टरपंथीयांना चांगली टक्कर दिली हे या निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. बिहारमध्ये देखील अशीच जोरदार टक्कर सामाजिक न्यायाच्या शक्तींनी दिली होती. परंतु अखेरच्या टप्प्यात भाजपने






विजय 'मॅनेज' केला असे आरोप झाले होते तसाच काहीसा प्रकार उत्तर प्रदेशातही झाला असावा या संशयास जागा आहे. कारण काही ठिकाणी डुप्लिकेट मतदानयंत्रांचे ट्रक उत्तर प्रदेशात पकडण्यात आले होते. हे प्रकार मध्य प्रदेशातही झाले होते. परंतु पाळीव माध्यमांप्रमाणेच सध्या निवडणूक आयोगासारखी स्वायत्त संस्था देखील पाळीव झालेली असल्याने विरोधी पक्षांनी यासंदर्भात केलेल्या तक्रारींची दखल घेणारेच कुणी उरलेले नाही त्यामुळे दाद लागणे तर अशक्यच झाले आहे.

या पार्श्वभूमीवर आगामी काळातील भारतीय राजकारणाची दिशा कशी असू शकते याचा अंदाज लावावा लागेल. विरोधी पक्षांचे विखुरलेपण भाजपच्या पथ्यावर पडते हे या पाच राज्यांच्या निकालांवरुन पुन्हा सिध्द झाले आहे. उत्तर प्रदेशातील विजयाचा संबंध नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांनी २०२४मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकीशी जोडलेला आहे.

उत्तर प्रदेश जिंकल्याने आता लोकसभेची निवडणूक जिंकल्यासारखीच आहे असा प्रचार भाजपच्या प्रचार टोळ्यांनी सुरु केलेलाच आहे. भारताच्या भावी राजकारणाच्या दिशेचा अंदाज घेताना वरील गोष्टी ध्यानात ठेवाव्याच लागतील. भाजपची साधनसंपत्तीची ताकद नव्हे तर सामर्थ्य अतुलनीय आहे. त्यामुळेच पैशाच्या जोरावर निवडणुका आणि निवडणुकांमधील विजयच खरेदी करण्याचे एक नवे तंत्र त्यांनी आत्मसात केलेले आढळते. भाजपच्या शीर्ष नेत्यांच्या सभांचे खर्च किती असतात याचा हिशोब आजतागायत कोणत्याही राजकीय पक्षाने मागितलेला नाही आणि कुणी मागितलाच तर पाळीव प्रशासन व निवडणूक आयोगाने वाळूत तोंड खुपसणाऱ्या शाहमृगाची भूमिका घेतलेली आढळते. त्यामुळे भाजपच्या विरोधात उभ्या ठाकणाऱ्या राजकीय पक्षांना ही बाब प्रथम लक्षात ठेवावी लागेल. त्याचप्रमाणे भाजपच्या विरोधात ठाम भूमिका घेणाऱ्यांना ईडी, सीबीआय, प्राप्तीकर विभाग आणि तत्सम केंद्रीय तपास संस्थांचा ससेमिरा सहन करावा लागेल ही बाबही ध्यानात घ्यावी लागेल. पक्षपाती केंद्रीय यंत्रणा, पक्षपाती व भेदभाव करणारा निवडणूक आयोग व तत्सम संस्था यांनाही या राजकीय पक्षांना तोंड द्यावे लागणार आहे. या प्रमुख जमीनीवरील प्रत्यक्षात येणाऱ्या अडचणी व अडथळ्यांकडे या राजकीय पक्षांना दुर्लक्ष करता येणार नाही. भारतातील ही स्थिती दुर्दैवी पण वास्तव आहे.

यानंतर भाजपला राजकीय पातळीवर तोंड देण्याबाबत विचार करावा लागेल. ज्येष्ठ राजकीय नेते शरद पवार यांनी यासाठी कार्यक्रमावर आधारित आघाडीची संकल्पना मांडलेली आहे. युपीए-१चे सरकार यशस्वी व सफल होण्यामागे त्यावेळी तयार करण्यात आलेल्या किमान समान कार्यक्रमाचे योगदान मोठे होते. मतदारांची बदलती मनोवृत्ती लक्षात घेता जो राजकीय पक्ष आणि जे सरकार लोकांची कामे करताना प्रत्यक्ष दिसते त्यांना कौल देण्याकडे मतदारांचा वाढता कल सध्या दिसून येतो. याचे उदाहरण दिल्लीमधील आम आदमी पार्टी सरकारचे देता येईल. अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील सरकारने वीज, पाणी, आरोग्य व शिक्षण या तीनच विषयांवर लक्ष केंद्रित करुन सर्वसामान्यांना प्रत्यक्ष दिलासा मिळेल असे कार्यक्रम अमलात आणून दाखविले. त्यामुळेच भाजपचा तीव्र विरोध असूनही त्यांना मिळालेल्या लोकांच्या पाठिंब्याला घातपात करणे भाजपला शक्य झाले नाही. सर्वसामान्य लोकांना आता निर्णयापेक्षा त्या निर्णयाची त्यांच्या हाती पडणारी फळे हवी आहेत. ही बदलती सामाजिक





मनोवृत्ती ध्यानात घेऊन विरोधी पक्षांना परंपरागत राजकारणात बदल करावे लागणार आहेत.

पवार यांनी याच्याच जोडीला आंदोलनात्मक राजकारणाचीही संकल्पना मांडलेली आहे. जनतेच्या विविध प्रश्नांवर एकत्रित कृति करणे आणि त्यासाठी लोकांना संघटित करण्याची आवश्यकता त्यांनी बोलून दाखवली आहे. जनतेला भेडसावणाऱ्या मुद्यांवर विरोधी पक्षांनी एकत्रित आवाज उठविणे आणि लोकांना खात्री पटेल अशा पध्दतीने देशभरात वातावरणनिर्मितीसाठी जनसंपर्क सुरु करण्याची बाबही यामध्ये अंतर्भूत आहे. जनतेच्या मुद्यांवर विरोधी पक्ष एक आहेत हे पटविण्यासाठी देशभर सामूहिक कृति आणि सामूहिक मोहिम सुरु करण्याची आवश्यकता त्यांनी बोलून दाखवली आहे आणि त्याच आधारे ते इतर पक्षांबरोबर बोलणीही करीत आहेत. प्रत्येक राजकीय पक्षाची जी शक्तिस्थाने आहेत ती मान्य करुन त्याआधारे निवडणुकीची तयारी करण्याच्या सर्वात महत्वाच्या मुद्याकडेही राजकीय पक्ष लक्ष देत आहेत. यामध्ये जास्तीजास्त मतदारसंघांमध्ये भाजपच्या विरोधात एकास-एक उमेदवार उभा करण्याच्या दृष्टीनेही रणनीती आखण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

याखेरीज भाजप व संघ परिवाराने देशभक्ति-राष्ट्रवाद आणि बहुसंख्यक वर्चस्ववादाचे जे राजकीय मिश्रण तयार केले आहे त्याचा यशस्वी व पटेल असा प्रतिवाद करणे व तसा नवा तर्कसंगत युक्तिवाद तयार करणे हे विरोधी पक्षांसमोरचे मोठे आव्हान आहे. भाजपकडून म्हणजेच त्यांच्या शीर्ष नेतृत्वाकडून निवडणुकांच्या प्रचारात बिनदिक्कतपणे धार्मिक प्रतीकांचा गैरवापर सुरु आहे. त्याला कुणीही हरकत घेताना आढळत नाही आणि निवडणूक आयोगाने तर पक्षपाताचे असे काही कातडे डोळ्यावर ओढलेले आहे की भाजपला मोकळे रानच मिळाले आहे. भारतात आजही उदारमतवादी लोकशाही मानणाऱ्या लोकांचा मोठा वर्ग आहे. त्या वर्गाला समर्थ पर्याय उपलब्ध होत नाही ही त्यांची अडचण आहे. त्यामुळे भाजपचे फावत आहे अशी त्यांची ठाम धारणा आहे. या वर्गाला आपण खात्रीशीर पर्याय असल्याची ग्वाही देण्याची जबाबदारी भाजपविरोधी पक्षांना पार पाडावी लागणार आहे आणि तरच त्यांना भाजपला समर्थ पर्याय उभारणे शक्य होणार आहे. यासंदर्भात हालचाली सुरु झालेल्या आहेत. त्यामध्ये शरद पवार, ममता बॅनर्जी, अखिलेश यादव, जयंत चौधरी, द्रमुक, तेलंगणा राष्ट्र समिती, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष असे पक्ष आहेत. काँग्रेस पक्षही यामध्ये सामील आहे. परंतु काँग्रेसला सर्वसमावेशक भूमिका घ्यावी लागेल आणि ज्या राज्यात जो प्रादेशिक पक्ष मजबूत आहे त्यांच्या बरोबर काम करण्याची तयारी व मनाचा मोठेपणाही दाखवावा लागेल. अशी व्यावहारिक व लवचिक भूमिका घेतल्यासच भाजपच्या विरोधातील आघाडी उभारणे शक्य होणार आहे. भाजपची ताकद लक्षात घेता कोणताही एक पक्ष त्यांचा मुकाबला करु शकणार नाही. एकेकाळी काँग्रेसचे स्थानही असेच अभेद्य मानले जात असे. परंतु ते कायम रहात नसते.

भाजपला आज ते स्थान प्राप्त झाले आहे आणि म्हणूनच त्यांच्या विरोधात अशी व्यापक आघाडी उभारण्याखेरीज विरोधी पक्षांना पर्याय राहिलेला नाही. ही त्यांच्या अस्तित्वाची लढाई आहे आणि म्हणूनच २०२४ची लोकसभा निवडणूक ही त्या भूमिकेतून लढवावी लागणार आहे. त्यासाठी तयारी आतापासूनच करावी लागेल!

■■

**कश्मिरी पंडितांवर झालेल्या अत्याचारांबाबत सहानभुती आहे पण त्याचसोबत मुस्लिम, शीख इतर हिंदू व जे जे विस्थापित झालेत्या सर्वांवर झालेल्या अत्याचारांबद्दल पण तितकीच सहानभुती आहे आणि एक माणूस म्हणून ती असायलाच हवी!**

# कोणता काश्मीर हवा?

-मनाली भिलारे



कश्मीर फाइल्स चित्रपट नुकताच पाहिला. परफेक्ट फ्रेम, साऊंड इफेक्ट, हिंसक शॉट, ॲक्शन आणि खटकेबाज संवाद यांचे मिश्रण असलेली कलाकृती निश्चितच प्रेक्षकांना अस्वस्थ करते, त्यांच्यात भिती निर्माण करते आणि मनात कळत- नकळत द्वेषाची ठिणगी सुध्दा टाकते.एखाद्या सामाजिक प्रश्नावर ही कलाकृती प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडते हे कौशल्य चित्रपटाचे व निर्मात्यांचे आहे, पण खरा प्रश्न उपस्थित होता तो समाज म्हणून आपण यातून काय घेतो? एकांगी बाजू विचारात घेवून 'समज' की 'द्वेष'?

सिनेमॅटिक लिबर्टी घेतली आहे, असे निर्मात्याने चित्रपटाच्या सुरवातीलाच स्पष्ट केले असते तर, योग्य झाले असते. परंतु, इतिहासाची माहिती दिली जात आहे, असे भासविले जात असताना केवळ एकच बाजू समोर दाखवली जाते. त्यातून वास्तवापासून आपण दूर तर जात नाही ना? असा प्रश्न विचार केल्यावर निर्माण होतो. काश्मिरमधील पंडितांवर जसे अत्याचार झाले तसेच मुस्लिमांवर, शीख व इतर हिंदू यांच्यावर पण झाले ही वस्तुस्थिती आहे पण, या चित्रपटात केवळ पंडितांचीच हत्या झाली, असे चित्र निर्माण केले जात आहे. १९९० च्या दशकांत काश्मिरमधल्या शिखांचे, मुस्लीमांचे काय झाले?? याचाही शोध घेणे गरजेचे आहे. देशाच्या फाळणीनंतर काश्मिरमध्ये राहत असलेले सर्व धर्मिय नागरिक १९९० पर्यंत गुण्यागोविंदाने नांदत होते. पण १९९० च्या दशकात या समाजात द्वेष कोणी पसरवला?कोणी राजकीय मनसुबे आखले? याचाही विचार होणे क्रमप्राप्त आहे. केंद्रात१९९० मध्ये भाजपाच्या पाठिंब्यावर व्ही.पी. सिंग यांचे सरकार होते व त्यात मुफ्ती मोहम्मद सईद या गृहमंत्री होत्या भाजपाच्याच मदतीने तर, जम्मू -काश्मिरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू होती. भाजपाच्या आग्रहानेच तेथे जगमोहन यांना राज्यपाल म्हणून नेमले होते. ही सर्व परिस्थिती बघता भाजपाने काश्मिरी पंडितांना संरक्षण का दिले नाही?पंडितांची कळवळ ही एका चित्रपटाला समर्थन देणाऱ्या ढोंगी भाजपाने त्यावेळी व्ही.पी. सिंग सरकारला जाब का नाही विचारला, वेळप्रसंगी सरकारचा पाठिंबा का नाही काढून घेतला आणि हा नरसंहार थांबवला का नाही? असे अनेक प्रश्न उपस्थित होतात त्याची उत्तरे अनुत्तरीत आहेत. कारण जे गोधरा हत्याकांडामध्ये झाले तेच १९९० मध्ये काश्मिरमध्ये झाले. हे असे अनेक प्रश्न उपस्थित झाले तरी त्याची उत्तरे आजही अनुत्तरीतच आहेत.

मुळातच जम्मू-काश्मिरचा जटिल प्रश्न सोडवायचा असेल तर त्याचा सखोल मागोवा घेणे गरजेचे आहे. हिमालय, धार्मिक आस्था, देवभूमी यांवर आधारलेल्या पौराणिक कथा तर दुसरीकडे

जन्नत, स्वर्ग असे केलेले काश्मीरचे वर्णन यामुळे येथील समाज, संस्कृती, धर्म, आचार-विचार, चालीरिती या विभिन्न आहेत हीच विविधता काश्मिरचे वैशिष्टय आहे. परंतु ज्यांना हे सत्य रूचले नाही त्यांनी टोकाची भूमिका घेतली. या प्राचीन संस्कृतीचा आदर करायचा सोडून 'जिहाद' च्या नावाखाली दशहतवाद्यांनी नरसंहार करण्याची भूमिका स्वीकारली. त्यातूनच काश्मिरी पंडित इतर हिंदू, शीख आणि मुस्लिमही यांना देखील याच काळात ठार केले गेले तर, अनेकांनी स्थलांतर केले.दशहतवाद्यांना,वर्चस्व मिळवण्यासाठी हिंसा हाच सोपा मार्ग वाटतो आणि काश्मीर मध्ये जे घडले किंवा घडत आहे ते या दशहतवादी संघटनांचीच कृती आहे. त्यामुळे काश्मिर पंडितांवर अन्याय, अत्याचार झाला याला मुस्लिम समाज जबाबदार नाही तर दहशतवाद्यांचे अतिरेकी विचार जबाबदार आहेत.

कश्मिरची पूर्वीची आणि आताची परिस्थिती पाहता तेथील तरूण तेव्हाही भरकटत होता आणि आताही तो भरकटतच आहे.त्यावेळीही स्थलांतर करण्यामागे प्रमुख कारणांपैकीअर्थार्जन हे होते. अनेक लोकं नोकरी, व्यवसायाच्या शोधात स्थंलातरित झाले. आजही त्या परिस्थितीत बदल झालेला नाही. बेरोजगारीचा प्रश्न अद्याप आहेच. या बेरोजगार तरूणांना काही आतिरेकी संघटना वश करून त्यांचे 'ब्रेनस्ट्रॉर्मिंग' करून त्यांना दशहतवादी कृत्यांत सहभागी करुन घेत आहेत. काश्मिरमधील तरुण दशहतवादी संघटनांचे सॉफ्ट टार्गेट होत असल्याचे महत्वाचे कारण म्हणजे त्यांच्या हाताला काम नाही.मूळातच कश्मिरमध्ये दोन प्रकारचे व्यवसाय आहेत. एक म्हणजे पर्यटन.त्यात रोजगाराच्या संधी असल्या तरी दिवसेंदिवस वाढणारी स्पर्धा त्यात टिकण्याची धडपड, छुपी बेरोजगारी याचे प्रमाण अधिक आहे तर दुसरीकडे सोपा पर्याय दारात येवून उभा आहे तो म्हणजे अतिरेकी, दशहतवादी संघटेनत शामिल होणे आणि येथील तरुणांना या व्यवसायात जाणे अधिक सोपे वाटते, याला कारण येथील समाज व्यवस्था - एका समूहाने अत्याचार केले म्हणून आम्ही करणार, मग पुन्हा दुसरा समाज वरचढ ठरणार हे चक्र असेच चालू आहे अविरतपणे!

हे चित्र बदलण्याची १९९० मध्ये पण गरज होती आणि आता तब्बल ३० वर्षांनी देखील हेच चित्र बदलण्याची नितांत आवश्यकता आहे. धर्मांधता मोठी राष्ट्र नष्ट करते हा इतिहास आहे. यातून वेळीच सावध होवून सरकारने योग्य ती उपाययोजना करणे आवश्यक आहे. पण आपल्या येथे मोदी सरकार याच्या विरोधात वागते आहे. वास्तविक समाजात तेढ अथवा द्वेष निर्माण करणाऱ्या चित्रपटांवर बंदी घातली पाहिजे. उलटपक्षी मा. पंतप्रधान मोदी यांनी या चित्रपटाचे कौतुक केले आहे. मोदी सरकारने काही राज्यात हा चित्रपट टॅक्स फ्री केला आहे, काही ठिकाणी सरकारी कर्मचाऱ्यांना चित्रपटासाठी पैशाची आणि कामाची सवलत दिली. याचा अर्थ काय? अतिरेकी किंवा दहशतवाद्यांसारखे राजकीय डावपेच कश्यासाठी? हिंदूना भडकावून सत्ता टिकवून ठेवण्यासाठी का? असे प्रश्न मनात उपस्थित होतात.

मोदी सरकारने ३७० कलम हटवले याचा काय फायदा झाला? तेथील परिस्थितीत सुधारणा झाली का? जे कश्मिरी पंडित विस्थापित झाले त्यांच्यासाठी आतापर्यंत काय केले? त्यांना त्यांच्या जन्मभूमीवर परत जायचे असेल तर काय धोरण आहे? याची उत्तरे मोदी सरकार कधी देणार? देशात महागाई व बेरोजगारीचा दर वाढत आहे यावर मोदी सरकार कधी बोलणार? हिंसा, नरसंहार, रक्तपात, दंगली, दहशतवाद आणि युध्द यातून कुणालाही शांती- सुख लाभले नाही. विजय संपादन झाल्याचा आनंद साजरा होत असतो पण रक्त सांडून, बळी घेवून मिळणाऱ्या या पाशवी आनंदाचा काय उपयोग?सध्या रशिया- युक्रेनमधील युध्दाने संपुर्ण देशाला काय धडा दिला? कुठल्याही देशांना युध्द करणे परवडणारे नाही. अगदी बलशाली देशांना ज्यांचा आर्थिक वृध्दीचा दर जरी दोन अंकी असला तरी सुध्दा ! रशियातील नागरिक सुध्दा तेथील सरकारला युध्द थांबवण्याची विनंती करत आहे, रस्त्यावर आपल्याच सरकारच्या विरोधात निषेध नोंदवत आहे. अश्या आंदोलनकर्त्या नागरिकांना पोलिस प्रशासन तांब्यात घेवून कारवाई करत आहेत. ही परिस्थिती काय सांगते? युध्द नको शातंता हवी! मग काश्मिरच्या बाबत आपण देखील सखोल विचार करायला हवा. अन्याय झाला म्हणून अतिरेकी होणे हा पर्याय नाही आणि अतिरेक्यांचा बदला घेण्यासाठी एका विशिष्ट समाजाला टार्गेट करणे हा पण पर्याय नाही. काश्मिरमधील हिंसा कायमची थांबवायची असेल तर समाजात सर्व पातळींवर समतोल साधणे आवश्यक आहे. तरुणांसाठी मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करणे गरजेचे आहे यासाठी राजकीय व प्रशासनाची इच्छाशक्ती आवश्यक आहे. मूलभूत गरजांचे समान वितरण, शिक्षण, नितीमूल्यांची शिकवण या बाबींसाठी धोरणात्मक निर्णयांची गरज आहे. आपल्याला धर्माचे राष्ट्र हवे आहे की धर्मनिरपेक्ष राष्ट्र? तसेच आपल्याला कोणता काश्मिर हवा आहे हे देखील आपण ठरवले पाहिजे. असिम सौंदर्याने नटलेला, निसर्गाचे वरदान लाभलेला काश्मिर हवा की,अमानवी वसाहतींनी बरबटलेला, धर्मपिपासूंचा काश्मिर? एकात्मिक, सांस्कृतिक प्रेमभाव असलेला काश्मिर हवा की, हिंसक, कत्तलेआम करणारा दहशतवादाने पछाडलेला काश्मिर?

पांढरी शुभ्र चादर ल्यालेला, शांत, मानवतावादी काश्मिर आपल्याला हवा आहे की लालबुंद रक्ताच्या थारोळ्यात बेचिराख होत असलेला काश्मिर? याचा निर्णय माणूस म्हणून आपण घ्यायचा आहे, त्यासाठी कोणाच्या प्रचारकी कलाकृतींवर अवलंबून राहण्याची गरज नाही.

■■

# राईट टू डिस्कनेक्ट विधेयकावर सुप्रिया सुळे यांचे लोकसभेतील भाषण



**प्रत्येक व्यक्तीला ऑफिसमध्ये ताणतणावाला सामोरे जावे लागते. मात्र, यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे, ऑफिसहून घरी आल्यानंतरही अनेक वेळा आपल्याला फोनवरून कार्यालयीन काम करावे लागते. कार्यालयीन वेळेनंतरही त्यांच्या कर्मचाऱ्यांनी कॉल घ्यावा, ईमेलला प्रतिसाद द्यावा अशी कंपन्यांची अपेक्षा असते. आधुनिक तंत्रज्ञानामुळे सध्याचे युग डिजिटल झाले आहे. या डिजिटल युगात सर्व काही मोबाईल फोनवर करता येते. त्यामुळे बरेचसे कर्मचारी स्मार्टफोनच्या साहाय्याने २४ तास काम करत असतात. याचा परिणाम कर्मचाऱ्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर पडतो. हे थांबवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे संसदेत नवा राईट टू डिस्कनेक्ट कायदा आणण्याचा प्रयत्न करत आहेत. यामुळे लाखो कर्मचाऱ्यांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे. याशिवाय खासदार सुप्रिया सुळे यांनी प्री लेजिस्लेटिव्ह कन्सल्टेशन विधेयक २०१९ आणि व्हिसलब्लोअर इन प्रायव्हेट सेक्टर प्रोटेक्शन विधेयक २०२० ही आणखी दोन विधेयके मांडली आहेत. राईट टू डिस्कनेक्ट हे विधेयक मंजूर झाल्यास कर्मचाऱ्यांची कामाच्या तणावापासून सुटका होईल आणि त्यांना मोठा दिलासा मिळेल. यासंदर्भात खासदार सुप्रिया सुळे यांनी स्पष्ट केलेली भूमिका...**

# कर्मचाऱ्यांना मिळणार विशेष अधिकार

नमस्कार, मी सुप्रिया सुळे. मी महाराष्ट्राच्या बारामती लोकसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची खासदार आहे. आज मी इथे राईट टू डिस्कनेक्टविषयी बोलण्यासाठी आले आहे. हे विधेयक मी माझ्या सहकाऱ्यांच्या मदतीने संसदेत आणले आहे. याला संसद सदस्याचे खासगी विधेयक म्हटले जाते. संसदेचा कोणताही सदस्य असे विधेयक आणू शकतो. त्यावर चर्चा होऊ शकते आणि सरकारला ते मंजूर करण्याची विनंती केली जाते. आपण वेगवेगळ्या पातळ्यांवर काम करत असताना आपल्यालाही संघर्ष करावा लागत असल्याची जाणीव मला झाली. माझे काम आणि आयुष्याचा समतोल

साधताना. माझेही वैयक्तिक आयुष्य आहे आणि सगळ्यांनाच यातून जावे लागते.

समजा घरात एखादा कार्यक्रम असतो, कोणाच्या घरी लग्न असते, कधी कोणाचा वाढदिवस असतो. मुलाचा क्रीडा दिन असतो. आपल्याला जायची इच्छा असते. पण कामामुळे तिथे पोहोचू शकत नाही. मग अशा परिस्थितीत आपण योग्य संतुलन साधू शकतो का. परफेक्ट नाही, पण आपण प्रयत्न तरी करू शकतो. आणि मग मी माझ्या सहकाऱ्यांसमवेत बसले आणि एक विधेयक आणण्याचा निर्णय घेतला, तेच हे राईट टू डिस्कनेक्ट विधेयक. हे विधेयक मी दुसऱ्यांदा सभागृहात आणले आहे. पहिल्या वेळी जेव्हा मी निवडून आले होते गेल्यावर्षी, तेव्हाही हे विधेयक आणले होते. पण त्यावेळी चर्चा होऊ शकली नाही. यावेळी पुन्हा मी हे विधेयक संसदेत आणले आहे आणि त्याला सगळ्यांचा चांगला पाठिंबा मिळत आहे. वैयक्तिक आयुष्य आणि काम या दोन्ही गोष्टी वेगवेगळ्या ठेवण्याची गरज आहे,

मी अनेक कर्मचाऱ्यांना विनंती केली आहे, या विधेयकामध्ये आणखी काय सुधारणा करता येतील हे सुचवावे आणि हे प्रत्येक कर्मचाऱ्यांसाठी आवाहन आहे. ही संधी दवडू नका, माझे प्रत्येकाला आवाहन आहे, की आपण एकत्र येऊन काही बदल घडवू शकू आणि चांगला बदल घडवून आणू शकू. आणि हे काम करणाऱ्या मर्यादित लोकांसाठी नाही. कार्पोरेटस् कंपन्या यामध्ये का सहभागी होऊ शकत नाहीत. अनेक कार्पोरेटस्नी अनेक चांगल्या गोष्टी केल्या आहेत. शेकडो उपक्रमशील गोष्टी राबविल्या आहेत. माझी त्यांना विनंती आहे, त्यांनी त्यांच्या यशस्वी कथा माझ्याशी शेअर कराव्यात. त्याचा आम्ही धोरण राबविण्यात उपयोग करू शकतो. त्यामुळे प्रोफेशनल्स, कार्पोरेटस् आणि आणि मी माझ्या सर्व सहकाऱ्यांनाही विनंती करते, संसदेतील, विधिमंडळातील सदस्य, सरपंच असे सर्वचजण, कोणीही, माझी सर्वांना विनंती आहे, की आपण सूचना कराव्यात. कोणत्याही प्रकारचा फिडबॅक द्यावा. मी त्याची प्रतिक्षा करत आहे.





हे काही माझे विधेयक नाही. ते आपल्या सर्वांचे विधेयक आहे. ज्याच्यामुळे आपल्या जीवनात नक्कीच बदल घडू शकतो. त्यामुळे आपण प्रोफेशनली काम तर करूच, पण त्याचवेळी आपल्यासाठीही वेळ देऊया. नाहीतर मानसिकदृष्ट्या आपण थकून जाऊ शकतो. कामावरून मन विचलित होते. मेंदू थकतो. चांगले काम करू शकत नाही. का नाही हा बदल घडवायचा. हा अधिकार आहे तुमचा. स्वत:चं आयुष्य जगण्याचा, मोकळा श्वास घेण्याचा अधिकार हा प्रत्येकाला आहे. तर आपण सगळे मिळून हा बदल घडवण्यासाठी सातत्याने, मी हा प्रयत्न करते आहे. माझी तुम्हाला अतिशय विनम्रपणे विनंती आहे, की मला माहिती पाठवा. मी विनंती करते, की कृपया ही संधी घ्या. कोणत्याही क्षेत्रातील प्रत्येकाला माझी ही विनंती आहे. राईट टू डिस्कनेक्टविषयी काय वाटते याविषयी मला अवश्य कळवा. माझ्या स्वत:च्या बाबतीत अशा अनेक घटना घडल्या आहेत. अनेकदा संघर्ष करावा लागला आहे. मला माझ्या मुलीचे क्रीडा दिन, वाढदिवस चुकवावे लागले आहेत. त्याबद्दल अनेकदा मला दोषी वाटले आहे. करिअरला महत्त्व द्यायचे की आपली मुलं पुढे भविष्यात म्हणणार, की आई तु त्यावेळी तिथे नव्हती. मला माहिती नाही काय घडेल. मी स्वत:ला योग्य पद्धतीने काम आणि आयुष्याच्या पातळीवर संतुलन साधण्याचा प्रयत्न करत आहे. सार्वजनिक जीवनात हे थोडेसे कठीण आहे. पण मी ते निवडले आहे. त्याबद्दल माझी तक्रार नाही. पण आजच्या अनेक युवा पिढीच्या बाबतीत याविषयी काहीतरी वाटते. तेव्हा, चला एकत्र येऊया. कृपया मला मदत करा. कृपया मला मार्गदर्शन करा आणि परफेक्ट विधेयक आणण्यासाठी आपण प्रयत्न करूया. आपल्यातील सर्वांनीच एक चांगले कर्मचारी तर बनूयाच, पण त्याचवेळी चांगले होममेकरही बनूया. चांगले पालक, चांगले भाऊ, बहीण अशा कोणत्याही खोल नातेसंबंधात वचनबद्ध राहण्याचा प्रयत्न करूया. कुटुंबाला वेळ देऊया. धन्यवाद!

■■

# हरित हिंदवी स्वराज्य

प्रा.डॉ.प्रकाश पवार
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर





जिजाऊं आणि छत्रपती शिवाजी महाराज यांची हरित स्वराज्याची संकल्पना एका दृष्टांतामधून किंवा प्रतिकामधून दिसते. प्रतिक किंवा दृष्टांत म्हणजे त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन होता. तो दृष्टांत कोणता होता ? प्रतिक कोणते होते ? या प्रश्नाचे साधे उत्तर सोन्याचा नांगर हा तो दृष्टांत किंवा प्रतिक आहे. हरित स्वराज्याचे प्रतीक शिवाजी महाराजांनी पुणे येथे सोन्याचा नांगर फिरवला हे आहे. हे प्रतीक जिजाऊ आणि शिवाजी महाराजांनी कुरुराजापासून स्वीकारलेले दिसते. कारण या प्रतिकाचा उगम कुरुराजा पासून होतो. कुरूराजाने सोन्याच्या नांगराने जमीन सरस्वती नदीच्या खोऱ्यात नांगरली. त्या जमिनीला पुण्यभूमी संबोधिले गेले होते. तेव्हापासून त्या जागेला कुरुक्षेत्र नाव पडले.

शिवरायांच्या स्वराज्याचा एक महत्त्वाचा अर्थ हरित स्वराज्य हा आहे. शिवरायांच्या स्वराज्याचा अर्थ राजकीय स्वराज्य हा वेळोवेळी व्यक्त झालेला आहे. परंतु त्या तुलनेत हरित स्वराज्य हा अर्थ नीटनेटका व स्वतंत्रपणे स्पष्ट केला गेला नाही. परंतु मुख्य तीन लिखित साधनांमध्ये हरित स्वराज्याचा अर्थ लावण्याइतके पुरावे उपलब्ध आहेत.एक, शिवरायांच्या पत्रव्यवहारांमध्ये हरित स्वराज्याबद्दलचीअशी म्हणून उदाहरणे आलेली आहेत. दोन, अज्ञापत्रांमध्ये विविध आज्ञा दिलेल्या आहेत. त्यापैकी काही आज्ञा हरित स्वराज्याचा आशय व्यक्त करणाऱ्या आहेत. तीन, महात्मा फुले यांनी शिवरायांवरती पोवाडा लिहिला. त्या पोवाड्यामध्ये सजीव सृष्टी, प्राणी सृष्टी, निसर्ग सृष्टी, मानव सृष्टी, यांचे वर्णन केलेले आहे. या सृष्टीचे संरक्षण करते शिवराय आहेत, अशी धारणा महात्मा फुले यांची होती. महात्मा फुले समाज प्रतिबद्ध विचारवंत (organic thinker) आहेत. त्यांच्या साहित्यामधून देखील शिवरायांच्या स्वराज्याचा अर्थ हरित स्वराज्य असा स्पष्ट होतो. या तीन साधनांच्या आधारे शिवरायांची हरित स्वराज्याची संकल्पना ठळकपणे दिसू लागते. शिवरायांचे स्वराज्य म्हणजे डावपेच आणि व्यूहनीती असे मानणारा एक वर्ग आहे. त्यामुळे शिवरायांचा स्वराज्याचा विचार केवळ रणनीती पुरता मर्यादित केला जातो. डॉ. स्टुअर्ट गार्डन यांनीदेखील जास्तीत जास्त भर रणनीतीवर दिलेला आहे (गार्डन स्टुअर्ट, २०२१: ६७-१०५). भारतातील सामाजिक शास्त्राचे अभ्यासक देखील रणनीती या गोष्टीवर भर देतात. परंतु रणनीतिपेक्षा शिवरायांचा उद्देश वेगळा होता. शिवरायांच्या राजकारणाचा एक महत्त्वाचा उद्देश स्वराज्य होता.

## ग्रँड सिद्धांत

हरित स्वराज्य ही संकल्पना हिंदवी स्वराज्याचा एक महत्त्वाचा उपसिद्धांत आहे. हिंदवी स्वराज्याचे वर्णन ग्रँड सिध्दांत असे केले गेले नाही. परंतु हिंदवी स्वराज्याचे वर्णन ग्रँड सिद्धांत असे केले पाहिजे. कारण हिंदवी स्वराज्याच्या अंतर्गत अनेक छोटे-छोटे सिद्धांत व्यक्त झालेले आहेत. दुसऱ्या शब्दात अनेक उपसिद्धांत हिंदवी स्वराज्याच्या अंतर्गतआहेत. या संदर्भातील मोठी यादी तयार होते. १) राजकीय स्वराज्य (self-rule) २) सकलजनांचे स्वराज्य, ३) हरित स्वराज्य ४) पर्यावरणस्नेही स्वराज्य, ५) शूद्रातिशूद्रांचे स्वराज्य, ६) सहिष्णू स्वराज्य, ७) अहिंसक स्वराज्य, ८) संपूर्ण शांततेचा पुरस्कार करणारे स्वराज्य, ९) सर्वधर्मसमभाव तत्वनिष्ठ स्वराज्य, १०) सारासार ज्ञानस्नेही स्वराज्य, ११) कृषी-उद्योग-व्यापारस्नेही स्वराज्य, १२) चेतना आणि भौतिकतेच्या समन्वयाचे स्वराज्य, १३) राजकीय सुधारणा आणि सामाजिक सुधारणांच्या एकोप्याचे स्वराज्य, १४) हिंदुस्तानीयत स्नेही स्वराज्य, १५) विज्ञानस्नेही स्वराज्य, १६) वैश्विक शांतीस्नेही स्वराज्य, १७) शोषणमुक्तीचे स्वराज्य, १८) ग्रँड स्ट्रॅटेजीचे स्वराज्य, १९) परंपरा व समकालीन (त्या काळातील) आधुनिकतेचा समन्वय साधणारे स्वराज्य, २०) मूल्याधारित स्वराज्य, २१) मूल्य समन्वय आधारित स्वराज्य, २२) प्रगतीच्या मार्गावर प्रवास करणारे स्वराज्य, २४) जगाला तिसरी दृष्टी देणारे स्वराज्य,





२५) राज्य निर्मितीचा प्रयोग राबविणारे स्वराज्य, २६) रामायण, महाभारताचा कालोचित अर्थ लावणारे स्वराज्य, २७) निर्वैऱ्याचे स्वराज्य, २८) सामाजिक सलोख्याचे स्वराज्य असे अनेक छोटे-छोटे सिद्धांत हिंदवी स्वराज्य या ग्रँड सिद्धांताच्या अंतर्गतआहेत. म्हणजेच व्यक्त झालेले आहेत. या सर्व प्रकारचा अर्थ आधुनिक काळात लावला जातो. त्यामुळे हिंदवी स्वराज्य आणि हिंदवी स्वराज्यातील छोट्या-छोट्या सिद्धांताचा संबंध कोणत्या प्रकारचा आहे हे सहज लक्षात येते. हिंदवी स्वराज्य ही एक छत्री आहे, असेही वर्णन करता येईल. तसेच हिंदवी स्वराज्य हा एक इंद्रधनुष्य आहे असेही वर्णन करता येईल. परंतु छत्री आणि इंद्रधनुष्य यापेक्षा सामाजिक शास्त्रांमध्ये त्याचे स्थान वेगळे आहे. कारण हिंदवी स्वराज्य हा एक सामाजिक शास्त्रातील ग्रँड सिद्धांत आहे. हिंदवी स्वराज्याच्या ग्रँड सिद्धांताचे अनेक छोटे-छोटे सिद्धांत आहेत. यामुळे खरेतर आधुनिक पूर्वकाळात हिंदवी स्वराज्य हाच एक ग्रँड सिद्धांत जन्माला आला. आधुनिक काळामध्ये कार्ल मार्क्सने ग्रँड सिद्धांताची मांडणी केली होती. अशा पद्धतीचा ग्रँड सिद्धांत कार्ल मार्क्सच्या आधी हिंदवी स्वराज्य म्हणून जन्मास आला. आधुनिक काळामध्ये या घडामोडीचे आत्मभान येऊ लागले होते. त्यामुळेच लोकहितवादींनी हिंदवी स्वराज्याचे वर्णन राजकीय क्रांती असे केले. महात्मा फुले यांनी हिंदवी स्वराज्याचे वर्णन शूद्रातिशूद्रांच्याचे स्वराज्य आणि कुणब्यांचे स्वराज्य असे वर्णन केले. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी राष्ट्र निर्मितीचे स्वराज्य असे वर्णन केले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बहिष्कृतांचे स्वराज्य असा अन्वयार्थ लावला होता. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी संपूर्ण भारताचे रुप हिंदवी स्वराज्यात पाहिले होते. अशी त्यांची भाषाशैली प्रतापगडावरती व्यक्त झाली होती. दुसऱ्या शब्दात त्यांची आयडिया ऑफ इंडिया आणि हिंदवी स्वराज्य यामध्ये त्यांना एकरूपता दिसत होती. श्रीपाद अमृत डांगे यांना हिंदवी स्वराज्य शोषित वर्गाची बाजू घेत होते असे दिसत होतेअसे म्हंटले आहे. अशी अनेक उदाहरणे हिंदवी स्वराज्याच्या ग्रँड सिद्धांताचा छोटा छोटा अन्वयार्थ स्पष्ट करणारी व्यक्त झालेली आहेत. हा छोटा छोटा अन्वयार्थ किंवा संकल्पना म्हणजेच हिंदवी स्वराज्याच्या ग्रँड सिद्धांताचे हे छोटे-छोटे उपसिद्धांतच आहेत. या गोष्टीचे आत्मभान आधुनिक काळातील विचारवंतांना आले होते. परंतु सिद्धांताची जडण-घडण करणाऱ्या समाज विज्ञानाला मात्र अशी दृष्टी कधीच लाभली नाही. परंतु तरीही शिवरायांच्या पत्रव्यवहारात, आज्ञापत्रात आणि महात्मा फुले यांनी लिहिलेल्या पोवाड्यात हरित स्वराज्य ही संकल्पना आशय म्हणून व्यक्त झालेली आहे. या गोष्टीची सुरुवात हरित स्वराज्याच्या प्रतिकापासून सुरू होते.

## हरित स्वराज्याचे प्रतिक

जिजाऊं आणि छत्रपती शिवाजी महाराज यांची हरित स्वराज्याची संकल्पना एका दृष्टांतामधून किंवा प्रतिकामधून दिसते. प्रतिक किंवा दृष्टांत म्हणजे त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन होता. तो दृष्टांत कोणता होता ? प्रतिक कोणते होते ? या प्रश्नाचे साधे उत्तर सोन्याचा नांगर हा तो दृष्टांत किंवा प्रतिक आहे. हरित स्वराज्याचे प्रतीक शिवाजी महाराजांनी पुणे येथे सोन्याचा नांगर फिरवला हे आहे. हे प्रतीक जिजाऊ आणि शिवाजी महाराजांनी कुरुराजापासून स्वीकारलेले दिसते.

कारण या प्रतिकाचा उगम कुरुराजा पासून होतो. कुरूराजाने सोन्याच्या नांगराने जमीन सरस्वती नदीच्या खोऱ्यात नांगरली. त्या जमिनीला पुण्यभूमी संबोधिले गेले होते. तेव्हापासून त्या जागेला कुरुक्षेत्र नाव पडले. या प्रतिकाची पुनरावृत्ती जिजाऊ व शिवाजी महाराज यांनी पुनवडी (पुणे) येथे केली. कुरुक्षेत्र या संकल्पनेचे अर्थ पुढील प्रमाणे आहेत. एक, शेतीचा शोध लागला याचे प्रतीक म्हणजे कुरुक्षेत्र. त्यामुळे कुरुक्षेत्र ही संकल्पना नवीनता किंवा नाविन्य या गोष्टीशी संबंधित आहे. दोन, कुरुक्षेत्र म्हणजेच सुजलाम-सुफलाम भूमी असा अर्थ घेतला जातो. दुसऱ्या शब्दात कुरुक्षेत्र म्हणजे युद्धभूमी नव्हे. कुरुक्षेत्र म्हणजे नवीन उत्पादनाची पद्धती होय. तीन, कुरुक्षेत्र म्हणजे शांततेची भूमी असाही अर्थ घेतला जातो. हा अर्थ एका अर्थाने अहिंसेशी जोडला गेलेला आहे. चार, कुरुक्षेत्र म्हणजे काबाड कष्ट करून शेती पिकवणे असाही अर्थ घेतला जातो. हा अर्थ एका अर्थाने उत्पादन पद्धतीच्या नव्या शोधाशी जोडलेला आहे. उत्पादनाची नवी पद्धत कुरूराजाने शोधून काढली. छत्रपती शिवाजी महाराज आणि जिजाऊंनी ही पद्धत पुनवडी मध्ये राबवली. म्हणून पुनवडीमध्ये जिजाऊ आणि शिवाजी महाराज यांनी सोन्याच्या नांगराने जमीन नांगरली. ती भूमी मातृभूमि व पुण्यभूमि ठरली. जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या दृष्टीकोनातून सकल लोकांचे पालन पोषण करणारी भूमी म्हणजे मातृभूमी आणि पुण्यभूमी होय. आजच्या अर्थाने सर्व नागरिकांचे पालन पोषण करणारी भूमी म्हणजे मातृभूमी आणि पुण्य भूमी होय. या अर्थाने सोन्याचा नांगर हे प्रतिक स्वराज्याचे आहे. तसेच हे पर्यावरण स्नेही धोरणाचे प्रतीक देखील आहे.

## शिवरायांच्या पत्रव्यवहारातील हरित स्वराज्याची संकल्पना

सुधाकर पवार यांनी मराठेशाहीतील पत्ररुप गद्य हे पुस्तक प्रकाशित केले आहे. या पुस्तकात त्यांनी शिवरायांच्या पत्रव्यवहाराचे संकलन केलेले आहे. त्या पत्र व्यवहारांमध्ये हरित स्वराज्याचा विचार आशय म्हणून व्यक्त झालेला आहे. या संदर्भातील महत्वाची उदाहरणे पुढील प्रमाणे आहेत. एक, गो-ब्राह्मण शब्दप्रयोगाचा अर्थ सुधाकर पवार यांनी परिसंस्था वाचक अर्थाने स्पष्ट केलेला आहे. गो म्हणजे पृथ्वी आणि ब्राह्मण म्हणजे विद्या किंवा उपासना असा त्यांनी अर्थ स्पष्ट केला होता. म्हणजेच थोडक्यात पृथ्वी आणि पृथ्वीचे ज्ञान या गोष्टीशी संबंधित परिसंस्था वाचक ही संकल्पना आहे. त्यामुळे ही संकल्पना जाती आणि वर्ण संस्थेपेक्षा वेगळ्या अर्थाची आहे. असे आत्मभान त्यातून व्यक्त होते (पवार सुधाकर,१९७८ : १३२). दोन, कुणबी समाज हा शब्दप्रयोग हरित स्वराज्य वाचक या अर्थाने येतो. कारण कुणब्याचे जीवन पर्यावरणाशी संबंधित आहे. त्यामुळे पर्यावरण आणि कुणबी यांच्यातील संवेदनशील संबंध शिवरायांच्या पत्र व्यवहारांमध्ये व्यक्त झालेलाआहे.तीन, पर्यावरणाबद्दल काही चूक झाली तर जीवन उद्ध्वस्त होते. याबद्दलचा पत्रव्यवहारात पुन्हा पुन्हा उल्लेख केला जातो. जंगल किंवा भूमीला जाळणे यास विरोध शिवरायांच्या पत्र व्यवहारांमध्ये झालेला दिसतो. विशेषतः आग लागल्यामुळे किंवा आग लावल्यामुळे कुणब्याला जीवे मारल्याप्रमाणे घडते. त्यामुळे त्यांनी अधिकारी वर्गाने गवत जाळण्यावर नियंत्रण ठेवण्याचा आदेश दिला आहे. उदाहरणार्थ आगीचा दगा न हो (पवार सुधाकर, १९७८: १९८). चार, शिवरायांच्या पत्रव्यवहारात जंगल तोड करण्यास विरोध केला आहे. उलट जंगलांचे संरक्षण करण्याचा विचार मांडलेला आहे.

## आज्ञापत्र आणि हरित स्वराज्य

हिंदवी स्वराज्याचे एक वैशिष्ट्य हरित हिंदवी स्वराज्य होते, असा आशय आज्ञापत्रमध्येदेखील व्यक्त झालेला आहे. हरित हिंदवी स्वराज्याचे पुरावे आज्ञापत्रात लिखित स्वरूपात दिसतात. त्या बद्दलची काही लक्षवेधक उदाहरणे पुढील प्रमाणे आहेत. एक, पाण्याचा संबंध हरित संकल्पनेशी घनिष्ठ असतो.






पाणी हा हरित संस्कृतीचा मूलभूत पाया आहे. यासंदर्भात अज्ञापत्राच्या आठव्या प्रकरणात पाणी, पर्जन्य आणि तळी यांच्याबद्दल सविस्तर आज्ञा दिलेल्या आहेत. पाण्यासाठी तळी बांधावेत. गडावर झराही आहे का? याची काळजी घ्यावी. पाण्यावर विशेष खर्च होतो. गडाचे पाणी बहुत जतन राखावे (जोशी प्रल्हाद नरहर, १९६०,३७). दोन, आज्ञापत्राच्या नवव्या प्रकरणात आरमार आणि हरित शेती यांचा संबंध जोडलेला दिसतो.आरमारासाठी सागवानाचा वापर करावा. आरमारासाठी लागणारे सागवान इतर राज्यातून खरेदी करून आणावे. त्या सागवानाचा पूर्ण दामत्या शेतकऱ्याला द्यावा. तसेच त्या राज्यालाही द्यावा. तीन, आरमारासाठी आंबे, फणस आशा शेतकऱ्यांच्या उपयोगाच्या असणाऱ्या झाडांचा उपयोग करू नये. रयतेने ही झाडे लावून लेकरासारखी बहुत काळ जतन करून वाढवलेली असतात. शेतकऱ्यांना दुःख देऊन त्यांनी वाढवलेली झाडे घेऊ नयेत (जोशी प्रल्हाद नरहर, १९६०, : ४३-४४).

## महात्मा फुलेंचा हरित स्वराज्याचा अन्वयार्थ

महात्मा फुले यांनी शिवरायांच्या स्वराज्याची कल्पना हरित स्वराज्य म्हणून मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. महात्मा फुले यांनी हरित हा शब्दप्रयोग वापरलेला नाही. परंतु आशयाच्या अर्थाने हरीत स्वराज्य हा शब्दप्रयोग व्यक्त झालेला आहे. या संदर्भातील पुढील चार मुद्दे महात्मा फुले यांनी मांडलेले आहेत. एक, महात्मा फुले यांनी छत्रपती शिवाजी राजे भोसले यांचा पोवाडा लिहिलेला आहे. त्या वाड्यामध्ये महात्मा फुले यांनी कुणबी आणि रयत असे दोन शब्द पुन्हा पुन्हा वापरले आहेत. हे दोन्ही शब्द शिवरायांच्या पत्रव्यवहारातदेखील आलेले आहेत.विशेषतः रयतेबद्दलची बांधीलकी या पोवाड्यात व्यक्त झाली आहे. दोन, रयत व कुणबी हा समूह महात्मा फुले यांनी क्षेत्र या अर्थाने वापरला आहे. क्षेत्र क्षेत्रियांचे घर हे वर्णन त्यांनी केले आहे. या वर्णनात क्षेत्र हा शब्दप्रयोग भूमी आणि कृषी संस्कृतीशी संबंधित आहे. भूमीची लूट आणि शेतीची लूट करणारा वर्ग कृषी विरोधक त्यांनी मांडला आहे. तर याउलट कृषीचे संरक्षण व भूमीचे संरक्षण करणारा वर्ग त्यांनी क्षेत्रवाशी या अर्थाने क्षेत्रिय त्यांनी मांडला आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे क्षेत्राचे संरक्षण करतात या अर्थाने त्यांनी पोवाड्याची रचना केलेली आहे. यामुळे छत्रपती शिवाजी महाराज यांचे मूळ रूप कुणबी आणि शिवरायांचा मूळ स्वभाव क्षेत्राच्या संरक्षणाचा आहे. तीन, महात्मा फुले यांनी क्षेत्राचे वर्णन पर्यावरण आणि परिसंस्था यासंदर्भात केले. यासंदर्भात महात्मा फुले यांनी डोंगर, वृक्षवल्ली, दऱ्या खोऱ्यातून खळखळ वाहणारे पाणी, फुले आणि झाडे, फुलांचा वाहणारा सुगंध, पक्षी, पक्षांचे स्वर, काळसर भूमी, भूमीची सुफलंन क्षमता अशा अनेक गोष्टींचे वर्णन हरित या स्वरुपात केलेले आहे. हे सर्व वर्णन त्यांनी शिवरायांच्या पोवाड्याच्या अनुषंगाने केलेले आहे. उदाहरणार्थ,

**शीखराकार डोंगर, नानावल्ली तरुवर**
**दरी खोरी वाहे नीर खळखळे निरंतर**
**झाडा फुले झाला भार, सुगंधी वाहे लहर**
**पक्षी गाती सोळा स्वर, मंजुळ वाणी मनोहर**
**नदी-नाले सरोवर, शोभे कमळाचा भार**
**भूमी अती काळसर, क्षेत्र देई पिका फार**
**धाव घेती दंगेखोर, दिला क्षेत्रियास मार**
**दास केले निरंतर, ब्रह्मा झाला मनी गार**

(कीर धनंजय आणि इतर, महात्मा फुले समग्र वाङ्‍मय, १९६९: ५०).

चार, शिवरायांच्या वरील पोवाड्यात त्यांनी मनुष्य सृष्टी, प्राणी सृष्टी, निसर्ग सृष्टी, वनस्पती सृष्टी त्यांचे वर्णन केलेले आहे. शिवराय हे या मनुष्य सृष्टी, प्राणी सृष्टी, निसर्ग सृष्टी, वनस्पती सृष्टी यांचे संरक्षण करते आहेत. असे वर्णन महात्मा फुले यांनी शिवरायांचे केलेले आहे. त्यामुळे शिवरायांवरील पोवाड्यात शिवराय हे हरितक्रांतीचे जनक आहेत. शिवराय हे परिसंस्था आणि पर्यावरणाचे संरक्षण करते आहेत. अशी सुस्पष्ट कल्पना महात्मा फुले यांनी मांडलेली आहे.

## पर्यावरण आणि परिसंस्था

शिवरायांच्या पत्रव्यवहारात आणि आज्ञापत्रात पर्यावरण आणि परिसंस्था याबद्दलचा आशय व्यक्त झालेला आहे. याबद्दलचा आशय चार प्रकारे व्यक्त झाला आहे. एक, शिवरायांनी समग्रपणे पर्यावरणाचा आणि परिसंस्थेचा विचार केलेला होता. दोन, परिसंस्थेतील एका घटकांचा दुसऱ्या घटकावर कोणता परिणाम होतो? याची त्यांना उत्तम जाण होती. यामुळे जंगलतोड झाली तर संरक्षणासाठी असणारे किल्ले उघडे पडतात. तसेच जंगलतोड झाली तर प्राणी सृष्टी आणि वनस्पती सृष्टीवर त्याचा परिणाम होतो. तीन, मानवाने आपल्या गरजा मर्यादित ठेवाव्यात. मानवाने निसर्गाशी जुळवून घेऊन जीवन जगावे. चार, शेतीचे संरक्षण राज्यसंस्थेने करावे. तसेच सजीव सृष्टी, प्राणी सृष्टी, वनस्पती सृष्टी यांचे देखील जतन आणि संवर्धन राज्यसंस्थेने करावे अशी धारणा शिवरायांची होती. चार, शिवरायांनी याबरोबरच उद्योग आणि व्यापार या दोन गोष्टींचा विचार केलेला होता. शिवरायांनी जंगल, संरक्षण, कृषी, उद्योग आणि व्यापार या सर्वांमध्ये एक समतोल निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे कोणत्याही एकाच क्षेत्राला त्यांनी अति झुकते माप दिले नाही. त्यांनी विविध क्षेत्रांचा पर्यावरणीय चौकटीत आणि परिसंस्थेच्या चौकटीत समतोल राखला. शिवरायांनी एक प्रकारे ग्रीन चार्टर जाहीर केलेला होता (जाहीरनामा). शिवरायांच्या ग्रीन चार्टरची स्थूलमानाने आजच्या काळातील चार वैशिष्ट्ये



दिसतात. एक, पर्यावरणाबद्दलचे शहाणपण, दोन, सामाजिक न्याय, तीन, तळागाळातील कल्याणकारी लोकशाही, चार, अहिंसा, पाच, जैवविविधतेचा आदर, सहा, चिरकालीन विकास या गोष्टी शिवरायांनी वारसा म्हणून दिलेल्या आहेत. आधुनिक काळात ग्रीन राजकारण उभे राहिलेले आहे. त्या राजकारणाला वैचारिक आधार शिवरायांच्या विचारांमध्ये सापडतो. थोडक्यात शिवराय हे ग्रीन राजकारणाचे एक महत्त्वाचे सांस्कृतिक प्रतिक आहेत. हा उद्देश शिवरायांच्या राजकारणाचा होता. हे शिवरायांच्या राजकारणाचे तत्वज्ञान होते.


## हरित स्वराज्य व आधुनिक युग

हरित स्वराज्याची संकल्पना भावार्थ म्हणून आधुनिक काळात देखील मोजमाप (मॅपिंग) करून दाखवता येण्यासारखी आहे. याची काही नमुनेदार उदाहरणे पुढील प्रमाणे आहेत. एक, हरित स्वराज्याची संकल्पना आणि गांधीवाद यातील पर्यावरण विषयक विचार एकमेकांशी मिळताजुळता आहे.

गांधीवादातील ग्रामस्वराज्य आणि हिंदवी स्वराज्यातील खेड्यांची पुनर्रचना यामध्ये भावार्थ म्हणून साम्य आहे. दोन, कृषी औद्योगिक समाजाची संकल्पना हरित स्वराज्यातून उदयास आलेली आहे. कारण शिवरायांच्या हरित स्वराज्यामध्ये प्राणी सृष्टी, वनस्पती सृष्टी यांचा विचार मांडलेला आहे. याबरोबर रायगडावरती बाजारपेठ उभारलेली होती. यामुळे कृषी आणि उद्योग यांच्या समतोलाचा विचार हरित स्वराज्यात होता. तीन, हा विचार महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित जवाहरलाल नेहरू आणि यशवंतराव चव्हाण यांच्याही कार्य आणि विचारात सुस्पष्टपणे दिसतो. कृषी-औद्योगिक समतोल याचा तपशील शिवरायांच्या हरित स्वराज्यात वेगळा होता.



स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये कृषी-औद्योगिक समतोलाच्या तपशिलाचा अर्थ वेगवेगळा होता. तसेच स्वातंत्र्योत्तर काळातील पन्नास आणि साठीच्या दशकातील कृषी-औद्योगिक समतोलाचा दावा वेगळा होता परंतु दृष्टिकोन मात्र शिवरायांच्या हरित स्वराज्यापासून ते पंडित नेहरू व यशवंतराव चव्हाण यांच्या विचारातील कृषी-औद्योगिक समतोलापर्यंत एक तत्त्व म्हणून समान दिसतो. म्हणजेच हरित स्वराज्याचा एक प्रवाह शिवरायांच्या काळापासून सुरू होतो. हा प्रवाह आधुनिक काळात देखील सातत्याने प्रवाही राहिलेला दिसतो. थोडक्यात, एकविसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात शिवरायांचा हरित स्वराज्याचा विचार उपयुक्त ठरणारा आहे. कारण या काळात पर्यावरणाचा समतोल नव्याने निर्माण करण्यासाठी शिवरायांचे प्रतिक आणि विचार महत्त्वपूर्ण ठरतो.



**संदर्भ**


पवार सुधाकर, १९७८, मराठेशाहीतील पत्ररूप गद्य, .इ.स. १६५० ते इ. स. १७५०, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

जोशी प्रल्हाद नरहर, १९६०, आज्ञापत्र, व्हीनस प्रकाशन पुणे.

कीर धनंजय, व इतर (संपा) १९६९, महात्मा फुले समग्र वाड्मय, महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.

गार्डन स्टुअर्ट, २०२१, देशमुख-वतनदार, छत्रपती -पेशवा: मराठाज, (र्. कृ. कुलकर्णी, अनुवाद), डायमंड प्रकाशन, पुणे.

■■




# राज्यकारभाराचा नवा नमुना : व्यक्तिस्वातंत्र्यावर वाढते आक्रमण

**- अनंत बागाईतकर**

मोदी सरकारने त्यांच्या नेहमीच्या खाक्यात जनसामान्यांच्या जीवनाशी निगडित महत्वपूर्ण असे विधेयक बहुमताच्या बळजबरीने लोकसभेत संमत करवून घेतले. ज्याप्रमाणे राज्यांच्या अधिकारक्षेत्रातील तीन कृषि कायदे बहुमताच्या जोरावर चर्चा न करता असंसदीय पध्दतीने संमत करवून घेण्यात आले होते तोच कित्ता या विधेयकाबाबत देखील गिरविण्यात आला. 'क्रिमिनल प्रोसिजर (आयडेंटिफिकेशन) बिल - २०२२' असे या विधेयकाचे शीर्षक आहे. म्हणजेच अपराधविषयक फौजदारी कायद्यात ओळख पटविण्याच्या संदर्भातील तरतुदींमध्ये बदल करुन तपास संस्थांना याबाबत अमर्याद अधिकार प्रदान करणारे हे विधेयक आहे. मूळ १९२०च्या कायद्यानुसार ओळख पटविण्याच्या बाबत हातांचे व बोटांचे, पायांचे ठसे घेण्यापर्यंतच मर्यादा राखण्यात आली होती. परंतु २०२२मध्ये मोदी सरकारने आणलेल्या या विधेयकात आणि लोकसभेत त्यावर फारशा चर्चेची संधी न देता मंजूर करण्याची घाई करताना या विधेयकामुळे व्यक्तिस्वातंत्र्यावर किती मोठा हल्ला केला जात आहे याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले आहे. कायद्यांचा सुयोग्य वापर करण्यापेक्षा त्यांचा अयोग्य वापर करण्याची मोदी सरकारची मनोवृत्ती आतापर्यंत भरपूर प्रमाणात स्पष्ट झालेली आहे. त्यामुळेच या कायद्याचा दुरुपयोग अधिक होण्याची सार्थ भीती विरोधी पक्षांनी व्यक्त केलेली आहे. त्याचप्रमाणे या कायद्याच्या दुरुपयोगाला आळा घालण्यासाठीचे कोणतेही उपाय या विधेयकात नसल्याकडे विरोधी पक्षांनी लक्ष वेधूनही सरकारने त्यांना चक्क फाट्यावर मारले आहे. त्यामुळेच मोदी सरकारच्या हातातील हे एक नवे शस्त्र म्हणून या प्रस्तावित कायद्याकडे पाहिले जात आहे. या हत्याराचा वापर ते विरोधकांसाठी करणार हेही स्पष्ट आहे. एका पाठोपाठ एक असे कायदे करुन सरकारच्या हाती जास्तीजास्त अधिकार एकवटणे व केंद्रित करणे हा सरसकट उद्योग सुरु आहे आणि त्याच मालिकेतला हा आणखी एक कायदा आहे. त्यामुळे मानवाधिकार संरक्षण, स्वयंसेवी संघटना, सामाजिक कार्यकर्ते व राजकीय विरोधक

यांना आणखी सावध राहण्याची वेळ आलेली आहे हाच संदेश या कायद्यामुळे मिळतो.

सद्दाम हुसेनना ते लपून बसलेल्या भूमिगत जागेतून पकडल्यानंतर त्यांची तपासणी कशी करण्यात आली याची दृष्ये अनेकांना आठवत असतील. अमेरिकन सैनिकांनी त्यांना पकडल्यानंतर त्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात येत असल्याचे दाखविण्यात आले होते. त्यामध्ये एक तुळतुळीत गोटा केलेला इसम(जो डॉक्टरपेक्षा कमांडो अधिक दिसत होता) हातात एक पेनटॉर्च घेऊन त्यांना तोंड उघडायला लावून घसा, नाक, जीभ, दात यांची तपासणी करताना दाखविला होता. डोळेही त्याने तपासताना दाखविण्यात आले होते. कदाचित भारतात तुम्हाला कधीकाळी अगदी संशयावरुन जरी पकडले तरी अशाच प्रकारच्या तपासण्यांना तोंड द्यावे लागण्याची शक्यता या नव्या कायद्यामुळे निर्माण होऊ शकते. या नव्या कायद्यानुसार तपाससंस्थांना त्यांच्या ताब्यातील व्यक्तीचे शारीरिक व जैविक नमूने गोळा करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. म्हणजेच अगदी किरकोळ कारणावरुन किंवा अगदी संशयावरुन किंवा प्रतिबंधात्मक उपाय म्हणूनही पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या व्यक्तींचे हा शारीरिक व जैविक(बायोलॉजिकल) नमून गोळा करण्याचे अधिकार त्यांना या कायद्याने प्रदान करण्यात आले आहेत. संशयितांचे देखील किंवा तपास संस्थांना एखाद्या व्यक्तीबद्दल केवळ संशय जरी आला तरी ते त्याचे शारीरिक व जैविक नमूने गोळा करु शकतात अशी तरतूद यामध्ये आहे. एकप्रकारे सरसकट असे हे अधिकार देण्याचा प्रकार करण्यात आला आहे. उदाहरणच द्यायचे झाल्यास महागाईच्या विरोधात नागरिकांनी मोर्चा काढला आणि त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले तर त्यांचे नमूने देखील अशा प्रकारे गोळा करण्याचे अधिकार पोलिसांना मिळाले आहेत. अर्थात सरकार त्यांना नको असलेल्या आणि त्यांच्या विरोधात असलेल्या व्यक्तींना ‘टार्गेट’ करण्यासाठी या कायद्याचा (गैर)वापर करणार हे उघड आहे. आतापर्यंत दहशतवाद्यांच्या विरोधात करण्यात आलेल्या कायद्यांचा उपयोग दहशतवाद्यांऐवजी राजकीय विरोधकांच्या विरुध्दच अधिक प्रमाणात झाल्याची असंख्य उदाहरणे असताना हा कायदाही अत्यंत सोज्वळपणेच वापरला जाईल अशी अपेक्षा करणे हा निव्वळ बावळटपणा ठरेल.

या कायद्याला विरोधी पक्षांनी हरकत घेणे अपेक्षितच होते. परंतु राजकारणापेक्षा यामध्ये नागरी स्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य या मूलभूत नागरी अधिकारांचा मुद्दा अधिक महत्वाचा आहे. मोदी सरकार हे सातत्याने नागरी स्वातंत्र्यांवर मर्यादा आणण्याचे प्रयत्न करीत आहे आणि त्या दिशेनेच त्यांची वाटचाल





**विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या राज्यांना सुरळीत कारभार करु न देणे हे एकमेव सूत्र भाजपकडून पाळले जाते. भाजपला निवडून दिले नाही तर त्याची शिक्षा भोगा अशा सूडाने पेटलेल्या मनोवृत्तीचे राज्यकर्ते केंद्रात सत्तेत आहेत. महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, पंजाब, तेलंगणा, तमीळनाडू, झारखंड, केरळ, छत्तीसगढ, राजस्थान, दिल्ली ही राज्ये दिल्लीकरांच्या डोळ्याला खुपत आहेत आणि त्यामुळेच या राज्यांमधील सरकारांना काम करु न देणे, तेथील राजकारण सतत खदखदत ठेवणे, फाटाफुटी, तोडफोडीच्या कारवाया करीत राहणे आणि याच्याच जोडीला ईडी, सीबीआय, प्राप्तीकर आणि तत्सम केंद्रीय संस्थांचा ससेमिरा तेथील राजकीय नेत्यांविरुध्द लावून देऊन त्यांना सळो की पळो करुन सोडणे यालाच बहुधा दिल्लीकर राज्यकारभार म्हणत असावेत. पंजाबमध्ये भाजपला कुणी हिंग लावून विचारत नाहीत परंतु तेथे सत्तेत आलेल्या आम आदमी पार्टीच्या सरकारला धडपणे राज्यकारभार करु देण्याच्या मन:स्थितीत दिल्लीकर राज्यकर्ते नाहीत.**



सुरु आहे. सुरुवातीच्या काळात आधार कार्डाच्या सक्तीचा मुद्दा असाच वादग्रस्त झाला होता.करोनाकाळात प्रत्येक मोबाईलधारकाला आरोग्यसेतु ॲप मोबाईलमध्ये डाऊनलोड करण्याची सक्ती झाली होती. विमानतळावर सुरक्षा तपासणीत हे ॲप तुमच्या फोनमध्ये आहे की नाही हे तपासले जायचे. अखेर सर्वोच्च न्यायालयाने आधारची सक्ती ही नागरी स्वातंत्र्य आणि नागरिकांची निजता(प्रायव्हसी) यांच्या विरोधात जाणारी असल्याचा निर्णय दिल्यानंतर सरकारला आधार कार्डाची दादागिरी कमी करावी लागली. अजुनही ही आधार कार्डाची सक्ती आणि दादागिरी कमी झालेली नाही. त्यामुळे हा जो नवा कायदा सरकार आणू पहात आहे त्यामध्ये देखील नागरिकांच्या निजतेचा हक्क किंवा अधिकार मोठ्या प्रमाणात मर्यादित होणार आहे व त्यावर हे एक नवे बंधन येणार आहे. त्याचप्रमाणे सरकारच्या विरोधात आवाज उठविणाऱ्यांच्या मनात दहशत निर्माण करण्याचा एक मानसशास्त्रीय उपाय, धाक-धास्ती म्हणूनही या कायद्याचा उपयोग आपोआपच होणार आहे. कारण यापुढील काळात अशा प्रकारे तपाससंस्थांना तुमची शारीरिक आणि जैविक माहिती गोळा करण्यासाठी मुक्तहस्त दिल्यास कुणीही कार्यकर्ता आंदोलन करताना दहा वेळेला विचार करील. यातून विरोधकांना आवाज दडपणे आणि सरकारला विरोध होता कामा नये ही सरकारची महत्वाकांक्षा यामुळे पूर्ण होऊ शकते. थोडक्यात सांगायचे झाल्यास एखाद्या पत्रकाराने सरकारच्या एखाद्या निर्णयावर टीका जरी केली तरी त्याच्याविरुध्द नाहक एखादी तक्रार पोलिसात दाखल करुन त्याला त्याआधारे नुसते ताब्यात घेतले तरी त्याची ही शारीरिक व जैविक माहिती एकत्र करण्याचा प्रकार केला जाऊ शकतो. याच माहितीचा गैरवापर होणारच नाही याची कोणतीही हमी या कायद्यात देण्यात आलेली नाही. तसेच या माहितीचे संकलन केल्यानंतर त्यावर कुणाचे नियंत्रण राहील याचे खुलासेही सरकारतर्फे करण्यात आलेले नाहीत. गृहमंत्री अमित शहा यांनी या विधेयकाचे समर्थन करताना तपास संस्थांना अपराध्यांच्या पुढे दोन पावले राहण्यासाठी हे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत असे म्हटले. वर्तमान काळात अपराध व गुन्हे अधिकाधिक गुंतागुंतीचे होत असताना तपास संस्थांना देखील त्यासाठी सक्षम करणे हा हेतु यामागे आहे. याचा दुरुपयोग होणार नाही आणि याची नियमावली तयार करताना राज्यांशी सल्लामसलत करण्यात येईल असे मधाचे बोटही त्यांनी लावले आहे. अर्थात शेतकऱ्यांसाठी केलेल्या कायद्यांच्या वेळी देखील मोदी सरकारने राज्यांचा विषय असूनही राज्यांना विश्वासात न घेण्याचा प्रकार केलेला होता. त्याची पुनरावृत्ती होणार नाही याची खात्री राहिलेली नाही.

या विधेयकावर लोकसभेत झालेल्या चर्चेत विरोधी पक्षांनी हे विधेयक घाईत संमत न करता संसदीय स्थायी समितीकडे छाननीसाठी द्यावे आणि त्यावर साधकबाधक चर्चा करुन मग त्यास मंजुरी दिली जावी अशी मागणी केली. परंतु सरकारने म्हणजेच गृहमंत्र्यांनी ती मागणी फेटाळून लावली. विधि आयोगाने(लॉ कमिशन) यासंदर्भात शिफारशी केल्या आहेत आणि विधि आयोगात त्यावर चर्चा झाली आहे असे सांगून गृहमंत्र्यांनी हे विधेयक संसदीय स्थायी समितीकडे पाठविण्याचे नाकारले. एका जुन्या कायद्यात काळसुसंगत अशा सुधारणा करण्याचा हा प्रयत्न असून विरोधी पक्ष किंवा राज्यांच्या यासंदर्भात काही सूचना असल्यास या कायद्याची नियमावली तयार करताना त्या विचारात घेऊ असे आश्वासन देऊन गृहमंत्र्यांनी विरोधी पक्षांच्या तोंडाला पाने पुसली. म्हणजेच सरकार हे विधेयक येनकेन प्रकाराने मंजूर करण्यासाठी हट्टालाच पेटल्याचे दिसून येत आहे. ही घाई कशासाठी आहे हे गूढ आणि अनाकलनीय आहे. मात्र यामागील सरकारचे हेतु स्वच्छ, साफ नाहीत हे या अतिघाईवरुन स्पष्ट होताना दिसते.


न्या.बी.एन.श्रीकृष्ण

विधेयक अस्पष्ट आहे आणि सरकारला नागरिकांच्या खासगी आयुष्यात नको एवढा हस्तक्षेप करण्याचा अमर्याद अधिकार त्यामुळे मिळणार आहे आणि म्हणूनच गृहमंत्र्यांनी कितीही तोंड भरुन आश्वासने दिली असली तरी या कायद्याचा दुरुपयोग त्यांचे सरकार किती रोखू शकणार आहे याचे उत्तर येणारा काळच देणार आहे. ज्या व्यक्तींची अशी माहिती गोळा करण्यात येईल ती माहिती (डेटा) नॅशनल क्राईम रेकॉर्डस् ब्यूरो किमान ७५ वर्षे जतन करु शकणार आहे. यासंदर्भात नियम तयार करण्याची जबाबदारी राज्यांकडे असली तरी केंद्र सरकारचाही त्यात समावेश

केला जाणार आहे. म्हणजेच अंतिमतः केंद्र सरकार स्वतःच्या हाती सूत्रे घेणार आहे

हे यावरुन स्पष्ट होत आहे. पत्रकार, स्वयंसेवी संघटना, सामाजिक कार्यकर्ते यांनी सरकारविरोधात भूमिका घेतल्यास तत्काळ त्यांच्याविरोधात देशद्रोहाचे खटले भरणारे हे वर्तमान सरकार आहे. सूडबुध्दीने पुरेपूर भरलेली मंडळी ज्या सरकारमध्ये असतात ते असे कायदे करुन विरोधी आवाज दडपण्यासाठी असे कायदे करीत असतात. तेच आता या देशात घडायला लागले आहे. थोडक्यात देशात कुणीही जनआंदोलने करु नयेत, सरकारविरुद्ध आवाज उठवू नये यासाठीची ही तरतूद आहे.



वर्तमान संगणकीय युगात नागरिकांची माहिती उघड केली जाण्याच्या वाढत्या प्रकारांमुळे व्यक्तिगत निजता किंवा ज्याला इंग्रजीत 'प्रायव्हसी' म्हटले जाते त्यावर आक्रमण होऊ लागले आहे. यातूनच अशा माहितीचे संरक्षण करणे, ती सहजासहजी कुठेही फुटू नये किंवा फोडली जाऊ नये यासाठी काही उपाययोजना करण्याची वेळ आली. यातूनच माजी न्यायमूर्ति बी.एन.श्रीकृष्ण यांच्या अध्यक्षतेखाली या विषयाच्या अध्ययनासाठी समिती नेमण्यात आली. त्यांनी यासंदर्भात काही शिफारशी केल्या आणि त्याआधारे सरकारने 'डेटा प्रोटेक्शन बिल' म्हणजेच संगणकीय वैयक्तिक माहिती संरक्षण विधेयक तयार केले. ते संयुक्त संसदीय समितीकडे विचारासाठी पाठविण्यात आले. परंतु त्यामध्ये श्रीकृष्ण समितीच्या शिफारशींऐवजी सरकार आणि तपाससंस्थांना अमर्याद अधिकार देण्याची शिफारस करण्यात आली. मूळ अहवालाशी विसंगत अशा प्रकारचे विधेयक तयार करण्यात आल्याने श्रीकृष्ण यांच्यासह अनेक तज्ञ मंडळींनी त्यास जोरदार विरोध केला. यामध्ये राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्याचा समावेश करुन वैयक्तिक व नागरी स्वातंत्र्यावर घाला घालण्याचाच प्रकार करण्यात आला. एवढेच नव्हे तर या माहितीचे संरक्षण करण्यासाठी एक स्वतंत्र व स्वायत्त अशी यंत्रणा किंवा प्राधिकरण उभारण्याऐवजी सरकारलाच या माहितीच्या संरक्षकाच्या भूमिकेत राखून संरक्षण या संकल्पनेचीच थट्टा करण्यात आली.

या सरकारने राज्यकारभाराचा एक नवाच नमूना अमलात आणण्यास सुरुवात केली आहे. ताज्या माहितीनुसार तीस मंत्रालयांमध्ये सुमारे तीन हजार अस्थायी किंवा हंगामी म्हणजेच विशिष्ट मुदतीसाठी (तीन वर्षांच्या कराराने) संबंधित क्षेत्रातील सल्लागारांची थेट नेमणूक करण्यात आली आहे. ही मंडळी फक्त त्या त्या विषयातील तज्ञ मंडळी आहेत. त्यांना कंत्राटी पध्दतीने कामावर घेण्यात आलेले असल्याने ती मंडळी धंदेवाईकपणे काम करतात. त्यामध्ये साधकबाधक किंवा लोकसेवा हे प्रशासनाचे जे प्रमुख उद्दिष्ट असते त्याला पूर्णपणे दुर्लक्षिण्यात येते. हे निव्वळ 'टेक्नोक्रॅट' असतात. त्यांना सामाजिक बांधिलकी वगैरे कशाशी देणेघेणे नसते. त्यांनाही माहिती असते की तीन वर्षांनंतर त्यांची सुट्टी होणार आहे. त्यामुळे ते तेवढ्यासतेवढे काम करतात आणि बाहेर पडतात. यामध्ये सरकारचे पैसे वाचतात. कंत्राटी कर्मचारी असलेल्यांना सामाजिक सुरक्षेचा कोणताच लाभ दिला जात नसतो. त्यामुळे भविष्य निर्वाह निधि, पेन्शन किंवा तत्सम सरकारी सेवकांना मिळणारे लाभ आपोआपच वाचतात व सरकारचा पैसाही वाचतो. त्याचप्रमाणे हे सल्लागार किंवा कन्सल्टंट थेट पंतप्रधान कार्यालयातील एका विशिष्ट अधिकाऱ्यास जबाबदार ठेवण्यात येतात. ते त्यांचा सल्ला या अधिकाऱ्याकडे पाठवतात आणि पंतप्रधान कार्यालयात निर्णय होऊन संबंधित निर्णय त्या मंत्रालयास कळविला जातो.


म्हणजेच नव्या रचनेत पंतप्रधान कार्यालयास सर्वशक्तिमान करण्यात आले आहे आणि मंत्रालये व मंत्री हे निव्वळ हुकमाचे ताबेदार बनले आहेत.

यापूर्वी संचालक किंवा डायरेक्टर आणि उपसचिव या पातळीपर्यंत थेट बाहेरुन आणि संबंधित विषयाशी निगडित व प्रशिक्षित लोकांची भरती करण्याचा कार्यक्रम अमलात

आणला गेला. ही कंत्राटी मोहिमच होती. एकप्रकारे लोकप्रशासनाचे किंवा सार्वजनिक - सरकारी प्रशासनाच्या खासगीकरणाचीच ही प्रक्रिया आहे. खासगीकरणात सामाजिक न्याय, आरक्षणासारखे मुद्दे आपोआपच बाजूला फेकले जातात. तसेच अस्थायी नेमणुकांमुळे या कर्मचाऱ्यांवर अंकुश ठेवणे अधिक सोपे जाते. याची व्याप्ती अशीच वाढती राहिल्यास सरकारच 'आउटसोर्स' करण्यापर्यंत तर या राज्यकर्त्यांची मजल जाणार तर नाही असा प्रश्न मनात आल्याखेरीज रहात नाही. याचे कारण वर्तमान राज्यकर्त्यांनी अनियंत्रित खासगीकरणाची मोहिम देखील हाती घेतली आहे. सरकारने कोणत्याच क्षेत्रात रहायचे नाही आणि रेल्वे, विमान, बस यासारख्या वाहतूक सेवा असोत, रस्ते, पूल यासारख्या पायाभूत सुविधा असोत या सर्वांचेच खासगीकरण करण्यास सुरुवात केली आहे. ही प्रक्रिया बेलगाम व अनियंत्रितपणे सुरु करण्यात आली आहे. त्याचा पहिला बळी सामाजिक न्याय असेल आणि आरक्षणाची संकल्पना धुळीस मिळविण्याचाच हा डाव आहे.

या राज्यकारभाराचे आणखीही काही पैलू आहेत. यामध्ये विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या राज्यांना सुरळीत कारभार करु न देणे हे एकमेव सूत्र पाळले जाते. भाजपला निवडून दिले नाही तर त्याची शिक्षा भोगा अशा सूडाने पेटलेल्या मनोवृत्तीचे राज्यकर्ते केंद्रात सत्तेत आहेत. महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, पंजाब, तेलंगणा, तमीळनाडू, झारखंड, केरळ, छत्तीसगढ, राजस्थान, दिल्ली ही राज्ये दिल्लीकरांच्या डोळ्याला खुपत आहेत आणि त्यामुळेच या राज्यांमधील सरकारांना काम करु न देणे, तेथील राजकारण सतत खदखदत ठेवणे, फाटाफुटी, तोडफोडीच्या कारवाया करीत राहणे आणि याच्याच जोडीला ईडी, सीबीआय, प्राप्तीकर आणि तत्सम केंद्रीय संस्थांचा ससेमिरा तेथील राजकीय नेत्यांविरुध्द लावून देऊन त्यांना सळो की पळो करुन सोडणे यालाच बहुधा दिल्लीकर राज्यकारभार म्हणत असावेत. पंजाबमध्ये भाजपला कुणी हिंग लावून विचारत नाहीत परंतु तेथे सत्तेत आलेल्या आम आदमी पार्टीच्या सरकारला धडपणे राज्यकारभार करु देण्याच्या मनःस्थितीत दिल्लीकर राज्यकर्ते नाहीत. याची दोन ठळक उदाहरणे म्हणजे महाराष्ट्र व पश्चिम बंगालची देता येतील. या दोन्ही राज्यातील सरकारे अस्थिर करण्याची एक संधी दिल्लीतील राज्यकर्ते सोडत नाहीत. सूडाने आंधळे झाल्याप्रमाणे दिल्लीच्या राज्यकर्त्यांचे वर्तन आहे. महाराष्ट्रातील आघाडी सरकारमधील मंत्र्यांच्या विरोधात कारवाया करणे, आमदारांना फोडण्याचा प्रयत्न करणे, गुढी पाडव्यावरुन सांप्रदायिक वाद निर्माण करणे अशा सार्वत्रिक काड्या करण्याचे प्रकार सतत सुरु आहेत. पश्चिम बंगालमध्ये देखील अक्षरशः रोज काहीना काही वाद उत्पन्न केले जात आहेत. जेणेकरुन तेथील सरकारला नीटपणे राज्यकारभार करताच येऊ नये यासाठीचा हा आटापिटा आहे.

आता पंजाबमध्येही अशीच खुसपटे काढण्यात येणार काय हे पहावे लागेल. दिल्लीमध्ये असलेल्या आम आदमी पार्टीच्या सरकारला केंद्र सरकारने कसे बेजार आणि त्रासून सोडले आहे त्याची असंख्य उदाहरणे आहेत. दिल्ली सरकारला परस्पर कोणताही निर्णय करता येऊ नये यासाठी





आम आदमी पार्टीला विजयाची मोठी संधी होती. भाजपच्या ताब्यात असलेल्या या तिन्ही महापालिकांच्या कारभाराला दिल्लीकर कंटाळलेले होते आणि त्यामुळेच यावेळी आम आदमी पार्टीला त्या काबीज करण्याची मोठी संधी होती. पंजाबमध्ये मिळालेल्या विजयामुळे आम आदमी पार्टीबद्दल दिल्लीतही आणखी अनुकूल वातावरण निर्माण झालेले असल्याने या महापालिकात त्यांना विजय मिळविणे सोपे होते. परंतु भाजपला ते सहन होणे अशक्य होते. त्यामुळेच एकत्रकीरणाचा हा डाव टाकण्यात आला. विधिनिषेधशून्यपणे हा प्रकार करण्यात आला. आता एकत्रीकरणातून निर्माण होणाऱ्या महानगरपालिकेची निवडणूक सहा महिने लांबवून या सहा महिन्यात पंजाबच्या विजयाचा परिणाम कमी करण्याचा प्रयत्न भाजपच्या प्रचारकी टोळ्या करतील. थोडक्यात म्हणजे केवळ बहुमत आहे म्हणून वाटेल ते कायदे वाटेल त्या पध्दतीने संमत करायचे आणि आपले राजकीय स्वार्थ साधण्याचे काम सुरु आहे. आपली सत्ता कशी टिकून राहील आणि विरोधी पक्षांचे अस्तित्व कसे संपवायचे या एकमेव लालसेने पछाडलेला हा सत्तापिपासू पक्ष आणि या पक्षाचे नेतृत्व आहे. यांच्या सत्तालालसेच्या उदाहरणांसाठी स्वतंत्र ग्रंथ होऊ शकतो. परंतु संसदेत आणि इतरत्रही मिळालेल्या बहुमताचा दुरुपयोग करुन येनकेन प्रकाराने सत्ता टिकविणे आणि न मिळालेल्या ठिकाणी कारस्थाने करीत ती मिळवायची, विरोधी पक्षांना संपवायचे व त्यासाठी त्यांच्यामागे कारवायांचा ससेमिरा लावून देणे असे वर्तमान राज्यकर्त्यांचे राज्यकारभाराचे 'मॉडेल' किंवा नमूना आहे. त्याच्या भवितव्याचा निर्णय मतदारांनीच करायचा आहे!

■■

नायब राज्यपालांच्या अधिकारात वाढ करण्यात आली.

एवढेच नव्हे तर आम आदमी पार्टीच्या सरकारने दिल्लीत शाळांसाठी जागा मगितल्यावर केंद्रीय नगरविकास मंत्रालयाने (होय, दिल्लीची जमीन केंद्र सरकारच्या अधिकारात येते) त्यांना चक्क जमीन देणार नाही म्हणून अडवाअडवी केली.

अखेर आम आदमी पार्टीच्या सरकारने शक्कल लढवून अस्तित्वात असलेल्या शाळांचे नूतनीकरण आणि त्यामध्येच वर्गांची संख्या वाढवून शिक्षण विषयक त्यांच्या योजना अमलात आणल्या. ताजे उदाहरण म्हणजे दिल्ली सरकार अंतर्गत असलेल्या तीन महानगरपालिकांचे एकत्रीकरण करण्याचा निर्णय होय. यामुळे उत्तर दिल्ली, दक्षिण दिल्ली आणि पूर्व दिल्ली या तीन महानगरपालिकांचे एकत्रीकरण करणारे विधेयक लोकसभेत जोरजबरदस्तीने संमत करण्यात आले.

निवडणूक आयोगातर्फे या महापालिकांची निवडणूक जाहीर केली जाणार होती परंतु त्यामध्ये कोणताही अधिकार नसताना केंद्र सरकारने आयोगाला निवडणुकीची घोषणा लांबविण्यास सांगितले आणि अचानक हे विधेयक मांडून तीन महापालिकांचे विलीनीकरण करुन टाकले. आता आपोआपच निवडणुका पुढे ढकलल्या जाणार आहेत. हे करण्याचे कारण स्पष्ट आहे. महापालिकांच्या निवडणुकीत



आधुनिक भारताच्या सामाजिक-शैक्षणिक सुधारणांच्या क्षेत्रांत महर्षी कर्वे यांची कामगिरी मोलाची आहे. आधुनिक भारताच्या सामाजिक क्षेत्रातील एक विक्रम त्यांच्या नावावर आहे. ही त्यांची एकमेवाद्वितीय कामगिरी होय. महर्षी १०४ वर्षे जगले. ही कामगिरी 'न भूतो' अशा स्वरूपाची आहे. १९-२० व्या शतकात जगण्याचे सरासरी वय कमी असताना महर्षींनी ही कामगिरी केली. वय, अनुभव आणि प्रवास यांमुळे त्यांनी विविध क्षेत्रांत ठसा उमटविला. त्यांची कामगिरी थोडक्यात अभ्यासू या.

## महिलांच्या शिक्षणासाठी जीवन परमात्म्याला अर्पिणारे

# महर्षी धोंडो केशव कर्वे

प्रा. डॉ. गणेश राऊत

**चरित्रक्रम** : १८ एप्रिल, १८५८ रोजी केशव आणि लक्ष्मीबाई कर्वे यांच्या पोटी धोंडोपंतांचा जन्म झाला. तत्कालीन परिस्थितीप्रमाणे वयाच्या १५ व्या वर्षी धोंडोपंतांचे लग्न राधाबाईंशी करून देण्यात आले. मॅट्रिक्युलेशन, बी.ए. शिक्षण झाल्यावर ते एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून काम करू लागले. ही तात्पुरती नेमणूक होती. सन १८८८ ते १८९१ या काळात त्यांनी वेगवेगळ्या शाळांमध्ये शिक्षण म्हणून काम पाहिले. सन १८९१ मध्ये त्यांच्या पत्नी राधाबाई यांचे निधन झाले. पुढे ते पुणे शहरातील प्रख्यात अशा फर्ग्युसन महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून दाखल झाले. फर्ग्युसन महाविद्यालयाचे संचालन करणाऱ्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे ते आजीव सदस्य (लाईफमेंबर) झाले.

११ मार्च, १८९३ रोजी त्यांनी गोदूबाई उर्फ आनंदीबाई या विधवा स्त्रीशी विवाह केला. यामुळे कर्वे यांच्यावर त्यांच्या जन्मगावी बहिष्कार टाकण्यात आला. कर्वे यांच्या विरोधात वादळ उठले. या कशालाही न जुमानता कर्वे यांनी समविचारी सहकाऱ्यांच्या मदतीने 'विधवाविवाहोत्तेजक मंडळी'ची स्थापना करून विधवा पुनर्विवाहास अधिकच गती दिली. कार्याचा विस्तार वाढू लागल्यावर सन १८९५ मध्ये संस्थेचे नाव बदलून ते विधवा-विवाह-प्रतिबंध-निवारक-मंडळी असे केले. सन

१८९६ मध्ये 'अनाथ बालिकाश्रम मंडळी' या संस्थेची त्यांनी सुरुवात करून पुण्यातील हिंगणे भागात कार्य सुरू केले. सन १९०७ मध्ये त्यांनी महिला महाविद्यालयाची स्थापना केली. सन १९०८ मध्ये निष्काम-कर्म-मठ स्थापला. सन १९१६ मध्ये कर्वे यांनी यापेक्षा मोठा पल्ला गाठून महिला विद्यापीठ सुरू केले. अध्यापिका शाळा, कन्या शाळा, महाराष्ट्र-ग्राम-प्राथमिक-शिक्षण मंडळ स्थापना, समतासंघ संस्थेची स्थापना, सन १९४६ मध्ये अनाथ बालिकाश्रमाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात संस्थेचे नाव हिंगणे स्त्री-शिक्षणसंस्था असे विविधांगी कार्य केले. भारत स्वतंत्र झाल्यावर त्यांनी 'मानवी समता' हे मासिक सुरू केले. विविध शैक्षणिक संस्था, विद्यापीठे यांनी कर्वे यांचे सत्कार केले. कर्वे यांना आयुष्याची शंभरी पार करतानाच आजवर केलेल्या कार्याचे कृतज्ञ स्मरण म्हणून भारत सरकारने सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न' प्रदान केला. पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या उपस्थितीत कर्वे यांच्या जन्मशताब्दीचा कार्यक्रम पार पडला. भारत सरकारने त्यांचे टपाल तिकीट काढले. ९ नोव्हेंबर, १९६२ रोजी त्यांचे निधन झाले.

**महर्षींचे योगदान** : महर्षींनी आपल्या सामाजिक कार्यास किशोरावस्थेपासूनच सुरुवात केली होती. अंकगणित सोडविणे, आकाश कंदील तयार करणे, मेणकापडी छत्र्या तयार करणे या गोष्टीत महर्षी तरबेज होते. गावातील लोकांना रोजची वृत्तपत्रे वाचून दाखविल्यास गावकऱ्यांच्या ज्ञानात भर पडेल असे धोंडोपंतांच्या शिक्षकांस वाटले. वि. ल. सोमण गुरुजी यांनी धोंडोपंतांना वृत्तपत्रे देऊन देवळाच्या प्रवेशद्वारापाशी बसविले. हा वृत्तपत्र वाचनाचा उपक्रम दोन महिने चालला. जरी तो अल्पायुषी ठरला तरी धोंडोपंतांच्या सामाजिक कार्याची ती सुरुवात होती. पुढे १८८१ च्या शिरगणतीत धोंडोपंत सहभागी झाले. पत्नी व बहिणीला शिकविण्यात त्यांनी पुढाकार घेतला. पुढे एल्फिन्स्टन हायस्कूल, कॅथिड्रल गर्ल्स हायस्कूल, अलेक्झांड्रा गर्ल्स हायस्कूल, बॉम्बे इंग्लिश स्कूल येथे शिकविले. थोरल्या मुलाच्या मुंजप्रकरणी (त्या काळी मुंज करणे म्हणजे गावातील एक मोठे कार्यच असे.) कर्वे यांनी आई-वडिलांचा विरोध पत्करून अल्प खर्चात मुंज करून त्या काळी दोनशे रुपये मुरुड या गावी इंग्रजी शिक्षण वा स्त्री शिक्षणासाठी खर्च करण्यास दिले. पत्नीच्या अकाली मृत्यूनंतर राधाबाईंच्या नावे पाचशे रुपये पुन्हा एकदा शिक्षण कार्यासाठी मुरुड गावात दिले. याच काळात त्यांनी आपल्या दरमहा प्राप्तीच्या पाच टक्के रक्कम सामाजिक कार्यासाठी द्यायला सुरुवात केली.

**मुरुड फंड उर्फ पै फंड** : कर्वे यांनी प. ह. दामले आणि का. वा. काणे या समविचारी मित्रांच्या मदतीने 'मुरुड फंड' उभारला. मुरुडमध्ये जन्मलेल्या, स्थायिक झालेल्या वा बाहेरगावी गेलेल्यांनी दर रुपयाला एक पै याप्रमाणे देणगी द्यावयाची. या देणगीतून शाळा बांधणे वा मुलींची शाळा चालविणे हे उद्देश होते.

**शिक्षणोत्तेजक मंडळी** : या संस्थेचे मूळ नाव 'दापोली तालुक्यातील मास्तर लोकांची सभा' असे होते. दर महिना तालुक्यातील एखाद्या गावी मुख्याध्यापक आणि शिक्षक सर्व एकत्र जमून चर्चा, शंकासमाधान, निबंधवाचन करीत. या उपक्रमाला 'मित्रमेळा' नाव होते. याला धोंडोपंतांनी वीस रुपये देणगी दिली.



**फर्ग्युसनचे दिवस** : धोंडोपंतांचे असे मुंबईत दिवस बरे चालले असताना फर्ग्युसनमध्ये गणित शिकविण्यासाठी एक जागा निर्माण झाली. धोंडोपंतांना त्या जागेसाठी बोलाविण्यात येऊन १८९१ पासून ते कायमचे 'पुणेकर' झाले.

**पुनर्विवाह** : येथवर सर्व व्यवस्थित चालले असताना धोंडोपंतांच्या पुनर्विवाहाने मोठे वादळ उठले. २५ जुलै, १८५६ रोजी हिंदू विधवा पुनर्विवाह कायदा झाला होता. महाराष्ट्रातील पहिला विधवा पुनर्विवाह म्हणजे रघुनाथ जनार्दन भांडारकर आणि नर्मदाबाई यांचा होय. हा विवाह मुंबईत झाला. सन १८५३ मध्ये विधवा विवाहावर 'पुनर्विवाह प्रबंध' नावाचा निबंध प्रसिद्ध झाला होता. भाऊ दाजी लाड यांनी सन १८६४ मध्ये विधवा विवाहांच्या मदतीसाठी ४३ हजार रुपयांचा निधी गोळा केला होता. अशा कालखंडात धोंडोपंतांनी ११ मार्च, १८९३ रोजी पुनर्विवाह केला. ख्यातनाम सुधारक प्राचार्य गोपाळ गणेश आगरकर यांची स्वाक्षरी लग्नाच्या निमंत्रण पत्रिकेवर होती. कर्वे यांच्या पत्नी आनंदीबाई या पंडिता रमाबाई यांच्या लाडक्या शिष्या होत. या विवाहास समाजात विरोध झाला. गोदूताई उर्फ आनंदीबाई कर्वे यांच्या वडिलांस या विवाहामुळे त्यांच्या गावात देवळात बारा नमस्कार व देऊळ जीर्णोद्धारासाठी शंभर रुपये भरावे लागले. पुण्यात केसरी, मराठा या पत्रांनी अनुकूल मत तर काही पत्रांनी प्रतिकूल मत व्यक्त केले. मुरुड गावात कर्वे यांच्यावरील बहिष्कार उठायला दहा वर्षे जावी लागली. लग्नानंतर आनंदीबाई नागपूरच्या डफरिन हॉस्पिटलमध्ये एक वर्षाचा मिडवाईफ आणि नर्सिंगच्या अभ्यासाला गेल्या. वर्षभराने त्या यशस्वी होऊन परतल्या.

**विधवा विवाहोत्तेजक मंडळी** : ३१ डिसेंबर, १८९३ रोजी वर्धा येथे कर्वे आणि समविचारी अशा १४ लोकांच्या उपस्थितीत 'विधवा विवाहोत्तेजक मंडळी' संस्था स्थापण्याचे ठरले. या संस्थेचे मुख्य २५ नियम ठरले होते. अशा प्रकारचे पुनर्विवाह करून त्यांचे मेळावे घेण्याचे ठरले. तसे मेळावे सुरूसुद्धा झाले. सन १८९५ मध्ये संस्थेचे नाव 'विधवा-विवाह-प्रतिबंध-निवारण मंडळी' असे बदलण्यात आले. कर्वे यांनी लोकमान्य टिळकांकडून 'पुनर्विवाहितांशी पंक्तिव्यवहार करण्याला हरकत नाही' असे लेखी पत्र घेतले. या कार्याचा जोरदार पुरस्कार त्यांनी केला.

**अनाथबालिकाश्रम मंडळी** : १ जानेवारी, १८९९ रोजी अनाथबालिकाश्रम मंडळीची सुरुवात झाली. रावबहादूर गणेश गोविंद गोखले यांनी देणगीदाखल जागा दिली. येथे मुलींना शिकविण्याचे कार्य सुरू झाले. नर्मदाबाई फडके, पार्वतीबाई आठवले, काशीबाई देवधर यांनी अन्य कितीतरी जणींच्या सहकार्याने काम उभे केले. या आश्रमास पुढे महात्मा गांधीजी आणि सौ. कस्तुरबा गांधी यांनी भेट दिली होती. या आश्रमात प्रवेश घेण्यासाठी भारतभरातून विद्यार्थिनी येऊ लागल्या. प्रवेश संख्या वाढतच चालली होती. यावर उपाय शोधण्याची गरज होती.

**महिला विद्यालय स्थापना** : ४ मार्च, १९०७ रोजी कर्वे यांनी महिला महाविद्यालय सुरू केले. मुलींना शिक्षण देणे व त्यांची लग्नाची वयोमर्यादा वीस वर्षांपर्यंत वाढवित नेणे या उद्देशांसाठी महाविद्यालय सुरू झाले. साधी राहणी, उच्च विचारसरणी आणि दरमहा पाच रुपयांत राहता येईल अशी व्यवस्था कर्वे यांनी केली. या खर्चासाठी त्यांनी 'ब्रह्मचर्य फंड' आणि 'शिक्षण फंड' असे दोन फंड उभारले. कार्य वेगाने पुढे नेण्यास निष्काम-कर्म-मठ संस्थेची स्थापना केली. निष्काम-कर्म-मठ या संस्थेची स्थापना ४ नोव्हेंबर, १९०८ रोजी झाली. कर्वे आणि त्यांचे दोन सहकारी यांनी याप्रसंगी जी शपथ घेतली त्यातून आपणास उद्देश समजू शकतो. कर्वे यांनी घेतलेली प्रतिज्ञा पुढीलप्रमाणे, "आश्रमाचे, विद्यालयाचे व अशांसारख्या इतर लोकोपयोगी संस्थांचे काम करण्यासाठी



जे 'इंडियन लेडीज मिशन' स्थापावयाचे आहे हे त्या कामी मी आपले जीवित या विश्वाचा चालक जो परमात्मा त्याला स्मरून अर्पण करीत आहे. माझ्या जीवितावर आता माझा हक्क नाही." यावर अधिक भाष्य करण्याची गरज नाही.

**महिला विद्यापीठ –** श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ (SNDT) : भारतातील पहिले महिला विद्यापीठ स्थापन करण्याचे श्रेय कर्वे यांच्याकडे जाते. ऑगस्ट १९१५ मध्ये 'जपान वुईमेन्स युनिव्हर्सिटी' या नावाची पुस्तिका कर्वे यांच्याकडे टपालाने आली. पुस्तिका वाचल्यावर कर्वे यांनी त्या संदर्भात लिहिले आहे की,



"अथपासून इतिपर्यंत वाचले आणि काही एक अवर्णनीय वारे माझ्या शरीरात व मनात खेळू लागले."

"हिंगण्याच्या संस्थातून जर महाराष्ट्रासाठी स्त्रियांची युनिव्हर्सिटी उत्क्रांत होईल तर मोठी बहार उडेल."

सन १९१५ मध्ये भारतीय राष्ट्रीय सभा (काँग्रेस) अधिवेशन मुंबईत भरणार होते. त्याला जोडून यावेळी राष्ट्रीय सामाजिक परिषद भरायची होती. परिषदेच्या अध्यक्ष पदावरून कर्वे यांना भाषण करायचे होते. या अध्यक्ष पदावरून बोलताना त्यांनी स्त्री-शिक्षण आणि महिला विद्यापीठाविषयी आपले विचार मांडले. श्री. नरूसे यांनी सन १९०० मध्ये जपानमध्ये स्त्रियांसाठी विद्यापीठ सुरू केले होते. कर्वे यांनी त्यापासून प्रेरणा घेऊन इकडे विद्यापीठ काढण्याचे ठरविताच प्रा. केशवराव कानिटकर यांनी ३०० रुपये तर ॲनी बेझंट यांनी दीडशे रुपये देणगी दिली. 'भारतवर्षीय महिला विद्यापीठ' वा 'इंडियन वुइमेन्स युनिव्हर्सिटी' नाव सुचविण्यात आले. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी कर्वे यांना पत्र लिहून शुभेच्छा दिल्या. अनेकांनी पाठिंबा आणि विरोध केला परंतु कर्वे यांचा निश्चय ठाम होता. महात्मा गांधीजींनी कर्वे यांच्या प्रत्यक्ष भेटीत दहा रुपये देणगी देऊन क्रियाशील पाठिंबा व्यक्त केला. पुढे काही काळाने महात्मा गांधीजींकडून येणारी नियमित देणगी कर्वे यांना महात्मा गांधीजींना विनाकारण त्रास नको म्हणून थांबविली. महात्मा गांधीजींच्या पाठिंब्यामुळे कर्वे यांना अहमदाबादला भरपूर देणगीदार मिळाले. विद्यापीठाचे पहिले चॅन्सेलर म्हणून डॉ. भांडारकर रा. गो. आणि व्हाईस चॅन्सेलर म्हणून रँग्लर र. पु. परांजपे यांनी काम पाहण्याचे मान्य केले. स्वतः कर्वे यांनी रजिस्ट्रार म्हणून काम पाहण्याचे मान्य केले. ३ जून, १९१६ रोजी महिला विद्यापीठ अस्तित्वात आले. या विद्यापीठाला काही एक अटींच्या स्वाधीन राहून सर विठ्ठलदास ठाकरसी यांनी पंधरा लाख रुपये देणगी देण्याचे मान्य केले. या विद्यापीठासाठी देणग्या गोळा करण्यासाठी कर्वे इंग्लंडला गेले. इंग्लंड, फ्रान्स, बेल्जियम, हॉलंड, स्वित्झर्लंड, डेन्मार्क, स्वीडन, नॉर्वे, जर्मनी, अमेरिका, जपान, चीन, फिलिपिन्स, मॅनिला, जावा, मलाया, सिंगापूर असा दौरा करून कर्वे यांनी खर्च वजा जाता विद्यापीठाकडे चौदा हजार रुपये जमा केले. आफ्रिकेत जाऊन कर्वे यांनी ३२,००० रुपये देणगी म्हणून गोळा केले.

**महाराष्ट्र-ग्राम-प्राथमिक-शिक्षण-मंडळ** : ज्या गावी बोर्डाच्या किंवा बोर्डाकडून मदत मिळणाऱ्या शाळा नसतील अशा खेडेगावात प्राथमिक शाळा चालविण्यास मदत करण्यासाठी या मंडळाची स्थापना झाली. न. चिं. केळकर अध्यक्ष तर कर्वे चिटणीस अशी कामाची वाटणी झाली. यावेळी कर्वे ऐंशीच्या घरात पोहोचले होते. हे काम त्यांनी बारा वर्षे केले. पुढे त्यांनी 'समता संघ' स्थापन केला. या संस्थेच्या माध्यमातून 'मानवी समता' नावाचे आठ पानी मासिक सुरू केले. सन १९४८ मध्ये कर्वे नव्वद वर्षे पूर्ण करते झाले. आपल्या कार्याने ते महर्षी पदास पोहोचले होते. 'अनाथ बालिकाश्रम' संस्थेचे नाव कालपरत्वे बदलून 'हिंगणे स्त्री शिक्षणसंस्था' करण्यात आले.


**मूल्यमापन** : महर्षींनी आयुष्याची शंभरी गाठल्यावर पुण्यातील ज्ञानप्रकाश वृत्तपत्रात एक अग्रलेख छापला गेला. त्या अग्रलेखाच्या सुरुवातीला डॉ. गूल्ड यांची महर्षींच्या संदर्भातील प्रमुख वाक्ये पुढीलप्रमाणे –

He said his goal, he walked, he persisted, he achieved. ... In doing this he has served Poona; he has served India; he has served Asia; he has served Humanity.

(संदर्भ : महर्षी धोंडो केशव कर्वे – विलास खोले)

आपल्या उण्यापुऱ्या १०५ वर्षांच्या आयुष्यात महर्षी मानवतेसाठीच कार्यरत राहिले.

■■

# परिवर्तनाचे शिल्पकार


## फुले-शाहू-आंबेडकर व्याख्यानमाला






डॉ.जयसिंगराव पवार

# ललित कलेचे आश्रयदाते
# राजर्षी शाहू महाराज

**परिवर्तनाचे शिल्पकार : फुले–शाहू–आंबेडकर या व्याख्यानमालेअंतर्गत राजर्षि शाहू यांनी ललित कलेचे आश्रयदाते म्हणून केलेल्या कार्याचा व या कलेला दिलेल्या प्रोत्साहनाचा राजर्षि शाहू चरित्राचे अभ्यासकार आणि ज्येष्ठ इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार यांनी घेतलेला संक्षिप्त आढावा.**

आज आपण शाहू महाराजांनी ललित कलांना दिलेला राजाश्रय आणि या राजाश्रयाच्या खाली संगीत असेल, नाट्य असेल, चित्रकला असेल, चित्रपट असेल, या ज्या ललित कला आहेत, त्या कशा बहरल्या आणि शाहू महाराजांची कारकीर्द म्हणजे मुंबई इलाख्यातीलच नव्हे, तर या देशातील ललित कलांचं सुवर्णयुग म्हणून संबोधलं गेलं.

संगीत ही ललित कलामधली मुख्य कला आणि कोल्हापूर संस्थानाच्या संगीताची परंपरा देवल क्लब नावाची याठिकाणी एक क्लब सुरू झाला, तेव्हापासून सुरू झाली. हा देवल क्लब शाहू महाराजांच्या प्रोत्साहनानं सुरू झाला आणि या देवल क्लबची कीर्ति मुंबई इलाख्यातच नव्हे तर संबंध हिंदुस्थानामध्ये पसरली. भारतामधल्या भल्या भल्या अशा संगीत तज्ज्ञांना, गायकांना असं वाटायला लागलं, की कोल्हापुरामध्ये आपण जायला पाहिजे आणि कोल्हापुरामध्ये देवल क्लबमध्ये आपला परफॉर्मन्स झाला पाहिजे. संगीत तज्ज्ञ एस. ए. कुलकर्णी यांनी एक लेख लिहिलेला आहे. आमच्या शाहू स्मारक ग्रंथामध्ये प्रसिद्ध केलाय तो आम्ही. त्याच्यामध्ये देवल क्लब आणि शाहू महाराज यांचं संगीताच्या क्षेत्रामधलं अनन्य असं काय कार्य होतं, हे अचूक शब्दामध्ये त्यांनी वर्णन केलेलं आहे.

ते म्हणतात, आज देशात विविध संगीत घराण्यातले गायक-गायिका कीर्तिमान झालेल्या आहेत. त्यांच्या वंशावळीचे करवीर नगरीतच संवर्धन झालेलं आहे आणि त्याचे जे मूळ प्रणेते आहेत, ते आहेत, शाहू महाराज. पुढे जेव्हा कोल्हापुरात महाराजांच्या कृपा प्रसादाने बहरलेला देवल क्लब प्रसिद्धीस आला. तेव्हा देशातल्या प्रत्येक गायक-गायिकेला वाटायचे, आपले गायन देवल क्लबमध्ये व्हावे. देवल क्लबमध्ये जो जो कलाकार आपली गायन-वादनाची कला सादर करू शकला, तो देशाच्या कीर्ति वलयात तरंगू लागला. आजही थोडीफार तशीच परिस्थिती आहे. आजही देवल क्लब आहे. चांगल्या पद्धतीनं कोल्हापुरच्या रसिकांनी तो चालवलेला आहे.

अशा या संगीत कलेमध्ये दोन शाखा आहेत. तशा अनेक शाखा आहेत. पण प्रमुख शाखा. विशेषत: महाराष्ट्राचं संगीत, त्याचा विचार करता, एक आहे शास्त्रीय संगीत आणि दुसरं आहे नाट्य संगीत. तशी ही दोन अलग वाटली तरी शास्त्रीय संगीताच्या बेसवरच नाट्य संगीत आहे. जसे काही शास्त्रीय संगीतामध्ये पुढे आले, त्यातले काही नाट्य संगीतात आले. उदाहरणार्थ, बालगंधर्व. बालगंधर्व हे शास्त्रीय संगीतामध्येही आहेत आणि नाट्य संगीतातही आहेत. त्यांचे समवयस्क असणारे संगीतसूर्य केशवराव भोसले. दोन्हीकडे आहेत. तर यामध्ये जे मोठमोठी गिरीशिखरं निर्माण झाली हिमालयातल्या गौरीशंकराप्रमाणं, त्यातलं एक शिखर म्हणजे अल्लादिया खाँ साहेब. अल्लादिया खाँ यांचं गायन साधारणपणे राज्यारोहणानंतर एक दिवस मुंबईत शाहू महाराजांनी ऐकलं आणि तिथंच त्यांनी माझ्या दरबारात या आणि दरबारी गायक म्हणून गा अशा प्रकारची ऑफर त्यांना दिली. नुसती ऑफर देऊन थांबले नाहीत, तर त्यांना आणलं, ही हिंदुस्थानच्या संगीत क्षेत्रातली अतिशय महत्त्वाची घटना मानली जाते. कारण अलादियां खांबरोबर त्यांचे बंधू हैदर खाँ आले. त्यांची मुलं तीन. तेही प्रसिद्ध गायक झाले पुढं. मंजी खाँ साहेब, रूजी खाँ साहेब आणि नसरूद्दीन खाँ साहेब.



बालगंधर्व








केशवराव भोसले

त्याच्यापुढं परंपरा आहे.

अल्लादिया खाँ साहेब हे जयपूर घराण्याचे गायक. महाराष्ट्राला जयपूर घराण्याची ओळख अल्लादिया खाँ साहेबांमुळं झाली. आणि कोल्हापूर हे संगीताचं विद्यापीठ. जसं मल्लविद्येची पंढरी, तसं संगीताचं विद्यापीठ म्हणून ललित कलांच्या नकाशावर अल्लादिया खाँ साहेब आले कोल्हापुरला. कोल्हापूर हे कलापूर आहे. कलापूर या नावानं संबोधलं गेलं. त्याला जे महान कलावंत कारणीभूत ठरलेले आहेत, त्यापैकी एक म्हणजे अल्लादिया खाँ साहेब. खाँ साहेबांची उंची हिमालयातल्या गौरीशिखराप्रमाणे. संगीत तज्ज्ञ बाबूराव जोशी यांनी त्यांच्याबद्दल मोठ्या आदरानं, कौतुकानं लिहिलेलं आहे. काय लिहिलंय पहा. अल्लादिया खाँ साहेब यांनी अभिजात संगीताची एक वैशिष्ट्यपूर्ण, सौंदर्यशाली, बुद्धीला व मनाला आनंद देणारी गतीमान अशी आगळीच परंपरा निर्माण केली.



अल्लदिया खाँ साहेब

अलादियां खां साहेबांच्या रूपाने कोल्हापुरला शोभा देणारे एक नवे लेणेच मिळाले. संगीतामधलं शिल्प असा प्रचंड बुद्धीचा आणि प्रतिभेचा गवय्या कोल्हापुरला लाभला हे त्या कोल्हापुरचे भाग्य. कोल्हापुरला ज्यांनी मोठे केले. किंबहुना अगदी स्पष्टच बोलायचे झाले, कोल्हापुरचे नाव ज्यांनी हिंदुस्थानभर केले, त्याला एकमेव कारण म्हणजे अल्लादिया खाँ साहेब. असा अप्रतिहत प्रकांड बुद्धीचा कलावंत पुन्हा होणे नाही. यापेक्षा काय त्यांची स्तुती करावी. काय महिमा गावा.

तेव्हा हे जयपूर घराण्याचे प्रणेते महाराष्ट्रामधले. शिष्य कोण आहेत पहा त्यांचे. यांच्या शिष्यांनी पुन्हा आपली परंपरा निर्माण केली. म्हणजे, एक राजा काय करू शकतो, त्याचे वारसे कसे निर्माण होतात आणि ते आजही आहेत. शिष्य पहा कोण. पंडित भास्करबुवा बखले. बखले कोण आहेत, हे अल्लादिया खाँ साहेबांचे ज्येष्ठ शिष्य आहेत. आणि यांचे शिष्य कोण. मास्टर कृष्णराव, महफिली गाजवणारे. आणखी कोण, तर बालगंधर्व. म्हणजे अल्लादिया खाँ, त्यानंतर तुम्हाला दिसेल भास्करबुवा बखले आणि कृष्णराव आणि बालगंधर्व. केसरबाई केरकर. संगीताच्या क्षेत्रामध्ये मानदंड ज्यांनी निर्माण केले, त्या केसरबाई केरकर या अलादियां खां साहेबांच्या शिष्या. त्या कलकत्त्याला जेव्हा गेल्या, त्यावेळेला शांतीनिकेनतमध्ये त्यांचं गायन झालं. ते गायन इतकं अप्रतिम होतं, की गुरूवर्य रवींद्रनाथ टगोर यांनी त्यांना सूरश्री नावाचा



अब्दुल करीम खाँ साहेब १९३८ साली कोल्हापूर संस्थानात आपले गाणे सादर करताना, सोबत त्यांचे साथीदार कलाकार.

किताब दिला. केरकर यांना आश्रय कुणाचा, तर शाहू महाराजांचा. मोगूबाई कुर्डीकर, दुसरी महान गायिका. त्यांची कन्या कोण, जी तुम्हा आम्हाला माहित आहे, किशोरी अमोणकर. तिची जर पाळंमुळं बघायची झाली तर शाहू महाराजांपर्यंत जातात. जसदनवाला, जरीवाला, निवृत्तीबुवा सरणे, याशिवाय हैदर बक्ष खां, त्यांचं किराणा घराणं आहे. त्यांना आश्रय दिलांय शाहू महाराजांनी. किराणा घराण्याचे अर्ध्वयू, त्यांचे शिष्य कोण, मिरजेला स्थायिक झालेले अब्दुल करीम खाँ. अल्लादिया खाँ यांच्यासारखं उत्तुंग व्यक्तिमत्व. अल्लादिया खाँ साहेब आणि अब्दुल करीम खाँ साहेब, कोणाची उंची मोजावी कुणी.




सरस्वतीबाई राणे

सुरेशबाबू माने





हिराबाई बडोदेकर



गोविंदराव टेंभे



मोगूबाई कुर्डीकर

अल्लादिया खाँ साहेबांच्या बरोबरीनं किंबहुना अल्लादिया खाँ साहेबांच्या प्रभावाखाली काहीजण आले. पण, स्वतंत्र गायिकी त्यांनी आपली किराणा घराण्याची जपली. अब्दुल करीब खाँ साहेबांनी ताराबाई माने नावाच्या गायिकेबरोबर लग्न केलं आणि त्यांना जी मुलं झाली, ती सगळी गायक आणि गायिका आहेत. सरस्वतीबाई राणे, सुरेशबाबू माने, हिराबाई बडोदेकर, कृष्णराव माने आणि कमलाबाई बडोदेकर. या सगळ्यामध्ये हिराबाई बडोदेकरांचं नाव चिरपरिचित आहे. सगळ्यांना माहित आहे. हिराबाई बडोदेकर कोण, तर अब्दुल करीब खाँ साहेबांच्या कन्या आणि अब्दुल करीम खाँ साहेबांना राजर्षी शाहू महाराजांचा आश्रय. म्हणजे तुम्हाला असं दिसेल, की पिढ्यान्पिढ्या हे संगीत जे आहे, ते झिरपत झिरपत पुढं आलेलं आहे.

मघाशी मी तुम्हाला सांगितलं, की संगीत दोन प्रकारचं. शास्त्रीय संगीत आणि नाट्य संगीत. शास्त्रीय संगीत हे खास जाणकरासाठी. ज्यांना शास्त्रीय संगीताची आवड आहे आणि जाण आहे त्यांच्यासाठी. पण, नाट्य संगीत असं आहे, की सामान्य माणसाला ते शास्त्रीय संगीताचं सौंदर्य जे आहे, मघाशी मी सांगितलं, की मनाला आनंद देणारं. शास्त्रीय संगीत मन आणि बुद्धी या दोन्हीला आनंद देणारं. तर नाट्य संगीतामध्ये, हेसुद्धा निरनिराळ्या नाटक मंडळं त्याच्यापूर्वी स्थापन झालेल्या होत्या, पण, शाहू महाराजांनी या नाटक मंडळींना, अनेक नाटक कंपन्यांना राजाश्रय दिला. राज्यारोहण प्रसंगी किर्लोस्कर नाटक मंडळी आणि शाहूनगरवासी राज्यारोहणाच्यावेळी आलेली होती. त्यांची नाटकं झाल्याची नोंद आहे. शाहूनगरवासी या कंपनीमधले गणपतराव जोशींचं हॅम्लेट हे पात्र त्यांना इतकं आवडलं, की त्याचे अनेक प्रयोग त्यांनी नव्या राजवाड्यावर केले. दत्तोपंत हल्याळकर हे दुसरे गुणी गायक शाहू महाराजांच्या आश्रयाखाली या सगळ्या लोकांनी नाटक कंपन्या काढलेल्या आहेत. दत्तोपंत हल्याळकरांनी महालक्ष्मी प्रासादिक कंपनी नावाची नाटक कंपनी काढली.

शाहू महाराजांच्या राजाश्रयाखाली लहान कलावंत महान बनले आणि शाहू महाराजांनी अनेक महान कलावंत मराठी रंगभूमीला दिलेले आहेत. त्याच्यापैकी एक पहिलं नाव आहे, ते म्हणजे गोविंदराव टेंभे. काय अष्टपैलू माणूस आहे हो हा. हा कवी आहे, नाटककार आहे, गायक आहे, नेपथ्यकार आहे. सर्वात म्हणजे हार्मोनियम वादक आहे. गोविंदराव टेंभेंसारखं हार्मोनियम कुणीही वाजवू शकलेलं नाही. गोविंदराव म्हणजे हार्मोनियम आणि हार्मोनियम म्हणजे गोविंदराव असं समीकरण त्या काळामध्ये होतं. गोविंदरावांचं काम इथंच थांबत नाही. गोविंदराव टेंभेंनी अनेक नटांना घडवलं. त्यांच्यामध्ये एक मादकता, सौंदर्य, एक लय ही गोविंदरावांनी आणली. त्याचे धडे दिले. बालगंधर्वांना त्यांनी घडवलं. हिराबाई बडोदेकर, त्यांना घडवलं. महाराष्ट्र कोकीळ शंकरराव सरनाईक हे भजन गायकीमध्ये पुढे गेले. अतिशय गोड गळ्याचा हा नट आणि गायक. यांना घडविण्यामध्ये हे गोविंदराव टेंभे आहेत. या गोविंदरावांनी शाहू महाराजांच्याच राजाश्रयाखाली १९१५-१६मध्ये शिवराज संगीत मंडळी स्थापन केली. बालगंधर्वांनीही शाहू महाराजांचा राजाश्रय घेऊन आपली गंधर्वनायक गायिकी असणारी नाटक मंडळी स्थापन केलेली होती. शंकरराव

सरनाईक हा गोड गळ्याचा तरूण. शाहू महाराजांच्या कानावर त्यांचा आवाड पडल्यानंतर शाहू महाराज गोविंदरावांना म्हणाले, की गोविंदराव या मुलाला तुमच्या नाटक मंडळीमध्ये घेऊन जा.

सर्व महाराष्ट्राला गोविंदरावांची गायिकी, बालगंधर्वांची गायिकी, एवढंच नव्हे, तर संगीत तज्ज्ञांचं असं मत आहे, की सर्व महाराष्ट्राला अल्लादिया खाँ ही काय चीज आहे हे गोविंदराव टेंभेंनी सांगितलं. असा हा अष्टपैलू कलावंत आहे. महाराष्ट्राला नाट्य संगीताचं वेड लावणारा. आणि मग ज्याचं वर्णन आपण करतो, की अवतारी कलावंत, तो म्हणजे बालगंधर्व. ही महान देणगी खरं म्हणजे शंभर टक्के शाहू महाराजांची आहे. जुन्या राजवाड्याजवळ छत्रपतींच्या गुरूंचं एक घराणं आहे, त्याला गुरू महाराज म्हणतात. तिथं शाहू महाराजांचं जाणं-येणं होतं. गुरू महाराजांशी त्यांचे मैत्रीचे संबंध होते. एक दिवस शाहू महाराज तिथं गेले असताना, गुरू महाराज म्हणाले, की महाराज या पोराचा गळा जरा बघा. फार गोड गातो. बालगंधर्वांच्या आई त्या ठिकाणी गुरू महाराजांच्या आश्रयाखाली होत्या. शाहू महाराजांनी या नारायण राजहंस, मूळ नाव त्यांचं असं आहे, या नारायणचा गळा ऐकला. प्रभावित झाले. ते म्हणाले, फारच गोड आहे. पण म्हणाले, काय रे पोरा, तुला ऐकू येत नाही का. तर नारायण म्हणाला, की होय, मला जरा कमी ऐकू येतं. मग मिरजेला पाठवलं त्याला. महाराजांनी तातडीने संदेश दिला, की एक पोरगं पाठवोय, नारायण राजहंस नावाचं, त्याच्या कानावर लगेच उपचार करा आणि नारायणाला सांगितलं, की हे बघ किर्लोस्कर कंपनीचा मुक्काम सध्या मिरजेत आहे. तु दवाखान्यात उपचार घ्यायचा आणि राहायचं किर्लोस्कर कंपनीत. किर्लोस्कर कंपनीच्या संचालकांना महाराजांनी कळवलं, की हा एक मोठा गोड गळ्याचा माधुर्य असणारा मुलगा मी तुमच्याकडं पाठवतोय. त्याला तुमच्या नाटक कंपनीमध्ये घ्या. नारायणचा गळा इतका मोहक होता, आणि नारायण स्वत: इतके रूपवान होते, की त्यांना गेल्यानंतर काही दिवसांनीच शाकुंतल नाटकामध्ये शकुंतलेची भूमिका मिळाली. योगायोग असा, की नारायणाच्या पहिल्या प्रयोगाला शाहू महाराज हजर होते आणि शाहू महाराजांचा आशीर्वाद घेऊनच नारायण स्टेजवर गेला. शाहू महाराजांनी शाबासकी दिली. त्याचं कौतुक केलं. आणि पुढं मग बालगंधर्व यांनी मागं वळून पाहिलं नाही.

पुण्यामध्ये जेव्हा हा प्रयोग झाला, त्याची गायिकी, त्याचं रूपवान शरीर आणि ठेवण, त्याचा अभिनय नारायणचा पाहून लोकमान्य टिळकांनी या नारायणचं नाव बदललं. बालगंधर्व ही पदवी दिली. तेव्हापासून बालगंधर्व या नावानं मराठी रंगभूमीवर ते प्रसिद्ध झाले. म्हणजे दोन महान पुरूषांचा आशीर्वाद बालगंधर्वांना मिळाला. मघाशी मी तुम्हाला सांगितलं, की गोविंदराव टेंभेंसारख्या अनेक मंडळींनी त्यांना मदत केलेली आहे, त्यांचं चरित्र घडवण्यामध्ये. एक असामान्य बुद्धीमत्तेचा गायक म्हणून महाराष्ट्रातल्या तमाम



बालगंधर्व आणि शाहू महाराज

रसिकांना कित्येक दशकं बालगंधर्वांनी मंत्रमुग्ध करून सोडलं. स्वत:ची गंधर्व संगीत मंडळी नावाचा नाट्य संघ त्यांनी स्थापन केला. हासुद्धा राजर्षी शाहू महाराजांच्या आश्रयाखाली.

शाहू महाराजांच्या राजाश्रयाखाली, मघाशी मी सांगितलं, की अनेक महान कलावंत निर्माण झाले, त्यातले दुसरे कलावंत म्हणजे केशवराव भोसले. या गायकाचं चरित्र हे विस्मयजनक आहे. दत्तोपंत भोसले हे त्यांचे वडील बंधू. ते एका नाटक कंपनीमध्ये होते. वयाच्या आठव्या वर्षी हा केशवराव त्यांचं बोट धरून स्टेजवर गेला आणि वयाच्या १८व्या वर्षी त्यांनी स्वत:ची नाटक कंपनी काढली. केशवरावांचं गायन म्हणजे,

चैतन्य, प्रतिभा आणि तडप यांचा संगम असायचा. आणि म्हणून त्यांच्या गाण्यावर लुब्ध होऊन महाराष्ट्रातल्या रसिकांनी त्यांना संगीतसूर्य अशी बिरूदावली दिली. सूर्यासारखा प्रखर. शाहू महाराजांचं खास प्रेम, खास मायेचा हा गायक आहे. पण शाहू महाराजांचं आणि त्यांचं फारसं पटलं नाही. म्हणजे कोल्हापूरच्या या परंपरेमध्ये निर्माण झालेला, शाहूंचं प्रेम असणारा असा हा महान गायक तो कोल्हापूरच्या बाहेर फिरत राहिला. शाहू महाराजांनी त्यांना १९१६ साली आणलं आणि म्हणाले, फिरतोयंस कुठं. कोल्हापुरातल्या लोकांचा



संगीतसूर्य केशवराव भोसले

पहिला हक्क आहे तुझ्यावर. महाराजांच्यासमोर काय बोलणार. म्हणाले, ठीक आहे.

कोल्हापुरामध्ये खासबाग मैदान तयार झालेलं होतं. या खासबाग मैदानाचं वैशिष्ट्य असं आहे, हे थिएटरपण आहे. आपण जर गेलात आणि पाहिलंत, ओपनियर थिएटरची नाटकं त्याठिकाणी होत असत. तर शाहू महाराजांनी मृच्छकटिक हे केशवरावांचं नाटक ठेवलं आणि त्याचं आवतण संस्थानातल्या सर्व लोकांना दिलं. २५ ते ३० हजार जणांचा समुदाय त्याठिकाणी उपस्थित होता. त्यावेळी लाऊडस्पीकर नव्हते. खड्या आवाजामध्ये त्यांनी २५ ते ३० हजार लोकांना मंत्रमुग्ध करून सोडलं. शाहू महाराजांनी मोठं कौतुक केलं. मुक्त हस्ते त्यांना बक्षिसं दिली. पण हा गायक मोठा अवलिया होता. प्रचंड संपत्ती मिळवली. पण सगळी संपत्ती वाटून टाकली. १९२१ साली या क्षेत्रातल्या काही रसिकांनी या दोन महान गायकांना एकत्र आणलं. बांलगंधर्व आणि केशवराव. आणि मुंबईला संयुक्त मानापमान हे नाटक ठेवलं. अप्रतिम असा हा शो झाला. सर्व महाराष्ट्रतून त्या काळामध्ये शंभर-शंभर रूपयांना तिकिट विकलं गेलं. पाचशे रूपयांपर्यंत ही तिकिट विक्री झाली. अशा रसिकांच्या समोर हा जो खेळ झाला, संयुक्त मानापमान. बालगंधर्व म्हणजे चंद्र आणि केशवराव म्हणजे सूर्य.

पु. ल. देशपांडेंनी या संयुक्त मानापमान या प्रयोगाविषयी आपलं मत व्यक्त केलेलं आहे. ते म्हणातात, की क्रिकेटियर सी. के. नायडू यांनी लागोपाठ मारलेल्या अकरा सिक्सर ही जशी क्रिकेटच्या क्षेत्रातली अभूतपूर्व घटना आहे, तशीच केशव-नारायण यांचा संयुक्त प्रयोग ही एक रंगभूमीवरची अभूतपूर्व घटना आहे. केशवराव धैर्यधर आहेत आणि नारायणराव हे बामिणी आहेत. केशवराव आणि नारायणराव यांच्या गायनात डावं-उजवं काय शोधायचं. पण, या संयुक्त मानापनाच्या प्रयोगात मात्र रसिकांनी केशवायनम: असं म्हटलं असं इतिहास सांगतो. या संयुक्त मानापमानाच्या प्रयोगाविषयी अनेक ठिकाणी लिहिलं गेलेलं आहे. आठ-आठ, दहा-दहा वन्समोअर पडले आणि बालगंधर्वांना एखाद-दुसरा वन्समोअर पडला. खरं म्हणजे ते मोठ्या ह्रदयाचे होते. पण त्या दिवशी बाजी मारली, ती केशवरावांनी. आणि म्हणून पुलंनी म्हटलंय, केशवायनम: या केशवरावांबद्दल शाहू महाराजांना केवढा मोठा अभिमान होता. माझा केशा असं म्हणत असत. भा. वि. वरेरकर, केशवरावांनीच त्यांना नाटककार बनवलं. ते एकदा भेटायला आले शाहू महाराजांना. तेव्हा शाहू महाराज म्हणाले, वरेरकर, माझा केशा म्हणजे तळपती तलवार आहे. ती ज्याच्या हातात पडेल, तो जग जिंकेल. अचूक रसिकत्व आहे. तसं बालगंधर्वांचं गाणं म्हणजे शीतल चांदणं. केशवरावांचं गाणं म्हणजे सूर्याप्रमाणं तेजस्वी, प्रखर. असे दोन महान नट हेसुद्धा आमच्या शाहू महाराजांनी रंगभूमीला दिलेली देणगी आहे.

रंगभूमीसाठी महाराजांनी काय करायचं राखलं. काही राखलं नाही. रोमसारखं थिएटर आपल्याकडं असलं पाहिजे. म्हणून नाटकासाठी शाहू महाराजांनी थिएटर बांधलं. त्या काळामध्ये संपूर्ण भारतात अशा प्रकारचं थिएटर नव्हतं. पॅलेस थिएटर झालं. १९१५ साली त्याचं उद्घाटन झालं केशवराव भोसलेंच्या सौभद्र नाटकानं. स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्र सरकारनं पॅलेस थिएटरचं नाव बदललं आणि संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृह असं नवीन नाव दिलं. नाट्य संगीत हा फार

मोठ्या ग्रंथाचा विषय आहे. त्यात फारसं न पडता पुढं जाऊया.

चित्रपट, चित्रकला, शिल्पकला यासुद्धा ललित कला आहेत. चित्रपट ही कला नुकतीच उगम पावलेली आहे. नाशिकला गोदावरीच्या काठी दादासाहेब फाळकेंनी राजा हरिश्चंद्र हा पहिला चित्रपट निर्माण केला. तो मूक चित्रपट होता. ही गोष्ट आहे, १९१३ची. दोन दिग्गज बाबूराव पेंटर आणि आनंदराव पेंटर, दोघे बंधू. हे चित्रकार आहेत. शिल्पकार आहेत. नेपथ्यकार आहेत. याहीपेक्षा ते तंत्रज्ञ आहेत. बाबूरावांच्यासारखा अष्टपैलू असा कलावंत झाला नाही. बाबूरावांच्या कानावर जेव्हा ही गोष्ट गेली, की दादासाहेब फाळकेंनी यूरोपमधून एक कॅमेरा आणलेला आहे आणि या कॅमेऱ्यावर त्यांनी राजा हरिश्चंद्र नावाची फिल्म तयार केलेली आहे. तेव्हा हे दोन बंधू दादासाहेबांच्याकडे गेले आणि म्हणाले, की तुम्ही जो कॅमेरा आणलाय, तो आम्हाला जरा बघायचा आहे. आम्हाला आवड आहे आणि आम्हीही काहीतरी करू इच्छितो. दादासाहेब म्हणाले, की तुमच्यासारख्यांचं काम नाहीये. हे तंत्रज्ञान फार पुढचं आहे. दादासाहेब फाळकेंनी, चित्रपटसृष्टीचे जनक ज्यांना आपण मानतो, त्यांनी बाबूरावांना आणि आनंदरावांना कॅमेरासुद्धा दाखवला नाही. हे चॅलेंज बाबूरावांनी घेतलं आणि दोन बंधूंनी अहोरात्र खपून स्वत:चा कॅमेरा निर्माण केला. आज त्याचं प्रतिक बाबूरावांच्या घरासमोर नांदतंय. बाबूरावांनी तयार केलेल्या कॅमेऱ्याची प्रतिमा त्याठिकाणी स्थापन केलेली आहे. बाबूरावांनी मूव्ही कॅमेरा निर्माण केल्यानंतर आपली नवीन फिल्म कंपनी स्थापन केली. महाराष्ट्र फिल्म कंपनी आणि या कंपनीचा पहिला चित्रपट होता, सैरंध्री. कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर, हे जे थोर नाटककार होऊन गेले, त्यांचं नाटक किचकवध, तर या किचकवधामध्ये किचकाचा वध भीम कसा करतो हे दाखवलं गेलेलं आहे आणि याचं चित्रण इतकं जीवंत झालेलं आहे त्या काळामध्ये की लोकांना वाटायचं खरोखर किचकाला मारलं गेलं.

तर सैरंध्री हा दुसरा चित्रपट आपण म्हणूया. दादासाहेब फाळकेंनी गोदावरीच्या काठी चित्रपटसृष्टीचं रोपण केलं. पण चित्रपटसृष्टी खरी बहरली, ही पंचगंगेच्या काठी आणि त्याला कारण हे आमचे बाबूराव पेंटर. आमचे ज्येष्ठ मित्र चंद्रकांत मांढरे आणि सूर्यकांत मांढरे हे बाबूरावांच्या तालमीमध्ये तयार झाले. चंद्रकांत हे पोस्टर रंगवायला होते. सूर्यकांत त्यांच्या हाताखाली होते. त्यांच्यामधला अभिनेता बाबूरावांनी खरा हेरला. आणखी एक सांगायला पाहिजे ती म्हणजे त्या काळी अगदी राजा हरिश्चंद्राच्या वेळेलासुद्धा हरिश्चंद्राची राणी हे पुरूष पात्र होतं. बाबूराव म्हणाले, नाही, माझ्या चित्रपटातलं स्त्री भूमिका करणारं पात्र हे स्त्रीच असलं पाहिजे आणि म्हणून अनूसयाबाई आणि गुलाबबाई या दोन स्त्रिया बाबूरावांनी आपल्या सैरंध्रीमध्ये घेतल्या. त्या काळामध्ये स्त्रियांनी स्त्रियांची भूमिका करणं हे क्रांतिकारी पाऊल होतं. या देशातली पहिली हिरोईन या अनूसयाबाई आणि गुलाबबाई या आहेत, असं म्हटलं तर काय चुकीचं ठरेल. त्या कोण होत्या हे आज काही माहिती नाही.




**पहिला मूक चित्रपट राजा हरिश्चंद्र**



**दादासाहेब फाळके**

ज्यावेळेला पुण्यामध्ये हा चित्रपट प्रदर्शित झाला, त्यावेळेला केसरीनं अभिप्राय दिलेला आहे. केसरी काय म्हणतो पहा. कंपनीचे चालक बाबूराव पेंटर यांनी चित्रपट तयार करण्याच्याबाबतीत लागणारा कॅमेरा व प्रिंटिंग मशीन वगैरे सर्व देशी यंत्रसामुग्री वापरून केलेल्या या चित्रपटात फोटोग्राफी वगैरेच्यादृष्टीने कोणतीही उणीव राहिलेली नसून, प्रसिद्ध अमेरिकन व यूरोपियन चित्रपटांच्या तोडीचा हा चित्रपट झालेला आहे. आता यापेक्षा काय कौतुक. कुठे गेले होते हे बाबूराव आणि आनंदराव शिकायला. कुठेही गेले नव्हते. कोणीही गुरू नाहीत. कुठल्याही स्कूलमध्ये गेलेले नाहीत. आणि तरीसुद्धा अभिजात कला. जिनियस होते.



भालजी पेंढारकर



बाबुराव पेंटर





आबालाल रेहमान आणि त्यांनी काढलेले चित्र


जिनियस असा कुणाकडून काही शिकत नाही. अंत:स्फूर्तीनं जो कला, आपल्या प्रतिभेनं जो कला निर्माण करतो तो जिनियस. पुढं लोकमान्य टिळकांनी हा सैरंध्री चित्रपट पाहिला. ते इतके खूश झाले, की बाबूरावांनी त्यांनी बोलावून सांगितलं, की बाबूराव ही मोठी किमया आहे बुवा तुमची. मी आजपासून तुम्हाला सिनेमाकेसरी ही पदवी देतो. नुसती पदवी दिली नाही. सुवर्णपदकही त्यांनी दिलं. बाबूरावांचं कौतुक पुण्यामध्ये झालं. मुंबईमध्ये झालं.

चित्रकलेच्या संबंधामध्ये, बाबूराव केवळ तंत्रज्ञ नव्हते. चित्रपटाचे निर्माते नव्हते. आणखी बऱ्याच गोष्टी त्यांच्याकडे होत्या. पण, महाराष्ट्र फिल्म कंपनीमध्ये एकूण २४ चित्रपट त्यांनी निर्माण केले आणि बाहेरच्या कंपनीने तिथे येऊन ९ चित्रपट निर्माण केले. या ३३ चित्रपटांचं दिग्दर्शन बाबूरावांनी केलं. या सर्वाच्या पाठीमागं शाहू महाराज आहेत. शाहू महाराजांनी यांना जागा दिली. आर्थिक पाठबळ दिलं. त्यांच्या या सुरूवातीच्या प्रयोगांना शाहू महाराज हजर राहिले. थिएटरमध्ये बऱ्याच वेळेला ते गेलेले आहेत. थिएटरची जागासुद्धा शाहू महाराजांनी दिलेली आहे. त्या काळामध्ये ही कला नवीन होती. आजच्यासारखी प्रगत नव्हती. हे मूक चित्रपट होते. बोलपट नंतर निर्माण झाले. बाबूरावांची चित्रपट कंपनी एखाद्या ऋषीच्या आश्रमासारखी होती. अनेक मोठे कलावंत, जे पुढे फार गाजले ते बाबूरावांचे शिष्य आहेत. झुंझारराव पवार, भालजी पेंढारकर, किशाबापू बकरे, स्टंट

किंग गणपतराव बकरे, व्ही. शांताराम, मास्टर विठ्ठल, बाळ गजबर इत्यादी इत्यादी.


व्ही. शांताराम आणि भालजी पेंढारकर ही दोन मोठी माणसं, ज्यांनी पुढं मराठी चित्रपटांचा इतिहास निर्माण केला. किती लोकांना माहित आहे, की आलमआरा नावाचा जो चित्रपट मुंबईमध्ये निर्माण झाला, तो पहिला बोलपट आहे. या बोलपटामध्ये नायकाचं काम करणारा कोल्हापूरचा मास्टर विठ्ठल आहे. भारतीय फिल्म इंडस्ट्रीच्या इतिहासामध्ये पहिला हिरो कोण, मास्टर विठ्ठल. बाबूराव पेंटर यांचा शिष्य. बाबूराव पेंटर कोण, तर शाहू महाराजांच्या आश्रयाखालील कलावंत. आपल्याला असं दिसेल, की ही जी परंपरा सुरू झाली आणि ती आजसुद्धा चालू आहे, त्याच्या पाठीमागं प्रेरणास्थान शाहू महाराज आहेत.

आता चित्रकला हे एक क्षेत्र आहे. चित्रकलेमध्येसुद्धा



महान कलावंत कोल्हापुरने दिलेले आहेत. त्यातला आबालाल रहिमान याचं नाव प्रथम घेतलं पाहिजे, आवर्जुन घेतलं पाहिजे एवढा तो महान कलावंत होता. आबालाल मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये प्रशिक्षण घेतलेले. विद्यार्थीदशेमध्ये असताना त्यांच्या चित्राला व्हाईसराय मेडल मिळालं. हा कलावंत जेव्हा कोल्हापुरला आला, तेव्हा स्वत: शाहू महाराजांनी त्याचं स्वागत करून, त्यांच्या घरी जाऊन त्यांना दरबारी चित्रकार हा सन्मान दिला. तनखा सुरू केला. कारण, अवलियाच होता माणूस. शेकडो चित्रं काढली त्यांनी. फार थोडी अस्तित्वात आहेत आज. असं म्हणतात, की काही शेकडो चित्रं त्यांनी पंचगंगेला अर्पण केली. बाबूराव सडवेलकर हे कला समीक्षक म्हणून मान्यता पावलेले आहेत. त्यांनी या आबालाल यांच्या कलागुणांचं कौतुक करत असताना लिओनार्दी दा व्हिन्सी आणि राफे या जगप्रसिद्ध चित्रकारांशी त्यांची तुलना केली आणि त्यांना राजाश्रय शाहू महाराजांनी दिलेला होता.

एवढेच नव्हे, तर बाबूराव पेंटर आणि आनंदराव पेंटर हे केवळ तंत्रज्ञ नव्हते, केवळ चित्रपट कलावंत नव्हते. तर पेंटर या नावाला शोभेल असे चित्रकलेचे ते आद्यप्रवर्तक होते. कोल्हापूर स्कूल हे या दोन बंधूंनी निर्माण केलं. आनंदराव हे तितकेच बुद्धीमान होते. दोघेही अल्पायुषी झाले. नाहीतर या बंधूंनी आणखी कायतरी करून दाखवलं असतं. असं म्हणतात,



की केशवराव भोसले आणि आनंदराव पेंटर गप्पागोष्टी करत होते. तेवढ्यात केशवरावांना काय वाटलं कुणास ठाऊक, ते म्हणाले, की आनंदराव नाटकाला टाळ्या पडतात, त्या माझ्या गाण्याला पडतात. त्यावर आनंदराव म्हणाले, की मी असे पडदे रंगवीन, की तो पडदा बघितल्या बघितल्या त्याला टाळ्या प्रेक्षक देतील. आणि खरोखर असं झालं. मखमली पडदा ही रंगभूमीला देणगी केशवराव भोसलेंनी दिली. तर मखमली पडदा बाजूला झाल्याबरोबर जो भव्य राजवाडा दिसल्याबरोबर रसिकांनी टाळ्या वाजवल्या आणि त्याला दाद केशवरावांनी

दिली, की आनंदराव तुमच्याही कलेला टाळ्या पडतात. असे मोठे अद्‌भूत कलावंत कोल्हापुरमध्ये निर्माण झाले.

चित्रकला हा कलेमध्ये दोन मोठे कलावंत महाराष्ट्राने दिले. ते म्हणजे रावबहादूर माधवराव धुरंधर आणि माधवराव परांडेकर. ते मोठे झाले मुंबईत. पण, जडणघडण कोल्हापुरामध्ये झाली. कोल्हापूर स्कूलमध्ये ते वाढले. मसोजी नावाचे आणखी एक चित्रकार आहेत. हे मसोजी कोल्हापूरचे, रवींद्रनाथांच्या शांतीनिकेतनमध्ये गेले, आणि आंतरराष्ट्रीय चित्रकार म्हणून प्रसिद्ध झाले. या परंपरा आहेत. ललित कला म्हणजे केवळ संगीत नाही आणि संगीतामध्ये केवळ शास्त्रीय संगीत नाही. त्यात नाट्य संगीतही आलं, चित्रपट आला, चित्रकला आली आणि त्या अनुषंगानं असणाऱ्या इतर कला आल्या. या कलांचं सुवर्णयुग असं ज्याला आपण म्हणतो, हे शाहू महाराजांच्या काळामध्ये अवतीर्ण झालं.

शेवटी, ज्यांना शाहू महाराजांचा प्रत्यक्ष सहवास घडला, आणि ज्यांचं चित्रकलेचं शिक्षण केवळ शाहू महाराजांच्यामुळं झालं, ते तीन कलावंत म्हणजे, बाबा गजबर, दत्तोबा दळवी आणि माधवराव बागल. माधवराव बागल हे चित्रकार होते हे आजच्या पिढीला फारसे माहित नाही. ते राजकीय पुढारी होते एवढंच माहित आहे. राजकीय पुढारी झाले नसते तर फार मोठा कलावंत म्हणून त्यांचं नाव कलेच्या इतिहासामध्ये नोंदवलं गेलं असतं. दत्तोबा दळवींना शाहू महाराजांनी जे. जे.मध्ये पाठवलं. जेजेचे गोल्ड मेडॅलिस्ट आहेत ते. पण मुंबईत राहिले नाहीत. ते कोल्हापूरला आले. त्या काळामध्ये आर्ट स्कूल, आर्ट इन्स्टिट्यूट मुंबई इलाख्यात फक्त जे. जे. होते. तशा प्रकारची आर्ट इन्स्टिट्यूट कोल्हापुरामध्ये काढावी असं दत्तोबांनी मनावर घेतलं आणि तशी इन्स्टिट्यूट, आज जी दळवीज् आर्ट इन्स्टिट्यूट या नावानं प्रसिद्ध आहे. ती त्यांनी स्थापन केली. हा मोठा कलावंत होता. त्याचं वास्तव्य शेवटी शेवटी हे राजवाड्यातच असायचं आणि शाहू महाराज पुत्रवत त्यांच्यावर प्रेम करत होते. असं म्हणतात, की शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जी पहिली भेट झाली त्याच्यामध्ये दत्तोबा दळवी यांची प्रमुख भूमिका होती.





महाराजांच्या कारकिर्दीमध्ये मल्लविद्या, संगीत, नाट्य, चित्रकला, चित्रपट अशा विविध विद्या आणि कला यांचा विकास झाला. इतका विकास झाला, की यांचं सुवर्णयुग निर्माण झालं. कोल्हापूरला कलापूर हे नाव मिळालं. अनेक क्षेत्रामधले कलावंत कोल्हापुरनं हिंदुस्थानला दिले आणि कलेच्या नकाशावर कोल्हापूर अग्रस्थानी आलं. अनेक कलांचे माहेरघर, याला शाहू राजासारखा रसिक, मर्मज्ञ आणि जाणता राजा मिळाला. राजा कालस्य कारणम् असं एक सुभाषित आहे. सुवर्णकाळ, सुबत्तेचा काळ हा राजामुळं निर्माण होतो. म्हणजे राज्यकर्ता कसा असेल याच्यावर ते युग त्याचं अवलंबून असतं. राजे भरपूर झाले. शिवछत्रपतीसारखा राजा एकमेव राजा आहे. अलिकडच्या काळामध्ये राजर्षी शाहू छत्रपतीसारखा राजा हा एकमेव राजा आहे. तेव्हा असा जेव्हा राजा आणि त्याचं कर्तृत्व जेव्हा पाहिलं जातं, त्यावेळेला एकच उद्‌गार बाहेर पडतो तो म्हणजे राजा कालस्य कारणम्!

■■

घंटाकर्ण




# रशिया-युक्रेन युध्द...... ......पडसाद बेंगलुरुत?

रशिया व युक्रेनमध्ये घनघोर युध्द सुरु आहे. त्याच्या बातम्या सर्वजण पहात - वाचत आहेतच!

या युध्दात भारताने तटस्थ भूमिका घेतलेली असली तरी रशियाच्या बाजुने भारत उभा असल्याचे चित्र आहे आणि ती वस्तुस्थितीही आहे. पण असे असतानाही भारतातील 'इन्फोसिस' या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात जगात अग्रगण्य मानल्या जाणाऱ्या कंपनीने रशियातील आपल्या कंपनीची शाखा बंद करण्याचा निर्णय अचानकपणे जाहीर केला.

इन्फोसिस कंपनी भारतीय आहे आणि तिच्या जगात अनेकठिकाणी शाखा आहेत. भारताचे धोरण रशियाला अनुकूल असतानाही या कंपनीने तडकाफडकी रशियातील काम बंद करण्याचे कारण काय?

याचे उत्तर आहे 'घराणेशाही'!

आश्चर्य वाटले? थांबा नीट उलगडा करावा लागेल!

इन्फोसिसचे कर्तेकरविते आहेत नारायण मूर्ति! त्यांची मुलगी आहे अक्षता! या मुलीचे पति आहेत ऋषि सुनाक!



हे पति-पत्नी लंडनचे रहिवासी आहेत. ऋषि सुनाक ब्रिटनचे अर्थमंत्री आहेत आणि बहुधा वर्तमान पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांच्यानंतर त्यांचे नाव पंतप्रधानपदासाठी घेतले जात आहे.




सध्या अर्थमंत्री असलेल्या ऋषि सुनाक यांनी ब्रिटनच्या धोरणानुसार रशियावर सडकून टीका केली आहे. ब्रिटिश कंपन्यांनी रशियाचा बहिष्कार करावा आणि रशियातून बाहेर पडावे अशी टीका करण्यापर्यंत त्यांची मजल गेली. मूळ भारतीय असलेल्या ऋषि सुनाक यांना त्यांच्या या टीकेच्या परिणामांची बहुधा कल्पना आली नसावी. त्यांच्या या विधानानंतर ब्रिटिश वृत्तपत्रे आणि माध्यमांनी त्यांचे सासरे नारायण मूर्ति यांच्या इन्फोसिस कंपनीच्या रशियातील शाखेच्या बातम्या देऊन 'ऋषि यांनी प्रथम आपल्या सासऱ्यांना त्यांच्या इन्फोसिस कंपनीच्या रशियातील शाखेला टाळे लावण्यास सांगावे' असा उपरोधपूर्ण प्रचार सुरु केला.

ऋषि सुनाक यांना चूक कळून आली पण त्याला उशीर झाला होता. ते स्वतः, त्यांची पत्नी व नारायण मूर्ति यांची मुलगी अक्षता यांनी या दोन्ही गोष्टींचा परस्परसंबंध नसल्याचे



सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचा काहीच परिणाम झाला नाही.

अखेर बेंगलुरु येथील इन्फोसिस कंपनीच्या मुख्यालयातून अचानकपणे एक संक्षिप्त निवेदन प्रसिध्दीस देण्यात आले आणि त्यामध्ये कंपनीने रशियातील आपली सर्व कार्यालये आणि कामकाज बंद करण्याचा निर्णय केल्याचे जाहीर केले.

यासाठी कंपनीने कोणतेही कारण दिले नाही. रशियातील कर्मचारीवर्गास इतर ठिकाणच्या कार्यालायंमध्ये सामावून घेतले जाईल असे जाहीर




करण्यात आले.

वाह रे वाह! ब्रिटनमध्ये लोकशाही असल्याच्या भरपूर फुशारक्या मारल्या जातात. परंतु प्रत्यक्षात ब्रिटीश माणसाची खडूस प्रवृत्ती अद्याप संपलेली नाही हे या उदाहरणावरुन स्पष्ट व्हावे. त्याचबरोबर जे मोठे मोठे उद्योगपति समाजाला नैतिकतेचे मोठमोठे डोस नेहमी पाजत असतात त्यांनी अशा दबावाला बळी पडावे आणि राष्ट्रीय भूमिकेशी विसंगत भूमिका घ्यावी हेही आश्चर्यकारक आहे. राजकारण्यांना बोटचेपेपणा करण्याबद्दल नावे ठेवणे, राजकारणी मंडळींची घराणेशाही व स्वतःच्या नातेवाईकांना अनुकूल गोष्टी करण्याबद्दल नावे ठेवताना ही नीतीमान मंडळी कधीच दमत नाहीत. पण त्यांच्या कुटुंबावर अशी काही वेळ आली तर तेथे ते काहीही करु शकतात. तेव्हा त्यांना त्यांनीच समाजाला केलेल्या उपदेशाची आठवणही येत नाही हे आश्चर्यकारक आहे! पण काय करणार? खरोखर उद्या जावई ब्रिटनचा पंतप्रधान झाला तर? त्यात कोणती अडचण यायला नको ना! मग भारताची भूमिका काय आहे याची पर्वा करायची कशाला???? जावयाचे व पर्यायाने ब्रिटनचे हितसंबंध आधी सांभाळा!!!!!!!!!

मेरा भारत महान!!!!!

## प्रेमळ मामा.....ते........ कंस मामा?

भारतीय संस्कृतीमध्ये 'मामा'चे स्थान महत्वाचे मानले गेले आहे.

एकीकडे आईचा भाऊ म्हणून प्रेमळ मामाची महती अगदी गाण्यातून देखील 'मामाच्या गावाला जाऊ या' म्हणून गायली जाते.

दुसरीकडे महाभारतातील शकुनी मामाचे पात्र असे आहे की साक्षात दुष्टपणा व कारस्थानीपणा!

मध्य प्रदेशाचे मुख्यमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी त्यांच्या



मुख्यमंत्रीपदाच्या कारकिर्दीत एक संवेदनशील व सहृदय नेता म्हणून स्वतःची प्रतिमा निर्माण केली. त्यामुळेच त्यांना मध्य प्रदेशात 'मामा', 'मामाजी' म्हणून प्रेमाने संबोधले जाऊ लागले.

परंतु उत्तर प्रदेशात योगी आदित्यनाथ यांना मिळालेल्या विजयानंतर हे मामा अचानक वेगळेच वागू लागले. असे अचानक काय घडले?






उत्तर प्रदेशात योगी आदित्यनाथ यांना लोकांनी दुसऱ्यांदा निवडून दिले यामागे त्यांची जी 'टफ' म्हणजेच 'कडक – टणक – कठोर नेता' म्हणून जी प्रतिमा तयार झाली त्यास या विजयाचे श्रेय देण्यात आले. योगी आदित्यनाथ यांना 'बुलडोझर बाबा' म्हणूनही संबोधले जाते. एखाद्या अपराध्याची अवैध मालमत्ता तत्काळ बुलडोझरने जमीनदोस्त करण्याची मोहिम त्यांनी आरंभली. कोर्टाचा आदेश असो वा नसो ते अशा मालमत्ता उद्ध्वस्त करुन टाकत. त्यामुळेच त्यांना बुलडोझर बाबा म्हणून ओळखले जाऊ लागले.

आता शिवराजसिंगांना बुलडोझर बाबाचे अनुकरण करण्याची हुक्की आली आहे. आपणही आता मवाळ व प्रेमळ मामाच्या प्रतिमेतून बाहेर येण्याची गरज असल्याची त्यांना अचानक आठवण झाली. मग त्यांनी आता रुद्रावतार धारण करण्याचे ठरवले आहे. त्यामुळे त्यांनी आता मध्य प्रदेशातील अपराधी भूमाफिया यांना जाहीर दम देण्यास सुरुवात केली आहे. 'मकान खोदकर मैदान बना दूंगा' अशा डरकाळ्या ते फोडू लागले आहेत. उत्तर प्रदेश व कर्नाटकाच्या धर्तीवरच त्यांनी धर्मांतरविरोधी कायदाही संमत करुन टाकला आहे. लव्ह जेहादच्या कायद्याचाही त्यांनी पाठपुरावा सुरु केला आहे.



एवढेच नव्हे तर बुलडोझरबरोबर शिवराजसिंग अशी पोस्टर्स देखील मध्य प्रदेशात सर्वत्र झळकू लागली आहेत.

थोडक्यात काय आता शिवराजसिंग चौहान यांना त्यांचे मुख्यमंत्रीपदाचे दिवस संपत आले असावेत याची कुणकुण लागली असावी आणि ते टिकवून ठेवण्यासाठी त्यांनी अचानक हा नवा अवतार धारण केला असावा अशी चर्चा मध्य प्रदेशात ऐकायला येऊ लागली आहे. मुख्यमंत्री म्हणून शिवराजसिंग यांची ही चौथी पाळी आहे. त्यामुळे त्यांना पाचव्यांदा संधी मिळेल काय याबद्दल प्रश्नचिन्ह आहे.

ते काही असो, शेवटी अनुकरण ते अनुकरणच आणि नक्कल ती नक्कलच! पण शिवराजसिंग सध्या ही नक्कल करण्यातच गुंग आहेत!

पाहू, मतदार त्यांच्या या नव्या अवताराला कसा प्रतिसाद देतात ते!

२०२३ मध्ये विधानसभा निवडणूक होणारच आहे!

## विजयाची मस्ती!

उत्तर प्रदेशात भाजपचे संख्याबळ सत्तावन्न जागांनी कमी झाले पण त्यांचे बहुमत कायम राहिले.

लागोपाठ दुसऱ्यांदा योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखाली उत्तर प्रदेशात भाजपचे सरकार स्थापन झाले.

अलीकडच्या काळात भाजपने एक नवी पध्दत अवलंबिलेली आहे.

निसटता विजय असला तरी तो अशा काही अति–महाभव्य स्वरुपात साजरा करायचा की लोकांचे डोळे दिपले पाहिजेत.

उत्तर प्रदेशासारख्या देशातील सर्वात मोठ्या राज्यातील विजय साजरा करणे तर अपरिहार्य होते.

मग काय योगीमहाराजांच्या




शपथविधीसाठी केंद्रीय मंत्रिमंडळाचा सारा लवाजमा विश्वप्रिय ब्रह्मांडनायकांच्या नेतृत्वाखाली लखनौला रवाना झाला. त्याचप्रमाणे देशातले भाजपचे सर्व मुख्यमंत्री, भाजपच्या मित्रपक्षांचे किंवा भाजपबरोबर आघाडी सरकारांचे मुख्यमंत्री या सर्वांची हजेरी देखील अत्यावश्यक होती.

बिहारमध्ये मुख्यमंत्री नीतीशकुमार यांच्या नेतृत्वात भाजप व संयुक्त जनता दलाचे आघाडी सरकार सत्तेत आहे.

नीतीशकुमार यांनी भाजपचा वरचष्मा सहन केलेला असला तरी जेथे शक्य असेल तेथे ते त्यांचा विरोध प्रकट करायला विसरत नाहीत. अन्य मागासवर्गीयांची जनगणना करण्याच्या मागणीवरुन त्यांनी केंद्र सरकारबरोबर दोन हात सुरु ठेवले आहेत. या मुद्यावर त्यांनी राष्ट्रीय जनता दलाशी हातमिळवणी केली. त्यामुळे भाजपमध्ये त्यांच्याबद्दल संशयाचे वातावरण निर्माण





होणे स्वाभाविक होते.

त्यामुळेच भाजपने लखनौ येथे योगीमहाराजांच्या शपथविधीच्या निमित्ताने केलेल्या शक्तिप्रदर्शनात नीतीशकुमार जाणार काय असा प्रश्न चर्चेत होता. याचे आणखी एक कारण म्हणजे नीतीशकुमार यांना योगीमहाराजांची व त्यांच्या निखालस सांप्रदायिक राजकारणाची असलेली ॲलर्जी हेही आहे. यापूर्वी त्यांनी योगीमहाराजांना बिहारमध्ये प्रचाराला पाठवू नका म्हणून भाजप नेतृत्वाला स्पष्ट सुनावले होते.

पण नीतीशकुमार लखनौला गेले आणि योगीमहाराजांच्या राज्याभिषेकाला ते उपस्थित राहिले.

व्यासपीठावर त्यांना स्थान देण्यात आले.

योगीमहाराजांना त्यांनी शिष्टाचार पाळून उचित अशा शुभेच्छा देऊन त्यांचे अभिनंदनही केले. या राज्याभिषेकाला ब्रह्मांडनायक उपस्थित होते.

साहजिकच नीतीशकुमार यांच्यासह व्यासपीठावर उपस्थित प्रत्येक नेत्याने त्यांना अभिवादन करणे अपेक्षितच होते.

नीतीशकुमार यांनीही कमरेत लवून झुकून ब्रह्मांडनायकांना कुर्निसात केला खरा परंतु ब्रह्मांडनायकांना उत्तर प्रदेशातील विजयाची धुंदी आणि नशा अशी काही चढलेली आढळली की त्यांनी बिहारचा मुख्यमंत्री आपल्याला नमस्कार करीत आहे याची दखलही घेतली नाही.

नीतीशकुमार यांच्या नमस्काराला कोणताही प्रतिसाद न देता ब्रह्मांडनायकांनी त्यांच्याकडे सपशेल दुर्लक्ष केले. नीतीशकुमार यांना निमूटपणे हा अपमान गिळावा लागला.

कारण, बिहारमध्ये त्यांचा पक्ष ४३च्या अल्पमतात आहे तर भाजपचे संख्याबळ ७७ असूनही त्यांच्या पाठिंब्याने ते मुख्यमंत्रीपद उपभोगत आहेत. त्यामुळे असले अपमान झेलण्याची त्यांना सवय लागलेली असावी. अर्थात भाजपबद्दलची आपली नाराजी ते वेगळ्या तऱ्हेने व्यक्त करीत राहतात. बिहारमध्ये गेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपने विकासशील इन्सान पार्टी या पक्षाशी समझोता केला होता. या पक्षाचे काही आमदार निवडूनही आले होते. या पक्षाचे प्रमुख

मुकेश साहनी हे बिहार मंत्रिमंडळात पशुधन व मत्स्योद्योग मंत्री आहेत. मल्लाह समाजाचा हा पक्ष मानला जातो. नावाडी व मासेमारी करणारा हा समाज आहे. भाजपने त्यांच्या दादागिरीच्या राजकारणानुसार निवडणुकीनंतर या पक्षाचे आमदार फोडले व सर्वांना भाजपमध्ये सामील करुन घेतले.

एवढेच नव्हे तर आता मुकेश साहनी यांना मंत्रिपदावरुन डच्चू द्यावा अशी मागणीही सुरु केली.

भडकलेल्या मुकेश साहनी यांनी नीतीशकुमार यांनी सांगितले तरच राजीनामा देऊ अशी अट घातली.

नीतीशकुमार यांनी यावर सोयीस्कर मौन पाळले आणि मुकेश साहनी यांचे मंत्रीपद चालूच आहे.

नुकत्याच एका सकाळी मुकेश साहनी यांना त्यांच्या बंगल्यावरील मंत्रीपदाची पाटी गायब होणे, त्यांच्या कार्यालयावरील नाव गायब होणे अशा भाजप व संघपरिवाराच्या वैशिष्ट्यपूर्ण अशा कारवायांचा त्रास सहन करावा लागत आहे.

एवढे होऊनही नीतीशकुमार यांनी त्यांचा राजीनामा घेतलेला नाही.

आता नाईलाजाने भाजपच्या मंडळींनी प्रचार सुरु केला आहे की मुकेश साहनी हे विधान परिषदेचे सदस्य आहेत आणि त्यांची मुदत जुलैमध्ये संपत आहे. त्यामुळे जुलैनंतर त्यांचे मंत्रीपद आपोआपच जाणार आहे. त्यामुळे त्यांचे मंत्रीपद आता अल्पजीवी आहे. त्यांना काय त्याचा आनंद घ्यायचा तो घेऊ द्यात!



या सर्व गोष्टींचा अर्थ काय?

बिहारमध्ये भाजप आणि नीतीशकुमार यांच्यातील संबंध वाटतात तेवढे चांगले नाहीत. नीतीशकुमार यांचीही चांगलीच कोंडी झाली आहे.

आता 'ये बाहेर अंडे फोडुनि शुभ्र मोकळ्या वातावरणी ' असे ते कधी करतील याचीच प्रतीक्षा आहे!


## कर्नाटक भाजपमधील नाटक!

कर्नाटकात कट्टर हिंदुत्वाचे व धार्मिक राजकारण करण्याचे भाजपचे प्रयत्न जारी असले तरी त्याला आता खुद्द भाजपमधूनच विरोध सुरु झाला आहे. अलीकडेच हिजाब किंवा बुरखा परिधान करण्याच्या मुद्यावरुन कर्नाटकातील वातावरण तापविण्यात आले. धर्मांतरालाच(स्वेच्छेने देखील) अपराध ठरविणारा कर्नाटक सरकारचा कायदाही प्रचंड वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे.

मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांची कौटुंबिक पार्श्वभूमि ही धर्मनिरपेक्ष असली तरी भाजपमध्ये येऊन त्यांना आता मुख्यमंत्रीपद मिळाल्यामुळे आपली निष्ठा सिध्द करण्यासाठी ते चार पावले पुढे जाऊन कट्टर सांप्रदायिकता आणि धार्मिक राजकारण करताना आढळत आहेत.

यातून ते स्वतःची प्रतिमा खराब करीतच आहेत परंतु आतापर्यंत एक कार्यक्षम मंत्री म्हणून त्यांनी मिळविलेला नावलौकिकही धुळीस मिळताना दिसून येत आहे. कर्नाटक भाजपमध्ये एक मोठी खिचडी तयार झाली आहे. यामध्ये काँग्रेस व जनता दल(धर्मनिरपेक्ष) या पक्षांतून आलेल्यांचीही भाऊगर्दी आहे. ही मंडळी भाजपच्या राजकारणाला सरावलेली नाहीत. त्याचप्रमाणे ज्या आमदारांच्या मतदारसंघांमध्ये मुस्लिम मतदार संख्या लक्षणीय किंवा निकाल प्रभावित करण्याएवढी आहे त्या आमदारांना आता हिजाब बंदी किंवा धर्मांतर बंदी कायद्यामुळे पराभव समोर दिसू लागला आहे. त्यामुळे आता त्यांनीच पक्षाच्या विरोधात तसेच या कायद्याच्या विरोधातही भूमिका घेण्यास सुरुवात केली आहे.






अर्थात या प्रकरणातली खरी गोम पुढेच आहे.

ही नाराज आमदार मंडळी आता माजी मुख्यमंत्री बीएस येद्युरप्पा यांच्या संपर्कात राहू लागली आहेत.

येद्युरप्पा हे काही धर्मनिरपेक्ष नाहीत. तेही संघाचेच आहेत. परंतु ते खुल्या मनाचे राजकीय नेते म्हणून ओळखले जातात.



मुख्यमंत्री असताना त्यांनी मुस्लिम आणि ख्रिश्चन समाजाशी उत्तम संबंध राखले होते आणि कधीही धर्मविरोधी राजकारणाला प्रोत्साहन किंवा पाठबळ दिले नव्हते. त्यामुळेच या नाराज आमदारांना आता येद्युरप्पा यांचा आधार घेण्याची गरज भासू लागली आहे.

येद्युरप्पा यांनी मोदी–शहा जोडगोळीच्या दबावाखाली मुख्यमंत्रीपद सोडलेले असले तरी ते राजकारणात सक्रिय आहेत आणि योग्य संधीच्या प्रतीक्षेत आहेत असे त्यांचे समर्थक सांगतात. त्यामुळे पुढच्या वर्षी कर्नाटकात होणारी विधानसभा निवडणूक उत्कंठावर्धक होणार आहे.

त्यामध्ये नाराज येद्युरप्पा कोणती भूमिका वठवणार याकडेच आता सर्वांच्या नजरा लागलेल्या आहेत!



## घरासाठी घर्घर घर्घर!!

राजकारणी मंडळींनी वरवर कितीही आधुनिकतेचा व बुध्दीप्रामाण्यवादाचा आव आणला तरी शकुन–अपशकुनावर त्यांचा नितांत विश्वास असतो.

दिल्लीत संसदसदस्यांना आणि मंत्र्यांना निवासस्थाने दिली जातात.

यावेळी या राजकीय मंडळींचे खरे स्वरुप समोर येते. वास्तू व वास्तूशास्त्र, संबंधित घराचे प्रवेशद्वार कोणत्या दिशेला आहे, त्याचा नंबर काय, रस्ता व परिसर कोणता, घराला खिडक्या किती दरवाजे किती अशा अनेक बारीकसारीक तपशीलांची माहिती घेऊन ते पसंत केले जाते.

दिल्लीच्या राजकारणात अनेक घराणी आहेत. त्यातलेच एक घराणे म्हणजे ग्वाल्हेरचे शिंदे घराणे!

राजमाता विजयाराजे, त्यांचे सुपुत्र माधवराव, त्यांचे चिरंजीव ज्योतिरादित्य, माधवरावांच्या बहिणी वसुंधरा राजे आणि यशोधरा राजे वगैरे वगैरे! आता तर ज्योतिरादित्य



यांचे चिरंजीव महाआर्यमान यांनीही राजकारणात उडी ठोकण्याची तयारी केल्याचे समजते. मध्य प्रदेश क्रिकेट असोसिएशनच्या मार्गाने ते राजकारणात उतरणार असल्याची माहिती मिळते.

तर ज्योतिरादित्य शिंदे यांचा विषय चालू आहे. सध्या ग्वाल्हेरच्या गादीचे ते मुख्य वारसदार व महाराज आहेत. काँग्रेसकडून सर्व सत्ता उपभोगल्यानंतर आता त्यांना विरोधातील काँग्रेसमध्ये घुसमट होऊ लागली.

मग त्यांनी मध्य प्रदेशातील काँग्रेसचे आमदारांमधील स्वतःच्या गटासह भाजपमध्ये प्रवेश केला. परिणामी मध्य प्रदेशातील काँग्रेसचे कमलनाथ



सरकार पडले. ज्योतिरादित्य यांना त्या बदल्यात राज्यसभेचे सदस्यत्व केंद्रीय मंत्रीपद देण्यात आले. त्यांच्या गटाच्या आमदारांना मध्य प्रदेशाच्या मंत्रिमंडळात मंत्रीपदे देण्यात आली.

२०१९ची लोकसभा निवडणूक हरलेल्या ज्योतिरादित्य यांना दिल्लीतील २७ सफदरजंग मार्ग येथील बंगला सोडावा लागला होता.

मोठ्या जड अंतःकरणाने त्यांनी तो सोडला होता. कारण या बंगल्यात त्यांचे वडिल माधवराव यांचे दीर्घकालीन वास्तव्य होते.



ते काँग्रेसमध्ये असल्याने भाजपच्या केंद्र सरकारने त्यांना तो बंगला सोडण्यास भाग पाडले होते.

परंतु आता भाजपमध्ये आल्यानंतर आणि राज्यसभेत प्रवेश केल्यानंतर त्यांना पुन्हा २७ सफदरजंग बंगल्याचे वेध लागले.

दरम्यानच्या काळात तो बंगला उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्रीपदी राहिलेले रमेश पोखरियाल निःशंक यांना देण्यात आला होता. ते माजी मुख्यमंत्री व केंद्रीय मंत्री असल्याने ते हा बंगला राखू शकतात. पण ज्योतिरादित्य यांच्या या बंगल्यात भावना गुंतलेल्या असल्याने त्यांनी हाच बंगला परत मिळावा असा आग्रह धरला. पोखरियाल यांनी विविध कारणे देऊन बंगला सोडण्यास टाळाटाळ सुरु केली. अर्थात ज्योतिरादित्य आणि त्यांची ती काय बरोबरी?

भाजपच्या नेत्यांनी त्यांना निर्वाणीचा इशारा देऊन बंगला सोडण्यास सांगितले आणि आता येत्या महिनाभरात ते बंगला सोडतील असे सांगण्यात येते. त्यामुळे ज्योतिरादित्य यांना पुन्हा त्यांना हवा तो शुभशकुनी बंगला मिळेल व ते तेथे दीर्घकाळ वास्तव्य करु शकतील.

केंद्रीय मंत्रिमंडळातून आश्चर्यकारकरीत्या काढून टाकण्यात आलेले दोन (आता माजी) मंत्री प्रकाश जावडेकर यांना त्यांचा कुशक मार्गावरील बंगला सोडण्यास सांगण्यात आले. त्यांनी ईमानइतबारे तो सोडला आहे. पण त्यांना मिळालेला तुघलक लेनमधील बंगला रिकामा न झाल्याने त्यांना कुशक मार्गावरच तूर्तास रहावे लागत आहे. रविशंकर प्रसाद यांनाही त्यांचा बंगला सोडावा लागणार आहे आणि लवकरच ते दुसऱ्या बंगल्यात जातील. घरासाठी किती आटापिटा?

चालयाचेच! राजकारण्याचे चोचले!



# परीक्षा पे चर्चा .... अधिकाऱ्यांचीच अग्निपरीक्षा!

ब्रह्मांडनायकांना उपदेशामृत, प्रवचने झाडण्याची मोठी आवड नव्हे तर व्यसन जडले आहे.


बरं, थेट लोकांशी संपर्क साधून ते काही क्रांतिकारक गोष्टी सांगत असते तर तेही मान्य होण्यासारखं झालं असतं.

पण नेहमीच्याच सर्वसाधारण गोष्टी ते त्यांच्या नाटकी स्टाईलने सांगून काहीतरी मोठी मर्दुमकी गाजवत असल्याचा आव आणत असतात.

नुकतीच त्यांनी 'परीक्षा पे चर्चा' केली. त्यासाठी देशभरात तयारी करण्यात आली. सर्वांना वरुन आदेश सोडण्यात आले होते आणि अक्षरशः अधिकाऱ्यांना व केंद्रीय शिक्षण संस्थांच्या अधिकाऱ्यांना सळो की पळो करुन सोडण्यात आले होते. त्यामुळे ब्रह्मांडनायकांचा हा कार्यक्रम संपल्यानंतर या सर्व संस्थांमधील अधिकाऱ्यांनी अक्षरशः सुटकेचा निःश्वास सोडला.

अशाच एका अधिकाऱ्याने अगदी संतापून सांगितले की गेले दोन आठवडे या कार्यक्रमाची सार्वत्रिक जाहीरातबाजी करण्यासाठी प्रत्येक अधिकाऱ्याला चोवीस तास जुंपण्यात आले होते. त्यांनी ट्वीटर, इन्स्टा, फेसबुक ज्याज्या माध्यमाद्वारे शक्य आहे त्या माध्यमातून या कार्यक्रमाची जाहिरातबाजी करणे. प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या दिवशी प्रवचन ऐकणाऱ्या विद्यार्थ्यांची गर्दी दाखविणे आणि त्यासाठी विद्यार्थ्यांना सक्तीने एकत्र करणे, कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांच्या ब्रह्मांडनायकांची थोरवी गाणाऱ्या मुलाखती एकत्र करणे, त्यांचे









फोटो पंतप्रधान कार्यालयाकडे पाठवणे, कार्यक्रमाची प्रसिध्दी पत्रके जारी करुन आपापल्या भागातील माध्यमात त्यांना प्रसिध्दी मिळवून देणे अशा सर्व गोष्टी या कर्मचारी वर्गाकडून सक्तीने करवून घेण्यात आल्याचे सांगण्यात आले.

एका अधिकाऱ्याने कडवटपणाने सांगितले की या गोष्टी आम्हीपण नेहमीच मुलांना सांगत असतो आणि त्यांना प्रोत्साहित करुन त्यांच्याकडून अभ्यास करवून घेत असतो. पण केवळ नाटकीपणा आणि जाहिरातबाजी करुन विनाकारण 'शो-बाजी' केली जात

आहे. भाजपचे ज्येष्ठ व वयोवृध्द नेते लालकृष्ण अडवानी यांनी या नेत्याबद्दल बोलताना, 'ते एक चांगले इव्हेंट मॅनेजर' आहेत. अशी टिप्पणी केली होती. ती खरीही आहे कारण त्यांनी तसले नाटकी प्रकार करतच देशाचे नेतृत्व मिळवले आहे!

## पत्रकारांना संसदेत मज्जाव कायम!

करोनाचा कहर संपलेला असला तरी देशाच्या संसदेत मात्र करोनाविषयक बंधने कायम आहेत.

अर्थात संसदीय कर्मचारी, खासदार यांना आता जाचक अशा बंधनातून मुक्त करण्यात आले आहे.

एवढेच नव्हे तर ताज्या फतव्यानुसार माजी खासदारांनाही संसदेत प्रवेश देण्याची कृपा करण्यात आली आहे. परंतु लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून मानल्या जाणाऱ्या माध्यम प्रतिनिधींवर मात्र करोनाची बंधने कायम आहेत. संसदगृहाच्या वर्तमान म्हणजे गोलाकार अशा ऐतिहासिक वास्तूमध्ये ऐतिहासिक सेंट्रल हॉल आहे.

खासदार, केंद्रीय मंत्री, वरिष्ठ पत्रकार, माजी खासदार यांचे भेटीगाठींचे सर्वात लोकप्रिय ठिकाण!

हा सेंट्रल हॉल करोनाच्या प्रारंभापासून खासदार, माजी खासदार आणि पत्रकारांना बंद करण्यात आला.

करोनामुळे सेंट्रल हॉलमध्येही काही खासदारांच्या बसण्याची व्यवस्था करावी लागल्याने तो पत्रकारांना बंद करण्यात आला असे कारण देण्यात आले. परंतु बाहेर जगात सर्वत्र सर्व गोष्टी खुल्या झाल्यानंतरही संसद मात्र पत्रकारांसाठी अस्पर्श राहिली.

मोजक्या पत्रकारांना अधिवेशनकाळात चिठ्ठ्या टाकून एक-दोन दिवसांसाठी संसदेत वार्तांकनाची संधी दिली जाऊ लागली.

सेंट्रल हॉलमध्ये प्रवेशबंदी कायम ठेवण्यात आली. आता या जुन्या वास्तूमध्ये आणखी दोनच अधिवेशने होणार आहेत. पावसाळी व हिवाळी अधिवेशन!

यानंतर पुढील वर्षापासून लहरी नेतृत्वाच्या इच्छेनुसार संसदेचे कामकाज नव्या वास्तूत सुरु होईल. या नव्या वास्तूमध्ये सेंट्रल हॉल नाही. त्यामुळे खासदार, मंत्री यांना भेटण्याची संधीच खतम करण्यात आलेली आहे.

थोडक्यात काय तर खानदानीपणा जाऊन निव्वळ उठवळपणाची नवी राजकीय संस्कृती रुजवण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

लहरी राजेमहाराजे पूर्वी असेच बेलगाम आचरण करीत असत.

त्यांचाच हा एकविसाव्या शतकातील अविष्कर मानावा लागेल!

▪▪





# Nanded City, Pune

The Maximum City

Sinhagad Road, Pune

A 700 Acre Mega Township on Sinhagad Road, Pune.

## प्रत्येक घराला एक मन असतं.
## प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्व असतं.

आमच्या प्रत्येक घराचं मन आहे उत्साही, चैतन्यशील, आशावादी, जगण्याच्या ऊर्जेने पुरेपूर भरलेलं, आणि आमच्या शहराचं व्यक्तिमत्व आहे अभिरूचिसंपन्न, सुसंस्कृत, सर्वसमावेशक, निसर्गप्रेमी आणि भविष्यसन्मुख. कारण आम्ही आहोत नांदेड सिटी, ७०० एकर्सचं अतुलनीय जग, जिथे आहे संपूर्ण कुटुंबाच्या आणि कुटुंबातल्या प्रत्येकाच्या सुखाचा, सुरक्षिततेचा, आरोग्याचा आणि आनंदाचा सखोल विचार.

### आनंदी संकुल



**कुटुंबासाठी प्रफुल्लित, प्रदूषणमुक्त पर्यावरण**

- इको पार्क व ऑक्सिझोन
- १३,२०० पेक्षा जास्त झाडांची लागवड
- १२० एकर्सची हिरवाई

### CBSE व ICSE शाळा



**विद्यार्थ्यांसाठी प्रगतीशील वातावरण**

- CBSE व ICSE बोर्डाच्या शाळा
- दर्जेदार शिक्षण
- वॉक-टू-स्कूल मॉडेल

### जिमखाना



**तरूणाईसाठी अगदी आदर्श सिटी**

- सायकलिंग व जॉगिंग ट्रॅक्स
- २४,००० स्क्वे. फूट जिम्नॅशियम
- क्रीडांगण-द स्पोर्टस् कॉम्प्लेस (प्रस्तावित)
- विविध खेळांच्या स्पर्धा व कोचिंग

**नांदेड सिटी, उत्साही मन आणि उमदं व्यक्तिमत्व यांचा देखणा मिलाफ!**

A project by MAGARPATTA CITY The pride of Pune

Call: 020-67275300 / 1 / 2

CREDAI PUNE METRO

www.nandedcitypune.com

info@nandedcitypune.com

An ISO 9001:2008, ISO 14001:2004, OHSAS 18001:2007 certified company.

tempestadvertising.com

|अभंग वारसा|
लेख-३

# भक्ती देवळात नाही आणि मशिदीतही

**सचिन परब**

**संत नामदेवरायांची गुरू ग्रंथसाहेबातली पदं त्यांचा क्रांतिकारक विचार दाखवून देतो. माझी पूजा ही देऊळ किंवा मशिदीच्या बाहेरच होते, हे सत्य त्यांनी सातशे वर्षांपूर्वी सांगितलं होतं.**



थिंक ग्लोबली अँड ऍक्ट लोकली, हा विसाव्या शतकातला विचार सर्वच संतांनी काहीशे वर्षांपूर्वी अमलात आणलाय. पण संत नामदेवरायांच्यात हा विचार लख्खपणे दिसतो. त्यांनी पाच वेळा तरी देश पालथा घातला. तिथे महाराष्ट्राचा वारकरी विचार रूजवला.

कबीर, मीरा, नानक, नरसी यांच्यासह देशभरातल्या सगळ्या प्रमुख संतांनी त्यांचं ऋण मान्य केलंय. आजही देशभर त्यांची शेकडो मंदिरं आहेत. नामदेव हे आडनाव आणि समाजनाव लावणारी लाखो माणसं महाराष्ट्राबाहेर आहेत. या देशावर इतकी वर्षं इतका प्रभाव आहे दुसऱ्या कुणाचा? विशेषतः शिखांचा धर्मग्रंथ गुरुग्रंथसाहेबातली त्यांची ६१ पदं वाचताना हे प्रकर्षानं जाणवतं.

नामदेवरायांच्या मराठी गाथेतल्या अनेक अभंगांवर प्रक्षिप्त किंवा बदललेले असल्याचे आरोप झालेत. त्या तुलनेत नामदेवरायांची हिंदी पदं ओरिजिनल ठरतात. गेल्या दोन अडीचशे वर्षांत मराठी संतसाहित्यात घुसखोरी झाली. तशी गुरुग्रंथसाहेबातल्या पवित्र मानल्या गेलेल्या पदांमध्ये बदल झाल्याची शक्यता नाही. त्यात नामदेवराय ते बंडखोर म्हणून. स्वतःला शूद्र म्हणवणारे, जातभेदावर प्रहार करणारे, कर्मकांड नाकारणारे आणि निर्गुणाचा पुरस्कार करणारे विठ्ठलाचे भक्त नामदेव उलगडत जातात. त्यातलं हे एक पद.

आजु नामे बीठुला देखिआ मूरखको समजाउ रे ॥
पांडे तुमरी गाइत्री लोधे का खेतु खाती थी ।
लै करि ठेगा टगरी तोरी लांगत लांगत जाती थी ॥१॥
पांडे तुमरा महादेउ घउले बलद चढिआ
आवतु देखिआ था ।
मोदी के घरि खाणा पाका वाका लडका मारिआ था ॥२॥
पांडे तुमरा रामचंदु सो भी आवतु देखिआ था ।
रावन सेती सरबर होई घरकी जोइ गबाई थी ॥३॥
हिंदु अंधा तुरकू काणा दुहांते गिआनी सिआणा ।
हिंदू पूजै देहुरा मुसलमाणु मसीत,
नामे सोई सेविआ जह देहुरा न मसीत ॥४॥

या पदातलं 'आजु नामे बीठुला देखिआ मूरखको समजाउ रे ॥' हे ध्रुवपदच मस्त आहे. त्याचा अर्थ, 'आज मी नामदेव, विठ्ठलाला साक्ष ठेवून मूर्खांना समजतोय.' यात स्टेटमेंट आहे. कन्विक्शन आहे. यातले मूर्ख कोण? त्याचं पुढे उत्तर आहे, पांडे.

**पांडे तुमरी गाइत्री लोधे का खेतु खाती थी ।**
**लै करि ठेगा टगरी तोरी लांगत लांगत जाती थी ॥१॥**

पांडे म्हणजे पंडित किंवा ब्राह्मण. उत्तरेतला सर्वसामान्यपणे ब्राह्मणांना हाक मारायचा शब्द. गायत्री या शब्दाचे दोन अर्थ इथे अपेक्षित आहेत, गाय आणि वैदिक

मंत्रांची कर्मकांडी परंपरा. लोधी म्हणजे शेतकरी. नामदेव महाराज सांगताहेत, 'ब्राह्मणा, तुझी गायत्री शेतकऱ्याच्या शेतात पिकं खात होती. तेव्हा देवाने तिच्या पायावर दांडा घातला. तेव्ही मी तिला लंगडत लंगडत जाताना पाहिलंय.'

नामदेवरायांनी ब्राह्मणांना उद्देशून लिहिलेले मराठी अभंगही आहेत. तोच फॉर्म इथेही दिसतो. ब्राह्मणाची गायत्री गाय शेतकऱ्याच्या शेतात येऊन चोरून चरतेय. इथे शेतकरी म्हणजे वर्णाच्या भाषेत शूद्रातिशूद्र, वर्गाच्या भाषेत कष्टकरी आणि जातीच्या भाषेत बहुजन. ब्राह्मणा, तुझी गायत्री बहुजनांच्या शेतात शिरलीय. माझ्या देवाने दंडुका मारून तिचं तंगडं तोडलंय. तिची लंगडी चाल मी बघितलीय. याचाच अर्थ असा काढता येतो, देव सांगतोय मंत्रांची कर्मकांडी परंपरा अर्धवट आहे. बहुजन समाजाने त्याच्या नादी लागू नये.

**पांडे तुमरा महादेउ घउले बलद चढिआ**
**आवतु देखिआ था ।**
**मोदी के घरि खाणा पाका वाका लडका**
**मारिआ था ॥२॥**

याचा अर्थ असा, 'ब्राह्मणा, तुझ्या महादेवालाही मी पांढऱ्या बैलावर बसून येताना पाहिलंय. राजाच्या घरी जेवण बनवण्यासाठी त्याने त्याचा मुलगा मारला होता.'

इथे नामदेवराय पुराणातल्या श्रियाळ राजाच्या गोष्टीचा दाखला देतात. पाहुणा म्हणून आलेल्या शंकराने श्रियाळ राजा आणि चांगुणा राणीसमोर अट ठेवली. राजाने त्यांच्या एकुलत्या चिलया बाळाला उखळीत घालून मारलं. त्याचं मांस शिजवून ते माझ्यासोबत खाल्लं, तरच मी जेवेन. राजाराणी त्या परीक्षेत पास झाले वगैरे गोष्ट आहे. भक्तीचं, आतिथ्यशीलतेचं आणि व्रतवैकल्यांचं महात्म्य सांगण्यासाठी ही कथा वापरली जाते. पण नामदेवराय इथे नेमक्या उलट पद्धतीने प्रश्न विचारतात. बाह्मणा, तुझा हा महादेव असा कसा अमानुष?

**पांडे तुमरा रामचंदु सो भी आवतु देखिआ था ।**
**रावन सेती सरबर होई घरकी जोइ गबाई थी ॥३॥**

नामदेवराय सांगतात, 'ब्राह्मणा, तुझ्या रामचंद्रालाही मी येताना पाहिलंय रे. रावणाशी युद्ध करेपर्यंत त्याने तर आपली लग्नाची बायकोही गमावली होती.'

'पांडे, असा कसा तुझा राम?' असा प्रश्न नामदेवराय विचारत असतील, यावर लगेच विश्वासही बसत नाही. कारण नामदेवांनी गुरू ग्रंथसाहेबामधल्याच इतर पदांमधे रामभक्तीचा, रामनामाचा महिमा गायलाय. इतरही मराठी आणि हिंदी रचनांमधेही तो येतो. त्यांना सांगायचं असावं, ब्राह्मणी विचारांनी रंगवलेला राम वेगळा आहे आणि वारकऱ्यांचा राम वेगळा आहे. चमत्कारांऐवजी प्रभू रामचंद्रांनी दाखवलेला निरामय जगण्याचा आदर्श समजून घेण्याचा हा आग्रह आहे. हे आजच्या संदर्भात समजून घ्यायचं तर गांधीजींनी सांगितलेला राम वेगळा आहे आणि हिंदुत्ववाद्यांचा राम वेगळा आहे. शेवटच्या कडव्यात ते अधिक स्पष्ट होतं.

**हिंदु अंधा तुरकू काणा दुहांते गिआनी सिआणा ।**
**हिंदू पूजै देहुरा मुसलमाणु मसीत,**
**नामे सोई सेविआ जह देहुरा न मसीत ॥४॥**

शेवटी नामदेवराय धार्मिक कर्मकांडाच्या विरोधात भक्तीचं महत्त्व सांगतात, 'हिंदू आंधळा आहे. त्याचे दोन डोळे गेलेत. मुसलमान काणा आहे. त्याचा एक डोळा गेलाय. दोघांपेक्षाही ज्ञानी खरा डोळस आहे. हिंदू देवळात पूजतो. मुसलमान मशिदीत पूजतो. नामदेव मात्र तिथेच पूजतो, जिथे देऊळही नाही आणि मशीदही नाही.'

याच रचनेशी साधर्म्य असणारी वचनं गुरू गोरक्षनाथ आणि संत रोहिदासांच्या नावानेही आहे. गोरखनाथ, नामदेव आणि रोहिदास ही उत्तर भारतातल्या संतमताची परंपरा त्यातून अधोरेखित होते. या क्रांतिकारी रचनेत नामदेवरायांनी कट्टर धर्मवाद्यांच्या मुस्काटात खणकन वाजवलीय. आता तरी



शहाणे बना. धर्माने आंधळे होऊ नका. मंदिर मशीद वाद करू नका. देऊळ किंवा मशिदीच्या पलीकडेच खरी पूजा होऊ शकते, असं कीर्तन करत मंदिर फिरवणारे नामदेवराव सांगतात. कर्मकांडी धर्माच्या चौकटीत भक्ती असूच शकत नाही. रामाच्या देवळावरून वैचारिक, मानसिक आणि प्रत्यक्षातली हिंसा हा तर अधर्मही आहे.

नामदेवराय, तुम्ही सातशे वर्षांपूर्वी हे सांगितलं, तरी आम्ही समजू शकत नाही. तुम्ही आम्हाला माफ करा. आम्ही खरं तर तुमची माफी मागण्याच्याही लायकीचे नाही.

**(लेखक हे रिंगण या संतविचारांचा सामाजिक सांस्कृतिक मागोवा घेणाऱ्या वार्षिक अंकाचे संपादक आहेत. संपर्क: ९९८७०३६८०५)**

■■

## शेवटचे पान






# ‘अभिजात’ कशाला? मी हाय तशी बरी हाय

मेहेरबान राजे हो
एक गाऱ्हाण ऐकाव जी
माझ्या ‘माय’ ला मराठी ला
‘अभिजात’ चा दागिना नको जी
आता अब्रूपण जाईल ना जी
तुमच्या तंट्यापायी माझा जीव जातो जी
इतक सगळ वंगाळ बोलताय
मी खाली मान घालून रडते जी
धर्माच्या नावावर
जातींच्या नावान
काय इपरित बोलता जी
माझी माय मातीत रूजली
अंकुरली, फुलली ना जी
संकट कोसळली तरी
धीर द्यायला पाठीशी राहिली
हे सगळ संपल का जी
दुकानावर मोठ्या पाट्या माझ्या लावता
हिडीस पिडीस संपत नाही जी
माझ्या सगळ्या बोल भाषा नात्यातल्या
जीव लावतात हो सगळ्यांना
एक एक करून संपायला लागल्या जी
आता मला ‘अभिजात’चा साजशृंगार का?
परवा पलिकडल्या वस्तीतून लेकरू आलं
म्हणल, अंकल स्वीट दिलय डॅडीन
माझी ॲडमिशन झाली लंडनला
उद्या मी फ्लाय होणार बर का
म्हणल पोरा मोठा हो पण ‘माय’ ला इसरू नको
कशी आईवानी सांभाळली ना
कपडा लत्ता दाना पानी सगळ दिल
उगा ‘अभिजात’ म्हटल की नाळ तुटते
म्हणून कशाला ‘अभिजात’
मी हाय तशी बरी हाय.

